मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.


अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत



अनुक्रमणिका



वि. सा. संघ, महिला समिती तर्फे दि. १५–१०–७७ ला झालेला '६ कवियित्री–एक समीक्षक' या कार्यक्रमाचे वेळी.



सांस्कृतिक समितीच्या वतीने आयोजित "तीन कवी एक समीक्षक" या कार्यक्रम मालिकेतील पहिला कार्यक्रम–तीन कवीं पैकी श्रीमती सुशीला शंकर काव्यवाचन करतांना–अरुणा पवार, श्रीपाद जोशी, उल्हास मनोहर.

'महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ' पुरस्कृत विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

विदर्भ साहित्य संघ

विदर्भ विषय: सारस्वती जन्मभू:

ऑक्टोबर-नोव्हेंबर १९७७

आश्विन-कार्तिक १८९९

संपादक :

वि. बा. प्रभुदेसाई

सहसंपादक

शिरीष गोपाळ देशपांडे

मूल्य पाच रुपये) 卐 (वर्ष ३३, अंक ७-८

हेंचि दान दे गा.....

वैचारिक व ललित लेख, कथा आणि कविता अशा प्रकारच्या विविध साहित्याने नटलेला हा दिवाळी अंक रसिकांना सादर करताना आम्हांला अतिशय आनंद वाटतो. 'विदर्भ साहित्य संघा'चे मुखपत्र या नात्याने प्रामुख्याने विदर्भातील साहित्याला प्रोत्साहन देण्याचे उद्दिष्ट 'युगवाणी' समोर असणे स्वाभाविकच आहे. असे असले तरी, 'युगवाणी'चा लेखकवर्ग हा प्रादेशिक मर्यादांनी सीमित झालेला नाही हे सहज ध्यानात यावे. विदर्भाप्रमाणेच, मराठवाडा, कोकण, पश्चिम महाराष्ट्राचा उर्वरित भाग, गोवा इत्यादी मराठी भाषिक प्रदेशांतील अनेक साहित्यिकांनी स्वयंस्फूर्तपणे आपापले साहित्य पाठवून 'युगवाणी' विषयी ची स्नेहभावना वेळोवेळी प्रगट केलेली आहे. हा लोभ असाच कायम असू द्यावा, हीच माझी अंतःकरणपूर्वक प्रार्थना.

'युगवाणी'चे लेखक, चित्रकार, जाहिरातदार आणि सर्व रसिक वाचक यांना दीपावली व नवे वर्ष आनंदाचे व उत्कर्षाचे जावो, अशी शुभकामना मी या प्रसंगी व्यक्त करतो.

अनुक्रमणिका

संपादक मंडळ :

सुरेश डोळके, श्रीधर शनवारे, सुनील सुभेदार, बजरंग सरोदे, यशवंत मनोहर, म. वा. कुंडले

युगवाणी : दिवाळी १९७७ अंतरंग

दहा लेख

चार कथा

दोन दीर्घ कविता

तीस कविता

टीप :—युगवाणी ऑगस्ट–सप्टेंबर, १९७७ च्या अंकावरील मुखपृष्ठ : प्रकाश कावळे

अनुक्रमणिका

वि० भि० कोलते / तें कटक वानिताये कवि र्नारदृ

नरेंद्र कवीच्या 'रुक्मिणी स्वयंवर' या काव्यातील फक्त ८७९ ओव्या आज उपलब्ध आहेत. त्यातील शेवटची ओवी अशी

तेय मुखांचा आंकणा चंदृ : त्यागें जितिला क्षीर समृदृ
तें कटक वानिताये कवि र्नारदृ : यादवरायाचे.

चंद्र हा ज्याच्या मुखाचा आंकणा=अंकित आहे, म्हणजेच ज्याचे मुख चंद्रापेक्षा अत्यंत सुंदर आहे, आणि ज्याने आपल्या 'त्यागें'=दानाने, अर्थात, औदार्याने क्षीरसमुद्रालाही जिंकले आहे त्या 'यादवरायाचे कटक र्नारदृ कवि वानिताये' असा याचा अर्थ आहे. या काव्यावरील टीपग्रंथात 'कटक=सैन्य' असा अर्थ दिलेला आहे. तो स्वीकारून 'कटक=सैन्य' हा अर्थ मी, त्या काव्याच्या माझ्या संपादनातील शब्दकोशात दिलेला आहे. इतरांनीही या ओवीतील कटक शब्दाचा अर्थ 'सैन्य' असाच केलेला आढळतो. या अर्थाचा आता पुर्नविचार केला पाहिजे.

नरेंद्राचे हे अपूर्ण काव्य नरेंद्राच्याच नावावार पूर्ण करण्याचे तीन प्रयत्न झाल्याचे, आतापर्यंत उपलब्ध झालेल्या पोथ्यांवरून दिसते. (१) २९३९ ओव्यांचे संपूर्ण रुक्मिणी स्वयंवर. हे काव्य प्रथम महन्त श्रीकृष्णदास महानुभाव, हैद्राबाद यांनी मूळ स्वरूपात इ. स. १९७० मध्ये प्रसिद्ध केले. याच काव्याची छायाचित्रे, प्रस्तावना व शब्दकोश यांसहित एक सुंदर आवृत्ती डॉ. सुरेश डोळके यांनी इ. स. १९७१ मध्ये प्रसिद्ध केली आहे. (२) 'अठराशते रुक्मिणी स्वयंवर.' स्थूल मानाने १८०० ओव्यांचे हे काव्य मला उपलब्ध झाले. 'युगवाणी'—नागपूर, ऑगस्ट–सप्टेंबर, १९७३ व डिसेंबर–जानेवारी, १९७४ पाहा. (३) 'नरेंद्र पंधरासें'—सुमारे १५०० ओव्यांचे हे रुक्मिणी स्वयंवर काव्य मला उपलब्ध झाले. त्याचा परिचय 'महानुभाव' मासिक, औरंगाबाद, मे, १९७४ च्या अंकात मी करून दिला आहे.

ही तिन्ही 'रुक्मिणी स्वयंवर' काव्ये नरेंद्राच्याच नावावर आहेत. त्यांत आरंभी नरेंद्राच्या अपूर्ण 'रुक्मिणी स्वयंवरा'च्या ८७९ ओव्या घेतलेल्या असून बाकीचा भाग निरनिराळ्या व्यक्तींनी आपापल्या कुवतीप्रमाणे पूर्ण केला आहे. वर उध्दृत केलेल्या ओवीच्या संदर्भात या तिन्ही काव्यांत ज्या विचारार्ह गोष्टी आढळतात त्या पुढीलप्रमाणे:—

(१) २९३९ ओव्यांच्या संपूर्ण रुक्मिणी स्वयंवरात ही ओवी जशीची तशी घेतलेली नाही. तिचा उत्तरार्ध बदललेला आहे. ती ओवी अशी

तेय मुखाचा आंकणा चंदृ त्यागें जीतीला क्षीरसमुदृ
तो परीवार उत्तरूला जैसा काळ रुदृ तो देखीला मुदेवें ८८१

यात नरेंद्राच्या मूळ ओवीतील उत्तरार्ध बदलला आहे. यावरून २९३९ ओव्यांचे संपूर्ण रुक्मिणी स्वयंवर हे काव्य, अर्थात ८७९ ओवीनंतरचा त्याचा भाग खास नरेंद्राचा नसून तो दुसऱ्या कोणी तरी लिहिलेला आहे हे स्पष्ट दिसते. या ओवीनंतर पुढील ओव्या आलेल्या आहेत:——

ऱ्हा तरी पृथ्वीचीया राया भीमें मुळें पाठवीली आवघेया
तै दुत पाठवीले यादवराया : वऱ्हाडीके यावे म्हणौनि ।।८८२।।
ते परीसौनि यादव चक्रवती दळाची कखीतु असे आइती
ते साहान मीनलें नेणो कीती : द्वारकेमाजी ।।८८३।।
ऐसा श्री भागवतीचा वृतांतु : आणि पद्मपुराणीची आइका मातु
जे भेटों आलासे पंडुसुतु : धनंजयो ।।८८४।।
त्याचा परीवारु तीन क्षौणी : उत्तरला असे द्वारके पाटणी
ते देखता जाला नयेनी द्वीजराज तो ।।८८५।।
आनीक गमलें ऐसें : नारायेणी–सेना देवातें वोळगत असे
ते सेना दाटली दीसे : मीसें वोळगावेयाचेनि ।।८८६।।
आतां असो हे शब्दरचना : करूं दळाचे वर्णना
पुनरपी श्रीभागवतीचें अनुसंधान : न संडीत बोलों ।।८८७।।

असे प्रास्ताविक लिहून मग कवीने ८८८ ते ९२८ पर्यंतच्या ओव्यांत दळाचे म्हणजे सैन्याचे वर्णन विस्ताराने केलेले आहे. काव्य पूर्ण करताना या कवीसमोर 'तेथ मुखाचा आंकणा चंद्' ही नरेंद्राची मूळ ओवी असलीच पाहिजे. त्यातील 'तें कटक वानिताये कवि नरिंद्' यातील 'कटक' शब्दावरून नरेंद्राने आपल्या मूळ काव्यात या ८७९ व्या ओवीनंतर यादव रायाच्या सैन्याचे वर्णन केलेले असणार अशी त्याची कल्पना झालेली असली पाहिजे. अर्थात, कटक=सैन्य, हाच अर्थ त्याला अभिप्रेत होता हे स्पष्ट दिसते.

(२) 'अठरा शते रुक्मिणी स्वयंवर' पूर्ण करणाऱ्या कवीने 'तेथ मुखाचा आंकणा चंद्' ही नरेंद्राची मूळ ओवी, कोणताही बदल न करता जशीची तशी ठेवली आहे. त्यानंतर त्याने लिहिलेल्या ओव्या पुढीलप्रमाणे:——

ऐसीया कमौंनि नवही पौळी सुदेवो पातला सवंदळीं
आडकाठी नाही तीये राऊळी ब्राम्हणासि ।।
बापु राणीव भूतळी बहुत साधुसंताची सोइरीक चाळी
ऐसी वाखानली व्रीदावळी देवरायाची ।।
काइ सांघों तिये नगरीचा लोकु : अखंड वाचे सहस्त्रनामाचा घोकु
तेणें नीवारताए अन्य दोखु आइकतयांचा ।।
सदा श्रीकृष्ण नामाचे प्रबंध : कवी क्रांतद्रस्ये नानाविध
भाषा चीत्रें पवाडे पढति मागध राया गोविंदाचे ।।
जे सेवितां चरणारविंद : योगी ध्याले परमानंद
तया अवसरू सदा राउळी तीए ।।

इत्यादी आरंभीच्या ओव्या पाहाता या कवीने सैन्याचे वर्णन केले नसून द्वारका नगरीतील लोकांचे वर्णन केलेले आहे हे स्पष्ट दिसते. 'नगरी,' 'राउळ=राजमंदिर' या शब्दांवरून तर त्याला द्वारका नगरीचेच वर्णन करायचे आहे हे उघड दिसते. अर्थात, 'ते कटक वानिताये' यातील 'कटक' शब्दाचा अर्थ 'सैन्य' असा त्याला अभिप्रेत नाही तर 'द्वारका नगरी' अभिप्रेत आहे.

(३) 'नरेंद्र पंधरासे' पूर्ण करणाऱ्या कवीनेही 'तेथ मुखाचा आंकणा चंद्' ही नरेंद्राची मूळ ओवी

जशीची तशी ठेवलेली आहे. त्यापुढे त्याने लिहिलेल्या ओव्या अशा:—

हुडे आटाळे परीकर : तेथं वोडविलें जंताचं माचर
माजी सीरोवरीं हातीएर : दीसताति ।।१।।
बहीरव ढेकुळीया नाना परीचीया
आनेक दुर्गावरीया : सोभत असं ।।२।।
दुर्ग उचीया असमसास मीवंत : सूद्रसेनाची घरटी दीसत
तेथ पारकेया वासु त्या आतु : पाहों न ए ।।३।।
लंघुनी तीया पौळी अंतु झडकरी : तेथे वीप्र प्रवेसला भीतरी
आतां नगरीची रचना मनोहरी कवण वर्णु जाणे ।।४।।
भीतरी कैसी देखिली ते नगरी : तेथ उपमा नाहि दुसरी
श्रेष्टेनि कवणे परी रचीनली ।।५।।

इत्यादी ओव्यांवरून या कवीनेही 'तेथ मुखाचा आकणा चंद्' या ओवीनंतर सैन्याचे वर्णन केले नसून द्वारका नगरीचे वर्णन केले आहे असे दिसते. तेव्हा त्यालाही 'ते कटक वानिताये कवि नरिंद्' या चरणातील 'कटक' शब्दाचा अर्थ 'सैन्य' असा अभिप्रेत नसून 'द्वारका नगरी' अभिप्रेत आहे.

'कटक' शब्दाच्या अनुषंगाने या दोन्ही कवींनी 'द्वारका नगरी'चे वर्णन का केले ? कारण, द्वारका ही श्रीकृष्णाची राजधानी होती. 'कटक' शब्दाचा एक अर्थ 'सैन्य' असा आहे हे खरे. पण त्याचे आणखीही अर्थ आहेत. त्यांपैकी 'राजधानी' हाही एक अर्थ आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. आपटे यांचा संस्कृत इंग्रजी कोश, गीर्वाण लघुकोश, दाते यांचा महाराष्ट्र शब्दकोश, या कोशग्रंथांत हा अर्थ नमूद केलेला आढळतो. 'तें कटक वानिताये' यातील 'कटक' शब्दाचा राजधानी हाच अर्थ नरेंद्राला अभिप्रेत आहे. सुदेवाला द्वारकेचे दर्शन दुरून झाले, मग तो द्वारकेभोवती असलेल्या पौळीजवळ आला. या नऊ पौळींचे वर्णन नरेंद्राने केले. त्यात 'माझारिली तीं पौळीं भितरीं :' असलेल्या 'राउळिची साहाने आयुधें चारी' म्हणजे 'चारी साहाने' अर्थात चतुरंग सैन्य व 'आयुधें'=त्यांची व तेथील 'शस्त्रसामुग्री' यांचा नरेंद्राने संक्षेपाने निर्देश ओ. ८७६ मध्ये केलेलाच आहे. त्यानंतरच्या पौळींचे वर्णन केल्यानंतर 'नववीये आंतुल पैंतु तो बारा गाउवांचा प्रदेशु: तेथ वसताय लक्ष्मीं विळासु : यादवेंसीं' असे तो ८७८ व्या ओवीत सांगतो. अर्थात, त्यानंतर 'लक्ष्मी विलास' श्रीकृष्ण जेथे राहत होता त्या त्याच्या 'कटका'चे म्हणजे 'राजधानी'चे अर्थात प्रत्यक्ष द्वारकेचे वर्णन त्याला करायचे होते हे स्पष्ट दिसते.

पण 'द्वारके'साठी 'राजधानी' या अर्थाचा 'कटक' शब्द नरेंद्राने का वापरला असावा ? कारण, रामदेवराव यादव याच्या दरबारातील हा कवी यादवांची राजधानी देवगिरी येथे राहात होता. या देवगिरीला त्या काळात 'कटक देवगिरी' म्हणजे राजधानी देवगिरी असे म्हणत असत. इतकेच नाही नुसत्या 'कटक' या शब्दानेही या राजधानी देवगिरीचा सर्वत्र निर्देश होत असे. 'कटक=सैन्य, सैन्याची छावणी' असा अर्थ करून 'कटक-देवगिरी' म्हणजे देवगिरी येथील सैन्याची छावणी, असा अर्थ काही जण सूचित करतात. तो बरोबर नाही. श्रीगोविंदप्रभुचरित्र, लीळा २९३ मध्ये गोविंदप्रभु भट आणि म्हाइंभट यांना कापूर विकत आणण्यासाठी सांगतात तेव्हा म्हणतात, "आवो मेला जाय : **कटक देवगिरीसि** जाय ना म्हणे आवो तेथ केसवनायक वेव्हारा असे तयाचीय घरी भुयरीं अमुकीय मांदुसे असे : . . .तो आणावा म्हणे" "मग भट म्हाइंभट **कटक देवगिरीसि** गेले :" या ठिकाणी सैन्य किंवा सैन्याच्या छावणीचा संबंध नाही. प्रत्यक्ष 'देवगिरी' नगराचा आहे. 'स्मृतिस्थळा'त पुढील उल्लेख आहे. 'एकवेळ नाथोवा हींडित हींडित **कटक देवगिरीसि** गेले तेथ कटककारां देमाइसां आणि वंकीसि श्रवण केलें' (स्मृ. ९२); 'एक वेळ उजेनियेहुनि बंदीजन(=भाट) **कटक देवगिरीसि** आले ते देमाइसांसि भेटले :' (स्मृ. १३२). यावरूनही 'कटक देवगिरी' हे सर्वसामान्य नागरिक, व्यापारी वगैरे जेथे राहात असे नगर होते हे दिसेल. सैन्याशी किंवा छावणीशी त्या नावाचा संबंध

नाही. देवगिरीसाठी केवळ 'कटक' हा शब्दही वापरला जात होता. उदाहरणार्थ 'तथा उपालंबपरीहारार्थ **कटका** पाठवणें' (स्मृ. १३४) पाहा. तेथें पूर्वोल्लिखित देमाइसाला भटोवासांनी आपल्या गावी जायला सांगितले. 'तेहीं मानिलें : मग तियें **कटका** गेली :' असे वर्णन आहे. येथे 'कटक' शब्द 'कटक देवगिरी'साठीच वापरला आहे हे पूर्वोल्लेखावरून कळून येईल. 'लीळा चरित्रा'त कटक शब्द अनेक ठिकाणी आला आहे. तेथे 'देवगिरी' नगरच अभिप्रेत आहे. 'लखुदेवोबा गोदाना **कटका** गेले' (एकाक २५) येथे 'कटक' म्हणजे देवगिरी राजधानीच; छावणी, सैन्याचा तळ किंवा लष्करी ठाणे नव्हे. राजाकडून होणारा गोदानाचा धार्मिक विधी राजधानीतच होणार. पूर्वार्ध लीळा २३४ वरून तर हे अधिक स्पष्ट होते. '**कटकीं** महादेरायातें श्राद्ध ब्राम्हण दानासि नीगाले गोसावीं इंद्रभटातें म्हणीतले' "वानरेया इंद्रया **कटका** जा : महादेरायातें श्राध" हे 'महादेवरायातें श्राद्ध' आणि त्यानिमित्त होणारी दाने राजधानीतच होणार, लष्करी ठाण्यात नव्हे. आणखी एकच उदाहरण देतो. 'वैजाए राणीयां वैजनाथाचें देऊळ करवीलें : ब्राम्हणा वृत्ति दीधलीया सारंग पंडितातें बोलाउं धाडीलें सारंग पंडीत **कटका** गेले : वृत्ति जाली काळाक्षेरीं नांव घातलें शासनीं नांव घालावें तवं ज्वरू आला' (पूर्वार्ध लीळा ९). हा सर्व शासन व्यवहार राजधानीतच होणार. सारंग पंडीत त्यासाठी 'कटका' गेले म्हणजे राजधानी देवगिरीला गेले हेच यावरून स्पष्ट होत नाही काय ? सारांश, देवगिरीला 'कटक देवगिरी' किंवा 'कटक' हे नाव पडले ते देवगिरी ही राजधानी होती म्हणून. सैन्याचा तळ असलेल्या देवगिरीचा एखादा विशिष्ट भाग म्हणून 'कटक' हे नाव अभिप्रेत नाही. 'कटक' या शब्दाचा एक अर्थ 'राजधानी' असा आहे. देवगिरी 'राजधानी' असल्यामुळे तिला 'कटक देवगिरी' किंवा नुसतेच 'कटक' म्हणत असावे, हे आता स्पष्ट होईल. या 'कटका'त म्हणजे राजधानीत नरेंद्र कवी राहात होता. त्यामुळेच त्याने श्रीकृष्णाची राजधानी असलेल्या द्वारकेला 'कटक' म्हणून म्हटले असावे. अर्थात, 'ते कटक वानिताये नरिंदृ यादवरायाचे' या चरणातील 'कटक' शब्द त्याने 'राजधानी' द्वारकेसाठीच योजला आहे, यात संशय नाही.

याच अनुषंगाने ज्ञानेश्वरांच्या 'रावो तेथ कटक' या सुप्रसिद्ध दृष्टांतातील 'कटक' शब्दाच्या अर्थाचे निर्वचन करणे अप्रासंगिक होणार नाही. विवेचनाच्या सोयीसाठी ही संपूर्ण दृष्टांतमाळिका वाचकांसमोर ठेवतो—

चंद्रु तेथ चंद्रिका । शंभु तेथ अंबिका ।
संत तेथ विवेका । असणें कीं जी ।।
रावो तेथ कटक । सौजन्य तेथ सोइरिक ।
वन्हि तेथ दाहक । सामर्थ्यता ।।
दया तेथ धर्मु । धर्मु तेथ सुखागमु ।
सुखीं पुरुषोत्तमु । असे जैसा ।।
वसंतु तेथ वनें । वनें तेथ सुमनें ।
सुमनि पालेगनें । सारंगांचि ।।
गुरू तेथ ज्ञान । ज्ञानि आत्मदर्शन ।
दर्शनीं समाधान । आथि जैसें ।।
भाग्य तेथ विलासु । सुख तेथ उल्हासु ।
हें असो तेथ प्रकाशु । सूर्यो जेथें ।।
तैसें सकळ पुरुषार्थ । जेणें स्वामी कां सनाथ ।
तो श्रीकृष्णराउॅ जेथ । तेथ लक्ष्मी ।।

(ज्ञानेश्वरी, अध्याय १८, ओ. १६१३–१९)

यातील 'रावो तेथ कटक' या दृष्टांताचा अर्थ, विशेषतः त्यातील 'कटक' या शब्दाचा अर्थ आपणाला पाहायचा आहे. साखरे, भिडे, कुंटे, माडगावकर, वेलिंगकर आदी ज्ञानेश्वरीच्या सर्व टीकाकारांनी या

ओवीतील 'कटक' शब्दाचा अर्थ 'सैन्य' असा दिलेला आहे. पण तो बरोबर आहे असे मला वाटत नाही. का ? कारण, जेथे राजा असतो तेथे त्याचे सैन्य असतेच असे नाही. राजा दरबारात असला, आपल्या मंत्र्याबरोबर गुप्त मसलत करीत असला, भोजनाला बसला असला, राणीबरोबर क्रीडा करीत असला, मंचकावर निद्राधीन झालेला असला — म्हणजे त्या ठिकाणी त्याचे सैन्य उपस्थित असते काय ? ते त्याचे अविभाज्य अंग नव्हे. ज्ञानेश्वरांनी जे इतर दृष्टांत दिले आहेत त्यांचे स्वरूप लक्षात घेऊ. जेथे चंद्र असेल तेथे चंद्रिका असतेच, कारण ती त्याचे अविभाज्य अंग आहे. शंभु म्हणजे शंकर जेथे असतात तेथे त्यांची पत्नी अंबिका ही असलीच पाहिजे. अर्धनारीनटेश्वराचे ती अविभाज्य अंग आहे. संतांच्या ठिकाणी विवेक असतोच. वन्हीच्या बरोबर त्याचे दाहकत्व अविभाज्यत्वाने असते. दया आणि धर्म, धर्म आणि सुख, सुख आणि पुरुषोत्तम याही अशाच जोडया आहेत. वसंत जेथे असेल तेथे वन असलेच पाहिजे. कारण वसंत वनातच फुलतो. जेथे वन असेल त्याच ठिकाणी फुले फुलतात. आणि जिथे फुले असतील तेथे 'सारंगाची पाल्हेणें' आढळणारच. गुरु आणि ज्ञान, ज्ञान आणि आत्मदर्शन, आत्मदर्शन आणि समाधान या जोडयाही अविभाज्य आहेत. जेथे भाग्य असेल तेथेच विलास असणार, जेथे सुख असेल तेथेच उल्हास आढळणार; किंबहुना जेथे सूर्य असेल तेथेच प्रकाश असणार. या सर्व दृष्टांतांचा अर्थ लक्षात घेऊन 'रावो तेथ कटक' या चरणाचा अर्थ लावला पाहिजे. आणि तो या दृष्टांताच्या प्रयोजनाशी, भावार्थाशी एकरूप असला पाहिजे. या दृष्टांतांच्या मालिकेत तो चपखल बसला पाहिजे. 'कटक' या शब्दाचा अर्थ सैन्य असा घेतल्याने तसा तो बसत नाही. त्याच ओवीतील 'सौजन्य तेथ सोयरिक' आणि 'वन्हि तेथ दाहकत्व। सामर्थ्यता' या दृष्टांतातील अर्थाशीही तो संगती साधत नाही. कारण जेथे सौजन्य असते तेथे जशी सोयरीक असतेच आणि जेथे वन्ही असेल तेथे त्याचे दाहकत्व जसे असते त्याप्रमाणे राजा जेथे असतो तेथे त्याचे कटक म्हणजे सैन्य असतेच किंवा असलेच पाहिजे असे नाही.

मला वाटते की या चरणातील 'कटक' शब्द ज्ञानेश्वरांनी 'राजधानी' या अर्थाने योजला आहे. जेथे राजा असतो तेथेच त्याची राजधानी (म्हणजे राजाचे वसतिस्थान) असते. मग तो कुठेही असो. दरबारात असो, मंत्र्याबरोबर गुप्त मसलत करीत असो, भोजनाला बसलेला असो, राणीबरोबर क्रीडा करीत असो, जेथे तो असेल तीच त्याची राजधानी होय. त्याचे सैन्य त्याच्याबरोबर असो किंवा नसो, किंबहुना बरोबर सैन्य न घेता अरण्यात एखाद्या आश्रमात जाऊन तो राहिला तरी तीच त्याची राजधानी होय. कारण राजधानी म्हणजेच राजाचे वसतिस्थान. त्याचे वास्तव्य नेहमी ज्या नगरात असते त्याला लौकिकार्थाने 'राजधानी' म्हणून संबोधतात हे खरे. पण त्या नगरातून अन्यत्र तो कोठेही गेला तरी जेथे तो असेल तीच वास्तव अर्थाने त्याची राजधानी होय.

श्री गणेश व्याख्यानमाला

विदर्भ साहित्य संघातर्फे यंदाची व्याख्यानमाला डॉ. आर. एस्. केळकर, सेक्रेटरी, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, हे गुंफणार आहेत.

शुक्रवार दि. २५–११–७७ विषय : 'मराठी आणि हिंदीचे कृष्णकाव्य'

शनिवार दि. २६–११–७७ विषय : 'साहित्य आणि अध्यात्म'

रविवार दि. २७–११–७७ विषय : 'आशियात रामायण परंपरा'

स० शं० देसाई / ऐतिहासिक कादंबरीची कुळकथा

मराठी साहित्यात एके काळी ऐतिहासिक कादंबरी लिहिली गेली. तदनंतर चालू तपाच्या प्रारंभी तिला पुन: बहर आला. आज तो जोम ओसरलेला दिसत आहे. आणि त्याचे एक प्रमुख कारण म्हणजे ऐतिहासिक कादंबरीकारांवर चोहींबाजूंनी झालेली चौफेर प्रतिकूल टीका. तरीही अधून मधून एखादुसरी ऐतिहासिक कादंबरी मराठीत प्रकाशित झालेली दिसत आहे.

मराठी साहित्यात ऐतिहासिक कादंबरी जरी निर्माण झाली असली, आणि मराठी टीकाकारांना ती जरी उदंड वाटत असली, तरी पाश्चिमात्य साहित्यात निर्माण झालेल्या शास्त्रशुद्ध ऐतिहासिक कादंबरीसारखी टप्प्याटप्प्यांनी विकसित झालेली शास्त्रशुद्ध आणि सर्वांगसुंदर ऐतिहासिक कादंबरी मराठीत अद्याप निर्माण व्हावयाची आहे. म्हणून मराठी टीकाकारांची मराठी ऐतिहासिक कादंबरीवरील टीका केवळ अन्यायमूलकच नव्हे, तर अज्ञानमूलकही आहे, असे खेदाने म्हणावेसे वाटते. मराठी टीकाकारांनी ऐतिहासिक कादंबरीची उत्पत्ती, तिचा विकास आणि तिने केलेली कामगिरी ह्यांचा मुळी अभ्यासच केलेला नाही. म्हणून प्रस्तुत लेखात ऐतिहासिक कादंबरीची कुळकथा सांगण्याचा एक प्रयत्न केला जात आहे. पाश्चिमात्य साहित्यात ऐतिहासिक कादंबरी फार पूर्वी लिहिली जात होती. फ्रेंच साहित्यातील प्रॉव्हेंसल (Provenxal) आणि जर्मन साहित्यातील गॉथिक (Gothic) कादंबऱ्या ही पाश्चिमात्य ऐतिहासिक कादंबरीची उगमस्थाने आहेत. मात्र ह्या दोन्ही कादंबऱ्यांच्या घोडदौडीत फ्रेंच कादंबरी मागे पडून जर्मन गॉथिक कादंबरीने आघाडी मारली, हे लक्षात ठेवले पाहिजे. तिचे प्रमुख विशेष पुढील-प्रमाणे होते

वस्तीपासून दूर असलेले जुने किल्ले, कोळीष्टकांनी आणि केरकचऱ्याने भरलेल्या त्या किल्ल्यांतील अंधाऱ्या, भयाण खोल्या, त्यांची गंजलेली भली मोठी कुलपे, पावसाच्या पाण्याने भिजलेल्या खुर्च्या, टेबले आणि इतर सामान, त्या खोल्यांतून रात्रीच्या वेळी होणारा त्रस्त समंधांचा आणि भुतांचा नंगानाच, एक जगावेगळा खलनायक की ज्याला आपल्या दुष्कृत्यांची कधीच शरम वाटत नाही, किल्ल्यातील प्रत्येक खोली आणि दिवाणखाना जुलुम, जबरदस्ती, छळ आणि अत्याचार यांची साक्ष पटविणारा आणि अशाच एखाद्या हाडांच्या सापळ्याच्या सान्निध्यात जीव मुठीत धरून भयग्रस्त जीवन कंठीत असलेली अभागी नायिका अथवा नायक. अखेर दैवाची त्यांच्यावर मेहर नजर होऊन त्यांना त्यांच्या कारावासाच्या तळघरात गुप्त दरवाजाची कळ गवसते. ती कळ दाबली जाताच तळघराचा गुप्त दरवाजा उघडा होतो व त्यातून ती मग किल्ल्याबाहेर निसटतात.

The German Novel in 1798 was known for its bloated magnificence of diction, extravagance of imagination and wild excentricity of adventure अशी टीका जर्मन गॉथिक कादंबरीवर विलियम टेलर या नावाच्या आंग्ल टीकाकाराने केली आहे. परंतु ही गॉथिक कादंबरी अठराव्या शतकाअखेर आणि एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी युरोपात आणि चोखंदळ साहित्याची जाण असलेल्या इंग्लंडमध्येही लोकप्रिय होती, हे लक्षात ठेवले पाहिजे. गॉथिक कादंबरीचे अनुकरण करणारे अनेक कादंबरीकार इंग्लंडमध्ये झाले, इतकेच नव्हे तर, यशस्वी कादंबरीकार म्हणूनही त्यांनी मोठा लौकिकही संपादन केला.

गॉथिक जर्मन कादंवरी ही वातावरण-निर्मितिप्रधान आणि असंभाव्य घटनांनी भरलेली साहसप्रधान कादंबरी होती. इतिहास असा त्या कादंबऱ्यांत नसायचाच ! त्यांची संविधानके काल्पनिक असायची. त्यामुळे ह्या ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या कपोलकल्पित प्रसंगांवर आधारलेल्या कादंबऱ्या त्याच त्या प्रसंगांच्या पुनरुक्तीमुळे वाचकांना पुढे आवडेनाशा झाल्या. आता वाचकही बराच चोखंदळ बनला होता. कादंबरीकारांनी आपल्या कादंबऱ्या यशस्वी व्हाव्या म्हणून लढविलेल्या युक्त्या प्रयुक्त्या त्यांना आता आकलन होऊ लागल्या होत्या. अशा अवस्थेत अठरावे शतक समाप्त झाले. एकोणिसावे शतक उजाडले आणि युरोपच्या साहित्य क्षितिजावर वॉल्टर स्कॉट या देदिप्यमान कादंबरीकाराचा उदय झाला.

वॉल्टर स्कॉट लिहावयास लागला, तेव्हा इंग्लंडमध्ये इतिहास हा विषय अत्यंत दुर्लक्षित होता. विद्यापीठांतून सोडाच परंतु शाळाकॉलेजांतूनदेखील इतिहास शिकविला जात नव्हता. (Historical Instruction had not been allotted a place in the education systems of most English Schools-James C. Simmons, **The Novelist as Historian, p. 28.**)

इतिहासाविषयीची ही अनास्था इंग्लंडमध्ये एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या दोन तपांपर्यंत चालू होती. सन् १८३० साली पहिल्या प्रथमच 'रग्बी' येथील शाळेत इतिहास शिकवला जाऊ लागला. पण त्या शाळेच्या अभ्यासक्रमात इतिहास विषयाचा अंतर्भाव व्हावा आणि होऊ नये म्हणून केवढी खडाजंगी माजली ! सन १८४१ साली ऑक्सफर्ड विद्यापीठात मध्ययुगीन इतिहासाचे अध्यासन पहिल्या प्रथम निर्माण करण्यात आले. आणि त्या विद्यापीठात अर्वाचीन इतिहास शिकविण्यासाठी कुणाची नेमणूक करण्यात आली, तर थॉमस ऑर्नोल्ड या नावाच्या इतिहासकाराची. सन् १८४८ साली कॅंब्रिज विद्यापीठात पहिल्या प्रथमच अर्वाचीन इतिहास शिकविला जाऊ लागला. इंग्लंडमध्ये शाळा कॉलेजांतून आणि विद्यापीठांतून एकोणिसाव्या शतकापर्यंत इतिहास ह्या विषयाला अभ्यासक्रमात स्थान प्राप्त होऊ शकले नाही, त्याचे कारण हे की, तोपर्यंत इंग्लंडचा इतिहास लिहिणारा मोठा इतिहासकार इंग्लंडात कुणी झाला नाही. गिब्बनने रोमचा इतिहास लिहिला पण इंग्लंडचा इतिहास लिहिला नाही. इंग्लंडच्या इतिहासावर लेखन करणारे बहुतेक सर्व लेखक होतकरू इतिहासकार होते. ते फावल्या वेळात इतिहासलेखन करीत. उदाहरणार्थ 'जॉर्ज ग्रोत' हा बँकर आणि पार्लमेन्टचा सदस्य होता. थर्लवाल (Thirlwall) हा विशप होता. थॉमन्स कार्लाइल लेखक आणि टीकाकार होता, मॅकोले राजकारणपटू आणि पार्लमेंटचा सदस्य होता. तर सर फ्रॅन्सिस पाल्ग्रेव हा प्रथम कायदेपंडित, आणि नंतर सनदी नोकर झाला. ह्या सर्व होतकरू इतिहासकारांचा व्यवसाय वेगवेगळा असून त्यांचे विश्वविद्यालयीन शिक्षण झाले नसल्याने विश्वविद्यालयांतील उच्च विद्याविभूषित प्राध्यापक त्यांना मान देत नसत. परंतु ह्या उच्चभ्रू पंडितांकडूनही ग्रंथनिर्मिती होऊ न शकल्याने उपर्युक्त होतकरू इतिहासकारांना विद्यापीठांत इतिहासाचे प्राध्यापक म्हणून स्थान देण्याची आवश्यकता इंग्लंडमध्ये निर्माण झाली. लॉर्ड ॲक्टन, एड्वर्ड फ्रीमन, जॉन ग्रीन वगैरे धुरंधर इतिहासकारांची दखल इंग्लंडमधील विद्यापीठांना घ्यावी लागली.

वॉल्टर स्कॉटच्या उदयापूर्वी इंग्रजी साहित्यात गॉथिक जर्मन कादंबरीचा प्रभाव होता हे वर आलेच आहे. स्कॉटने पहिल्या प्रथमच आपल्या कादंबऱ्यांतून खऱ्याखुऱ्या ऐतिहासिक घटनांना स्थान दिले.

अनुक्रमणिका

परंतु तेवढ्यानेच त्याच्या कादंबऱ्या लोकप्रिय झाल्या असे म्हणता यत नाही. ऐतिहासिक घटनांबरोबरच सर्वसामान्य वर्गातील पात्रांचा आणि बोली भाषेचा अंतर्भाव केल्यामुळेही त्याच्या कादंबऱ्या सर्वसामान्य वाचकवर्गापर्यंत जाऊन पोहोचल्या.

त्या वेळी इंग्लंडात औद्योगिक क्रांतीस नुकतीच कुठे सुरुवात झाली होती. कामगार अर्धशिक्षित होता आणि कामगार पुढारी लेखकांना आवाहन करीत होते की, दिवसभर कारखान्यातून शारीरिक कष्ट करून थकल्या भागलेल्या कामगारांचा शीण घालविणारे रंजक असे साहित्य तुम्ही त्यांच्या हाती द्या. परंतु इंग्लंडमधील उपयुक्ततावादी विद्वान, उच्चभ्रू टीकाकार आणि भिक्षुकवर्ग ह्या सर्वांनी कामगार पुढाऱ्यांच्या आवाहनाची थट्टाच केली. ते त्यांना म्हणाले की, तुम्हाला साहित्यातले काय कळते. जे कळत नाही त्यात तुम्ही लुडबूड करू नका. परंतु वॉल्टर स्कॉट हा मध्यमवर्गीय लेखक असूनदेखील त्याने कामगार वर्गाच्या आवाहनास प्रतिसाद देऊन रंजक साहित्य-निर्मिती करण्यास प्रारंभ केला. त्याच्याबरोबरच आणखीही बरेच लेखक रंजक साहित्य निर्मितीच्या क्षेत्रात उतरले. सन् १८६० सालापर्यंत त्यांनी इंग्रजी साहित्यात ऐतिहासिक साहित्याचा नुसता पूर पाडला. त्यासाली 'लंडन स्टॅटिस्टिकल सोसायटी'ने त्या कालावधीतील ग्रंथांचा आढावा घेतला असता असे आढळून आले की, वॉल्टर स्कॉट आणि त्यांच्या सहप्रवासी कादंबरीकारांच्या साहित्याला विशेष मागणी असून हे साहित्य कामगार वर्गामध्ये अधिक लोकप्रिय होत आहे. परंतु या ठिकाणी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती ही की, स्कॉट आणि त्याचे सहप्रवासी कादंबरीकार जरी अतिशय लोकप्रिय असले, तरी त्यांच्या साहित्याकडे पाहून नाके मुरडणारे उच्चभ्रू टीकाकारही काही कमी नव्हते. उदाहरणार्थ हेन्री क्रॅब रॉबसन ह्या टीकाकाराने एन्स्वर्थ (Ainsworth) ह्या कादंबरीकाराच्या एका कादंबरीविषयी असे उद्‌गार काढले की, हे 'पुस्तक चटकदार म्हणून मी वाचले खरे, परंतु ते वाचण्यात वेळ घालविल्याबद्दल मला शरम वाटली'. तथापि, स्कॉट आणि त्यांच्या समकालीन कादंबरीकारांच्या कादंबऱ्यांवर इंग्लंडमधील उच्चभ्रू टीकाकारांनी प्रखर टीका करून हे साहित्य जरी टाकावू ठरविले असले, तरी स्कॉटच्या कादंबऱ्यांतील सामाजिक इतिहासाचा गौरव करणारे टीकाकार फ्रान्समध्ये आणि इतर देशांतही झाले. उदाहरणार्थ प्रख्यात साम्यवादी साहित्यसमीक्षक आणि मार्क्सिस्ट तत्वज्ञानाचा एक महान भाष्यकार Geoge Lukaes हा Historical Novel ह्या आपल्या ग्रंथात म्हणतो 'The influence of Walter Scott can be held in every province of literature of his age. The new school of French Historians formed itself under the influence of the Scottish novelist. He showed them entirely new sources which had so far remained unknown despite the existence of the historical drama of Shakespeare and Goethe' – Pushkin (p. 30).

लुकाक्सने उध्दृत केलेले स्कॉटविषयींचे उद्‌गार अर्थात रशियन कवी आणि कादंबरीकार पुष्किन याचे आहेत हे येथे नमूद केले आहे. परंतु युरोपियन लेखकांनी आणि टीकाकारांनी स्कॉटचा जरी कितीही उदो उदो केला, तरी इंग्लंडमध्ये त्याच्या कादंबऱ्यांवर भयंकर टीका होऊ लागली. आणि ह्या टीकाकारांत 'कार्लाइल' हा अग्रेसर होता. त्याने स्कॉट आणि त्याच्या समकालीन कादंबरीकारांना ठणकावून सांगितले की, रंजनात्मक लेखन बंद करून गंभीर साहित्य आता लोकांना द्या.

कार्लाइलसारख्या मातबर टीकाकारास आणि थोर इतिहासकारास स्कॉट आणि त्याचे समकालीन ऐतिहासिक कादंबरीकार यांच्यावर टीकेची झोड उठविण्यासाठी लेखणी हाती घ्यावी लागली त्याचे कारण हे की प्रस्तुत कादंबरीकार सत्यापलाप करून इतिहासात विपर्यास करीत होते. आपले साहित्य रंजक व्हावे म्हणून ते आपल्या कादंबऱ्यांत ज्या कपोलकल्पित घटना घुसडवीत होते, त्या सत्य म्हणून वाचक धरून चालत होता. त्यामुळे खरा इतिहास कुठला आणि खोटा इतिहास कुठला हा संभ्रम निर्माण झाला होता. त्यामुळे कार्लाइल आणि इतर टीकाकारांना ऐतिहासिक कादंबरीकारांना सांगावे लागले की, ऐतिहासिक ललित लेखन

करणाऱ्या लेखकांवर इतिहासास धक्का न लागू देण्याची नैतिक जबाबदारी असून इतिहासकारांच्या जबाबदारीहून ती मोठी आहे. (Writers of historical romances, tales and novels are under greater moral responsibility than the compilers of real history. Care must be taken not to falsify or misrepresent historical personages and events). ऐतिहासिक ललित साहित्य जसजसे विपुल प्रमाणात निर्माण होऊ लागले तसतशी त्याची छाननी करणारे चोखंदळ टीकाकारही मोठ्या प्रमाणात पुढे येऊ लागले. त्यांनी ऐतिहासिक कादंबऱ्यांतील विपर्यस्त ऐतिहासिक घटनांची आणि व्यक्तिरेखांची चिरफाड करण्याची एवढी जबरदस्त मोहीम सुरू केली की त्याचा धसका घेऊन काही ऐतिहासिक ललित लेखकांना लेखणीच खाली ठेवावी लागली. सुप्रसिद्ध फ्रेंच टीकाकार तेन (Taine) ह्याने History of English Literature ह्या आपल्या ग्रंथात स्कॉटच्या कादंबरीविषयी म्हटले "आम्ही स्कॉटच्या कादंबऱ्यांपासून इतिहास शिकलो. परंतु तो खरा इतिहास आहे का ? स्कॉटने निर्माण केलेले भूतकालीन प्रसंग खोटे आहेत".

आणि तेनने म्हटल्याप्रमाणे वस्तुस्थिती अशी की, फ्रान्सप्रमाणेच इंग्लंडमध्येही स्कॉटच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांमुळे इतिहासकारांना इतिहासलेखन करण्यास प्रेरणा मिळाली. लंडन स्टॅटिस्टिकल सोसायटीने सन् १८१६ पासून १८५४ पर्यंतच्या काळात इंग्लंडमध्ये प्रकाशित झालेल्या ग्रंथांचा आढावा घेतला असता, असे आढळून आले की, ह्या कालावधीत जे एकूण १०,३०० ग्रंथ प्रकाशित झाले, त्यात ४,९०० इतिहासावरचे ग्रंथ, ४,००० शालेय पुस्तके आणि ३,५०० कादंबऱ्या होत्या. परंतु कादंबऱ्यांमध्ये ऐतिहासिक कादंबऱ्या हजार दीड हजारांहून अधिक नव्हत्या. थोडक्यात सांगायचे म्हणजे इंग्लंडमध्ये ऐतिहासिक कादंबरीचे युग सुरू झाले नसते, तर इतिहासलेखनाला चालना मिळाली नसती.

टीकाकारांनी इतिहासाचा विपर्यास करणाऱ्या कादंबरीकारांना फैलावर घेतल्याने काही कादंबरीकारांनी लेखन संन्यास घेतला हे वर आलेच आहे. ह्या घटनेसंबंधी 'ब्लॅकवूड' या नावाच्या नियतकालिकाने पुढील नोंद केली : "आजकाल ऐतिहासिक ललित लेखन करणे ही एक अवघड कामगिरी होऊन बसली आहे. सर वॉल्टर स्कॉट यांचा काळ आता उरलेला नाही. त्यांच्या समकालीन लेखकांना ऐतिहासिक ललित लेखन स्वैरपणे करता येत असे. आज ऐतिहासिक ललित लेखन, ऐतिहासिक घटना आणि व्यक्ती यांचे चित्रण इतिहासाला धरून करावे लागते. त्यामुळे हे काम अत्यंत जोखमीचे होऊन बसले आहे". ऐतिहासिक ललित लेखकांनी टीकाकारांची एवढी दहशत घेतली की, इतिहासाचा सखोल अभ्यास केल्याविना ते ऐतिहासिक ललित लेखन करण्यास धजेनासे झाले. उदाहरणार्थ प्रख्यात कादंबरीकर्ती जॉर्ज इलियट हिने Ramola ह्या ऐतिहासिक कादंबरीचे हस्तलिखित १८६३ साली फाडून टाकले. तथापि, टीकाकारांची दहशत घेऊन काही ऐतिहासिक ललित लेखकांनी वर सांगितल्याप्रमाणे जरी लेखणी खाली ठेवली असली, तरी वाचकांना अस्सल इतिहास ललित स्वरूपात सादर करण्याच्या ईर्षेने काही इतिहासकार कादंबरी क्षेत्रात उतरले. त्यामुळे इंग्रजी साहित्यात ऐतिहासिक कादंबरीचे एक नवीन पर्व सुरू झाले.

सर वॉल्टर स्कॉट आणि त्याचे समकालीन ऐतिहासिक कादंबरीकार हे अस्सल इतिहासापेक्षा पात्रांचे पोषाख, त्यांचे बोलण चालणे, तत्कालीन सामाजिक चालीरीती, त्यांच्या घरांची वर्णने, दिवाणखान्यातील फर्निचरचे वर्णन, वेगवेगळी हत्यारे यांचा तपशील अधिक देत असत. ह्या सर्व गोष्टी ते लालित्यपूर्ण भाषेत खुलवून सांगत असत. परंतु त्यांना लढायांची रोमहर्षक वर्णने जमत नसत.

ह्याच्या उलट अस्सल इतिहासाला प्राधान्य देणारे ऐतिहासिक कादंबरीकार वीर रसावर अधिक भर देऊ लागले. युक्त्या प्रयुक्त्या, ओढून ताणून निर्माण केलेले काल्पनिक प्रसंग आणि असंभाव्य घटना यांना त्यांनी अजिबात फाटा दिला. त्यांची पात्रे आणि प्रसंग इतिहासाचा सखोल अभ्यास करून निर्माण केलेले आहेत. त्यांनी रंजनासाठी इतिहासाचा विपर्यास केला नाही. कारण, रंजन हा त्यांचा प्रधान हेतू नसून आपल्या वाचकांना अस्सल इतिहासाचा परिचय करून देणे हा प्रधान हेतू होता.

इतिहासाचे जतन करण्याच्या उदात्त हेतूने कादंबरीक्षेत्रात उतरलेल्या काही इंग्रजी कादंबरीकारांमध्ये सर फ्रॅन्सिस पालग्रेव, एड्वर्ड जॉर्ज हॅवार्ड, बुलवर लिटन आदी श्रेष्ठ इतिहासकारांचा अंतर्भाव होतो. विशेषत: एड्वर्ड जॉर्ज हॅवार्डची 'सर हेन्री मॉर्गन' ही ऐतिहासिक कादंबरी एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात चांगलीच गाजली. ती 'मॉर्गन' या नावाच्या चांच्याच्या जीवनावर आधारित आहे. ह्या चांच्याने स्पेनला नुसते त्राहिभगवान करून सोडले. त्याच्या कामगिरीबद्दल त्याला इंग्लंडकडून 'नाईटहूड'चा श्रेष्ठ बहुमान प्राप्त झाला.

अशारीतीने इतिहासकार कादंबरीकार बनले. टीकाकारांनी त्यांना शाबासकी दिली व त्यांच्या कादंबऱ्यांचे कौतुक केले. ह्या टीकाकारांत कार्लाइलचाही अंतर्भाव होतो.

एक काळ असा होता की, ऐतिहासिक ललित लेखकांनी रंगविलेले ऐतिहासिक प्रसंग खरे कोणते आणि खोटे कोणते अशा संभ्रम टीकाकारांना आणि सामान्य वाचकांनाही पडत असे. तीच परिस्थिती आताही उद्भवली. इतिहासकारांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांतील सगळेच प्रसंग अस्सल आहेत का, असा प्रश्न टीकाकारांना पडू लागला. त्यामुळे इतिहास कोणता आणि कादंबरी कोणती हे ओळखता येईनासे होऊ लागले. उदाहरणार्थ Froude या नावाच्या इतिहासकाराने लिहिलेला इंग्लंडचा इतिहास खरोखरच इतिहास आहे का की, ती ऐतिहासिक कादंबरी आहे, असा सवाल वाचकवर्ग करू लागला. परंतु समाधानाची गोष्ट ही की, इतिहासकारांनी आपल्या कादंबऱ्यांतून निर्माण केलेले काही प्रसंग जरी काल्पनिक असले, तरी ते अस्सल ऐतिहासिक घटनांवर अधिष्ठित होते. इतिहासाचा विपर्यास करणारे ते खोटे प्रसंग त्यांनी रंगविले नाहीत.

इंग्लंडमध्ये होऊन गेलेल्या इतिहासकार कादंबरीकारांमध्ये Bulwer Lyton ह्याचा क्रमांक इंग्रजी कादंबरी साहित्यात स्कॉटनंतर दुसरा लागतो. तो इतिहासाशी नेहमी इमानी राहिला. त्याने ऐतिहासिक कादंबरीचा सिद्धांत पुढील शब्दांत मांडला आहे :—

The chief events of narrative are set. They cannot be tempered with by the author. Imaginative speculation is permitted only in the development of the inner, not outer history of man. That is the author is free to conjecture about private persons and motivations, but this must be always speculation hedged about by close historical scholarship.

बुल्वर हा इतिहासकार कादंबरीकार हे वर सांगितलेच आहे. त्याच्याइतका लोकप्रिय ऐतिहासिक कादंबरीकार इंग्लंडात स्कॉटनंतर दुसरा कुणी झाला नाही. त्याने कादंबरीकार म्हणून लौकिक तर संपादन केलाच, परंतु टीकाकारांच्या लेखण्याही बोथट करून टाकल्या.

वॉल्टर स्कॉटने ऐतिहासिक कादंबरीला जगात प्रतिष्ठा आणि लोकप्रियता मिळवून दिली. त्याच्या कादंबऱ्यांचे अनुवाद जगातील बहुतेक सर्व साहित्यात झाले. त्याचे अनुकरण करणारे कादंबरीकारही पुष्कळ झाले. परंतु त्याने चरित्रात्मक ऐतिहासिक कादंबरी मात्र लिहिली नाही. ही कादंबरी त्याच्यानंतर इंग्लंडमध्ये एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात लिहिण्यास प्रारंभ झाला. ऐतिहासिक कादंबरीचा तो शेवटचा टप्पा असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. 'एडवर्ड जॉर्ज हॉवर्ड' याची 'हेन्री मॉर्गन दि बकानीयर' ही एका चाच्याच्या जीवनावर लिहिलेली ऐतिहासिक कादंबरी पहिली चरित्रात्मक ऐतिहासिक कादंबरी ठरते. या कादंबरीच्या अनुकरणाने फ्रेंच साहित्यात पहिली चरित्रात्मक ऐतिहासिक कादंबरी ऑरिएत मार्तिनो (Henriete Martineau) या नावाच्या लेखिकेने लिहिली. पॅसिफिक महासागरातील 'हाइटी' (Haiti) या नावाच्या बेटातील निग्रो गुलामाच्या स्वातंत्र्याचा प्रणेता तुसां लुव्हेर्त्युर (Toussaint L' ouverture) याच्या जीवनावर प्रस्तुत कादंबरी आधारलेली आहे. 'तुसां' हा मूळचा निग्रो गुलाम. त्याने हायटी बेटातील निग्रो गुलामांना संघटित करून त्यांच्यामधून एक सशस्त्र सेना निर्माण केली व तिच्या बलावर फ्रेंच आणि इंग्रज यांच्याशी सामना करून हायटी बेट स्वतंत्र केले.

असे सांगतात की, उपर्युक्त दोन्ही चरित्रात्मक ऐतिहासिक कादंबऱ्या अस्सल कागदपत्रांच्या आधाराने लिहिण्यात आलेल्या असून उभय लेखक-लेखिका इतिहासाशी इमानी राहिले आहेत. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात म्हणजे १८६० नंतर युरोपात वास्तववादी सामाजिक कादंबरी जन्मास आली. फ्रान्स ही तिची जन्मदात्री म्हणून मानली जाते. माणसाला नेहमीच रुचिवैचित्र्याची आवड असते. त्याला साहित्य संप्रदाय आणि कला संप्रदाय अपवाद नाहीत. फ्रान्समध्ये जन्मास आलेली वास्तववादी सामाजिक कादंबरी अल्पावधीत इतकी लोकप्रिय झाली की, तिने हां हां म्हणता ऐतिहासिक कादंबरीला मागे टाकून तिचे स्थान पटकावले. जवळ जवळ एक शतकाहून अधिक काळ लोटला आहे, परंतु सामाजिक कादंबरीला मागे टाकू शकणारी प्रभावी ऐतिहासिक कादंबरी टॉल्स्टॉयची War and Peace ही कादंबरी वगळता जन्मास आली नाही.

ऐतिहासिक कादंबरी मागे का पडली त्याची कारणमीमांसा टीकाकारांनी केली आहे. त्यांचा निष्कर्ष असा युरोपात ऐतिहासिक कादंबरी विकसित होऊन ती जरी लोकप्रिय झाली असली, तरी वॉल्टर स्कॉटच्या प्रभावातून ऐतिहासिक कादंबरीकार मुक्त झाले नाहीत. बहुतेक सर्व ऐतिहासिक कादंबरीकारांनी स्कॉटचे फाजील अनुकरण केले; सन १८६० पासून युरोपात जी नवीन सामाजिक वास्तववादी कादंबरी लिहिली जाऊ लागली तिच्याशी स्पर्धा करण्यास ऐतिहासिक कादंबरी असमर्थ ठरली.

हा निष्कर्ष रॉबर्ट लुई स्टिव्हन्सनसारख्या लोकप्रिय कादंबरीकारालाही मान्य आहे. तो म्हणतो 'ऐतिहासिक कादंबरी आता विस्मृत झाली आहे. स्थिर चित्रणात्मक वास्तववादी (Photographic Realism) कादंबरीची आता चलती आहे'.

परंतु स्टिव्हन्सनचे उपर्युक्त उद्गार म्हणजे ऐतिहासिक कादंबरीवरील मृत्युलेख नव्हे, हेही तितकेच खरे. टॉल्स्टॉयची War and Peace ही कादंबरी त्याला अपवाद ठरली आहे. ही ऐतिहासिक कादंबरी अजूनही लोकप्रिय आहे. या कादंबरीच्या यशाचे गमक काय तर तिच्यामधील प्रसंगांची निवड. जॉर्ज लुकाक्स म्हणतो :—

Tolstoy's genius as an historical novelist lies in his ability to select and portray these episodes so that the entire mood of Russian army and through them of the Russian people gains vivid expression (**Historical Novel, p. 45**).

युद्ध आणि शांतता ही ऐतिहासिक कादंबरी वास्तववादी सामाजिक कादंबरीच्या काळात लिहिली गेली. खुद्द टॉल्स्टॉय हा वास्तववादी सामाजिक कादंबरीचा एक प्रवर्तक होता.

'युद्ध आणि शांतता' या कादंबरीनंतर एमिल झोलाच्या The Downfall या ऐतिहासिक कादंबरीच्या यशाचाही उल्लेख येथे करता येईल. झोला हा वास्तववादी सामाजिक कादंबरीचा एक प्रणेता होता. त्याने वास्तववादी सामाजिक कादंबऱ्या तर लिहिल्याच; पण The Downfall ही फ्रेंच साहित्यात वादग्रस्त ठरलेली ऐतिहासिक कादंबरीही लिहिली. प्रस्तुत कादंबरी वादग्रस्त ठरण्याचे कारण की, सन् १८७० सालच्या फ्रांको-प्रशियन युद्धाच्या पार्श्वभूमीवर ती लिहिली गेली आहे. या युद्धात फ्रान्सचा पराभव झाला असता. झोलासारख्या श्रेष्ठ कादंबरीकाराने तो पराभव आपल्या कादंबरीतून जगासमोर मांडला म्हणून त्याच्यावर फ्रेंच साहित्यिकांनी आणि टीकाकारांनी टीकेची झोड उठविली. परंतु झोलाने त्या टीकेची परवा केली नाही, कारण आपल्या राष्ट्रनेत्यांकडून जे प्रमाद घडत असतात, त्यांचे दिग्दर्शन झाल्याखेरीज त्यांचे निर्मूलन होऊन राष्ट्र बलशाली होत नाही, अशी झोलाची मतप्रणाली होती. आणि ह्या जगावेगळ्या विचारसरणीमुळेच त्याला अखेर फ्रान्समधून परागंदा व्हावे लागले. लंडन शहरातील एका खुराड्यात दारुण अवस्थेत त्याचे निधन झाले. तथापि The Downfall ही कादंबरी जरी फ्रान्सच्या पराभवाच्या पार्श्वभूमीवर लिहिली गेली असली, तरी त्यामुळे काही फ्रेंच वाचकांनी तिच्यावर बहिष्कार टाकला नाही. त्या काळी तिच्या फ्रान्समध्ये

(पृ. १३४ वर पाहा)

श्रीधर शनवारे / **पाच कविता**

अखेरची पानगळ

आजची ही संपूर्ण अनोळखी वेळ. भर दुपारची.
सैल देठांच्या शेवटच्या पानांना टेकून भोवताल पाहण्याची
— या झाडाची ही अखेरची पानगळ !

सारा फुलोर चाटायला कीड निघाली होती
त्यातून तेव्हा वाचलेल्या चार पानांची,
पालीच्या मांसात रुतणाऱ्या बोक्याच्या
बाकदार नख्या—तशा सूर्यकिरणांना
अखेरचे सोसणाऱ्या चार पानांची,
जमिनीच्या गर्भातील पाण्याला
आता कधीही हाक न घालणाऱ्या चार पानांची
— या झाडाची
ही अखेरची पानगळ !

तवंग चढलेल्या म्हाताऱ्या बुबुळांना
बकरीच्या पिलांचे, पहाडी वाऱ्यात फडफडते
कान दिसतात
सूर्याची तिरीप सहन न झाली तर
त्या विचाऱ्यांना दुसऱ्या झाडांचा आश्रय आठवो !
हेले विकायला मैलोगणती निघालेले गवळी
या उघड्या मुळावर गवरी फोडायचे
त्यांना पुनः
भाकर भाजायला या स्थळाचे स्मरण न होवो !
आता उद्यापासून
या गळत्या साली दिसणे नको;
फांद्यांवरून ओघळणारी
रोगकृमींची अंडी पाहणे नको :
मरणाच्या सगळ्यात जवळ बसलेली ही चार पाने
खालच्या आगटीत पडल्याचे दृश्य
साहणे नको !

जाता जाता एकच संपूर्ण समाधान
की, आभाळ पुनः माझ्यावर रुसणार नाही.
कारण पाखरांचा सौदागर
आता या वाटेने कधीही येणार नाही . . .

गवळण वयो

गवळण वयो, खडे मिठाची कोठी लिंपून ठेव
दुहीच्या दुनियेत पुनः मरणाची साथ आली आहे.
उरला सुरला भाकर तुकडा
तडसाने नेण्याची वेळ आली आहे !

तुमच्या गवळीगडाच्या आतल्या अंगाला असलेल्या
पहारेकऱ्यांच्या चौक्या
दुफळीने दुबळ्या बनल्या होत्या
तेव्हा कोण काय करू शकले होते
अनेक वर्षांपूर्वी ?
उंटखाने उपरे ठरलेत, हत्तीखाने हतवल झालेत
तेव्हा तुझा पितामह
धूळघाटीत वसावे तसा
सिंहासनावर बसला होता !

त्यानंतर
माती घालून विझविलेल्या मशालींच्या धुरात
अमावास्येचे रान तुडवीत आलात तुम्ही;
दगडाळ उतारांवरचे असुरक्षित पाय
सांभाळत आलात तुम्ही
गावातला सारा बाजार उठून जावा
आणि घोड्याची लीद तेवढी पडून राहावी
तसे तुमचे कुळ
शेवटी या भणंग बिळात
वस्ती करून वावरले, वयो !

आता ह्या
निदानच्या अस्तित्वाला
जर तुला जपायचे आहे
तर तेवढी खडेमिठाची कोठी लिंपून ठेव.
दुहीच्या दुनियेत पुनः एकदा
मरणाची साथ आली आहे
उरला सुरला भाकर तुकडा
तडसाने नेण्याची वेळ आली आहे !

मी कोण असेन ?

काल माझ्या स्वप्नात
एक तत्त्वचिंतक आला.
येऊन मला जागवून गेला. . .

आता मला प्रश्न पडला आहे
की मी कोण असेन ?
तत्त्वचिंतकाला पडत असलेले
एक अल्पकालीन स्वप्न तर नसेन ?

दशा

शेतात नाही आड
अन् उन्हाची धाड
रोपं जगावं कशी ?

पायी भेगाचं ईख
नाही वडाले चीक
भीक मागाव कशी ?

अरूच्या जिवाले ढास
आला चितेचा वास
रात रेटाव कशी ?

वापा, शनीचा खेल
जवय नाही तेल
शांति कराव कशी ?

तू म्हणाली होतीस आई

आतून नासत चाललेला
रात्रीचा प्रहर असतो
(कुठला, कुणास ठाऊक)
वाहत्या नालीच्या पाण्याचा आवाज
कानावर येत असतो
(कोठुन, कुणास ठाऊक)
लखवा गेल्यासारखे फुफ्फुस
अशुभावस्थेत
गुदमरत असते
(कशामुळे, कुणास ठाऊक)
माझ्या लिहिणाऱ्या तर्जनीवरील चक्रात
एक कुलक्षणी रोगबिंदू
चमकत असतो
(कधीपासून, कुणास ठाऊक)

तळातून चिरून निघाल्या स्वरात
तू म्हणाली होतीस आई,
की अशी स्वप्ने शुभ असतात
(कशी, कुणास ठाऊक !)

मुरलीधर कुळकर्णी / स्टे

आधीपासूनच आम्ही अप्पाच्या कानीकपाळी ओरडून सांगितलं होतं, गावाच्या नादी लागू नकोस म्हणून. पण अप्पाचा स्वभाव हेकट. टर्रेहुसेनखान. शेवटी जे व्हायचं तेच झालं. गावापुढं एकटं दुकटं घर कितीशी तग धरणार ? आम्ही तिघंजणं नि सबंध गाव एकीकडं. गावाला दुसरं काही नंको होतं. हवं होतं धरण. ते व्हायलाच पाहिजे होतं. त्यामुळं गावच्या विहिरींना वर्षभर पाणी राहाणार होतं. बागायती फुलणार होती.

गावाला इतरत्र धरण बांधता येण्यासारखं नव्हतं असं नाही. पण गावही हेकेखोर. त्याला ते आमच्याच जमिनीत व्हावं असं वाटत होतं. तेही साहजिकच. आमचं घर एकटं. पाठी कुणी नाही. गावाच्या पाठी आमदार, पुढारी. आमची जमीन तशी पिकाऊ. गावात उजवी. पेरलं की कापायलाच जावं. गावाची बरीचशी जमीन बरड. पाऊस लागायचे. आमच्या मळ्याची जमीन काळीकरंद. माती पाहिली की प्रेम जडावं.

अप्पाला पुन्हा सांगायला गेलो तर तो आम्हा दोघांवर वसकून आला.

"तुम्ही भेकड आहात".

आम्ही कानकापल्या कुत्र्यासारखे गप. करता काय ? तू शहाणा, आम्ही वेडे.

अप्पा जाऊन केरू घाडग्याला भेटला. त्याचं मत चाचपून पाहिलं. त्याचीही बरीचशी जमीन धरणाखाली जात होती. नदी कडेची मळ्याची. दोन विहिरी. अशी नामाईक जमीन धरणाखाली जावी असं कुणा शेतकऱ्याला वाटेल ? अलीकडंच केरू घाडग्यानं एक मोठी विहीर पाडलेली. तिला चंगळ पाणी लागलेलं. सगळी जमीन भिजू लागली. बाकीच्यांचे टाकडेटुकडे धरणाखाली जात होते. नुकसान फारसं नव्हतं. कुणी नादी लागलं नाही.

केरू घाडग्या कसलेला शेतकरी. जमिनीत बेफाम कष्ट करायचा. चार पोरांचा राब. ज्वारी, गहू, हरबरा अमाप पिकवायचा. जमीन पिकत नव्हती पिकत होते केरू घाडग्याचे कष्ट. पोरं जवान. गणपा थोरला. चार हंगाम्यात कुस्त्या मारलेल्या. कष्टाला वाघ. धाकटेही तसेच. केरू घाडग्यानं शेतीवर पैका केला. गडीगुडी लागत नव्हते. घरचा राब. चार पोरांच्या चार बायका. सकाळी भाकऱ्या थापल्या, कोल्ड्यासवोल्ड्यास केलं की पाटचा भरून, पोरं पाठीशी बांधून रानात. न्ह्यारीला शेतात हजर. दिवसभर राबून दिवस बुडतीला घरी. केरूला मजुरीपायी पैका खर्चच करावा लागत नव्हता. काढणीतोडणीही घरच्या घरी. केरूनं एक पिठाची गिरणही टाकली. तिसऱ्या नंबरचं पोर इंजिन खोलून पुन्हा बसविण्यात वाकबगार झालं. जात्याला टाकीही तेच लावी. गिरणीचं

फौंडेशन घालून दिल्यावर केरूला पुन्हा काही गिरणीकडं बघावं लागलं नाही. दहापंधरा रुपये गल्ला विनखर्ची खिशात आणि त्याच्या शिरिमंतीनं गावाचे डोळे दिपू लागले.

केरू घाडग्यानं खरं तर आपल्या शिरिमंतीचं प्रदर्शन कधी केलं नाही. सुनांच्या अंगावर मंगळ-सूत्राच्या दोन दोन वाट्या आणि जोडीला दोन दोन मणी. बायकोही लंकेची पार्वती. पण गवर झालेला केरू घाडग्या गाव बघत होतं. त्याच्या कष्टानं शेती पिकत होती. दरसाल. गिरण चालत होती. दररोज.

धरणाचं आता निश्चित झालेलं. मोजणीदार मोजणी करून गेलेले. दोनतीनदा मोजणी. दोन तीन ठिकाणी पांढऱ्या दगडाच्या खुणा करून ठेवलेल्या. एक खूण आमच्या कौठीच्या बांधाला. या भितीनं आमची आणि केरू घाडग्याची सर्व जमीन पाण्याखाली जाणार होती. दुसरी खूण तिरमखा माळ्याच्या विहिरीवरून पुढं नदीकडं. कौठीच्या खुणेपासून एक दीड एकर खाली. तिसरी मारुती पाटलाच्या विहिरीवरून नदीकडं. मारुती पाटलाच्या खुणेमुळं आमचंच काय पण कुणाचंच फारसं नुकसान होण्या-सारखं नव्हतं कारण वरच्या जमिनींमध्ये वाटणीच्या धांदोट्या होत्या.

साहजिकच आमचं मत मारुती पाटलाच्या विहिरीवर भित व्हावी असं. आमची जमीन वाचू शकत होती. पण गावाचं मत ती कौठीच्या बांधावर व्हावी असं होतं. याचं कारण मारुती पाटलाच्या विहिरीवरून भित झाली तर त्यात लहान लहान शेतकरी मरत होते. त्यांना इतरत्र बागायती नव्हती. म्हणून गावाचा विरोध. मधल्या भितीमुळं आम्ही नि तिरमखा माळी मरत होतो. पण तिरमखा माळी म्हणजे पाटलाचा बगलबच्चा. नातं गोतं नव्हतं. तो माळी हा कुणबी. नातं होतं तिरमखाच्या बायकोकडून. पाटलाची नेहमीची उठबस तिरमखा माळ्याच्या घरी. तिरमखाच्या विहिरीवर भित होणं अशक्यच. राहाता राहिला कौठीचा बांध. वऱ्यापैकी फक्त दोनच शेतकरी या भितीमुळं मरणार होते. त्यांची पात्रता काय, हे कोण बघणार होतं? केरू आणि आम्ही पार भुईसपाट होणार होतो. त्याचं गावाला काही सुतक पडणार नव्हत.

गावानं मोर्चे बांधलेले. पाटलाची आमदाराकड धावाधाव. आमच्यासारख्यांची जमीन धरणाखाली जातेय याच्या गुदगुल्या गावाला. प्रत्येकजण आमच्याकडं बघून गालातल्या गालात हसत होता. आमची जमीन गावात उजवी. म्हणून गावाच्या डोळ्यांवर आलेली.

आजोबांनी पूर्वी शेतं बटाईनं दिलेली होती. कळ कायदा आला तसे आम्ही जागे झालो. नोकरी सोडून अप्पा घरी आला. मीही मुंबईच्या टेलर शेठचं दुकान सोडलं. तब्येतही मुंबईत बरी रहात नव्हती. मावी येऊन एक जुनं मशीन घेतलं. गावा-तली कापडं शिवू लागलो. मधून मधून शेतीकडंही पहाता येऊ लायलं. नोटिसा देऊदेऊ अप्पानं जमिनी ताब्यात घेतल्या. सहा बैलं केली. शेती ओढू लागला. गावाला जमीन पचली नाही म्हणून ते बामणावर जळू लागलं. कशावरून ना कशावरून कुरापत्या काढू लागलं. कुणी पिकात जनावरं घाली. कुणी बांध रेटी. कुणी बांध कापी. कुणी रात्रीची झाडं तोडून नेई. सगळं चोरून. पण आम्ही बधलो नाहीत. काही वेळा गाव भटकीचा शिधा बंद करी. गावात दोनतीन तट. एक तरी तट आमच्याकडून. गावात दुही होती तोवर बरं चाललं.

पण आता धरणाच्या बाबतीत सारं गाव एका बाजूला गेलं. आम्ही एका बाजूला. रहाता राहिला केरू घाडग्या. पण अजून त्याचेही दोन्ही डगरीवर हात. पुन्हा शिधापाणी बंद. त्यात अप्पा जास्तीच इरेला पेटलेला. काही बोलायला जावं तर उख-डायचा.

"भेकड आहात तुम्ही सारे. पूर्वजांचं पाणी नाही. मेषपात्र. जिद्द पाहिजे जिद्द. अरे, जमिनी सुटणार नाहीत म्हणून त्यावेळी तुम्ही रडत होतात. पण ह्या वच्चमजीनं सोडविल्याच की नाही सगळ्या?" हे असं. त्याचंही म्हणणं खरं होतं. त्यानं जमिनी वाचवल्या नसत्या तर केव्हाच कुळांच्या घशात गेल्या असत्या. पण फार ताणणंही बरं नसतं कधी कधी.

एक दिवस पुन्हा अप्पा उठला. केरू घाडग्याच्या सपरावर गेला. केरू विहिरीच्या धावेवर पाणी शिंपीत होता.

"लई लांब येनं क्येलं अप्पा ?"

"आल्तो तुझ्याकडंच."

"काय धोरण ?"

"तुला माहीत आहे. उगाच विचारतोस तू."

"धरनाबद्दल तर नव्हं ?"

"होय."

"काय म्हननं ?"

"हे बघ केरू, धरण कौठीच्या बांधावर झालं तर तूही मरतोस आणि आम्हीही. मरायचं का ? दोन्ही घरं सपाट."

"मंग म्हननं काय तुहं ?" डोक्यावरला पटका अलगद गुढघ्यावर ठेवीत त्यानं विचारलं.

"माझं ऐकशील ?"

"काहीवी सांग. दगूड भांदून यहयरीत उडी टाकायचं सांगितलंस तरी ह्यो गड्‌ पठ्ठ्या तयार !" छातीवर हात हाणून तो म्हणाला

"म्या वीष खा म्हटलं तर तू वीष खाणार नाहीस हे मला माहित आहे. पण हे तुझ्या भल्याकरता. मागं सरायचं नाही."

"शाप न्हाई. आरं ही जिमीन ग्येलीतं केरू घाडग्या केरू घाडग्या ऱ्हायचा न्हाई. बोल !"

"आपण स्टे आणू या !"

"आनि ?"

"पुढं कोर्टात दावा लावू या गावाच्या विरुद्ध. गावाची ही अत्यंत सुपीक जमीन. धरणाखाली गेली तर गावाचं उत्पन्न तेवढंच घटेल."

"पर गावाला काय करायचंय् उत्पन बुडालं तं? त्येचं काय लुकसान हयेमंदी ?"

"सरकारचं आहे ना गावाच्या दृष्टीनं".

"म्हननं खरं हे".

"मग उद्या चल जिल्ह्याला".

"पर जमंल का ?"

"न जमायला काय झालंय. मात्र तू माघार घेताने. नाही तर गाळ हातपाय ऐनवेळी".

"तसं कंदी झालंय ? आरं, ह्या केरू घाडग्या हाये !" पुन्हा एकदा केरू घाडग्याची थाप छातीवर.

"बरं चलतो मी. उद्या नक्की आं ?"

"ध्यानात हाये. जा तू बिनघोर".

दुसऱ्या दिवशी दोघं जिल्ह्याला गेल्याची कुणकुण गावाला. लोक एकमेकांच्याकानाला लागू लागले. एकदोन दिवसांत गावाला कळलंच की अप्पानं नि केरू घाडग्यानं धरणाला स्टेचा अर्ज केलाय म्हणून. गावातला एक पोरगा कोर्टात कारकून. त्यानं बातमी पेरली. गावाचं माथं सणकलं. गावानं संध्याकाळी पंचाईत बोलावली. दोघांना बोलावून घेतलं. हे होणारच होतं. केरू जरा घावरलाच. पंचाईत सुरू. सावळू कारभाऱ्याचा सवाल,

"आरं आपा, केरू तुमाला धरन होऊनेसं वाटतं व्हय रं ?"

"तसं कसं म्हणता येईल कारभारी ? धरण तर व्हायलाच हवं. पण ते दुसरीकडं. कुठंतरी होऊ द्या ना !" अप्पा म्हणाला.

"माहं बी त्येच म्हननं. दुसरीकडं कुडंबी धराव. आमच्या दोगांच्याच मुळावं ह्ये धरान कसं म्हनाव ?" घाडग्या बिचकत म्हणाला.

"म्हंजी तुमचं म्हननं आसं का वढयाच्या उगमाच्या बाजूला धरान ना धरता पार खालच्या शिवारात धराव. न्हवं ?" पाटील दुमत्यानं म्हणाला.

"पाटील, असं आडव्यात शिरायचं कारण नाही. धरण व्हावं ओढयाच्या वरच्या शिवारातच. गावाच्या खालच्या शिवारात होऊन गावाच्या जमिनीला त्याचा काय फायदा ? आम्हाला काय कळत नाही ?"

"कळतं त मंग गावच आडव्यात शिरतंय म्हना की !" वेम्टा गणपा वेंबी चाचपत म्हणाला.

"गावाचं म्हणणं आम्ही कुठं नाकारतोय ? धरण व्हावं हे आम्हालाही मान्य. पण ते नेमकं कौठीच्या बांधावर कशाला ? तिसऱ्या नंबरच्या खुणेवर का होऊने म्हणतो मी." इति अप्पा.

"मी वी त्येच म्हन्तोय. ह्येचा आर्थ आमा दोगांनाच मारायचा व्योत दिसतोय गावाचा".

"तू बोलू नगंस केरू. तुला तुपलं न्हाई बूड. तुला गुरुमंतर अप्पाचा". पाटील गुरगुरला.

"पाटील, जरा तोंड आपलं आहे असं समजून बोला. का रे केरू, मी तुला गुरुमंत्र दिलाय ?"

"आवं पाटील, प्वाट दुखाय लागलं का मानूस आपसुकंच ववां मागतंय्. माह्याबी वेंबीला लागलीय् कळ. आनि तुम्ही म्हन्ता गुरुमंतर ! पाटील,

अनुक्रमणिका

तुमच्याच मळ्यात समजा धरान झालं आसतं —"

"आरं म्या तं आनंदानं तयार झालो आस्तो". पाटलानं तोडलं.

"पाटील, ह्ये सारं वेंवीच्या देठापसून वर. तुम्ही वी आमच्यासारकं आडवं पल्डा आस्ता".

"आरं, आप्पा तुमी स्टेचा अर्ज केला म्हन्त्यात".

"कोण म्हणतंय ?"

"सारं गावच म्हन्तय. आन केरू घाडग्यालावी फितवलंस." सावळू कारभारी म्हणाला.

"तात्या, आता तुमचे पांढरे केस झाले. सारा पण गेला. तुम्हाला हा आरोप करणं शोभत नाही. त्याला फितवायला तो का बोळ्यानं दूध पितोय ?"

"बरं, तुमी स्टे आनलाय न्हवं ?"

"अजून नाही. पण तसा बेत आहे".

"खोटं बोलू नगंस. पर्वालाच आर्ज केलाय तुमी".

"वरं केला. मग म्हणणं काय ?"

"म्हननं काय आसायचं ? पर ह्ये जड जाईल". सावळू कारभारी पांढऱ्या डोक्यावरून हात फिरवीत म्हणाला.

"तात्या आजवर जड गेलंयच. पिढयान् पिढ्या हेच चाललंय्. गावकी नेहमीच आम्हाला नाडत आलीय. भ्यायचं काय कारण ? आमच्या आज्याला वाळीत टाकलं गावानं. म्हणून ते काय गांडीत हात घालून वसले नाहीत. पोरांचे केस घरी हातांनी तासले. मोटा सांधल्या. स्वत: औतं, पाभरी भरल्या. त्यांनी जसे दिवस पाहिले तसे आम्हाला पहावे लागतील. यापेक्षा अधिक काय होणार ? घराला आग लागली तर माणूस नुसतं बघत बसत नाही." अप्पा जिद्दीनं म्हणाला.

"पर अप्पा, दिवस पालटलेत. त्ये दिवस न्हायले न्हाईत. बघ व्वा. काळचा आईचंवी म्हननं मानाव लागतंय्". एक पंच म्हणाला.

"आमचा मुद्दा ह्यो, तुमी स्टे माघं घेनार हात का न्हाईत. काय अप्पा ?"

"स्टे मुळीच मागं घेणार नाही. काय होईल ते होईल !" अप्पा निर्धारानं म्हणाला.

"ऐकलं का पंचमंडळी ?"

"न्हाई म्हन्तोय तं जास्ती लांबान नगू. पघून घेऊ. चला उठा". पाटील घोंगडं झटकीत गुरगुरला. पंचाईत मोडली. सगळे घरोघर पांगले.

अप्पा घरी आला. जेवताना प्रश्न निघालाच. मी म्हटलं,

"अप्पा स्टे मागं घेतो म्हणून का नाही कबूल केलंस ? चिन्हं वरी दिसत नाहीत".

"मूर्ख आहेस. तुला फक्त मशीनवर पाय हालवायची अक्कल. मी तुम्हाला भेकड म्हणतो ते खोटं नाही. अरे, ही गावातली माणसं शेफारलीत. वामणाच्याही अंगात काही पाणी आहे याचा इंगा दाखविला पाहिजे भडव्यांना".

"तुझा हेका तुला सोडावा लागेल. गावापुढं जाता येत नाही. त्यांच्यामागं शिवाय आमदार मंडळी. मी ऐकलंय, या भागातून निवडून आलेला किसन निम्हार्स पाटलाला म्हणाला, 'अरे, वामण वामण; वामण काय करतंय ? वामणांचं राज गेलं म्हनावं. कुणब्या कामगाराचं आलंय. आजवर आमच्या वायका वामणांची धुणीभांडी करीत व्हत्या. आता वामणांच्या वायकांनी आमची धुणीभांडी कराया पाह्यजेत' ".

"आमचे हात काही गांडीत गेले नाहीत म्हणावं लेका. असशील आमदार, आपल्या घरचा". अप्पा घास गिळून म्हणाला.

"पण तुम्ही पडले पुरुष. वायका मुलांचा विचार केलात का काही ? उद्या गावातल्या लोकांनी काही-बाही आरंभलं तर आम्ही बायकांनी काय करायचं ? आम्ही वायामाणसं. धुण्याभांड्याला बाहेर पडावं लागतंय. तुम्हा पुरुषांचं तरी काय ! आपलं वर एकटंच. तो केरू काय कुणबटच. उद्या उलटणार नाही कशावरून ? तुम्ही त्याच्या कशाला नादी लागलात ?" वहिनी म्हणाल्या.

"वहिनींचं ऐक. साऱ्यांवर प्रसंग आहे. असं नको करूस". मी म्हणालो. अप्पा उखडला.

"अरे, असं करता करताच ही पाळी आली. अशानं आपल्या बायकांवर खरंच धुणीभांडी करायची पाळी येईल. आणि मग काय होनं, काय झालं याचा शोक करत बसाल".

"नाही, पण जागा पाहून हातपाय पसरावेत. एकाला तोंड द्यायचं नाही आपल्याला. साऱ्या

गावाला".

"म्हणजे हकनाक जमीन जाऊ द्यायची म्हणाना! जाऊं द्या मग". तो कुऱ्यानं म्हणाला.

"तसं नाही रे. जमीन कुठं जातेय? गाळपेर तरी होईलच की नाही? कुठं मोठा असा जायकवाडी प्रकल्प लागून गेलाय? गाळपेर मिळेलच".

"त्याचं काही सांगता येत नाही".

"का? गाळपेर मिळू शकते".

"मग देऊ नाद सोडून म्हणतो? घेऊ स्टे मागं? माणूस काही करायला गेलं तर तुम्ही गांडीत शेपटं घाला!"

"निदान सगळ्यांना तरी बोलावून घे इथं. आधार होईल."

"ते कसले येतात! आपला धंदा, नोकऱ्या, संसारात ते मश्गूल".

"त्यांना नाही इस्टेटीची गरज?"

"अरे माहीत आहे. ते आयत्या बिळावरले. तुम लडो हम कपडे संभलते. त्यांची वाट पहाण्यात काय अर्थ? आपलं आपण बघावं". विषय असा संपला. अप्पा झोपायला गेला.

दुसऱ्या दिवशी सकाळीच केरू घाडग्याच्या सपरावर मोर्चा. उन्हाळ्यात सपरावर रहात. केरू घाडग्याला घेराव. केरू तोंड धुऊन चहा पिण्याच्या तयारीत. मोठा पोरगा बाहेर उभा होता त्यानं विचारलं,

"आरं काय भानगड?"

"चल हाट् बाजूला व्हय." जमावातून कुणी ओरडलं. "पाझर तलाव झालाच पाह्यजे!" "केरू अप्पा मुर्दाबाद!" "केरू घाडग्याची हुर्रेर्र ऽऽऽ" पब्लिक ओरडत होतं. केरूनं घेतलेला चहाचा घोट तोंडातच राहिला. गुळणी धरून तो बाहेर धावला. तोवर दोघाचौघांनी गणपाला चांगलाच लोळवला होता. वरून लाथा बुक्क्या. कुणीतरी समंजस सुरात म्हणत होतं, "त्येला कह्याला मारता? केरूला वढा भायेर!" गणपाचा घोळणा फुटला होता. अंगावर रक्त. केरू हादरला. हात जोडून थरथरायला लागला. गावानं सपराभोवती वैठक दिली.

"केरू, स्टे माघं घेनार का न्हाई?"

"स्टे म्या न्हाई आणला. अप्पा बामनाला इच्यारा!"

"त्येलाबी दावतो इंगा. त्वा काय ठरवलं?"

"पर म्या स्टे आनलाच न्हाई".

"लकडीमगर मकडी वठनीवं यायची न्हाई रं". गावानं ठिय्या दिला. आत बायामाणसं, पोरं सोरं धरून आणल्यागत. कुणीतरी आत जाऊन पेटलेल्या चुलीत पाणी ओतलं. मंडळी दिवस डोईवर येईस्तोर बसून राहिली. केरूही बसून. करील काय? मोर्चेवाल्यात सारी टगे कंपनी. पाटील, पंच मोर्च्यात फिरकले नाहीत. कायद्यात कोण सापडतंय? गुंडांचा उपयोग. गुंडांनी काम चोख बजावलं. वेळेला अशी मंडळी उपयोगाची.

"घाडग्या, स्टे माघं घेतल्याविगर भाकरटुकडा मिळायचा न्हाई. इच्यार कर!"

"कारं घाडग्या, लय चर्वी चल्डीय रं तुला? धरान झालं तं तुह्या बापाचं काय व्हय?" कुणाच्याच तोंडाला धारबोळ नव्हता.

"आरं, शिरिमंत आसशील तुह्या घरचा. गावापुढं जातूस? कसा जातूस त्ये बघतो. चार दीस पोटात भाकर पल्डी न्हाई म्हंजी समजंल".

"चार दीस कह्याला पाह्यजीत रं? आत्ता बंगल सांच्यापारी!"

मंडळी संध्याकाळपर्यंतच काय, चार दिवसही बसून रहायला कमी करणार नाही हे बघून केरूच्या तोंडचं पाणीच पळालं.

बातमी आम्हाल कळलीच. आता आमच्यावर पाळी. जातवाल्याची गय केली नाही. आम्ही पडलो 'बामणं'. अप्पाला मी म्हणालो,

"अप्पा, पोलीस संरक्षणासाठी तरी अर्ज करायचा. आतापर्यंत पोलीस आले असते. लोक चांगलेच चिडलेत. काय करतील नेम नाही". अप्पाही चिंतेत पडल्यासारखा दिसत होता. पण अगदीच मेषपात्रासारखं वागून चालणार नव्हतं. बाजू रेटायला हवी होती. दुबळ्याचा वाली कुणीही नसतो. आम्ही आजवर दुबळ्यासारखे वागलो असतो तर गावानं केव्हाच आम्हाला हाकून दिलं असतं. पिढ्यानपिढ्या आम्ही गावात टिकलो याचं कारण वाडवडिलांची कर्तबगारी.

"विचार करायलाही फुरसत नाही नि पोलीस

संरक्षण कसलं मागतो ?"

संध्याकाळपर्यंत दिवस काळजीतच गेला. गणपाला बेदम मारलं याची बातमी ऐकून थरकाप उडाला. आणि मंडळी संध्याकाळी घोषणा देत हजर. 'पाझर तलाव झालाच पाहिजे ! अप्पा-बामण मुर्दाबाद !' आमची पाचावर धारण.

तेवढ्यात वहिनी म्हणाली,

"भावजी तुम्ही नि ते घरात व्हा ! मी घेते बघून. कोण काय करतंय ते बघते !" म्हणत वहिनी उंबऱ्यात बघून. आम्ही दोघं घरात निमूट.

"वहिनी, आपा कुठंय ?"

"कशाला हवेत ?"

"पायजे, स्टे घेनार का न्हाई माघं ?"

"अहो, मग ही कामं का अशी दांडयामुंडण्यानं नि हाणामारीनं होतात ? जरा शांततेनं घ्या".

"कसली शांतता घेऊन बसलात वयनी. चला वाट सोडा !" दुसरा एक जण डुकरासारखा मुसंडी मारण्याच्या बेतात. वहिनींनी दोन्ही बाजूला चौकटीवर हात देऊन रस्ता अडवून धरलेला.

"मी वाट सोडते पण एक अट. मान्य कराल ?"

"कोणती ?"

"कुणालाही हाणमार करायची नाही. दोघंही घरात आहेत".

"काय हरकत न्हाई. आरं, हानामारी कुनाला करायची न्हाई रं !"

वहिनी एका बाजूला झाल्या. लोंढा धरण फुटल्यागत आत शिरला. थेट संपाकघरात. शिंक्यावर भाकरीचं तरसाळं. एकानं ते हस्तगत केलं. भाकरी घरभर पिस्कारून दिल्या. कपाटाप केळीचे दोन फण. एकानं ती इतरांना वाटली. खाऊन फस्त. पोराबाळांच्या हातातोंडाचा घास पळविला. चुलीवरल्या दुधावर एकानं हल्ला केला. पांढरा धोट ओघळ थेट खालच्या वडीपर्यंत. चुलीत पाणी ओतून ती त्यानं थंडगार केली. अजून आमची रात्रीची जेवणं व्हायची होती. मध्येच हा हुर्सोळ ! आम्ही उघडया डोळ्यांनी, मुक्यानं हे नुसतं बघत होतो.

मग मंडळींनी ठाण दिलं. काही स्वैंपाकघरात. काही ओसरीवर. अप्पा सतरंजीवर ज्वारीच्या पोत्याला पाठ देऊन बसलेला. नुस्ता बघतोय गुडघ्याला हात बांधून.

"आप्पा, स्टे माघं घेनार का नाई ? बोल".

"अशी जबरदस्तीनं कामं होत नाहीत बाबू".

"आता आशीच पद्धती हाई"

"कोणती पद्धती ?"

"घेराव, मोर्चे, उपोशान"

"एवढंच कमी होतं आपल्या दरिद्री खेड्यात".

"ती मरू दी. मंग काय ठरलं तुहं ?"

"माझं काय ठरायचं ?"

"उद्या स्टे माघं घेतला नाई तं बरी गत न्हायची नाई. आनपान्यावाचून मराव लागंल !"

मी केरू घाडग्याचे हाल ऐकलेले होते. भेदरून अप्पाला म्हटलं,

"म्हणतात तर घे स्टे मागं".

"आता ते कसं व्हायचं ?"

"न व्हायला काय झालं ? परत दुसरा अर्ज करायचा".

"ते खरं. पण मंजूर व्हायला हवा ना ?" सोपं असूनही अप्पा अवघड करीत होता. वाटत असावं मिटेल थोडक्यात. मला तसं वाटत नव्हतं. दिवसभर ही माणसं घाडग्याच्या सपरावर बसली होती. आम्हाला रात्रीची झोपू देणार नाहीत, खाऊ देणार नाहीत. दुसऱ्या दिवशी पुन्हा अन्नपाण्याचा प्रश्न. मुलाबाळांची आबाळ. रात्रीलाच त्यांना दूध नव्हतं की भाकरी नव्हती. अप्पाची समजूत काढत मी म्हटलं,

"अप्पा लक्षण ठीक नाही. घाडग्याचे फार हाल झालेत. त्यांना भाकर तुकडा मिळू दिला नाही. वेळाकाळाचा विचार करावा लागतो. तू नुसतं म्हण स्टे मागं घेतो म्हणून."

"बघा हं. पुन्हा म्हणाल मीच केलं म्हणून"

"कोणी काही म्हणत नाही".

"ऐका रे, मी उद्या स्टे मागं घेतो". म्हणताना अप्पाला मनातून जे कष्ट पडले ते चेहऱ्यावर उमटले.

"अगदी खरं ?"

"खरं".

"कुनाची शपत ?"

"कुनाची घेऊ ?"

"पोराची धी." अप्पाला आता माघार घेणं भागच होतं. त्यानं घेतली. लोक उठले. कुजबुजत मुकाट्यानं बाहेर पडले. दडपण दूर झालं.

दुसऱ्या दिवशी रुटे मागं घेण्याचा अर्ज घेऊन अप्पा गेला.

धरणाचं काम कोठीच्या बांधावर सुरू झालं. गावाला मोलमजुरी मिळू लागली. आनंद झाला. शिवारात हरित क्रांती होणार होती.

अप्पा उदास झाला. गावातून परागंदा झाला. त्याचा पत्ता काढून आम्ही समजूत घालण्याचा प्रयत्न केला. अपमानामुळं तो गावात यायला तयार नव्हता. धरण पुरं होत आलं.

नि अचानक अप्पा आला. न सांगतासंवरता. तडक मळ्याकडं गेला. कोठीचा बांध धरणाच्या अजस्र भिंतीखाली गुदमरलेला. प्रचंड अजगरासारखी सुस्त भिंत. शेतातल्या काळ्या मातीत भिंतीसाठी घेतलेले मोठमोठे खड्डे. भिंतीच्या वरल्या अंगाला मळा अगदी इवलासा केविलवाणा दिसत होता. भिंतीनं जणू त्याला खाऊन टाकलेलं. एकएक दीडदीड एकराची चौकोनी शेतं भ्याल्यागत एकमेकांना बिलगून पडलेली. त्यांच्यामधल्या रेषा पुसल्या जाणार होत्या. एकमेकांमधलं नातं तुटणार होतं. मळ्याची झाडं पाण्याच्या साठ्यानं कोळपून जाणार होती. विहीर गाळानं भरून निकामी होणार होती. अप्पाच्या डोळ्यांसमोर भविष्यातलं ते भेसूर दृश्य उभं राहिलं. एकीकडं मजूर आपली मातीची घमेली भिंतीवर आणून रिचवत होते. भिंत उंचउंच चढत होती. त्या प्रचंड भिंतीवर अप्पा मुंगीएवढा उभा.

अप्पाच्या डोळ्यांतील पाण्याचं धरण फुटलं. तो मटकन खाली बसला. ओल्या मातीचा तो थंडगार स्पर्श. कित्येक पिढ्यांच्या रक्ताच्या ओळखीचा. त्याला भडभडून आलं.

गावानं आमच्या स्थिर जीवनालाच खीळ घातली. आम्ही आशेनं कुणाच्या तोंडाकडं पहायचं? तोंड दाबून बुक्क्यांचा मार मुकाट्यानं सहन करण्याशिवाय आम्हाला दुसरा कोणता मार्ग होता?

(पृ० १२५ वरून)

एक लक्ष शहात्तर हजार प्रती खपल्या. पाच हजार पौंडाची त्याला रॉयल्टी मिळाली आणि भाषांतरांच्या हक्कापोटी आणखी दोन हजार पौंड मिळाले. या कादंबरीला झोलाने लिहिलेली प्रस्तावना अतिशय मननीय आहे, तो म्हणतो :—

La Dibacle (The Downfall) is a realistic historical novel—is a document on the psychology of France in 1870. This will explain the enormous number of characters which figure in the book. Each character represents one e'tat d'ame psychologique of France of the day.

युद्ध आणि शांतता ही कादंबरी लिहिण्याकरिता टॉलस्टॉयला तब्बल सात वर्षे लागली. हजारो मैलांचा त्याने प्रवास केला व नेपोलियनच्या रशियाच्या स्वारीत भाग घेतलेल्या शेकडो लष्करी अधिकाऱ्यांच्या आणि सैनिकांच्या मुलाखती त्याने घेतल्या. त्याने गोळा केलेल्या दस्तऐवजांच्या सत्तावीस ट्रंका भरल्या. तेव्हा असा श्रमसायास करून आणि रक्त आटवून लिहिलेली कलाकृती यशस्वी झाली नाही तरच नवल!

पाश्चिमात्य ऐतिहासिक कादंबरीचा ऊहापोह केल्यावर मराठी ऐतिहासिक कादंबरी येथे अनुल्लेखित राहाणे इष्ट नाही. चांगल्या ऐतिहासिक कादंबरीला अजून मराठी वाचकांची मागणी आहे, असे प्रकाशकवर्गाचे मत आहे. मात्र चांगल्या ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिणारे उद्योगी कादंबरीकार हवेत. जोपर्यंत चांगली वास्तववादी सामाजिक कादंबरी मराठीत लिहिली जाणार नाही, तोपर्यंत ऐतिहासिक कादंबरीला वाचकवर्गाची वाण भासणार नाही, यात संदेह नाही.

उषा मा. देशमुख / मराठी गद्याचे अहेवलेणे

प्राचीन मराठी वाङमय-समीक्षेत कवितेला जसे प्राधान्य दिले गेले तसे गद्यवाङमयाला दिले गेलेले दिसत नाही. याला प्रमुख कारण म्हणजे यादवकालीन गद्य हे पूर्णतः महानुभावीय पंथीयांचे गद्य आहे. त्याचे स्वरूप Collection of teachings and sayings of चक्रधर असे होते. त्यामुळे ते पूर्णतः सांकेतिक लिपीमध्ये बंदिस्त राहिलेले होते. उलटपक्षी भागवतसंप्रदायाच्या कवितेची अवस्था तशी नव्हती. ही कविता सर्वसामान्य माणसाचा जिव्हाळ्याचा आणि आदराचा विषय झालेली होती. यादवकाळापासून पेशवेकाळापर्यंतच्या मराठी गद्याची परंपरा शोधू गेल्यास त्याची हिरवळ फार अल्प असली तरी त्या गद्याचे स्वतःचे वळण आणि विकास करण्याचा प्रयत्न सातत्याने केलेला स्पष्ट होतो. ज्ञानेश्वर, नामदेव, मुक्ताबाई आणि ज्ञानदेवांचा समस्त संतपरिवार यांनी जी उत्कट भक्तिभावपूर्ण अशी काव्यरचना केली ती काही एकदम निर्माण झाली असे नाही. कारण यादवकालीन सर्वच कवी एकीकडे परंपरावादी आहेत तर दुसरीकडे त्या परंपरांचा छेद करून पुढे जाण्याचा प्रयत्न करणारेही आहेत. यादवकाळात प्रौढ प्रतिभेची झेप आणि जीवनजाणिवांच्या तळापर्यंत जाण्याचा प्रयत्न कविता करीत आहे. एक समृद्ध जीवनाशय आणि कल्पकतेने निर्माण झालेली प्रतिमासृष्टी यांचाही आढळ यादवकालीन वाङमयनिर्मितीत झालेला स्पष्ट होतो. अशी समृद्ध निर्मिती एकदम होणे शक्य नसते आणि तिच्या पाठीशी महानुभाव गद्य निर्मितीचे पाठबळ आहे. मुकुंदराजाच्या 'विवेकसिंधू' आणि 'परमामृत' आणि ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी, नामदेवांची अभंगगाथा आणि ज्ञानेश्वर प्रभावळीतील सकळ संतांची अभंग गाथा यांच्या जोड-दुव्याचे काम महानुभाव गद्याने आणि महदंबेच्या धवळ्यांनी केलेले आहे ही गोष्ट वाङमयाच्या इतिहासावरून दिसून येते आणि 'सातीग्रंथा'ची रचना ही ज्ञानेश्वरोत्तर आहे याही घटनेला अनन्यसाधारण महत्त्व द्यावे लागते. मुकुंदराजाने शके ११११० मध्ये 'विवेकसिंधू'ची रचना केली आणि ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीचे लेखन शके १२१२ मध्ये झालेले आहे. या दोन समृद्ध आणि आशयपूर्ण निर्मितीतील एका शतकाचे अंतर महानुभाव वाङमयाने भरून काढले आहे. त्याही पूर्वी जाण्याचा प्रयत्न केला तर श्रीपतिभट्टाची 'ज्योतिष-रत्नमाला' आणि 'ताम्रपट', शिलालेखांचा उल्लेख करा लागेल. वापरंतु हे पुरावे एकतर त्रोटक स्वरूपाचे आहेत आणि ज्योतिषरत्नमालेत गद्यवाङमयाच्या घडणीचा आणि जिवंतपणाचा आढळ सर्वथैव दुरापास्त आहे. कारण तो एक मुहूर्तग्रंथ किंवा ज्याला 'शकुनग्रंथ' असेही म्हणता येईल असा तो ग्रंथ आहे आणि 'ताम्रपट', 'शिलालेख' हे बोलून चालून राजाज्ञेने आणि धर्मदानासाठीच

बोलके झालेले दिसतात. मराठी भाषेचा काळ ठरविण्यासाठी आणि मराठी भाषेचे स्वरूप जाणून घेण्यासाठी ताम्रलेखांचा आणि शिलालेखांचा उपयोग होऊ शकतो. परंतु मराठी भाषेचे वळण, मराठी भाषेची घडण आणि सामाजिक जीवनमानाचा एक छेद या दानपत्रांकडून काही अपेक्षिता येत नाही. त्यावेळी महानुभाव वाङमयाचा आणि पंथीयांचा अक्षरग्रंथ जो 'लीळा चरित्र' त्याकडे आपल्याला वळावे लागते. यादवकालीन समाजमन समजावून घेण्यासाठी 'लीळाचरित्र' आदर्शभूत ठरले आहे. माणूस हा नेहमीच आपल्या भावभावना, विचार विकार, सुखदुःख सर्वप्रथम आपल्या बोली-भाषेतून अभिव्यक्त करतो. प्रथमतः तो नेहमीच गद्यात बोलतो. कारण त्याची बोलीभाषा ही केवळ संकेत पुरवीत नसून संकेत माध्यमातून जन्माला आलेल्या भाषेची घडण आणि विकासही गद्यातून करीत असते. यादवकालीन गद्याचे स्वरूप लक्षात घेता एकीकडे बोलीभाषेला समृद्ध करण्याचे आणि तिचे भरणपोषण करण्याचे काम गद्याद्वारे पुरे केले जात होते तर दुसरीकडे वाङमयाचे विविध प्रकार निर्माण करून वाङमयाची विविधता निर्माण करीत होते. ललित आणि शास्त्रीय अशा दोन्ही पद्धतींनी वाङमय-निर्मिती होत होती.

यादवकालीन कवितेमागील आणि गद्यनिर्मितीमागील प्रेरणा आणि प्रवृत्ती वरवर भिन्न स्वरूपाची जाणवत असली तरी ती अंतिमतः धर्ममूलकच होती. अध्यात्मविचार, ईश्वरसंकीर्तन आणि समाजप्रबोधन यांनी गद्यपद्य वाङमय माखून निघालेले दिसते. किंबहुना माणसाचे सर्वच जीवन-व्यवहार हे धर्माने बांधले गेले होते. आज कायद्याने जसा मानवी जीवनव्यवहार नियंत्रित केला जातो तसा तो यादवकाळात धर्माने केला गेला होता म्हणून वाङमयनिर्मितीमागील मूलगर्भ प्रेरणा ही धर्ममूलकच होती. आणि हिंदुधर्मान्तर्गत अनेक संप्रदायांचा आणि विशेषतः भक्तिसंप्रदायांचा उदय आणि ऱ्हास सतत होत राहिलेला दिसतो याचेही कारण धर्मबंधन हेच होय. तत्त्वज्ञानाचा पुरस्कार, प्रचार आणि प्रसार करणे व त्याच्या साह्याने समाजाला सुधारण्याचा प्रयत्न करीत ईश्वरनिरूपण भक्तिमार्गाने करीत जाणे व त्यातून 'ज्ञान' धारणा मिळविणे या पद्धतीने यादवकालीन वाङमयनिर्मिती होत होती. प्रत्येक कलावंत या दिशेने जात असता आत्माविष्कार करून 'धर्म', 'कर्म' आणि 'ज्ञान' या संकल्पनांचा अर्थ आपल्या पद्धतीने आणि कुवतीप्रमाणे लावीत होता. ज्ञानेश्वरांनी 'विश्व स्वधर्म' असे म्हटले तर नामदेवांनी आणि इतर कवींनी 'धर्म' आपल्या प्रकृतीप्रमाणे शोधला. महानुभाव कवी आणि गद्यलेखकांनी मात्र 'धर्म' ही संकल्पना चक्रधरांच्या लीळा शोधनात आणि चक्रधर गुणसंकीर्तनात शोधलेली होती. वस्तुतः महानुभाव संप्रदाय हा हिंदुधर्मान्तर्गत एक संप्रदाय होता आणि आहे. परंतु हिंदू धर्मातील ईश्वर तत्त्वातील संकल्पना महानुभावांनी न स्वीकारता पंचकृष्णांपैकी शेवटचा अवतार जो चक्रधर त्यालाच ईश्वर मानले व द्वैतभाव निर्मिती केली. आणि चक्रधरांनी मी म्हणजेच ईश्वर असेही वारंवार सांगितल्यामुळे चक्रधर या ईश्वराचे ठिकाणीच पंथीयांनी धर्मशोधन केले. भागवत संप्रदाय आणि महानुभाव संप्रदाय समकालीन असूनही आणि त्यांच्या निर्मितीत अनेक साम्ये असूनही ईश्वरविषयक मूलभूत अधिष्ठानात भेद निर्माण झाला व दोन्ही संप्रदाय केवळ समांतर राहिले असे नाहीत तर परस्परांची हेटाळणी करण्यात धन्य समजू लागले. असा हा इतिहास आहे. 'लीळाचरित्र' हा महानुभाव संप्रदायाचा जसा पहिला ग्रंथ आहे तसाच मराठी वाङमयातही पहिला गद्यग्रंथ आहे. पंथीय दृष्टीकोणातून त्याचे महत्त्व अनन्य स्वरूपाचे तर आहेच परंतु वाङमयाच्या संदर्भात आणि राजकीय, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक दृष्टीनेदेखील 'लीळाचरित्रा'चे महत्त्व अनन्य ठरते. एकतर यादवकाळाला आज जे आपण संपूर्णपणे जिवंतपणाने अनुभवू शकतो ते लीळाचरित्रामुळेच ! लीळाचरित्रात चक्रधर या ईश्वरी अवताराच्या लीळांचे कथन असल्यामुळे त्या जश्याच्या तश्या स्वीकारण्यातील वस्तुनिष्ठा फार महत्त्वाची ठरली आहे. त्यातून एका शब्दाचाही फरक किंवा कानामात्रा इकडची तिकडे करणे म्हणजे धर्मबाह्य वर्तन करण्यासारखे ठरते. अशी महानुभाव पंथीयांची प्रखर निष्ठा होती आणि दुसरी गोष्ट म्हणजे 'लीळाचरित्र' सांकेतिक लिप्यांमध्ये बंदिस्त झाल्यामुळेही त्याचे यथातथ्य रूप नाहीसे झालेले नाही. एका प्रखर व्यक्तिनिष्ठेने भारावलेल्या पंथीयांनी

जोपासलेले हे वाङ्मय धन भाषाशास्त्रीयदृष्ट्याही अत्यंत महत्वाचा पुरावा म्हणून उपयुक्त ठरले. म्हणून लीळाचरित्राचे मोठेपण केवळ महानुभाव पंथीयानांच वाटते असे नाही तर वाङ्मयाचे अभ्यासक, भाषाशास्त्रज्ञ, इतिहासतज्ज्ञ, राजशास्त्रज्ञ, धर्मविचारवंत, समाजशास्त्रज्ञ या सर्वांना वाटत आलेले आहे आणि दिवसेंदिवस अनेक अंगांनी त्याचा अभ्यास संपूर्ण जगभर होत आला आहे ही घटनाही मराठी वाङ्मयात अपूर्व आहे. यादवकालीन जीवनाचा ठाव घेणारे वास्तवदर्शन लीळाचरित्र घडविते. यादवकालीन समाजजीवनाचे विविध स्तर, सामाजिक मनांची कुजबूज आणि मनामनांचे हुंकार लीळाचरित्रातून ऐकू येतात. म्हणून ते फक्त चक्रधरांचे आत्मवृत्त किंवा चरित्र आहे असे नाही तर यादवकालाचेच एक बिंबप्रतिबिंब त्यातून गोचर झालेले आहे. विद्याप्रसार, धर्मप्रसार, लोकशिक्षण, तत्त्वप्रचार या सर्व अंगांसह लीळाचरित्र आपल्याला चक्रधरांकडे नेत असते. त्या दृष्टीने त्याचे महत्त्व अनन्यसाधारण ठरते. सामाजिक स्थितिगतीची स्पंदने आणि यादवकालीन परिस्थितीचा मूळाबरहुकूम चलच्चित्रपट लीळाचरित्र घडवीत असते आणि गंमत अशी की अशा प्रकारची कोणतीही प्रेरणा किंवा प्रवृत्ती अभिप्रेत नसतांनाही किंवा तशी भूमिका नसतानाही आपोआप तसे ते घडून आलेले आहे. लीळाचरित्राचे आणखी एक गुणरूप म्हणजे या ग्रंथातूनच महानुभाव पंथीयांना लेखन-प्रेरणा मिळालेली आहे. चक्रधरांच्या हयातीत पंथीय वाङ्मय-निर्मिती झालेली नव्हती. ती निर्मिती होण्यासाठी चक्रधरांच्या महानिर्वाणामुळे पंथीयांच्या भावजीवनात निर्माण झालेली जी विरहव्यथा होती, जी एक भावमय दरी निर्माण झाली होती, जी एक भावनिक कोंडी निर्माण झाली होती त्यातून लीळाचरित्र-निर्मिती झालेली आहे. या लेखनात ओतप्रोत भरलेली मनाची तळमळ आणि उत्कटता जाणवते याचे कारण आजपर्यंत जे दैवत उरीपोटी अत्यंत श्रद्धेने बाळगले तेच गुणस्वरूप नाहीसे होताच मनामनांचा कल्लोळ आणि दुःखावेग असह्य झाला व अविरतपणे सर्व भक्तमंडळी चक्रधरांच्या स्मृती आणि लीळारूप आठवू लागले व आपला विरह कमी करण्याचा आणि दुःख हलके करण्याचा प्रयत्न करू लागले. या दुःखकल्लोळाला एक सुंदर रूप माहिमभट्टांनी नागदेवाचार्यांच्या उपस्थितीत दिले आणि दुःखभार हलका करण्याचा प्रयत्न केला. लीळाचरित्राची केंद्रीभूत व्यक्ती म्हणजे चक्रधर ! त्यांच्या संदर्भातील विविध आठवणी, आख्यायिका, आत्मकथन, वृत्तकथन, चरित्रचित्रण, प्रसंगचित्रण, दैनंदिन जीवनातील व्यवहार, चक्रधरांचे विविध ठिकाणींचे विहरण, विहरणात भेटलेली माणसे, घडलेले प्रसंग यांचे सर्वांगीण जिवंत चित्रण 'लीळाचरित्रा'त ग्रथित केले गेले. आणि लीळाचरित्रातून प्रेरणा घेऊन 'सूत्रपाठ', 'दृष्टांतपाठ' आणि 'स्थानपोथी' यांचीही निर्मिती झाली. याचाच अर्थ असा की लीळाचरित्राची निर्मिती ही नैमित्तिक दुःखकल्लोळ शमविण्यासाठी झाली असली तरी पुढील वाङ्मयनिर्मात्यांना ती उपजीव्य ठरली ती कायमचीच !

महानुभवांची गद्यपरंपरा ही बहुमुखी आणि वैविध्याने नटलेली आहे. एकीकडे तिचे स्वरूप हे संस्कृतनिष्ठ आणि शास्त्रीय आहे तर दुसरीकडे ती कहाणी वाङ्मयाशी, लोककथांशी आणि जातककथा वाङ्मयाशी आपले नाते जोडते आहे. लीळाचरित्र आणि दृष्टान्तपाठ यातील रचनासौंदर्य, संपादन कौशल्य आणि मार्मिक मूलगामी विवेचन लक्षात घेतल्यास संशोधन संपादनाचा पाया मराठीच्या बाळपणीच अत्यंत समृद्धपणे महानुभाव गद्याने घातलेला दिसतो. आणि शास्त्रीय पद्धतीच्या गद्य लेखनातील वस्तुनिष्ठता सांभाळण्यातही परंपरेला स्वीकारीत आणि तीत नाविन्याने बदल घडवीत निर्मिती प्रक्रिया चालू असलेली दृष्टीस पडते. एकीकडे लीळाचरित्राचेच पुनः रूपांतर संस्कृतात रत्नमाला स्तोत्रात करण्याचा प्रयत्न होत असतो तर दुसरीकडे वैदिक परंपरेप्रमाणे श्रुती, स्मृती यांना महत्त्व दिलेले असते. आणि सर्वच महानुभाव लेखक हे विद्वान पंडित आहेत. त्यांनी एकीकडे मराठी या आपल्या धर्मभाषेतून वाङ्मयनिर्मिती केली तर दुसरीकडे मूळ मराठी ग्रंथनिर्मितीचेच संस्कृतकरण केले. यावरून काळाचा प्रभाव आणि धर्माची बंधने यांनी बंदिस्त असलेली विद्वानांची मने कोणत्या दिशेने विचार करीत होती यावर प्रकाश पडतो. यादवकाळात कविताच केवळ समृद्धपणे निर्माण झाली असे दिसत नाही तर कवितेच्या तोडीस तोड असे गद्य वाङ्मयही

निर्माण झालेले आहे व त्यातून त्यांची संशोधन दृष्टी आणि सत्य शोधनाचा चाललेला प्रयत्न प्रत्ययाला येतो. भाष्य, महाभाष्य, लापणिका, व्याकरण, न्यायशास्त्र, टीपग्रंथ, प्रमेय ग्रंथ, लक्षण ग्रंथ, मीमांसा, तर्क, न्याय, वैय्याकरण, साहित्यशास्त्र आणि अलंकारशास्त्र ही जी शास्त्रीय वाङमयनिर्मिती आहे ती पूर्णतः महानुभाव लेखकांनी संस्कृत भाषेच्या तोडीस उतरेल अशा पद्धतीने केलेली आहे. यादवकालीन गद्य वाङमयात एकीकडे ललित गद्याची निपज होत होती तर दुसरीकडे शास्त्रीय स्वरूपाचे व विविध ज्ञानशाखांतील वैशिष्टये साक्षात करणारे असे गद्यलेखन चालू होते. 'स्मृतिस्थळ', 'गोविंदप्रभुचरित्र', 'स्थानपोथी', 'लक्षणबंद', 'आचार स्थळ', 'सूत्रमाला', 'सूत्रपाठ' या ग्रंथांच्या साहाय्याने वरील विधान पडताळून बघता येईल. कोणत्याही काळात वस्तुनिष्ठ दृष्टिकोणातून शास्त्रीय स्वरूपाची वाङमयनिर्मिती ही त्याकाळातील वैचारिक आंदोलन कोणत्या स्वरूपात आहे आणि कोणत्या दिशेने जात आहे यावर प्रकाश टाकल्यास समर्थ ठरणारी असते. एक नवीन वाङमयीन परिभाषा या निर्मितीतून निर्माण झाली. आणि संशोधन संपादनाचा ओनामा महानुभाव गद्यवाङमयाने पुढील मराठी वाङमयाला दिला. 'लीळाचरित्र' यामधून जसे चक्रधरांचे आत्मवृत्त आणि चरित्र-चित्रण मिळत असते त्याचप्रमाणे मराठी ललित वाङमयाचा आकृतिबंध कसा होता, कोणत्या स्वरूपात या लीळा अभिव्यक्त झाल्या आहेत आणि लीळांच्या पाठीशी असलेले जे प्रचंड व्यक्तिमत्त्व आहे त्या व्यक्तिमत्त्वाची व्यामिश्रता कोणत्या स्वरूपाची आहे; गावकुसान आणि गावकुसाबाहेर या व्यक्तित्वाने केलेले जे परिभ्रमण होते त्या परिभ्रमणातील सुखदुःखाचे क्षण, उलाघालीचे क्षण आणि आनंदाचे क्षण त्या व्यक्तिमत्त्वावर कोणता परिणाम घडवून गेले; या व्यक्तिमत्त्वाभोवती जमलेली जी माणसे होती त्यांचे स्वभाव, त्यांचे दैनंदिन जीवन आणि त्यांचा चक्रधर या प्रचंड व्यक्तिमत्त्वाशी आलेला संबंध यांचे मोठे विलोभनीय दर्शन लीळाचरित्रातून घडले आहे. आणि हे सर्व मराठी या खळखळत्या मायबोलीतून !

मराठी बोलीभाषेचा जिवंत आणि उमलता फुलौरा विशेषतः यादवकालीन गद्यवाङमयातून अभिव्यक्त झाला ही गोष्ट स्वतःसिद्ध आहे. माणूस बोलतो ते जिव्हाळ्याच्या, प्रेमाच्या भावना व्यक्त करण्यासाठी. या भावनांपाठीमागे असते ती माणसांनी माणसांना ओळखण्याची जिज्ञासा. आपले विचार, आपल्या भावना, आपल्या मनोकामना ज्यावेळी माणूस व्यक्त करतो त्यावेळी त्यातील उत्कटता ही सरळ अभिव्यक्त होते, ती संवादात्मक संभाषणातून ! कवितेला असलेली बंधने गद्यात बंधनकारक ठरत नसतात आणि एका वऱ्हाडी मोकळेपणाचे आणि मनाचे प्रतिबिंब ज्यात प्रतिबिंबित झाले आहे अशा मनामनांचे हुंकार यादवकालीन गद्यातून आणि विशेषतः लीळाचरित्रातून जाणवत असतात. लीळाचरित्राची रचना, लेखननिविष्टतेमागील भूमिका आणि वृत्तिप्रवृत्तिनिदर्शकता लक्षात घतल्यास त्यातील संवादी सूर बोलीमागच्या आंदोलनातून झिरपत असतात आणि अशा अनेक तऱ्हेच्या अनेक प्रकारच्या आणि अनेक भावानुभूती अभिव्यक्त करणाऱ्या 'संवादिनी' लीळाचरित्रातून गोचर होत असतात.. एका अर्थाने 'लीळाचरित्र' ही 'एकोक्ती' आहे तर दुसऱ्या अर्थाने समूहभावनांची 'संवादिनी' आहे. लीळाचरित्रात गद्याची कर्कशता किंवा काठिण्य का निर्माण झाले नाही ? गद्यामध्ये असलेली तार्किक मांडणी का येऊ शकली नाही ? आणि भाषेची क्लिष्टता का निर्माण झाली नसावी ? या साऱ्या प्रश्नांची उत्तरे 'लीळाचरित्रा'ला आलेल्या स्वरूपात आणि त्याने स्वीकारलेल्या आकृतिबंधात स्पष्ट होतात. तसेच त्यात लपलेले जे जीवन जाणिवांचे नाटय आहे त्यात स्पष्ट होतात. लीळा-चरित्राने स्वीकारलेला जो 'रूपबंध' आहे तोही कसा अनघड, नैसर्गिक आणि तालेवार असा, त्यातच त्याचे आकृतिसौंदर्य सामावलेले आहे. रंगभूमीचा पडदा वर जावा आणि नाटकाच्या पहिल्या अंकाला सुरवात होऊन वाचक आणि प्रेक्षक त्याकडे खेचला जावा तसे लीळाचरित्राच्या 'लीळा' वाचनाचा अनुभव आहे. आपल्या सर्व रूपगोचर अंगप्रत्यंगांसह एक निखळ संवादलेणे अनेक माणसांच्या भावभावनांना, विचारांना, विकारांना आणि कल्पनांना साक्षात करीत असते व त्यासह ती माणसेही जिवंत जागती आणि स्वतःच्या पाया-वर उभी असलेली अशी साक्षात होत असतात. म्हणजे लीळाचरित्र हे एकीकडे 'चरित्र' आहे, 'आत्मचरित्र' आहे;

'संवादिनी' आहे, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाचे एक 'सुवर्णपान' आहे पण त्याहीपेक्षा ते अनेक गावकुसां-बाहेरील आणि गावकुसांआतील माणसामाणसांचे 'हुंकार' आहेत, 'सहजोद्‌गार' आहेत आणि 'मनोदर्पण' आहे. असे म्हणण्याचे कारण म्हणजे ज्या काळात मराठी हा शब्द आणि मराठी ही संस्कृतीही आपला रूपभेद स्पष्ट करू शकत नव्हती अशा एका अंधारकाळी संस्कृत पंडितांनी आणि जाणकार विद्वानांनी मराठी भाषेची गंगा 'लीळाचरित्रा'तून धारावाही वनविली. सर्वच महानुभाव (यादवकालीन) हे संस्कृत विद्येचे उपासक, जाणकार आणि पढिक होते. संस्कृत भाषेची योग्य ती श्रेष्ठता त्यांनी मान्य केलेली होती. संपूर्ण देशातील व्यवहार विद्वन्मान्य अशा देववाणीतून होत होता. अशा वेळी शके १२०५ मध्ये मात्र गद्यातून मराठी बोली भाषेचे 'खळाळ' विद्वान अशा महानुभावांनीच जिवंत ठेवले व केवळ काव्यातूनच बोलीभाषेचा स्वीकार झाला असे होऊ न देता गद्यातूनही मराठी भाषेचे पाझर पाझरू लागले हे 'लीळाचरित्र' या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. आपले भाषिक पारतंत्र्य झुगारून देण्याचा प्रयत्न फक्त केवळ महानुभावांनीच केला होता असे नाही तर जैन, लिंगायत या पंथीयांनीही लोकभाषेचा आणि आपल्या मातृभाषेचा आग्रह आपल्या वाङमय-निर्मितीतून मांडला होता. येथे केवळ भाषिक विरोधामुळे किंवा केवळ भौगोलिक संकुचितपणामुळे भाषिक वादळे निर्माण झाली असेही नव्हते तर एकच आणि एकमेव प्रमुख कारण म्हणजे बहुजन सुखाय आणि बहुजन हिताय अशी निर्माण झालेली आणि लोकशिक्षक असलेली माणसे आपले विचार आणि आपला दृष्टिकोण आपल्या बोली-भाषेतून अभिव्यक्त करण्याचा आग्रह धरून होती व एक प्रचंड वादळ त्यामुळे निर्माण होऊन गेले. अनपढ, अशिक्षित आणि अज्ञानी समाजाला जर काही भौतिक आणि आधिदैविक शिकवण द्यायची असेल तर त्याच्याशी त्याच्या मायबोलीतून,मायभाषेतून बोलले पाहिजे, त्याच्याशी संवाद साधला पाहिजे, याची प्रखर जाणीव जशी चक्रधरांना झाली तशीच चक्रधरांपाठोपाठ येणाऱ्या ज्ञानेश्वर-नामदेवांना झाली. केवळ 'संस्कृताची गहन तीरे' तोडण्याचा हा प्रयत्न नव्हता त्यावरोवरच एका 'आध्यात्मिक लोकशाही'ची मुहूर्तमेढ पक्की करून ईश्वर संकीर्तन चक्रधर आणि ज्ञानेश्वर या लोकपालांना करणे आवश्यक वाटले होते. म्हणूनच लीळाचरित्रात 'संवाद' येतात आणि ज्ञानेश्वरीतही 'संवाद' असतात. हजारो-लाखोंच्या मनामनांच्या संवादांमधून समाजाची दुःखे, अन्याय, दारिद्र्य, व्यथा अभिव्यक्त होत गेल्या होत्या. समाजाशी संवाद साधीत, समाजाला जवळून न्याहाळीत आणि समाजामध्ये डोकावीत जात जात आपल्या धर्माचे, पंथाचे प्रयोजन चक्रधर-ज्ञानदेव यांनी निश्चित केले होते. एका अर्थाने त्यांचे 'जगणे' हे त्यांचे स्वतःचे 'जगणे' नव्हतेच तर 'स्व' मध्येच संपूर्ण मानव समाजाची जगण्याची खंत लक्षात घेत व त्यातून मार्ग काढीत पुढे जाण्याचा प्रयत्न होता. तत्कालीन समाजाचे लौकिक भावजीवनाचे स्वरूप आपल्याला जसे लीळाचरित्रातून जाणवत असते तसेच ते थोड्या प्रमाणात ज्ञानेश्वरीतूनही जाणवत असते. वस्तुतः चक्रधर हे विचारवंत होते. ते काही ज्ञानेश्वरांसारखे कलावंत नव्हते. परंतु चक्रधरांनी लावलेला जीवनाचा अर्थ आणि त्यासाठी एकांतातून लोकांतात येण्याची दर्शविलेली तयारी त्यांच्या लोकाभिमुखतेची साक्ष देते. समाजजीवन लोकाभिमुख आणि लोकसत्ताक करण्याचा असा हा प्रयत्न होता. म्हणून एकांक–पूर्वार्ध–उत्तरार्ध या संपूर्ण लीळाचरित्रातील संवादात शब्दाशब्दांत जिव्हाळा ओतप्रोत भरला आहे. इतकेच नव्हे तर 'लीळाचरित्र' हे महानुभाव संप्रदायाचे आणि वाङमयाचे स्फूर्तिकेंद्र बनले. एकीकडे चक्रधरांचे वाङमयीन व्यक्तिमत्त्व लीळाचरित्रातून गोचर होते तर दुसरीकडे सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक अशी महाराष्ट्राची घडण कशी होती याचा अतिशय महत्त्वपूर्ण पुरावा म्हणून वैशिष्ट्यपूर्ण ठरते. 'लीळाचरित्रा'मधून राजकीय परिवर्तनांची दिशाही स्पष्ट झाली आहे. म्हणून हा ग्रंथ केवळ महानुभावांना किंवा केवळ वाङमयाच्या अभ्यासकांनाच महत्त्वपूर्ण वाटतो असे नव्हे तर साहित्य, समाज आणि संस्कृती यांचा यादवकालीन 'आदर्शपाठ' लीळाचरित्रातून साक्षात होतो.

एखादी 'म्हण' किंवा एखादा वाक्प्रचार केव्हा निर्माण होतो? भाषाशास्त्रीयदृष्ट्या बघू लागलो तर निरंतर उपयोगात आणून जो शब्दसमूह एका विशिष्ट अर्थानेच सिद्ध होतो त्याला आपण 'म्हणी' असे म्हणतो.

अनुक्रमणिका

म्हटली जाते ती 'म्हण' अशी जर म्हणींची फोड केली तरीदेखील तीतून शब्दांचा सामाजिक असा जो अन्वय आहे तो लक्षात येईल. उदाहरणार्थ—'तारेवरची कसरत करणे' हा वाक्प्रचार क्रियापदान्वित असा असून त्यातून दुसराच एक लक्ष्यार्थ स्पष्ट झालेला असतो, तो म्हणजे तारेवरून चालताना ज्याप्रमाणे सावधगिरी बाळगली पाहिजे, कौशल्य दाखविले पाहिजे त्याप्रमाणे कोणत्याही कृत्यात सावधगिरी दाखविली पाहिजे असा या वाक्प्रचाराचा सरलार्थ होय. पिढ्यानुपिढ्या वापरून या शब्दसमूहाला एक विशिष्ट अर्थाचे वलय निर्माण होते व त्याचा वाक्प्रचार तयार होतो. वाक्प्रचारात किंवा म्हणींमध्येही लोकांनी दैनंदिन जीवनात जो भाषेचा व्यवहार केलेला असतो, वापर केलेला असतो त्यातूनच एक विशिष्ट संकेत कालांतराने निर्माण होत असतो. यादवकालीन मराठी भाषेत आणि विशेषतः लीळाचरित्रात असंख्य म्हणी आणि वाक्प्रचार मिळतात याचाच अर्थ असा की भाषेची शब्दसंपत्ती समृद्ध असते त्याशिवाय वाक्प्रचार आणि म्हणी भाषेत निर्माण होणे शक्य नसते. तसेच आणखी असे स्पष्ट होईल की जर भाषा सर्वार्थाने समृद्ध आणि प्रौढ असेल तरच तिच्या 'म्हणी' आणि 'वाक्प्रचार' निर्माण होतील. त्याही दृष्टीने लीळाचरित्रातील 'म्हणी' आणि 'वाक्प्रचार' लक्षात घेतले तर यादवकालीन मराठी भाषेची प्रौढता, विदग्धता आणि गर्भश्रीमंती दिसू लागेल. लीळाचरित्रातील शब्दसंपत्तीच्या साह्याने त्याच्यातील म्हणींचा व वाक्प्रचारांचा अन्वयार्थ लक्षात घेतला तर समकालीन महाराष्ट्रीय सांस्कृतिक, भौतिक, धार्मिक, सामाजिक आणि राजकीय जीवनावर एक वेगळाच प्रकाश पडेल ! मराठी भाषेची समृद्ध आणि परिपक्व अवस्था लीळाचरित्रातील अनंत वाक्प्रचार आणि म्हणीं मधून लक्षवेधी ठरते आणि हे वाक्प्रचार लोकजीवनाशी आणि विशेषतः नागर जीवनापेक्षाही ग्रामजीवनाशी संबद्ध असे आहेत. त्यातून यादवयुगो चालीरीती आणि जीवन व्यवहार दृष्टगोचर होतोच पण एका समृद्ध आणि सुसंस्कृत जीवनातील भावविश्व गोचर होत जाते.

वास्तविक लीळाचरित्राची निर्मिती ही 'उत्तरार्ध-पूर्वार्ध : दोनी भाग केले' अशी झालेली आहे. लीळाचरित्रनिर्मितीत उत्तरार्धाला प्राधान्य मिळणे स्वाभाविकही होते. कारण चक्रधरस्वामींचे महानिर्वाणामुळे निर्माण झालेले दुःसह दुःख शमविण्यासाठी त्यांच्या सहवासात आलेली समस्त भक्तमंडळी त्यांच्या स्मृतिलीळा आठवू लागणे स्वाभाविकच होते. त्यादृष्टीने उत्तरार्धातील लीळा ४८८ आहेत, पूर्वार्धातील लीळा ३५८ आहेत आणि एकांकातील लीळा केवळ ७५ आहेत. यावरूनही चक्रधर-शिष्यांनी आपल्या परमदैवताला सतत आळविण्याचा मनःपूर्वक केलेला जो प्रयत्न होता त्याचा निर्देश करता येईल. सर्व स्मृती आठवताना अर्थातच काहीवेळा द्विरुक्ती, काही वेळा पुनरुक्ती तर काही वेळा एकी वासना, दुजीवासना असे लीळाचरित्रात घडले आहे आणि त्यामुळे त्याच्या स्वाभाविक सौंदर्यात आणखीनच भर पडलेली आहे. नागदेवाचार्यांच्या अनुसरणापासून महाप्रयाणापर्यंतचा उत्तरार्ध त्या दृष्टीने भक्तांच्या अधिक निकटचा होता. हा काळ अर्थातच शके ११९० ते ११९४ असा केवळ चार वर्षांचा कालखंड आहे. त्यात शेकडो भक्त मंडळी चक्रधरांच्या अवतीभोवती होती त्यांची ती 'पाळिली' 'पोषिली' अशी होती. एकांतातून केवळ लोकांतात चक्रधर आले असे नाही तर अतिशय झपाटलेपणाने त्यांचे परिभ्रमण चालू होते. या भ्रमणालाही विलक्षण गती होती, विलक्षण संगती होती. एकांक पूर्वार्धापेक्षाही उत्तरार्धात अनेक सूत्रे आणि दृष्टान्त येतात आणि एक विलक्षण चमकदारपणा त्यांच्या भाषेला येतो. तिच्यातील वक्तृत्व, स्वभावोक्ती आणि अलंकरण यामुळे एक प्रगल्भ प्रौढत्व या भाषासरणीला झळाळ देऊन जाते. पूर्वार्धातील काळ म्हणजे चक्रधरांच्या पतितावतारापासून पैठणला येऊन नागांविकेला प्रेमदान आणि स्वतः चक्रधरांनी संन्यासदीक्षा ग्रहण हा कालखंड आहे. उत्तरार्धापेक्षा हा काळ खूपच विस्तृत आहे व त्यातच चक्रधरांचे आत्मचरित्रही बोलके झालेले आहे. मूळ लीळाचरित्राचे 'उत्तरार्ध' आणि 'पूर्वार्ध' असे दोनच विभाग स्मृतीस्थळकारांनी मानलेले असले तरी त्यात अनस्यूत असलेले आत्मवृत्त 'एकांक'मध्ये आलेले आहे आणि अशा पद्धतीने उत्तरार्ध शके ११९० ते ११९४, पूर्वार्ध शके ११८६ ते ११९० आणि एकांक शके १०७५ ते ११८५ अशी चक्रधर-चरित्राची विभागणी झालेली आहे. त्यातही चक्रधरांच्या

(पृ. १४७ वर पाहा)

अनिल दिगंबर कुळकर्णी / **यास्मीन**

"कितनी हसीन सोहबते हैं गुलोंकी मगर
वहीं जिंदगी है; जो कांटों में गुजार दे"

माझ्या कोवळ्या, निरागस कवितेचा
अर्थ समजून घ्यायला;
तू कुठे असशील ?
यास्मीन,
पाऊसझडीच्या भीतीने
अंग चोरून बसलेल्या सर्पाने, केलेल्या तीक्ष्ण दंशाच्या कथा
तुला माहीत होत्या
म्हणून का तू अशी अचानक निघून गेलीस ?

थाळी वाजवताच
कुठल्या फकिराला तू ओंजळभर दाणे टाकलेस की
माझ्या गात्रातून फुटणारे
तुझ्या चैतन्याचे स्रोत अजूनही आटत नाहीत
कोणत्या फुलांच्या सार्वभौम प्रदेशाचा,
मी राजा आहे की
जिथल्या बहराला अंत नाही.
यास्मीन
त्यादिवशी;
समईच्या मंद अुजेडात
मी आईला व्यंकटेशस्तोत्र वाचून दाखविले
वासराची वाट पाहात असलेल्या गाईच्या
पाठीवरून हात फिरवला
आणि, पलसिद्धाच्या मठाकडे निघालो.
वाटेत––
ताऱ्यांचा पाऊस कोसळत होता.
मशिदीच्या मिनारावरून उडालेला पारवा
झाडांच्या गर्द फांद्यांत हरवून गेला
शुभ्र समाधीच्या पायथ्याशी
भरलेल्या गच्च तलावात
पाय मोकळे सोडून बसलो
आणि तू सवंध आठवत गेली...

फुटक्या भांड्याला डाग देणाऱ्या
वृद्ध दमेकऱ्याशी
तुझे लग्न ठरले, यास्मीन
तेव्हा, केवढी कोमेजून माझ्याकडे आलीस.
विलक्षण कोवळेपणाने तू
माझा हात हातात घेतलास
आणि म्हणालीस—
"बादशाह, जो खुषीसे चोट खाये वो जिगर कहाँसे लाऊँ"
तेव्हापासून
'दो गज' जमिनीसाठी तडफडणाऱ्या 'जफर' सारखा
मी अनवाणी भटकतोय
क्षितिजापासून समुद्रापर्यंत
यास्मीन ! जिथे;
पुत्र-प्राप्तिच्या तीव्र लालसेने
कुलीन स्त्रिया, अपरात्रीला
स्मशानातल्या मारोतीला नागव्याने आंघोळ घालतात
तिथे;
पारिजाताच्या उमलण्याचे रहस्य माहीत असलेल्या
तुझ्या सौंदर्याला
कुणाच्या मंत्राने भारून टाकले होते की,
तुझ्या प्रयाणाची वार्ताही मला पोचू शकली नाही.
यास्मीन—
रिमझिमत्या पावसात
तुझा दफनविधी आम्ही शांतपणे उरकून आलो.
आता
मातीच्या मअुशार अंथरुणावर
शहनाईच्या मंजुळ स्वरांची स्वप्ने
तुला पडत असतील का ?

मुक्तीच्या मंगलमय क्षणी
आकाशात टिपूर चांदणे असेल
अनोळख्या देवदुताने तुझी कवर खणून काढल्यावर
तू तशीच
सतेज, सुहास्य
वहरून बाहेर येशील का ?
यास्मीन,
माझ्या आताच्या विपण्ण रात्रींना
तुझ्या आठवणींचा सुगंध आहे
कधी काळी—
तुझ्या देहावर माळलेल्या माझ्या स्पर्शांचे
आता निर्माल्य झाले असेल
ते
तसेच असू दे
प्रत्यक्ष भेटीत ओळख पटल्यावर
मीच त्याला वाहत्या पाण्यात सोडून देईन.

जन्मले ती आईची चवथी मुलगी म्हणून. त्यामुळे अर्थातच मी झाल्याचा आनंद कोणालाच वाटला नाही. मी झाले एवढंच. पण एक मोठीच भानगड करून ठेवली मी. झाली ती रंगानं एकदम काळी. वडिल मावळे होते. पण आई एकदम गोरी होती. गोरीपान. झाल्या झाल्या सुईण तर मला मोरीतच फेकायला निघाली होती. एवढा राग आला होता तिला. पण आईचं मन कळवळलं.

जन्मले म्हणून वाढू लागली. जाणून बुजून कोण गळा दाबणार होतं ? हत्येचं पाप कोणी घ्यायचं डोक्यावर ? तसे सर्व हुशार होते. शरीराची तर हत्या नाही केली; मनाची केली. कुणी पाहिलं, न जाणलं.

मी वाढत गेले. तेरावं लागलं. दोन मोठ्या बहिणी गोऱ्या होत्या. मागण्या येऊन येऊन त्यांची लग्नं झालीत. तिसऱ्या नंबरची बहीण निशा सावळी होती. ती एक काळजीचा विषय बनली. आई घाबरायला लागली. वडिल चूप झाले.

निशा सावळी आहे तर ही मुष्किल ! मी तर ठार काळी. माझ्या काळजीनं तर आई मरून जाईल. निशाला तर सोन्या-चांदीनं मढवता येईल. पण हिऱ्यांची तुला करूनसुद्धा कोणी मला स्वीकारलं नसतं.

वाटलं आईच्या सुंदर, कुरळ्या केसांत बोटं अडकवत म्हणावं, अग लग्न केलंच पाहिजे असं कुठाय ? तू मला आपला मुलगा समज. मी तुझ्याजवळ राहीन, शिकीन, नौकरी करीन. रोज रात्री स्वप्नात डॉक्टर होऊन मी वार्डात फिरायची व भविष्याची चिंता सोडून गाढ झोपायची.

एकदाचं निशाचं लग्न ठरलं. आईनं सोन्याचा जोडा दाखवला तेव्हा कित्येकांच्या माना झुकल्या. एका बापानं तर उडी मारून संधी साधली. सर्वजण निशाच्या भाग्याचा हेवा करू लागले. किती भाग्यवान पोरगी — उंच नीच, गोरापान आणि वर लायझन ऑफिसर. वागण्यात फुलांचं मार्दव, बोलण्यात मधाळपणा, अंतःकरणाचा राजा. निशा खूप खूश होती आणि भयभीतही.... हो दाखवावयाचे दात एक आणि......! !

सर्व बहिणी आपआपल्या घरी निघून गेल्या. घरात मी एकटीच उरले. मुलगीही मीच आणि मुलगाही मीच. माझं एकछत्री राज्य होतं. सारा कमळ आई-वडिलांच्या प्रेमाचं केंद्र मीच होते आता. खूप छान वाटलं. सर्वात चांगला वाटला तो वडिलांचा सहवास.

वर्गात पहिली आले तेव्हा किती आनंद झाला आईला. वडिलांनी कौतुकानं डोळे भरून एकदा वरपासून खालपर्यंत पाहिलं, जणू माझ्या अंगातून

प्रकाश स्रवत होता. ते पुष्कळ वेळ पाहात राहिले. त्यातच त्यांनी माझ्या भविष्याविषयी निर्णय घेतला— 'हिला डॉक्टर करीन मी. डॉक्टर होईल तर सर्वजणं हिच्यासमोर झुकतील. आजारी कोण नाही पडत ? सर्वांनाच गरज पडेल हिची.'

मी उमजले वडिल माझं काळेपण धुण्याचा सावण घेत होते.

त्या दिवशी माझ्या भविष्याचा सूत्रपात झाला. रेशमानं विणलेला जोडा, मखमलीनं मढवला जाऊ लागला. वडिल यानेच तर प्रहार करतील समाजावर, गौरवर्णाच्या उपासकांवर.

प्री-मेडिकलमध्ये पहिली आले म्हणून लेडी हार्डिंग कॉलेजमध्ये सहज प्रवेश मिळाला. पहिल्या वर्षातील शरीरशास्त्राचा तास अजूनही लक्षात आहे माझ्या.

शल्यक्रियेच्या टेबलावर काळी ठिक्कर पडलेलं बेवारस प्रेत पडलं होतं. आज जसं हे प्रेत बेवारस आहे तसं जन्मतानाही होतं ? जेव्हा सुईण मला फेकायला निघाली होती तेव्हाच बेवारस झाले होते मी. या प्रेतासारखी. कोणाला नको असलेली, हवीशी न वाटणारी मी बेवारस नाही तर काय आहे ? आई-वडिलांच्या प्रेमाचं आच्छादन तरी कसलं ? अनाथाश्रमाच्या अधिकाऱ्यानं, अनाथ मुलांना, मागून आणलेल्या जुन्या कपड्यानं झाकावं असं ! ! डोळ्यांच्या कडांना आलेलं पाणी काजळाच्या रेखेसारखं पापणीभर पसरलं.

'डॉक्टर व्हायचं असेल तर मन खंबीर ठेव किरण. प्रेत पाहून रडायला लागलीस तर जिवंत माणसांना कसं कापशील ?'

'जिवंत माणसांना कच्चं चावून खाईन' मनातल्या वाभळीला काटे फुटत होते. 'येऊ तर दे कोणी समोर, रक्तबंबाळ करून टाकीन. '

मेडिकलच्या तिसऱ्या वर्षात गेले तेव्हा आपणाला जादा समजणारे नातेवाईकही आई-वडिलांना हसून हसून नमस्कार करू लागले. कित्येकदा तर कार घेऊन थेट घरापर्यंतही आलेत. दवाखान्यात कोणाला भरती व्हायचं होतं आणि दवाखान्यात योग्य काळजी घेतली जाण्यासाठी छोटी-मोठी ओळख असणं जरूरी असतं.

परंतु जेव्हा जेव्हा आईनं माझ्या लग्नाचं बोलण काढलं तेव्हा तेव्हा कुत्र्याचं शेपूट वाकडंच राहिलं.

अगदी छोटी होते तेव्हा दूरच्या नात्यातील आत्याच्या मुलीशी, उषाशी खेळायची. आत्याची उषा पहाटेसारखी गोरी, सुंदर होती. आणि मी, मी रात्रीसारखी काळी. एक दिवस न राहावून आत्याला विचारलं, 'आत्या, उषा एवढी गोरी कशी झाली ग ?'

'अग, मी तिला धोव्याला दिलं होत धुवायला'.

आत्यानं वेळ मारून नेण्यासाठी थाप मारली पण मी धोव्याच्या मागे हात धुऊन लागले. मी त्याच्या घरी गेले 'मला धू नं ! मला गोरं कर'.

त्यादिवशी रविवार होता. सकाळच्या इन्स्पेक्शननंतर आमची सुट्टी झाली. हॉस्टेलमधून मी घरी आले. निशा आणि तिचे यजमानही आले होते. आजपर्यंत त्यांनी तिला एखाद्या कावडीसारखं खांद्यावर वागवलं होतं. एका पारड्यात त्यांच्या स्वतःच्या आईवडिलाचं सुख होत तर दुसऱ्यात आमच्या वडिलांनी दिलेले पैसे आणि नोकरी. आतापर्यंत त्यांनी या कावडीचा तोल बिघडू दिला नव्हता परंतु आता तो तोल बिघडू लागला होता. आता ते ही कावड पेलायला तयार नव्हते. जर निमूटपणे त्यांच्या खांद्यावरून ती काढून घेतली गेली नाही तर ते ती फेकून द्यायला निघाले होते. निशाहाय होऊन स्वयंपाकघर आणि डायनिंगरुम यांच्यात पेंड्यूलमसारखी हेलकावे खात वेळ घालवीत होती. कुठल्या तरी गौरवर्णी सुंदरीनं तिच्या सर्वस्वाचं अपहरण केलं होतं. धागे इतके गुंतले होते की तुटल्याशिवाय वेगळे होणे शक्य नव्हते. गुंता असाच झाला होता. कोण कुठं गुंतला आहे, कोण कुठं हेच कुणाला समजत नव्हतं.

सर्व ऐकलं तेव्हा सुन्न झाले. रक्तहीन. मायेची वेल निशाच्या आधारानं कशीबशी वाढत होती, ती पण सुकली. आता नाही होणार माझं लग्न. हिऱ्यानं तोललं तरी नाही, डॉक्टर झाले तरी नाही. काळ्यावर प्रेमाचा रंग कसा बरं चढू शकेल ? माझी तर चादरच काळी आहे. पातळ पण नाही. जन्मापासून पांघरलेली आहे.

'का? पण असं का? चामडीत येवढं आहे तरी काय?'

मी नाही, माझे प्रश्न आक्रंदत होते. क्षणभर जीजाजी हतबुद्ध झाले. इतका सरळ प्रश्न मी विचारीन असं त्यांना वाटलं नसावं. स्पष्ट बोलायची त्यांचीही इच्छा होती. माझ्या प्रश्नानं आंधळ्याला दोन डोळे मिळाले होते.

'बरं झालं कोणी तरी हा प्रश्न विचारला मला. प्रश्न रंगाचा नाही किरण अंतरंगाचा आहे. त्वचेचा नाही, नसांमधून वाहणाऱ्या उष्ण रक्ताचा आहे... अगदी थंड... थंडगार रक्त आहे तुझ्या वहिणीचं'.

मी चकित झाले. विस्फारलेल्या डोळ्यांनी त्यांच्याकडे पाहू लागले. जीजाजी माझ्या जवळच्या खुर्चीवर येऊन बसले.

'कळतयं नं तुला काही किरण मी काय सांगतोय ते? मेडिकलची विद्यार्थिनी आहेस तू. तुझा प्रश्न एका वयात आलेल्या मुलीचा प्रश्न होता. ठीक आहे नं मी काय म्हणतोय ते?'

हो म्हणू की नाही. मी तर सुन्न झाले होते. मला वाटलंच नव्हतं ते इतक्या स्पष्टपणे माझ्याशी बोलतील म्हणून. गुंजणारा भारी आवाज, त्यातील आपलेपणा आणि त्यातूनही मला वयस्क मानणं. संमोहित केल्यासारखी मी जडवत बसून राहिले.

पुरुषाला स्त्री हवी, त्वचा नको. शरीराच्या भुकेसाठी शरीर हवं, मनाच्या भुकेसाठी सळसळतं चैतन्य हवं, बुद्धीच्या भुकेसाठी प्रौढत्व हवं. हे आहे सगळं निशापाशी?'

खुर्चीच्या पाठीवर क्षणभर डोकं विसावलं त्यांनी.

'जेव्हा जेव्हा निशाजवळ गेलो तेव्हा मन उबून गेलं. जसं आपलं कर्तव्य पार पाडत होती ती. केवळ एक दान भावना. प्रत्येक वेळी वाटलं आपण एक याचक आहोत. कुठे उष्णता नाही, ऊब नाही. कोणाला सांगू, मला स्त्री हवी, शरीर नको अशी स्त्री जिच्या नसांतून उष्ण रक्त वाहत आहे; अदम्य, अतृप्त इच्छांची तडफ आहे मग ती काळ्या त्वचेआड असो की गोऱ्या. नुसत्या चामडीला काही अर्थ नाही.'

खूप थकवा आल्यासारखे ते उठले.

'पुष्कळ निभवलं मी. खोटेपणाचीसुद्धा हद्द असते. मी माझ्या मनातील आदिम मनुष्याची गोष्ट सांगितली. प्रत्येक पुरुषाच्या मनात हाच आदिम मनुष्य असतो. प्रत्येक पुरुषाला याचाच शोध असतो. तुला नाही वाटत?'

'कधी याचा विचारच केला नाही मी'. ओठ सुकले होते माझे. शरीर जडवत झालं होतं.

'नसेल केला तर कर... निदान आपल्यासाठी तरी....'

काही उपाय नसल्यामुळं निशानं परिस्थितीशी समझौता केला. आईला हे सहन झालं नाही. काही दिवस आजारी राहिली आणि एके दिवशी या जंजाळातून मुक्त झाली. तिच्या मृत्यूचं मला दुःख झालं नाही, उलट बरंच वाटलं. आता चैन आहे. वडिल घरात फार वेळ रहात नव्हते आणि घराबाहेर पडल्यावर ते सर्व विसरून जात होते. लग्नाची गोष्ट म्हणजे एक आरसा होता ज्यात माझा चेहरा प्रतिबिंबित होत राहायचा तो नेहमी आईच्या चेहऱ्यावर. टांगला रहायचा. बरं झालं तो तुटला.

पण एके दिवशी कोणीतरी मला आभाळातून ओढून जमीनीवर आदळलं.

त्या दिवशी वडिल मला हॉस्टेलवर घ्यायला आले. संध्याकाळी कोणी घरी येणार होतं. आश्चर्य! माझं म्हणे लग्न ठरलं होतं. गोष्टी पक्क्या करण्यासाठी माझ्या वडिलांनी दहा हजार रुपये दिले होते. आज साखरपुडा होता.

मुलाच्या आईनं आणि वहिणीनं दवाखान्याच्या दारात मला पाहिलं होतं आणि वडिल हुंड्यानं हवेलीवजा घर द्यायला तयार होते तेसुद्धा त्यांनी पाहिलं होतं. मुलाला मुलगी दाखविण्याची गरज नाही कारण त्याच्यासाठी आई आणि बहिणीचं म्हणणं वेदवाक्य होतं.

'बिचारा! त्याला मुळीच माहीत नाही की मी काळी आहे. आई, वहिणीवर आंधळेपणे विश्वास ठेवून बसलाय. नरकाच्या अग्निकुंडात फेकला जात आहो याची पण कल्पना नाही बिचाऱ्याला..!'

आई गेली आणि वडिलांना कशाचाच मोह

उरला नाही. न स्वत:चा, माझा न पैश्याअडक्याचा. आईच्या अभावी शेजारच्या भाभींनी आणि सौ. मिश्रांनी साखरपुड्याची जबाबदारी उचलली. त्या मला आरशासमोर सजवीत होत्या. यंत्रचलित मला. भाभी केसांचा अंबाडा बांधत होती आणि सौ. मिश्रा नेहमी प्रमाणे बडबडत होत्या, 'मुलगा फार साधा आहे नाही तर आजकाल कोण पाहिल्याशिवाय लग्न करतो. '

'तसा तो स्वत:ही काळाच आहे म्हणा...' काचेवर पत्थर फेकून मारलाच त्यांनी. काच चूर चूर झाली. पण कुठे? समोरचा आरसा तर अभंग उभा आहे.

'मग माझ्या मनात तुटलं काही?'

पतीविषयी काय कल्पना बाळगल्या होत्या उराशी? त्या तर छिन्न-भिन्न नाही झाल्या? हृदय चाचपून चाचपून पाहिलं आत काच खोलवर रुतले होते. खरंच, कधी विचारच नव्हता केला नवरा काळाही असू शकतो याचा.. '

काळा आहे म्हणून फसविला जात आहे. मन आक्रंदून उठलं. ते पण इतकं अपमानित, इतकं घायाळ झालं नव्हतं. 'मुलगा तर तुपाचा लाडू असतो, कसाही असला तरी तुपाचाच लाडू असतो', सौ. मिश्रा भाभींचं तोंड बंद करीत होत्या.

विवाहाच्या वेदीत त्या तुपाच्या लाडूचा होम केला गेला. त्याच्या घरच्या लोकांकडून. माझं लग्न लागलं. रडू येत होतं. वरमाला घालताना क्षणभर नाही, युगांसाठी त्याचे हात खोळंबले होते. मी जडवत झाले होते. पाषाणासारखी. पायाने स्पर्श केला असता तरी उद्धरले असते पण त्यानं स्पर्श केलाच नाही. त्या रात्री नाही, दुसऱ्या रात्री नाही आणि अनेक रात्री नाही.

तो इतका भला होता की मला अव्हेरूही शकला नाही. तडफडत राहिला. माझ्या मनात जी बर्फाची लादी ठेवली होती ती वितळू लागली. त्याच्याकरता. किती झालं तरी माझा नवरा होता. आज्ञाधारक मुलगा असण्याची सजा भोगत होता.

तो निरिच्छ भटकत राहिला. .येथे.. तेथे. .आपल्या मित्रांकडे. आणि मी घराच्या अंधाऱ्या खोलीत आणखीच अंधार करीत बसून राहिले.

आमच्यामध्ये दुहेरी मौन होतं. एका बाजूनं मी कडी लावून घेतली होती. दुसऱ्या बाजूची उघडण्याची त्याची इच्छा झाली नाही. अशानं तर दम कोंडेल त्याचा.

'मरायचं ठरवलं आहे की काय त्या काळ्या माणसानं?'

एके दिवशी खूप राग आला. 'काय फरक आहे तुझ्यात नी माझ्यात? दिवा लावला तरी नाही, दिवा विझवला तरी नाही'.

मी दिवा मालवला. तो दचकून उठला. असं कधीच झालं नव्हतं. लग्नानंतर त्यानं नेहमी स्वत:ला स्वच्छ प्रकाशात दडवून ठेवलं होतं. मी आज ते आवरण फाडून टाकलं होतं. तो हतप्रभ झाला.

माझ्या पुंगीवर एक मस्त नाग झुलत राहिला......!!

पण अजूनही मौन तुटलं नव्हतं. तो प्रसन्न आहे की दु:खी, संकोची आहे की योगी, हे ओळखू शकले नव्हते.

सकाळ होताच तो आईला म्हणाला—'शिक्षण अर्धवट राहिलय..किरणला हॉस्टेलमध्ये पाठवून दे. डॉक्टर झाली की आपल्या पायावर उभी राहू शकेल. शिकण्यात मन रमेल तिचं...'

— पाण्याला मुठीत तर पकडत नव्हते?

— याला स्त्री नको? याच्या मनात तो आदिम मनुष्य नाही?

— दयेच्या लायकही नाही. .लक्ष देण्याच्या लायकीचाही नाही.

— का विचार करीत होते मी याच्याबद्दल? का?

— का ऑक्सिजन द्यायला निघाले होते. मरू दे गुदमरून. मरू दे. जिवंत प्रेतंच तर आहेत सगळी.

परंतु जमिनीत बीज पडलं होतं, वाढत होतं.

'मला दिवस गेले आहेत. '

त्याचा गाल कापला गेला. दाढी करता करता तो थांबला. पहिल्यांदा सकाळच्या प्रकाशात डोळे रोखून त्यानं माझ्याकडे पाहिलं.

'किती महिने?'

'तीन'.

रक्ताचे थेंब टॉवेलवर टपकत होते. रेझरकडे पाहात तो म्हणाला, 'मग ? काय विचार आहे ? . . .ती पण. ?'

मी उभी होते. स्टूलवर बसले घामाने चिंब होऊन.

'हो, आतील जीवदेखील काळाच असेल'.

दवाखान्याच्या बिछान्यावर पहिल्यांदा जाणवलं. या बुद्धिजीवी माणसालाही काळीज आहे. तो स्फुंदून, स्फुंदून रडला. कृतज्ञता निर्वेधपणे वाहात होती डोळ्यांतून. आपल्या मुठीत माझे हात धरले होते त्यानं. जणू मला धीर देत होता.

मला हसू आलं.

भ्रूणहत्याच तर केली होती. आत्म्याची नाही आणि जीवाचीही नाही. ही हत्या तुला आणि मला नरकाच्या अग्नीत पोळणार नाही. तुझ्या, माझ्या भाग्याची पुनरावृत्ती होणार नाही.

माझ्या आईनेही अशी हत्या केली असती तर. . .! !

(मूळ हिंदी)
(अनुवादक : म. ल. वऱ्हाडपांडे)

(पृ. १४२ वरुन)

जीवनाचे पंचखंड डॉ. कोलते यांनी मानले तर डॉ. य. खु. देशपांडे यांनी चार खंड मानले; अर्थात त्यामुळे मूळ आकलनाला मदत होते इतकेच ! एकांक म्हणजे चक्रधरांच्या पंथनिर्मितिपूर्व आयुष्यक्रमाची आत्मकहाणी आहे. जणू चक्रधरांचे स्वतःच्या गतार्थ आयुष्याचे केलेले ते सिंहावलोकन आहे. अलौकिक जन्म, राजधर्मानुसार घेतलेले अनंत सुखोपभोग आणि त्यातून अंतिमतः आलेली निवृत्ती अशा चढत्या क्रमाने चक्रधरांच्या आयुष्याने घेतलेले वळण आहे. त्यात संन्यासदीक्षा आणि नागांबिकेला प्रेमदान या घटना संपूर्ण चक्रधर जीवनातच विलक्षण खळबळ घडविणाऱ्या अशा ठरल्या आणि पुढील आठ वर्षे म्हणजे आपल्या आयुष्याच्या सायंकाळी चक्रधरांनी समाजोद्धाराचे कार्य संघटनास्थापनेतून आणि तत्त्वज्ञाननिरुपणातून केले व पुढे नागदेवाचार्यांसारखा निस्सिम भक्त मिळाल्यामुळे वाङ्मयनिर्मितीचे अधिष्ठान महानुभाव संप्रदायाला आणि आचार विचार धर्माला मिळू शकले. चक्रधरांची अलौकिक जीवनगाथा आणि ज्ञानेश्वरांची अलौकिक जीवनगाथा यात परस्पर विरुद्धत्व असूनही एकामागे एक अवतीर्ण होऊन दिव्याने दिवा उजळावा तसे समाज-उद्बोधनाचे कार्य चक्रधर आणि ज्ञानदेवांनी आरंभिले आणि पूर्णतेस नेले. ज्ञानेश्वर creative poet होते तर चक्रधर thinker होते, विचारवंत होते. यादवकालीन लोकजीवनाला आणि मराठी संस्कृतीला चक्रधरांनी आपल्या पद्धतीने एक विशिष्ट आकार देण्याचा प्रयत्न केला. त्यांचे विचार अतिशय नाविन्याने भरलेले होते. स्त्रियांना संन्यास दीक्षा देणे, विटाळ चांडाळ न मानणे, मातंगाच्या हातचा प्रसाद स्वीकारणे आणि खेडोपाडी अटन विजन करून एक धार्मिक सामंजस्याचा प्रयत्न करणे या दृष्टीने चक्रधर सतत विहरण करीत राहिले. डोळयांनी बघितलेल्या समाजाचे दुःख आणि हाल थोडेफार आचारधर्माने कमी कमी करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यांची दृष्टी ही पुरोगामी आणि विचार आधुनिक होते. हे सर्व विचारधन लीळाचरित्रातून जपले गेले आहे. अल्पाक्षरत्व आणि अर्थभारित्व हे काव्याचे गुण असले तरी चक्रधर-वाणीला ते अनुरूप ठरले आहेत. हजारो लाखोंच्या जीवांना चटका लावून गेलेले हे व्यक्तित्व पुनः स्मरणातून आविष्कृत करण्याचा हा एक अनोखा असा प्रयत्न मराठी वाङ्मयाच्या बाळपणी आणि गद्याच्याही बाळपणी घडला हाही एक अलौकिक चमत्कारच म्हणावा लागेल ! भाषेचे वैभव, गद्यातील तथातथ्य वास्तव आणि बोलीभाषेतील माणसांच्या उक्तीतील सळसळता जिवंतपणा यामुळे मराठी भाषेचे आणि वाङ्मयाचेही एक अहेवलेणे म्हणून 'लीळाचरित्रा'चे स्थान अनन्यसाधारण ठरते !

मधु जामकर / अव्वल इंग्रजी काळातील साहित्यसाधना

आधुनिक मराठी वाङमयाच्या इतिहासात अव्वल इंग्रजी काळ हा तमोयुग म्हणून समजला जातो. काहींनी त्यास भाषांतर युग म्हणून हिणविले आहे. दत्तो वामन पोतदार यांना या काळात 'तमोनाशक चंद्र' उगवलेला दिसत नाही. आजपर्यंत अनेकांनी या कालखंडाकडे उपेक्षित म्हणून पाहिले आहे. कोणत्याही कालखंडात निर्माण होत असलेले वाङमय हे त्या कालखंडाच्या सामाजिक व राजकीय परिस्थितीचा परिपाक असते. या काळातील वाङमयीन अभिरुची-देखील या परिस्थितीशी पूरक म्हणून ओळखल्या जातात. साऱ्यां वाङमयीन प्रेरणा व त्याभागील प्रवृत्तीं ज्या धारणेतून आकार घेतात त्या या वाङमयास साधक बाधक घडवीत असतात. सहाजिकच या काळातील वाङमयाचे मूल्य-मापन याच भमिकेतून केले पाहिजे. ज्या काळात कसलीच निखळ अशी वाङमयीन अभिरुची निर्माण झाली नव्हती किंवा जो काळ अपेक्षानिर्मितीचा म्हणून ओळखला जातो त्यास आपण मोजपट्टीने कसे व का मोजावे ? त्यापेक्षा काळोख पडल्यावर क्षितिजावर प्रथमच लुकलुकणारा तारा जरी आपल्या प्रभेने दिशा उजळू शकत नाही तरी त्याचे तें सौम्य तेज मनाला एक प्रकारचा आल्हाद निःसंशय देते या भावनेतून आपण या काळातील वाङमय विचारात घेतले पाहिजे. साहित्य-निर्मितीपेक्षा साहित्य साधना या काळात तेजस्वी झाली. आजच्या पार्श्वभूमीवर ही साहित्य साधना इतकी उठून दिसते की आज ते सारे वाङमय त्यापुढे निस्तेज वाटते. किंबहुना आजची वाङमयीन परंपरा सुदृढ करण्याचें बरेचसे श्रेय याच कालखंडाकडे जाते.

हा काळ परकीय सत्तेखाली वाढत असला तरी येथील मराठी मनाची घडण आपल्या मूळ वृत्तीपासून वंचित झाली नव्हती. ' इंग्रजांनी पाश्चात्य संस्कृतीचे कलम मराठी संस्कृतीवर केले असले तरी मराठी माणूस आपल्या अंगभूत प्रेरणेशी सुसंगतच होता. लहान मूल प्रथम पांगूळगाड्याचा आधार घेऊन चालू लागते व त्यातूनच पुढे ते पांगुळगाड्याशिवाय चालू लागते. तद्वतच पाश्चात्य वाङ मयाच्या सहाय्याने मराठीं वाङमय स्वतंत्र प्रतिभेची वाटचाल करू लागले. लोकहितवादी यांनी इंग्रजांना 'गुरू' म्हटले ते याच भावनेतून गतिशून्यता हा ज्या समाजाचा स्थायीभाव" झाला होता त्या समाजास नवे चैतन्य देण्यासाठी इंग्रजांनी आम्हास गती दिली हे सत्य आजही मान्य करणें चुकीचे ठरणार नाही. त्यातही पुन्हा या काळातील व्यापक साहित्यसाधना पाहून आपली मती क्षणभर अचंबा पावते. ही साहित्यसाधना चौफेर होती. ' ज्ञानाच्या विविध क्षेत्रात प्रथम तिनें चंचुप्रवेश केला व पाहाता पाहाता सारा प्रदेश तिच्याच हुकुमाखाली वर्चस्व गाजवू

लागला. या साहित्य साधनेचे ध्रुपदच मुळी 'शहाणे करुन सोडावे, सकळ जन' असे होते. जो मराठी समाज पेशवाईत साकल्याने सुस्तावलेला होता, निर्बुद्ध झालेला होता त्याला ज्ञानाचे सकस बाळकडू पाजावे या प्रेरणेने ही साहित्य साधना वेगवेगळी वळणे घेत होती. त्यातही तिला यशाबरोबर अपयश पचवावे लागत असे. राजकीय व सामाजिक परिवर्तनाच्या मानाने हे होत असलेले मानसिक परिवर्तन अधिक महत्वाचे होते. एक नवा मनू आपल्या व्यक्तिमत्वास आकार देत होता. हे कार्य मूठभर लोकांचे नव्हते की मूठभर लोकांसाठी नव्हते. उभ्या महाराष्ट्रात एक नवविचारांची लाट निर्माण करावयाची होती ज्यातून सारा ज्ञानसागर उचंबळून येऊ पाहात होता.

या मानसिक क्रांतीला एक वैचारिक असे अधिष्ठान होते. यातूनच पुढील बुद्धिप्रामाण्यवादाची परंपरा निर्माण झाली. समाज-जागृतीपेक्षा समाजउद्‌बोधन अधिक महत्त्वाचे आहे, या भूमिकेने येथील साहित्य साधना वाटचाल करीत असे. यासाठी प्रत्येकजण तन मन धनाने सर्वस्व ओतू पाहात होता. संघटनाकौशल्य हा या साधनेचा महत्वाचा मानबिंदू होता. उपयुक्त ज्ञान प्रसारक मंडळाचे मुखपत्रक असलेले 'मराठी ज्ञान प्रसारक' या नियकालिकात या संघटना कौशल्याचे पानोपानी तेज दिसेल. त्यातही पुन्हा ही संघटना आवळ्याच्या मोटीप्रमाणे अखंड अशी बांधलेली राही. विस्कळित होणे तिला जणू माहीतच नव्हते. कडक शिस्त आपल्या अंगभूत नियमितपणांतून या साधनेस वेगळाच आकार देत असे. दादोबा पांडुरंग सारख्या निष्ठावंत कार्यकर्त्याने आपल्या अंगच्या कर्तृत्वावर ही संस्था तेजस्वी ठेवली होती. या संस्थेत प्रवेश घेणारा प्रत्येकजण या शिस्तीने बांधला जाई. शिस्तभंगाचे प्रायश्चित्त घेई व आपले बावनकशी सोने तेज:पुंज करी. एकीकडे सकळ जनास 'शहाणपण' मिळे व दुसरीकडे संघटनेच्या अविभाज्य घटकांतून त्यास संघटनाचातुर्य अवगत होत असे. ज्ञानाच्या प्रसाराबरोबर स्वतःच्या कर्तृत्वाची भरारी घेतली जाई. म्हणून हे कार्य महान वाटते. ह्या काळात व्यक्ती ही संस्था बनत असे. अशा अनेक संस्था आपणापुढे आदर्श देणाऱ्या आहेत.'

या साहित्यसाधनेने नियतकालिकांच्या इतिहासात स्वतःचे नाव अजरामर केले आहे. कै. बाळ-शास्त्री जांभेकरांनी वृत्तपत्राची मुहूर्तमेढ रोवली व स्वतःच्या आदर्शवादाने समाजापुढे कित्ता ठेवला. नियत-कालिकांचा प्रपंच म्हणजे सतीचे वाण या ठाम भूमिकेने त्यांनी स्वतः आचरणसिद्ध परंपरा निर्माण केली. विविध भाषेच्या अभ्यासातून आपली ज्ञानसाधना निस्पृही वृत्तीची केली. विनावेतन नियतकालिके समाजापुढे परिश्रमपूर्वक ठेवली व समाजाच्या अभिरुचीस पोषक असे वातावरण निर्माण केले. भाऊ महाजनांसारखा तेजस्वी संपादक एकाच वेळी तीन नियतकालिके चालवीत असे. अविरत परिश्रम व ज्ञान हेच जीवनाचे ध्येय. या प्रेरणेतून आपले असिधाराव्रत या काळातील प्रत्येक ज्ञानवंताने अखंडपणे चालू ठेवले. एका ज्योतीतून अनेक ज्योतींना प्रज्वलित करावे त्याप्रमाणे एकातून अनेक सांघिक प्रयत्न निर्माण होत. ज्यामुळे सारा समाज वैचारिक लाटेने ढवळून जात असे. मागील काळात 'ऐकणे' हे त्या समाजाचे प्रमुख कार्य होते तेच या काळात 'वाचणे' या भूमिकेतून पुढे आले. केवळ साक्षरतेची मोहीम हाती न घेता अक्षर वाङमयाची प्रेरणा या काळात रूजू लागली हे विशेष आहे. आदर्शवादी नियतकालिकांत प्रसिद्धीस येणारे साहित्य निनावी असे. यामागे असलेली भूमिका जेवढी उदात्त तेवढीच ज्ञानप्रकाशात केवळ 'नाममात्र' न राहणारी आहे. आजच्या संपन्न नियतकालिक युगात लेखक केवळ 'नामधारी' लिहितो, त्यात कसलीच साहित्यसाधना नसते. साहजिकच वरील काळातील नियतकालिकसाधना आपले डोळे दिपवून सोडते. मराठी नियतकालिकांच्या इतिहासाची प्रथमावस्था एवढी तेज:पुंज असावी हे आजही पटते व या पार्श्वभूमीने आपला वर्तमानकाळ नियतकालिकाची केवढी वंचना करीत आहे याचे शल्य बोचते. विचारस्वातंत्र्य, परखड असे नि:पक्ष विचार व चौफेर अभिरुचि संपन्नता या देणग्या अव्वल इंग्रजीतील नियतकालिकांनी आपणास दिल्या. हे ऋण आजही अमान्य करता येत नाही. नियतकालिके चालविणे हा एक धंदा नसून पवित्र असा व्यवसाय आहे. तेव्हां त्याचे व्यवसाय पावित्र्य आजन्म टिकले पाहिजे या मनोधारणेतून पावले टाकली जात. लोकरंजनाबरोबर लोकशिक्षण या

दुहेरी भूमिकेने नियतकालिक आपले अवतारकार्य पार पाडीत असे आणि कठोर व्यवहाराची सांगड देऊन आपला व्यवसाय स्वार्थ आणि परमार्थ यांची विवेकाने जोपासना करी.

अव्वल इंग्रजी काळातील साहित्यसाधना विविध भाषेच्या अभ्यासातून जेवढी चौफेर तेवढीच स्वभाषेविषयी अभिमानी होती. स्वभाषेतून स्वदेशाभिमान जागृत होतो म्हणून हा अभिमान आंधळा झाला नव्हता. मराठी भाषा शास्त्रशुद्ध व्हावी, तिची आंतर्बाह्य सकसता वाढावी यासाठी या काळात अविरत प्रयत्न झाले. हा काळ असा होता की इंग्रजी शिकून तयार झालेल्या पिढीला स्वतंत्र लेखन करण्यात फार काळ घालवण्यापेक्षा अल्प काळात विविध प्रकारचे युरोपियन ज्ञान लोकात पसरवून त्याबद्दलची गोडी उत्पन्न होईल अशी खटपट करण्याचा. ज्ञानाचा जेवढा म्हणून आपण अभ्यास करावा तेवढे आपले अज्ञान स्वतःस दिसून येते. म्हणून हा काळ अखंड असा ज्ञानसाधनेत गुंग होता. ज्ञानाचा सातत्यपूर्ण शोध, त्याचा चिकित्सक स्वीकार व त्याचे अविरत दान या कार्याचा अखंड असा प्रवाह या काळात वाहात असल्याने प्रत्येक मराठी मनात चुरस निर्माण होऊन वैचारिक देवाण घेवाण सतत व्यासपीठावर दिसत असे. विविध भाषांच्या अभ्यासातून मराठीचे जन्मदारिद्र्य दूर जाऊन तिचा पांग फेडण्याची तळमळ जनमनास वाटत असे. मराठीचे जन्मदारिद्र्य व मराठ्यांचे आकलनदारिद्र्य हे दोन शाप आपल्या समाजास फार पूर्वीपासून होते. ते या काळात साहित्य साधनेने धुतले व ज्ञानसंपन्नता देशाच्या नसानसातून पेरली गेली. विविध भाषांचा संपर्क होऊन मराठीची समृद्धी वाढली, तिचा कायापालट झाला. तिची शुद्ध बोलण्याची क्रिया तिच्या शुद्ध लिहिण्याशी नाते सांधू लागली व 'अमृताते पैजा जिंकी' या स्वरूपाची मराठी आपल्या साहित्यसाधनेतून नवे नवे उन्मेष धारण करून अपूर्व निर्मितीची नवी आव्हाने स्वीकारू लागली. नवा देश, नवा समाज व नवी संस्कृती यातून या साधनेची पायवाट कधी वक्र तर कधी सरळ वळणाने आपल्या कायम खुणा मांडत असे. आज ही 'पायवाट' रुळलेली दिसते तिचे बरेच श्रेय या काळातील अखंड साहित्यसाधनेस आहे.

या काळातील वाङ्मय बोलके असून त्यातून कर्ते सुधारक निर्माण झाले. लोकहितवादी आणि म. ज्योतीबा फुले यांचे कार्य आपण समंजसपणे अभ्यासल्यास आपणास हे मत पटेल. परंतु दुर्दैवाची बाब अशी आहे की आपण या दोन्ही महापुरुषांस आपल्या सोयीप्रमाणे न्याय देतो. ज्या तेजस्वी साहित्यसाधनेतून लोकहितवादींची 'शतपत्रे' अवतारकार्य करू पाहात असत त्यातील मुख्य प्रेरक शक्ती वगळून आम्ही त्यांचा परधार्जिणीपणाच तेवढा उचलला व साप म्हणून जमिनीस झोडपून काढले. तसेच ज्योतिबा फुले यांच्या साहित्यसाधनेत जो विवेकाचा अंगार होता तो विसरून त्यांचे दलित प्रेम स्वतःच्या स्वार्थाने सीमित केले. या दोन्ही युगपुरुषांनी प्रस्थापितावर केलेली टीका प्रवृत्तिवाचक आहे, तिला जातीयतेची पातळी देऊन भ्रष्ट करणे हे त्यांना अन्यायकारक असून तुम्हा आम्हांस क्लेशदायक आहे. शिवाय या दोन पुरुषांची सक्रियता लक्षात घेता या साधनेत विचार आणि आचार एका नाण्याच्या दोन बाजू झाल्या होत्या व हे नाणेदेखील शुद्ध धातूचे होते. पण त्यांचा 'आधी केले मग सांगितले' हा भागदेखील आम्ही सोयीने विसरतो. कै. रानडे यांनी विधवाविवाहास सक्रिय पाठिंबा दिला नाही हे जेवढे खरे तेवढेच कै. विष्णुशास्त्री पंडितांनी विधवाविवाहास सक्रिय पाठिंबा दिला हेही खरेच आहे. कै. रानडे यांच्यावरील टीका जेव्हां कै. पंडितांना न्याय देऊ पाहते तेव्हा तिच्यातील विवेक या काळातील साहित्यसाधनेतून आला आहे याची ओळख पटते. ज्या ज्ञानसाधनेसाठी उभा जन्म या काळातील साधकांनी झिजविला त्यांचे मूल्यमापन केवळ याच शक्तीने आपण केले पाहिजे. निर्गुणाला जसे आपण सगुणातून पाहतो तद्वतच लोकहितवादींकडे पाहावे तेव्हा त्यांचे मोठेपण आपणास दिसेल.

या साहित्यसाधनेने देश, धर्म, संस्कृती व परंपरा या सर्वांच्या परिसीमा ओलांडल्या होत्या. महाराष्ट्रास कर्मभूमी करून मे. कँडी, केरे, मोल्सवर्थ यांनी केलेली साहित्यसाधना केवळ अतुलनीय अशी आहे. या साधकांच्या वाट्यास जन्मदारिद्र्य होते पण आपल्या ऐहिक जीवनातील संघर्ष त्यांनी ज्ञानसंवर्धनाने मिटविला, आंधळा भाषाभिमान बाजूला सारून परभाषेचा डोळस अभ्यास शास्त्रशुद्ध बैठकीने कृतार्थ करून दिला. एल्फीस्टनसारखा धूर्त पण द्रष्टा असलेला विवेकी शासक या काळाची सूत्रे हाती घेऊन पुढे आल्याने

अनुक्रमणिका

येथील समाजास अचूक अशी वाट मिळाली. शिक्षणासारख्या उदात्त बाबींकडे शासकीय दृष्टिकोण सुजाण भूमिकेने पाहात असल्याने 'नहि ज्ञानं पवित्रं विद्यते' हे ब्रीद शासनाचे झाले. इतर धन दिल्याने कमी होते उलट ज्ञान हे दिल्याने दुप्पट होते या प्रेरणेतून शासनाने 'आदानम् विसर्गाय' अशी अखंड वाटचाल केली. शासकीय पातळीवर होत असलेली ही साहित्यसाधना आजच्या पार्श्वभूमीवर एक नवा आदर्श आपल्यापुढे ठेवते व आजची साक्षरतेची मोहीम कुठे चुकते व कोणती चेष्टा करते याचे उदाहरण आपल्यासमोर देते. ऐहिक गरजेतून जेव्हा मानसिक गरज भागविण्याचा प्रश्न शासन सोडू पाहते तेव्हा त्याची कार्यतत्परता जेवढी उदात्त तेवढीच अक्षयदायक ठरते. अव्वल इंग्रजी काळातील ज्ञानसाधना एकाच वेळी राजकीय व सामाजिक पातळीवरून वळणावळणांतून लोकाभिमुख झाली असल्याने तिची सकस अशी दुहेरी दृष्टी नेहमीच तेजस्वी राहिली. साहित्यसाधना ही स्वयंभू प्रेरणा झाली ती जणू समाजाच्या 'पडिले वळण इंद्रियां सकळां' प्रवृत्तीतून चालू लागली व राष्ट्रहिताचा एक मुख्य घटक बनली.

या काळातील साहित्यसाधना केवळ प्रतिभावंतांच्या कक्षेतील नव्हती. प्रतिभेच्या लहरीवर तिचा दिमाख नव्हता. उलट आपल्या कक्षेत तिने प्रतिभेस वेगळा आधार दिला होता. कोणताही प्रतिभावंत हा एक टक्का प्रतिभेचा दास असतो व नव्याण्णव टक्के साधनेचा भोक्ता असतो. आपले जन्मजात देणे जेव्हा साहित्यसाधनेने तेजस्वी होते तेव्हाच ते चैतन्यदायी होते. अव्वल इंग्रजी काळातील वाङ्मय प्रतिभावंताचे देणे नसेल म्हणून ते चैतन्यशून्य थोडेच आहे ? कै. परशुराम तात्या गोडबोले, कै. बाळशास्त्री जांभेकर, कै. बाबा पदमनजी यांच्या साहित्याचा विचार एक अधिक नव्याण्णव यांच्या बेरजेतूनच करावा लागेल. त्यातही पुन: वाङ्मयाचा निकष जेव्हा अभिरुचीने लावला जातो तेव्हा रसिकसापेक्ष समाजाकडे आपणास वळावे लागते. अव्वल इंग्रजी कालखंडात असा रसिक जन्मू पाहात होता. कै. परशुराम तात्या हे स्वतंत्र अव्वल दर्जाचे रसिक होते हा याचाच परिणाम म्हणावा लागेल. एखादा कलावंत मातीला नवा आकार देताना स्वत:च त्या आकृतीशी तादात्म्य पावतो व क्षणभर अद्वैत पावतो. या काळातील समाजास असाच आधार देणे महत्वाचे होते. ज्ञानाची विविध क्षेत्रे धुंडाळीत त्यास शास्त्रशुद्ध बनवून चौफेर साहित्यसाधनेने सारा समाज अभिरुचि-संपन्न करणे हे कार्यदेखील जन्मजात प्रतिभावंताचेच म्हणावे लागेल. आपल्या काळच्या चौकटीत वाङ्मय निर्माण होते, वाढते व शेवटी चौकटीबाहेर स्वत:च्या कक्षा अमर्यादित करू जाते. पण त्याचे मूल्य तपासताना प्रथम आपण तो काळ वाङ्मयसापेक्ष धरतो. अव्वल इंग्रजी काळातील साहित्यनिर्मिती जेव्हा या निकषाने तपासणे भाग पडते तेव्हा त्यामागील साहित्यसाधना प्रथम आपले डोळे दिपवून सोडते व याच तेजात त्याचे मूल्य डोळस होऊन आपल्या टीकेस आंधळे करते.

वाङ्मयाची नि:सीम उपासना आजच्या क्षेत्रात दुर्मिळ होत आहे. एकीकडे वाङ्मयनिर्मिती सश्याच्या गतीने धावत असता आजची साहित्यसाधना कूर्मगती घेत आहे. या साधनेच्या गतीबद्दल वाईट वाटत नाही परंतु याच गतीने शेवटी कासवाप्रमाणे आपणास अंतिमत: शर्यत जिंकता येईल असा तिच्याजवळ अढळ विश्वास नाही याचे वाईट वाटते. प्रतिभा ही उपासकास जन्मजात देणगी देते याचा प्रत्यय आज तरी कोणीही अनुभवास घेत नाही. साहित्यसाधना जेवढी कलावंतास अनिवार्य तेवढीच रसिकास अपरिहार्य आहे. अभिजात रसिकता हा याच साधनेचा परिपाक व अभिजात कलाकृतीदेखील याच साधनेचा गाळीव अर्क आहे. या परस्परांस पूरक असलेल्या उद्देशाचेच आजच्या काळात दर्शन दुर्लभ झाले आहे. एकीकडे वाङ्मयाच्या कक्षा विस्तारत आहेत म्हणून गाजावाजा करावा व दुसरीकडे त्याला समान दर्जाचा भोक्ता अवगत होत नाही म्हणून ओरड करावी. या दोन भिन्न वाणींनी आमची साहित्यसाधना दुभंगली जाते. त्यातही पुन्हा आजचे यांत्रिक जीवन दैनंदिन संघर्षाचा सासुरवास व ना सवड ना आवड यातून उत्पन्न झालेले आमचे वैफल्य या साहित्यसाधनेस खग्रास ग्रहण लावू पाहात आहेत. वैज्ञानिक प्रगतीच्या परंपरेचे आम्ही वारसदार असूनही आम्हांस त्यामागील निष्ठा साहित्यसाधनेकडे ओढत नाही अशा वेळी अव्वल इंग्रजी काळातील साहित्य साधना आपल्या दैनंदिन वाटचालीत सिंहावलोकनाने एक नवा उत्साह देईल. ही साधना निखळ वाङ्मयाशी तडजोड करणारी नसेल. ज्ञान

(पृ. १५५ वर पाहा)

धर्मराज निमसरकर / **मीचक्र**

अजून पलीकडच्या टेकड्या स्वप्नमय धुक्याच्या वर्षावात भिजत होत्या. मधुर संगीताच्या मैफिलीत धुंद होऊन गेल्यावर विस्मृतीची तरंगती स्थिती व्हावी त्यागत सगळं शेजार डोलत असल्यासारखं वाटत होतं. पण, समुद्र कमालीचा शांत आणि गंभीर दिसत होता. समुद्राचं असं निर्विकार आणि शांत स्वरूप पाहिलं म्हणजे मला भरून येतं. मनाच्या पोकळीत कुठेतरी रित्यापणाची जाणीव होते. आणि या जाणिवेत आकंठ बुडून गेल्यावर मनावर उदासीनतेचा तरल पडदा पसरतो, खिन्न खिन्न होऊन जाते.

समुद्र येथेही रिता
तिथे तर तो होताच !

समुद्र येथेही एकटाच
तिथे तर होताच !

लाटांनी दिलं खूपखूप
लाटा कुठे गेल्या ?

काल सध्याकाळी एकटाच बसलो होतो किनाऱ्यावर. काळचाशार ओलसर खडकावर. त्याचा गारवा हाताला डंख मारल्यागत वाटला होता. दूरवरपर्यंत लाटांचाच खेळ चालला होता. मी पहात होतो अस्ताला जाणाऱ्या सूर्याच्या तांबड्यालाल गोलाकडे. त्याने पिंजून पिंजून टाकलेल्या रंगाने आभाळ खरचटल्यासारखे वाटत होते. तेव्हा किनाऱ्यावर मी एकटाच होतो.

हल्ली एकटेपणाचा मला कंटाळा आला तरी हे एकटेपण मला कमालीचं आवडते. हा समुद्र एकटाच असतो ना ! जेव्हा लाटा नसतात तेव्हा, ओहटी असते तेव्हा, किनारा तर किती अंतरावर असतो. हृदय फाटलं तरी ऐकू जाणार नाही त्याला !

हा समुद्र एकटा
मी एकटा
सगळेच एकटे . . . आपआपल्या समुद्रात
आणि लाटा येतात तेव्हा
तोही धुंद
मीही धुंद.. दु:खात, व्यथेत, विवंचनेत
आतून बाहेरून
नुस्तं वादळ

हे वादळ येते
आणि जाते – रोज येते रोज जाते
केव्हा पण –

अंधार साचला होता आसमंतात. तेव्हा समुद्राचे रुदन मी ऐकू लागलो. कदाचित तो भास पण असेल. नाही नाही ऽऽ भास असणं साफचूक. ते रडणे धुक्यासारखे तरल होते, विरून जाणारे. विरून जाता जाता आठवणी देणारे.

समुद्र रडतो !
होय. . .समुद्र रडतो. .
न रडायला काय झालं ?

सगळेच रडतात. . .कोणी मनात, कोणी जनात, कोणी कोणी डोळ्यांत

मी सळयांचंच रडणं पाहिलंय.

मी रडतो तेव्हा, माझा आवाजंच निघत नाही; डोळ्यांत पाणीपण भरत नाही.

माझ्यातला समुद्र आटला
माझ्यातला समुद्र रिता झाला.

भयंकर गर्जनेने मी भानावर आलो. अंधारात मला काहीच दिसत नव्हतं. फक्त आकाशात पसरलेलं टिपूर चांदणं आणि रस्त्यावरचे लुकलुकणारे दिवे दिसत होते. समुद्राची गाज माझ्या कानांच्या पडद्यावर घाव घालीत होती.

अंधार मला मित्रासारखा वाटतो
त्याची किती दिवसांची साथ !
सारखा पाठीशी असतो माझ्या
त्याच्यापासून मुक्ती नाही
माझी तर नाहीच नाही
अनेकांची काय दशा ?
मी पाहिला आहे अंधार समुद्रावरचा
गार गार काजळासारखा
मी पाहिला आहे अंधार भयाण विवरातला
गाभाऱ्यातला
गाभाऱ्यातील मूर्तीमागचा
मी पाहिला आहे अंधार डोळ्यांतला
डोळ्याच्या पलीकडचा
झाडाखालचा; झाडावरचा
आतला बाहेरचा,

झपाझपा टांगा टाकीत वाळूतून रस्त्यावर आली. गॅसपॅस डांबरी रस्ता मरक्युरी दिव्यांनी लख्ख लख्ख झगझगलेला. प्रकाश असंख्य शलाकांनी माझ्या डोळ्यांत प्रवेशण्यासाठी वेताव. . . .मला सहन होत नव्हता प्रकाशाचा हा आडमुठेपणा. माझे अर्धे चेतलेले डोळे विझून गेले या प्रकाशात. मला आवडतात अंधारात लटकणारे प्रकाशाचे गोळे. मागे अनंत काळोख. आणि त्यावर हे जिवंत वाटणारे डोळे.

माझ्या डोळ्यातला प्रकाश
विझत जाणारा – तुझ्या डोळ्यातला प्रकाश ?
सगळेच विझलेल्या प्रकाशाचे मढे
घेऊन प्रवास करणारे.
तिमिरयात्रेचे प्रवासी.

या झगझगणाऱ्या दिव्यांकडे पाहत चालताना मला ठेच लागली. पडता पडता वाचलो. समोरून एक टॅक्सी भर वेगात निघून गेली. थोड्या क्षणांची गफलत झाली असती तर ! . . .मौत ने गले लगाया होता. . . . .रक्ताच्या थारोळ्यात अस्ताव्यस्त पडलेल्या आपल्या देहाकडे पाहून चार चौघा पादचाऱ्यांनी चूऽचूऽचूऽ. . . बिच्चारा. . . म्हटलं असतं, आपल्या वाट्याला एवढेच मायेचे शब्द लाभले असते. शरिरावर एक प्रचंड मोठा काटा उभा राहिला. मन भीतीच्या गाभाऱ्यात गरंकन फेकल्या गेलं.

सगळ्यांचंच ठेचा खात
उन्मळून पडणारं आयुष्य
क्षणाक्षणाला पडणारे वेडे
खूप वेगाने पळणारे घोडे
सगळेच वेगवान – सूपर सॉनिक स्पीड
लयी वद्ध
शिस्तवद्ध
चाकोरीतले – चाकोरी बाहेरील

मी एक एक वंध तोडण्याचा प्रयत्न करतो, जमत नाही. एका एका घटनेचा आणि प्रसंगाचा हिशोब करतो, नेहमी चुकतो.

रात्रीचा गारवा अंगाला चाटून जातो. अंग शहारल्यासारखं होते. भटकून भटकून शिणलेल्या मनाला आणि देहाला पोकळीतून बाहेर आल्यागत

वाटते. एकट्यातून गर्दीत आल्यावर. गर्दीचं भान येतं. गर्दीच्या विवंचना अंगाला चिकटतात आणि माणूस आणखी एकटा होतो. अनंत एकटा.

तुफान वेगानं मन धावायला लागतं. घराकडे. चार भिंतींच्या कोठडीत. एका कारावासातून सुटका दुसऱ्या कारावासात बंदिस्त. कोणत्याच भिंती उध्वस्त करता येत नाहीत.

कुठलं आकाश मोकळं ?
हे नाही – ते पण नाही
सगळेच काळयाकुट्ट ढगांनी भरलेले
भारावलेले. . .ओथंबलेले
केव्हा पण बरसतील; वाहून नेतील दिशाहीन
उन्मळून पडतील बेभान.
पाऊस
बेवारस पाऊस, केव्हापण येणारा
ऋतू नाही – कुठलंही चक्र नाही
पण —
माझ्या पायाला चक्र
माझ्या मनाला चक्र.
सारखं गरगरणारं – अखंड फिरणारं
चक्रावर माळलेले सगळे रक्तपुष्प
मी रक्तपुष्प
तू रक्तपुष्प
सगळेच रक्ताचे मिजासखोर..

मी लोकलच्या डब्यात मरण गर्दीत उभा. उभा नव्हतोस मुळी, कुठे तरी माणसांच्या वळवळणाऱ्या अवयवांच्या गोडाऊनमध्ये झुलत होतो. अस्तित्व नसल्यासारखा. पिटल्या गेल्यासमान. मर्जीने श्वास घ्यायचा येथे हक्क नव्हता. श्वास कोंडला मी कोंडलो. सगळे एकमेकांकडे खुळसपणे पाहत होते. सगळयांच्या संयमाचे बांध कोसळून पडण्याच्या क्षणापर्यंत येऊन ठेपले होते. तरीपण उगीचच दुर्लक्ष केलेल्याचा बहाणा.

मी माझा खलास
तो त्याचा खलास
अनेक असेच खलास झालेले

माना टाकलेल्या; कत्तलखान्याकडे निघालेल्या बकऱ्यासमान.

स्मशानात पडलेले
प्रेतयात्रेत सामील झालेले.
सब मुर्गे एक बराबर
सगळयांच्या आयुष्याच्या पाटयांवर
चितेची, विवंचनेची, व्यथांची अक्षरं लिहिलेले.
येथेही सगळे आपआपली जात शोधतायत
जातवाला हात देतो
गाववाला साद देतो
शब्द देतो, शब्द घेतो
मी बेजात–बेगाव
मुकाटयाने अनओळखी गावात
हे कसं !
हे असंच !
न संपणारं, कधीच उध्वस्त होऊ न घातलेलं

लोकल थांबली, मी डब्यातून बाहेर फेकला गेलो, येथेही पडता पडता वाचलो.

एका तरुणीला धक्का देता देता स्वतःला बचावून घेतले.

शुक्र है लोगों की नहीं तो सर सलामत नही रहता !

कुठे कुठे बचावून घेणार स्वतःला
अशी नाही तर तशी
उजेडात नाही तर काळोखात अब्रू जातेच
एकटयात नाही तर चार चौघात
घरात नाही तर चौकात
मित्रात नाही तर दुश्मनात
न्यायात नाही तर अन्यायात
येथे कोण बचावला
खरेही नाही खोटेही नाही.
सगळे नंगे फकिर
कोही भला कोही बुरा !

आता जिवात मुळीच त्राण नव्हता. होती नव्हती अंगातली उष्णता लोकलच्या गर्दीत वाहून गेली. स्वतःला ओढत ताणत खोलीवर घेऊन आलो. दाराला कडी घातली. दिवा विझविला. शिणलेल्या अंगाला बिछान्यावर आडवं केलं. झोप म्हणून डोळयात नव्हतीच मुळी. आता अशा स्थितीत उभी रात्र घालवायाची म्हणजे जोक नव्हे. अंधाराचे

पुंजके डोळ्यासमोर नाचत होते. घेर धरून. खूप वेगात. बेताल कसे तरी....

डोळे घट्ट मिटून घेतले.

अंधार गच्च. आणखी अंधार. काळा निळा अंधार. पिवळा धमक. पिवळा धमक अंधार. लाल भडक आणि मग अंधाराच्या लाटाच लाटा. या अंधारलाटा जाऊन कोसळल्या. कॅन्टीनच्या कोपऱ्यामधल्या टेबलावर. मदहोशीच्या आसपास गटांगळ्या खात.

बेदर्द एकटीच बसली होती. तिने एकदा तरी पापण्या उचलून पाहायचं होतं. काळीज ओवाळून टाकलं असतं.

येथे अलवत थंडगार डोळ्यांची भुरभुर
हा अंधार
चारही दिशांतून—माझ्या मनातून
धुमसत जाणारा—चिंचेच्या पानांनी साचणारा
शापासारखा पसरणारा
अंधार येथेही बाभुळवनात
अंधार येथेही गुलाबवनात
अंधार मनात
अंधार जीवात
अंधार सर्वत्र
अंधार पायापायांतून
अंधार हाताहातांतून
अंधार डोळ्यांत – अंधार अख्ख्या रक्तात.

अशीच केव्हा तरी झोप लागली. उघडली ती कोणाच्यातरी बेसूर कर्कश रडण्याने. पहाटेचे पाच वाजले असावे. पहाटेच्या गारव्याला या बेसूर रडण्याने भलतीच कजागता आणली होती.

कोणाचं रडलेलं मला ऐकवत नाही.

दोन्ही कानं दाबून मी झोपण्याचा प्रयत्न केला. पण वातावरणाची त्या रडण्याने केलेली विषण्णता माझ्याने सहन झाली नाही.

आणि मीचक्राला बांधून घेण्यातच पर्याय उरला.

(पृष्ठ १५१ वरून)
आणि विज्ञान या दुहेरी भूमिकेचा तिचा अट्टाहास होता व या मागे निष्ठा, प्रयत्नांची पराकाष्ठा 'आधी केलेच पाहिजे' असा ध्यास होता. ऐहिक ज्ञानाचे संवर्धन करीत पारलौकिक ज्ञानाचे क्षितीज विस्तारणे या साधनेचे ध्येय होते. चिमूटभर साधना व नोटभर लिखाण या प्रेरणेचे तिला वावडे होते. वाङमय सागरात झेप घेण्यासाठी केवळ त्याच ताकदीचे पंख जवळ असावे लागतात. आत्मनिष्ठ आणि वस्तुनिष्ठ तसेच आशय आणि अभिरुची या द्वंद्वाचा चोथा काढणारे आजचे टीकाकार देखील याच साहित्य साधनेने स्वतःचा टीका विवेक उजळू पाहातात. अशा वेळी अव्वल इंग्रजीचा साहित्य निर्मितीचा काळ उजळ माथ्याने समोर उभा राहतो. या काळातील वाङमय निर्मिती 'पायाचा दगड' म्हणून पाहिल्यास आज आपण खरोखरीच 'कळसा'पर्यंत पोचलो का याचा विचार करावा. या वैचारिक निरीक्षणाने हाताशी थोडेफार समाधान मिळाल्यास त्याचे श्रेय या साहित्य साधनेस द्यावे लागेल. अव्वल इंग्रजी काळ मागे पडला पण त्या काळातील साहित्य साधना काळावर मात करून आजतागायत अखंडपणे वेगवेगळी वळणे घेत मार्गक्रमण करीत आहे. म्हणूनच या भूतकाळातील साहित्य साधनेस शरण जाणे वर्तमान व भविष्य काळास हिताचे आहे.

बजरंग सरोदे / **दोन कविता**

रंग गंधा

चंद्राचे चांदणे
सखीची संगत
फांदीवर हिर्व्या
पक्ष्यांची पंगत

दाट सावलीत
नेत्र – कवडसे
फुलांच्या कोषात
पावलांचे ठसे

अनावर मन
ओठी शब्द लाजे
चिंब मिठीमधे
रंग गंधा भिजे !

वीजरेघ

डोळयांच्या पंखात
तुझी एक मूर्ती
आसवात भिजे
ओलीचिंब प्रीती

किती उणे दुणे
शब्दातले काज
ओठंगून दारी
सुगंधली लाज

मन-आभाळात
दाट स्मृतिमेघ
उजळून कधी
जाई वीजरेघ !

विश्वास कानडे / **तीन कविता**

१.

पाच वेडयांनी
सूर्य चोरायचे ठरविले
आणि
तो लपवून ठेवायसाठी
जागेचा शोध सुरू केला

२.

असत्याची गंगा
वाहे दुथडी भरून
सत्य थंडीत कुडकुडे
कधीचा हा नंगा

३.

डोळयांच्या चिमटीत धरून
त्याने आपल्या तळहातावर
सत्याचा थरथरणारा क्षण ठेवला
पाऱ्याचा, शुद्ध स्वरासारखा,
आणि म्हणाला—
ह्यांत पहा
तिथे तू नाहीस — मी नाही
फक्त निळे मुग्ध आकाश

दत्तात्रय जयवंत जोशी / **होळी**

साऱ्याच अिप्सितांची येथे करून होळी
मी फक्त एक माझे हे पोट आज जाळी

आकाश पेलणाऱ्या अिच्छा मनात मोठ्या
परि श्वास हे फुकाचे लिहिलेत सर्व भाळी

चिमण्या उरात माझ्या आहे विशाल विश्व
ठेवून दूर त्याला घेतो दुजेच जवळी

उद्रेक भावनांचा सांगू कशास कोणा
आंसूच गाळलेले हे प्राशणे कपाळी

आदी नि अंत आहे साऱ्या व्यथांस येथे
तो काळ एक उदरी घेणार देत टाळी

साऱ्याच अिप्सितांची येथे करून होळी
मी फक्त एक माझे हे पोट आज जाळी

अनुराधा पाटील /**सूर सांडले वनात**

तुझ्या नादाने दर्वळे
ओठी खळाळते हसू
फुटे काळजाला पान्हा
वर बांधते मी सेतू

लक्ष दीपांची आरास
माझा अहंकार खोटा
मला ओढून पाण्यात
अशा उधाणल्या लाटा

दूर गेलेले ते दीप
कशा दिशाव्यात दिशा
दाट वेढतो काळोख
माझ्या उदासीन देशा

आपखुषीने घातली
नाव अथांग पुरात
हाक बुडता बुडता
सूर सांडले वनात... !

माधुरी पारसनीस / **कविता**

आग हवी आहे मला आग
जाळणारी, पोळणारी, चटके देणारी.
ह्या हिरवळीवर मी कधीच पाणी शिंपलं नव्हतं
पण ही हिरवळही आहे निर्जीव
लाकडी भुशाची.
कधीतरी असलेल्या जिवंतपणाच्या
खुणा मिरविणाऱ्या लाकडाची.
रुळलेल्या पायवाटांभोवती पसरण्याचं काम
इमाने इतबारे करणारी.

मला हवी आहे निर्जीव वाळू
अथांग पसरलेली
वर पेटता सूर्य खाली जाळती वाळू
शुष्क नीरस माझं शरीर
माझ्या मनासारखं
माझा प्रवास सुरू असेल पेटता, भाजता
तरीही वेदनचं सुख देणारा
आणि अशावेळी—

आणि अशावेळी तू दिस
एकुलत्या खजुराच्या झाडासारखा
तुझ्या अश्रूंनी माझी तहान भागव
आणि मला रस्ता दाखव
दूरच्या त्या खऱ्याखुऱ्या हिरवळीचा

मोहन सावंत / **हे जेव्हा कळेल तुला**

तुझ्या गावपांढऱ्या दुधाचे अमृत पाजलेस
त्यालाच मी बेईमान झालो हे जेव्हा कळेल तुला
तेव्हा झाडशील का मला ऐरणीवर संथपणे ?

वळवण्याच्या पुलावर तुलाच भरदिवसा अडवले त्यांनी
आणि चिरगुटे पुलाखाली वाहविली
तरी वेशीवर त्यांच्यातच मिसळलो मी
हे जेव्हा कळेल तुला तेव्हा बांधशील गवाणित दावे मला

हे माझ्या माय, खोपटावर तुझे भेगाळलेले हात
पांदीत सांधता सांधता मीच दुभंगलो हे जेव्हा कळेल तुला
तेव्हा घेशील विळा आणि ठोकशील गावासमोर मला.

असेच आणखी कळेल तुला
आणि माझी फिरलेली पाठ दिसेल तुला
तेव्हा नेशील का पुन्हा तळ्यावर
आणि बुडवशील तसाच पुन्हा मला

नीलकृष्ण देशपांडे / **पाय नाजुक कोवळे**

पाय नाजुक कोवळे वाट तुडवित चाले
भर दुपारची वेळ अुन्ह माथ्यावर आले
सूर्य फुलला आकाशी अुन्ह वैशाखी दाटले
दाही दिशा तळपती जणु शिवार पेटले
घामेजला सारा देह होअी अंगाची काहिली
घाअी अनवाणी पाया केव्हा मिळेल सावली
डोक्यावरती भाकर बांधलेली फडक्यात
तरी वाटे धाकधुक करपेल का अुन्हात ?
वाट पहात असेल वावरात घरधनी
भूक पेटली पोटात राग दाटला का मनी ?
कामधाम आटोपण्या केली कितीकिती घाअी
त्यांना खावया भाकर वेळ झाला का, गं बाअी?
घरधनीण चालली वावरात घाअी घाअी
अुन्ह भीतीचे मनात जीव खाली वर होअी

नीलकांत ढोले / **गुलामांची शाळा**

गुलामांची शाळा भरते दिवसा उजेडी
अंधाऱ्या गल्लीबोळातून
गिरवतात धुळाक्षरे पाॅकेटमारीची
अन् घोकतात बाराखडी
आईमाईच्या गलिच्छ उद्धाराची खोपटाखोपटांतून !
मोठी चिवट अन् जिवट असतात
पोरे गुलामांची !
पोचवतात हातभट्टी दारोदार
अन् करतात सौदे गिऱ्हाइकांशी
आपल्याच वहिणींच्या टंच शरीरांचे
डोळे सताड उघडे ठेवून मन:पूर्वक
बघतात प्रात्यक्षिके सुरामारीची, बलात्काराची
अलगद शिरतात अभ्यासिकेत
ड्रेनेजच्या मेनहोल मधून
जुगाराचे टीमवर्क पार पाडण्यासाठी
करतात हल्ले लपून छपून येणाऱ्याजाणाऱ्यावर.
व्यवहारी जगातला प्रत्यक्षानुभव घेण्यासाठी
कधीमधी सुट्टी होताच पोरे घरी परततात
तेव्हा पडली असते त्यांची माय अस्ताव्यस्त
नागव्या मांडीत नोटा गच्च धरून
आणि . . भरले असतात
अश्रूंचे हौद अन् रक्ताचे रांजण
पोरांसाठी !

नीलम प्रभु /**औदुंबराखाली**

अशी अस्वस्थ कवितेसारखी
वैराण माळरानावर फिरू नकोस
पानापानांतले रातकिडे
स्वैर किऽरगीत
गातील
तुला साहवणार नाही ते बहुधा
सखे, जरा बसून रहा
त्या दाट औदुंबराखाली
समोरचे विशाल आभाळ पहात
कुठेतरी ओळखीचा तारा दिसेल !

राजीव प्रभाकर पांडे / **अंधारवेणी**

मी असा हा रातवेडा
रातही माझी दिवाणी
गुंफतो कैफात माझ्या
मी तिची अंधारवेणी !

चुंबिताना रातवारा
गोठतो हा जन्म सारा :
चंद्रवेड्या आसवांनी
गुंफली वेडी कहाणी

दूर होताना पहाटे,
ती मला बाहूत घेते,
गीत हे ओठास देते;
प्रीतिची वेडी निशाणी

स. सो. सुतार / **स्मशानवाट**

एक मुडदा
दुसऱ्याच्या खांद्यावर
अंसपैस पसरून
हवेत चालल्यागत
आणि जिवंत मढी
मुड्याला वाहून नेणारी
दु:ख पचवून खिन्न हसणारी
धुंद स्मशान वाट—
गर्दीचा सराव झालेली
अनेकांच्या मरण कथा ऐकून थकलेली
जाणारे-येणारे मुडदे पहात
अमरत्व ल्यालेली

श्रीकृष्ण राउत / **मेणा**

प्रार्थनेत रंगलेल्या व्याकूळ कातरवेळी
छाटून नेल्या गर्भार हासऱ्या जिवाच्या केळी
रक्तातल्या गावाच्याही सर्व वेशी बंद झाल्या
आता ओळखीच्या कशा प्राणातून हाका आल्या ?
देहातल्या रोमरोमी असीम दाटता वेणा
वेदनांचे दिवे नेण्या आला कवितेचा मेणा.

दिवाकर बोवडे / **शब्दांनो**

शब्दांनो. !
नेमकी गरज असते तेव्हाच कसे अवसेंट असता...
किडामुंगीचं जीवन जगणाऱ्या कृशोदरी काटक्यांना
सांगायच्या असतात वेदना
आसू ढाळीत
अस्थिपंजर छाताडात घुसलेले छर्रे
शिपीत जातात शोणित प्रेमळ... मानवतेसाठी
महात्म्याचं
क्रुसावरच्या येशूचं
अर्थहिन, सूरहिन
अस्फुट ओठावाहेर न येणारा हुंदका
कोरडा उसासा
निस्तब्ध उमाळा...
तुम्ही नसता म्हणून शब्दांनो...
अग्नीत होरपळून झालेल्या जखमा वुजविण्यासाठी जावं लागतं सीतेला
पुन्हा वनवासात
काळ्या क्रूर करणीनं होते अहिल्येच्या पदराची निश्चेष्ट फडफड
तडफतात द्रौपदीच्या डोईचे मोकळे केस...
पिंजारतात आपल्यावरील अमानुष अत्याचार...अन्याय...
नेमके त्याचवेळी नाही घेत तुम्ही त्यांची कड...
नाही तेव्हा माजविता मात्र शहाणपणाचे फड
शब्दांनो...! नको तेव्हाच झोपता तुम्ही
म्हणून तर वुरखा पांघरलेले अज्ञान, दास्य, लाचारी, अनीती, दारिद्र्य आणि
व्याधी.
पसरवितात आपले जाळे संसर्गाने...
त्यांचे टॅवलेट, लिक्विड, ऑइंटमेंट नाही बनत तुम्ही
आपलं असली रूप झाकून ठेवतात मेकअप करून ढोंग, कौटिल्य, कपट, मत्सर...
चढवतात नकली मुखवटा...!
शब्दांनो. ! तुम्ही नसता जागे पाहिजे तेव्हा...
म्हणूनच घडू नये तेच घडते केव्हा. .
पिचलेल्या दुर्वलांच्या डोळ्यातील नाही दिसत तुम्हाला आसू...
म्हणूनच सवलांच्या अकाळविकाळ ओठातून वाहेर पडतात राक्षसी हासू !
शब्दांनो. !
नेमकी गरज असते तेव्हाच अवसेंट असता तुम्ही...
म्हणून...!

वसंत वाहोकर / **सरी**

सरीवर वर्षती सरी
सरीवर नाचती सरी
सरी येती इथे तिथे
देही माझ्या तुझ्या सरी

गडे सरीपाठी सरी
सरी जुळ्या बाळापरी
सरी पोरी राना वना
मनी माझ्या तुझ्या सरी

सवतीच जणू सरी
कधी न्हात्या धूत्या पोरी
कधी काय, कधी हाय
माझ्यातुझ्यामध्ये सरी

ओढाळ गऽ नारी ! सरी
सरी हिर्व्या चुड्या परी
सरी आपाढी पाहुण्या
घरी माझ्या तुझ्या सरी

मीनाक्षी कुळकर्णी / **विकून टाकले मी**

खिडकीतून दिसणाऱ्या
तुकडाभर आभाळाशी
जुळणारे
डोळ्यांचे नातेही
जेव्हा नाकारले
पापणीच्या पडद्यांनी
तेव्हाच विकून टाकले मी
माझे सारे श्वास
त्या अनाम अक्षरांना
ज्यांनी लिहिलाय पराधीनतेचा
शिलालेख
माझ्या ललाटीच्या
कबरीवर !

ववन सराडकर / **चंद्र**

हातातला दीप
करोनी अंधुक
मागू नये कधी
चांदण्याची भीक

उडवावा नभी
पाखरांचा थवा
मातीतला चंद्र
खुडू खुडू खावा

श्रीकांत पाटील / **दिवेलागण**

जड झाला पान्हा
गाई घरी परतल्या
ओढणाऱ्या पावलांच्या
खुरा वाटेनं वेचल्या

ओळखीचे हंबरणे
आणि डोळ्यातील कळ
साऱ्या देहभर झाली
दिवे लागणीची वेळ

अशा दिवे लागणीला
घर एकटे नसावे
टाकलेल्या पोरासाठी
ऊर राधेचे भरावे

रवींद्र पाठक / **ॲनिमिया झालेली चांदणी**

वाळक्या हातांची जुडी उशाला घेऊन
न् आपल्याच हातांनी आपल्याच पायांना घट्ट मिठी मारून
अंगावर वंशपरंपरागत आलेल्या फाटक्या कांबळ्याची झूल लेवून
जेव्हा तो पडला असतो
म्युनिसिपालिटीच्या चाळीस नंबरच्या चाळीतल्या
बावन्न नंबरच्या खोलीत
मरतुकड्या आभाळाचा वीतभर तुकडा
आणि ॲनिमिया झालेल्या एकदोन पांढुरक्या चांदण्या पाहत
तेव्हा मला तो फार आवडतो
कारण तेवढा एकच क्षण
तो 'तो' असतो.
नाहीतर एरवी—
या महानगरीच्या प्रचंड पोकळीत
तुफान वेगाने गरगरणाऱ्या
लक्षावधी मॉलीक्यूल्सपैकी तो असतो
एक
कोणत्या तरी दिशेने भ्रमण करणारा
दुसऱ्या मॉलीक्यूल्सचे धक्के खाणारा
न् दहा बाय दहाच्या पोकळ भिंतींना धक्के देणारा
त्याच्या भरकटण्यालासुद्धा न्यूटनचे नियम लागू असतात.
श्वासाश्वासात प्रदूषित हवेचा कुबट वास असतो
वेंबीच्या देठापासून कधी ओरडलाच तर
तो आवाज त्याचा नसतो,
युनियन लीडरचा असतो.
आणि म्हणूनच,
त्या निवर आकाशाकडे बघताना
जेव्हा त्याच्या वाळवंटी डोळ्यात वाफेचा ढग डोकावतो
न् त्या ॲनिमिया झालेल्या चांदण्या
त्याच्या डोळ्यात उतरतात;
तेव्हा त्याच्या टिनपाट छातीआड काहीतरी गलबलतं
म्हणूनच तेव्हा तो मला फार आवडतो.

अनिल दवडगावकर / **शिल्प**

तो तसाच उभा आहे—
त्याच्या पायाला बांधलेली कासवं
केव्हाच गतप्राण झालीत
खांद्यावरच्या पक्षाने
त्याचं हृदय फोडलं तेव्हा
त्याच्या रक्तातून अंधार फुटला
म्हणून तर
व्यामिश्र व्यथा अंधाराने रंगवून
तो शिल्प झालाय—दुर्लक्षित !

मनोहर तल्हार / **फिनिक्स**

काळाच्या उदरांत गडप झालेली
अनंत व्यक्तिरेखांची ही थडगी
बसली आहेत,
आपल्याच राखेतून जन्म घेणाऱ्या
फिनिक्स् पक्षाची वाट बघत

अहिंसेला छातीशी कवटाळून, तिला
छातीत बंदिस्त करणाऱ्या—
महात्म्याची नजर चुकवून
हिंसेच्या तीक्ष्ण नजरेने टिपून,
छेदून काढले छातीला आरपार
. . तूर्त एवढेच असू दे !
मृत्यूलाही स्वतःच्या शक्तीची
लाज वाटली
फांसांत लटकणाऱ्या हास्य वदनांतून
प्रस्फुटित झालेले गीत ऐकून—
'मेरा रंग दे बसंती चोला
मेरा रंग दे'
सिंह गर्जना करून
गडावर लढणारा मर्दगडी
धारातीर्थी पडला
आणि जिवाची बाजी लावून
लढणाऱ्याचा जीव
तोफेच्या गोळांचा आवाज ऐकण्यासाठी अडला.

सत्तेसाठी—
पुतण्याच्या खूनाचे
कुटिल कारस्थान रचणाऱ्या शासनाला
'देहान्त प्रायश्चित्त'
सुनविणारी न्यायदेवता
हद्दपार झाली राज्यांतून
पण अजरामर झाली
सत्याच्या कसोटीवर
स्वतःच्या छातीचा परकोट
कापून काढून—
ब्राह्मणाला भीक घालणाऱ्या सूर्यपुत्राने
निधड्या छातीवर झेलला बाण—
जमिनीत रुतलेले रथाचे चाक
ओढून काढताना . . .
कुमारी मातेच्या कुंतलांत गुंतल्या
त्याच्या प्रतिष्ठेच्या वेदना
शरीराचे सुटे भाग
सोलून काढून
विकट हास्य करणाऱ्या यवनाला, कसायाला—
भीक घातली नाही त्याने
स्वतःच्या हिंदुधर्माची.
महाकालीचे रूप घेऊन लढणाऱ्या राणीने
आत्मबलिदान केले—
पेटल्या होमकुंडात !
परंतु शरीराचा एकही कण
इसायाच्या हाती पडला नाही.
काळाच्या उदरांत गडप झालेली
अशा अनंत व्यक्तिरेखांची ही थडगी
बसली आहेत वाट बघत—
आपल्याच राखेतून जन्म घेणाऱ्या
फिनिक्स् पक्षाची . . . पण . . .
पण त्याची राखरांगोळी कधीचीच झालेली आहे
राखेतल्या पुनर्जन्माच्या पुण्याचीच—
आता राख झाली आहे.

रघुनाथ तावरे / **असा अंधारच आणू**

चांदण्यांचा सहवास, ऊन, पाऊस, वारा आणि आईचे प्रेमच फक्त
मिळते रांगेशिवाय . . . येथे करून सर्वत्र रांगाच रांगा
रांगांनासुद्धा रांगा फुटलेल्या . . .
रॉकेलच्या गाडीची वाट पाहाताना उजाडलेली अशीच एक रांग—
गाडी येणार नाही कळल्यावर विखुरते सावकाश
जड पावलांनी सांजवल्यावर घेऊन डब्यात फक्त अंधार शिगोशिग . . .
आता पोटाला अंधारबाधा झालेले घरोघरचे स्टोव्ह
या अंधाराच्या नवीन आक्रमणाने पेटून उठतील . . .
तेव्हा आम्ही म्हणू— बरेच झाले; आजच्या रात्रीच्या जेवणाची चिंता मिटली !
उद्या परत जाऊ, रांग लावू; रॉकेल नाही मिळाले तरी—
असा अंधारच आणू !

ह० शि० खरात / **सूर फुटताना**

सूर फुटताना
मातीला ये वळ
मांडीमध्ये कळ
आभाळाची

सूर विझताना
मालवतो दिवा
दूर जाय रावा
देहातून

श्रीनिवास रामचंद्र सिरास / **मूकनायिका भारती**

विदर्भातले प्रथम श्रेणीचे नवनाटककार म्हणून नाना जोगांचे स्थान अबाधित आहे. त्यांच्या चारही नाटकांपैकी सर्वाधिक श्रेष्ठता प्राप्त झालेले नाटक 'भारती' होय. या नाटकाचे सारे कथानक भारती या एका तरुण पण जरठबाला विवाहपद्धतीच्या जुलुमाखाली चिरडल्या गेलेल्या मुलीभोवताली गुंफलेले आहे. भारती हाच या नाटकातल्या संघर्षाचा आधार. हा संघर्ष आंतरिक संघर्ष आहे व तो भारतीच्या मनातला आहे. या संघर्षाचे दर्शन भारतीचे हावभाव व हालचाली यांच्याद्वारे घडते. अशी ही भारती संपूर्ण नाटकभर मुकीच आहे. तिला जेव्हा मनाचा क्षोभ अनावर होतो तेव्हा ती ऑर्गनमधून अत्यंत कर्णकर्कश असे सूर काढते. या कर्कश सुरांतून भारतीचा क्रोध प्रकट होतो; पण तिला बोलता येत नाही. मात्र कर्कश सुरांचा समावेश जर भारतीच्या संवादांत करतो म्हटले तर ते चुकीचे ठरेल. कारण ऑर्गनचे सूर हे नाटकात पार्श्वसंगीत म्हणून वापरले आहेत. म्हणजेच नाना जोगांनी 'भारती' या नाटकाद्वारे जी एक मूक नायिका प्रेक्षकांसमोर पुन्हा उभी केली त्या मागे नवनाट्याचा पुरस्कार करणे एवढाच हेतू होता. कारण, नाना जोग एका नात्याने नवनाट्याचे पुरस्कर्ते असले तरी त्यांना नवरंगमंचाची पुरेशी जाण नव्हती, असेच म्हणावे लागते.

'भारती' या नाटकाच्या लेखनापाठीमागे नाना जोगांची श्रद्धा स्पष्टपणे दिसते. मुळातच नाटक ही एक श्रद्धाशक्ती आहे. ते नाटक अभिनित करणारा नट आणि बघणारा प्रेक्षक हे दोघेही या श्रद्धाशक्तीच्या आधिपत्याखाली असतात. एकटा नाटककार तेवढा या श्रद्धाशक्तीच्या आधिपत्याखाली येत नसतो. तो मुळी जन्मतोच तो आपली विशिष्ट तत्त्वे, सिद्धांत आणि मूल्ये आपल्यासोबत घेऊन. या मधूनच नाटककाराची अलिप्तता निष्पन्न होते. नाना जोगांच्या बाबतीत ही अलिप्तता दिसून येते किंवा नाही हा प्रश्न वादाचा ठरू शकतो. कारण त्यांनी फक्त कलात्मक दृष्टिकोन तेवढा समोर ठेवून नाटक लिहिले नाही. नाटक हे कितीही जरी सजीव असले, अभिनयाची परीक्षा बघत असले आणि नाटकाशी संबंधित घटनांचा स्वतः नाटककाराच्या वास्तव जीवनाशी जवळचा किंवा दूरचा संबंध असला तरीसुद्धा ते नाटक लिहीत असलेल्या नाटककार या व्यक्तीला स्वातंत्र्याची अनुभूती ही आवश्यकच आहे. इथे मला कलात्मक ताटस्थ्य अभिप्रेत नसून लेखनस्वातंत्र्यावर आधारित व्यक्तिस्वातंत्र्याची अनुभूती काय ती अभिप्रेत आहे. नाटककाराला एकाच वेळी स्वतःच्या वास्तवात उभे असताना त्याच वेळेस पात्रांच्या वास्तवात शिरता येणे शक्य झाले तर नाटककाराचे स्वतःचे वास्तव आणि कलेतील वास्तवाचे शब्दबद्धीकरण या दोन लेखनप्रक्रियांच्या द्वारे लेखननिर्मिती

करता येते. या खेरीज नाटकाचे संवाद स्वतंत्ररीत्या रचणे; त्यांचे पुर्नलेखन करणे या सर्व गोष्टी तांत्रिक बाबी ठरतात.

असे असताना मग भारती ही 'मूकनायिका' का, हा प्रश्न शिल्लक उरतोच. माझ्या मते उपरिनिर्दिष्ट नाट्यलेखनामागील तर्कसंगती नाना जोगांना मुळी पेललीच नाही. त्यांच्या मते वास्तवाचे रेखाटन हेच मुळी नाटकाचे वास्तववादीपण नव्हते. नाना जोगांनी स्वतः चित्रकला, संगीत, सुतारकाम या सारख्या कला आत्मसात केलेल्या असल्या तरी तो एक फावल्या वेळेचा छंद म्हणूनच! त्यांना त्यांत प्राविण्य मिळविण्याची गरजच वाटली नाही. भारतीला असलेले संगीताविषयीचे प्रेम हा या नाटकातील मुख्य बिंदू होता. हे कलात्मक प्रेम भारतीच्या भावात्म नाट्याशी इतके एकजीव झाले की त्यामुळे नाटकातली इतर पात्रे जरी कलेच्यावद्दल चर्चा करीत असली तरी भारती फक्त ती चर्चा मुकाट्याने ऐकत उभी राहाते. स्वतः कलावंत असली तरीही भारती त्या चर्चेत भाग घेत नाही. कारण ती नाटककाराने निर्माण केलेली एक 'मूकनायिका' आहे.

नाना जोग हे भारतीचा इतर पात्रांशी असणारा संबंधसुद्धा मर्यादित राखू शकले नाहीत. त्यामुळे भारती—मार्तंडराव असा परस्पर उघड विरोध असणारा झगडा मानणे भागच पडते. खरे तर सजीव शब्द आणि अर्थविहीन निर्जीव मूकता यांच्यातलाच हा संघर्ष होता. परंतु सबंध नाटकात दुरूनदेखील या संघर्षाचे दर्शन घडू शकले नाही. त्यामुळे भारतीला स्त्रियांची क्रांतिकारक प्रतिनिधी ठरवावी लागली आहे!

भारतीमध्ये असणारा हा संघर्ष कदाचित आपली जुनाट भारतीय विचारसरणी व नवी आदर्शवादी साम्यवादी विचारसरणी यातील संघर्ष आहे असे मानले तर? तरीही भारतीच्या मुकेपणाचे उत्तर कुठे सापडते बरे? नाना जोगांच्या नाटकाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील व्यक्ती नाहीत, तर त्यांचे विचार-प्रवाह हे आहे. या विचार-प्रवाहांनी भारलेले एक व्यक्तिचित्रण म्हणून भारती मान्य केली तर उलट तिचे मुकेपणच जास्ती उपरे व नकली वाटते. कारण जेव्हा मनुष्य विचार-प्रवाहांनी भारलेला असेल तेव्हा तो आपले विचार-प्रगटन करीत असताना त्यातूनच कलात्मक वैचारिक कृती प्रकट होत असते. 'सुशीलेचा देव' व 'रागिणी' या वा. म. जोशी यांच्या कादंबऱ्यांतील पात्रे अधिक बोलकी का होतात याचे उत्तरही या वस्तुस्थितीतच सापडते. मग भारतीला ही मुकेपणाची शिक्षा का?

'भारती' हे एक प्रतीक-नाट्य मानले तरी परत त्याच अडचणी समोर ठाकतात. कारण एकटी भारती एवढीच व्यक्तिरेखा फक्त प्रतीकात्मक मानावयाची गैरसोय मग पत्करावी लागते. आणि ही गैरसोय पत्करली तरीसुद्धा नाना जोगांना स्त्रियांच्यावरील जुलूम वा अत्याचार यांचे प्रगटन करावयाचे नव्हतेच. नाटकाच्या अखेरीला भारतीने प्रेक्षकांना उद्देशून गायलेल्या मुक्तक स्वगतातूनही हेच प्रगट होते.

तसेच, भारती हे एक पात्र नसून ती एक विचारधाराच आहे अशा प्रकारचे मत मान्य करणेदेखील तितकेसे सोपे नाही. कारण भारतीने सबंध नाटकभर केलेला मूकाभिनय त्या नाटकाच्या वास्तवतेत भर घालू शकत नाही. त्यामुळे नाटक वाचतानासुद्धा त्यात ताण जाणवत नाही. रंगभूमीवर असा ताण उभा करायला तेवढेच चातुर्य आवश्यक आहे. नाना जोग हे चतुर नाटककार नव्हते. ते होते स्वाभिमानी व व स्वामिनिष्ठ नाटककार. कसे ते पाहा!

एका अभिनव कल्पनेने त्यांच्यावरती स्वामित्व मिळविले होते. हे स्वामित्व नाटकाच्या नवेपणाबद्दलच्या कल्पनेविषयीचे होते. या स्वामित्वामधूनच मूकनायिकेची योजना केल्यास आपोआपच नवे नाटक अवतरेल, ही कल्पना निघाली. नाना जोगांना नाटकाच्या नवेपणाच्या निर्मितीबद्दलचा जो स्वाभिमान वाटत होता तोच इतर पात्रांच्या चर्चेत व बोलण्यातून प्रविष्ट होऊ लागला. मूकी नायिका हे कितपत सत्य व तार्किकदृष्ट्या कठोर वास्तव आहे याचीही काहीच कल्पना त्यांना नसावी, असे म्हणवत नाही. कारण भारतीचे

दु:ख भाषेतून व्यक्त करण्यात नाना जोग खूपच यशस्वी ठरले आहेत. पण त्यांच्या काळातील कुठल्याही लेखकाला नाटकाच्या संहितेबद्दलच्या पुरोगामी कल्पना शिवल्या नव्हत्या. त्याचमुळे या नाटकाकडे वास्तवादी नाटक म्हणून बघणे चुकीचे ठरते.

मात्र 'भारती' हे नाटक नवनाटयाला जास्ती जवळचे ठरते. त्याचे कारण नाना जोग हे स्वत:च नवनाटकाचे भाकित सांगणारे नाटककार ठरतात. नाना जोगांनी या नाटकात भारतीच्या मुकेपणाचा व त्याचवेळी ऑर्गनचा एकदम परपस्र विरोध साधला. या परस्पर विरोधातून नाटकाला आवश्यक असलेली भारतीच्या मनामधील चीड आणि इतरांच्या मनामध्ये तिच्याबद्दल असणारी अनुकंपा यांच्यात सुरू झालेली एक अंधारातील लढाई समोर आली. याचमुळे नाटकाला वेगळे असे कलामूल्य प्राप्त झाले.

रसिकलाल समोर उभा आहे; पण भारती वाचेच्या सहाय्याने त्याच्या वासनांचा विरोध करू शकत नाही. स्वत: रसिकलाललासुद्धा त्याचे स्वत:चे मोह दाबून ठेवता येत नाहीत. म्हणनच भारतीला पद-दलितांची आणि मार्तंडरावांना हुकमशाही लादणाऱ्या भांडवलदाराचे प्रतीक मानणे अशक्य ठरते. 'भारती' या नाटकाचा 'प्रतीकात्मक नाटक' 'Symbolic Play या संदर्भातील विचारही चुकीचा ठरतो. आधी मुक्या असलेल्या भारतीला नाटकाच्या अखेरीला वाचा प्राप्त होते. त्याचे कारण मानसिक धक्का Mental Shock, असे नाटककार नाना जोगांनी व त्यांचे समकालिन असलेल्या टीकाकारांनी मानले. पण ही काही प्रतीक-नाटयाची कारणमीमांसा ठरणार नाही.

मूलत: 'भारती' या नाटकातील संघर्षच कच्चा आहे. शिवाय भारतीचे संवाद फक्त अभिनय व हालचाली, संगीत व प्रकाशयोजना यातच लपून राहातात. हे नाटक तत्कालीन पद्धतीचे सहाजिक नाटक राहात नाही. त्यात नव्या नाटकाचेच गुण आपल्याला आढळतात. तसेच दुसऱ्या अंकापासून डॉक्टरने केलेली साहित्याची विच्छेदक चर्चा. भारतीचे संगीत (की संगीत प्रेम ?) हीच तिच्या दारिद्रयाची उत्पत्ती आहे असे डॉक्टर तिला सांगतो. उलट तो भारतीला जेव्हा विचारतो, "तू का गातेस ?" तेव्हा भारतीला उत्तर देणे अशक्य होते. डॉक्टर भारतीला हे पटवून देतो की शेवटी याचे खरे कारण फक्त दारिद्रयच. त्याचमुळे शेवटी डॉक्टर भारतीला सावध करतो व म्हणतो, "फुटू दे या सत्याला वाचा !"

पण हे ऐकून भारती भेदरली, किंचाळली (कां ?) व त्यामुळेच तिची किंचाळी ऐकून रसिकलाल आला. तो आल्याने डॉक्टरचा प्रयोग पूर्ण झाला नाही. म्हणजे समाजवादाचे तत्वज्ञान सांगणे हा नाटक-काराचा, पर्यायाने डॉक्टराचाही उद्देश नसतो. तो त्या 'प्रयोगा'चा एक भाग असतो. अशा प्रकारच्या समाजवादी प्रयोगाच्या नाटकाने मूकनायिका म्हणून भारती जास्तीच अडचणीत सापडते. कारण त्यानंतर डॉक्टर रसिक-लालवर रागावतो व रसिकलालने थोडे दिवस मार्तंडरावांच्या घरी न येण्याची अट घालतो.

डॉक्टरच्या मते भारतीला सहानुभूतीपेक्षाही सहानुभूतीच्या कठोरतेचीच अधिक आवश्यकता असते. इथूनच पुढे नाटककार नाना जोग पडद्याआडून समोर येतात. रसिकलालने भारती लवकरच बोलणार अशी आशा व आनंद प्रगट केल्यानंतर भारतीच्या मुकेपणाचे खरे कारण नाटककार नाना जोगांनी पुढे केले आहे. ते आहे घराचे गहाणपत्र व विवाहामुळे मार्तंडरावावर झालेले कर्ज. भारतीची वाचा जाण्याचे कारण तिचा मार्तंडरावाशी विवाह झाला हे आहे, असे नाना जोग सांगतात.

'सफल हे मीलन' ही कविता गावयाला रसिकलाल भारतीला प्रेरित करतो आणि स्वत: गाण्याला तिच्या अगोदर सुरुवात करतो. हळू हळू संगीताच्या शक्तीने भारतीच्या मनावरला भार हलका होतो व भारतीही आपला सूर त्याच्या सुरात मिसळू लागते. भारती गाऊ लागते. भारती गळयावाटे संगीतीय स्वर काढू लागली तरी पण तिला बोलता येत नाही कारण मानसशास्त्रीय तत्वाप्रमाणे गायन ही भारतीकरता एक प्रतिक्षिप्त क्रिया झालेली असते. याउलट बोलणे ही एक मानसिक प्रक्रिया असते. गाणारी भारती ही मूक-

नायिका भारतीपेक्षा निराळी नायिका आहे. गायन ही भारतीची मानसिक गरज आहे. शारीरिक गरजं वाचेची मात्र तिला नाही.

म्हणूनच तिसऱ्या आणि अखेरच्या अंकातली भारती आपल्याला नीटनेटकी झालेली आढळते. आता तिच्या वृत्तीत बदल झाला आहे. ती आनंदी दिसते एवढेच नव्हे तर डोक्यात फुलेही माळते. भारतीचा हा नीटनेटका पोषाख, तिने केलेला साज–श्रृंगार हेच भारतीच्या आयुष्याचे संगीत असताना पुढे भारतीने

"आम्ही – एकेकाळच्या आर्या
आता त्यांच्याच भार्या होण्यास तळमळतो"

हे प्रसिद्ध स्वगत ऐकवणे हे 'मूकनायिका भारती' या श्रद्धेला अत्यंत विसंगत दिसते. कारण या स्वगताद्वारे नाटकातील जास्तीतजास्त समाजवादी परिणाम नाटककार नाना जोग प्रेक्षकांपुढे आणू शकले हे तर खरेच. पण 'आर्या' व 'भार्या' या दोन शब्दांतील शब्दातीत उच्चारसाम्य पाहिले म्हणजे भारतीला स्वतःला अर्थ आणि यमक या दोनपैकी काय अभिप्रेत असावे, असा प्रश्न शिल्क उरतोच !

'भारती' हे या नाटकाचे शीर्षकच नाटकाचे नायिका-प्राधान्य सूचित करते. मात्र भारतीला मूक-नायिका व्हावे लागले व त्यामुळे रसिकलाल व डॉक्टर या पुरुष पात्रांनाच अधिक प्राधान्य मिळाले. शिवाय संवाद बोलायचे नसल्याने भारतीच्या स्टेजवरील अस्तित्वालाही कालमर्यादा पडतात. ती इतरांच्याप्रमाणे जास्तीकाळ स्टेजवर वावरू शकत नाही. त्याचमुळे नाटकाचे शीर्षक तितकेसे बरोबर वाटत नाही.

या नाटकाची जी मध्यवर्ती कल्पना ती सुद्धा अशीच न पटणारी. ही कल्पना अशी की, सजीव शरीरा-तल्या नर्व्हज्सुद्धा संप करतात व त्यांचा हा संप मोडून काढायचा असला तर त्या संपापुढे निसर्गाचेही चालणार नाही. या नाटकातले कथानक मात्र वास्तवाशी जवळीक साधणारे आहे. मार्तंडराव व भारती या विजोड दांपत्यामधील भारती ही केवळ मार्तंडरावाच्या मृत्यूनेच स्वतंत्र होऊ शकेल. या थोटक कथानकाला तीन अंकांपर्यंत ताणल्यानेही नाटकाची रसहानी झाली आहे.

नाना जोग हे अत्यंत जागरूक निवेदक आहेत; त्यामुळे संपूर्ण नाटकात कुठेच आलंकारिक आभासांची निर्मिती त्यांनी केली नाही. जे आहे ते सरळ उघडपणे साध्या शब्दांत मांडावयाचे, ही इथली शैली.

एरवी 'भारती' हे नाटक फक्त प्रायोगिक रंगमंचावरतीच शक्य आहे. कारण 'भारती' हा नाट्य-लेखनातला एक प्रयोग आहे. अखेरीस केलेला स्वगताचा परिणामकारक वापर आणि विषयाचे नाविन्य या गोष्टी नाना जोगांच्या जमेच्या बाजू ठरतात. शेवटी भारतीने जे स्वगत तारेमध्ये (Trance मध्ये) गायले आहे त्यातील परिणामकारक सौन्दर्य हे नाकारता येत नाही. या स्वगतामुळेच मूकनायिका भारतीच्या भाव-प्रगटनशक्तीचा प्रेक्षकांवर न मिटविता येणारा खोल ठसा उमटतो. अतिशय प्रभावी व्यक्तिदर्शन, जीवन-दृष्टीची एक नवी जाणीव आणि विलक्षण परिणामकारक अशी स्वतंत्र शैली या तिन्ही गोष्टींनी या नाटकाला एक अतिशय बळकट व समंजस नाट्यस्वरूप असणारे नाटक म्हणून मराठीतल्या नवनाट्यात वरचे स्थान प्राप्त होते.

या नाटकाद्वारे नाना जोगांनी त्या काळी भविष्यात लिहिल्या जाणाऱ्या नव्या नाटकांच्या विषयीचे भाकीत वर्तविले आहे. भारती व मार्तंडराव यांच्यासारखे विवाह पुढे घडून येऊ नयेत एवढेच सांगावे हा मर्यादित उद्देश त्यांचा नाही; तर त्याच्याच अनुषंगाने साम्यवादी वास्तवतावादाची समाजात सुधारणा घडवून आणण्याची शक्ती किती प्रचंड आहे हे दाखवणे हीच या नाटकापाठीमागील मुख्य प्रेरणा आहे. परंतु संपूर्ण नाटक हे नाट्यगर्भ आशय न लाभल्याने त्यातून नाना जोगांनी मूकनायिकेद्वारे सांगितलेला समाजवादी वास्तव-वाद अखेर पडद्याआडच राहिला. या समाजवादी वास्तवतावादाबद्दल जी. ल्यूकास हा लिहितो :—

(पृष्ठ १७९ वर पाहा)

सुनीती आफळे । **राखाळलेला निखारा**

तुरुंगातल्या आपल्या नवऱ्याला आपण असं टाकून बोलयला नको होतं..

मथुरेला राहून राहून पश्चात्ताप होत होता. आज मुळी काही शिजवावंसं ...खावंसं वाटतच नव्हतं...अन्नावर मुळी वासनाच राहिली नव्हती. कशावरच नव्हती.

आपलं अंधारलेलं एकाकी जीवन मनावर पांघरून ती पडून राहिली...

मोठ्या तोऱ्यात घराबाहेर पडून ही खोली घेतली...अंगावरची चीजवस्तू विकत चाललीय गुजराण कशी तरी....पण आता हल्लीहल्ली हे एकटे-पण नुसतं रिंगणं धरून भेडसावू लागलंय्...

वाटतं परत जावं आपल्या मुला-सुनेत...नातवंडांत. नाही म्हटलं तरी सारीजणं प्रेम करतात...दुखलं खुपलं पुसतात...

ते...तेच खरं.

ही तत्त्वं...ध्येयवाद...सगळे नुसते गॅसचे फुगे. वरवर तरंगणारे.. काही अर्थ नाही त्यात.' जमिनीतून उगवणाऱ्या फुलांशी त्यांचं नातं कधी जुळायचंच नाही. आणीबाणीला शिव्या देणं आणि स्वातंत्र्याच्या घोषणा करणं फार फार सोपं आहे हो दिनकर...

माझ्यासारखं म्हातारपणी एकटं राहणं फार कठीण आहे. .फार फार कठीण...

मनाच्या उभारीला देखील काहीतरी प्रेमाचा मायेचा पाया लागतो हो...

नाहीतर ते खचत खचतच जातं...

म्हातारपणी तर फारच...

पूर्वी दिनकरबरोबर कितीदा तरी स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला. चळवळी...धरपकड...कारावास...खूपखूप भोगलं... कित्येकदा दिनकर भूमिगत असताना तर छोट्या दीपकला सांभाळून घरगाडा ओढताना नाकी नऊ येत असत. पण तरी मथुरा अशी कधी खचली नाही..

परवाच्या भेटीत दिनकरनं म्हटलं तेच खरं असेल का ?

'मथ–मथुरा अग स्वातंत्र्य लढ्यात माझ्या खांद्याला खांदा लावून लढणारी...अनेकदा तुरुंगवास भोगलेली ती मथुरा म्हणजे एक स्फुल्लिंग होतं... स्वतः जळणारं...दुसऱ्याला पेटवणारं...आता कुठं गेली तुझ्यातली ती आग मथू?... विझलं सारं? राख...राख झाली त्या निखाऱ्याची... अरेरे...!'

अन् त्यांनी पाठ वळवली आपल्याकडे... निघून गेले...!

परवाची ती शेवटची भेट झाल्यापासून मयुरा दिनकरचे ते शब्द आठवीत होती...

आठवता आठवता रडत होती..

चिडतही होती.

राख होईल नाहीतर काय ?

सगळचा बाजूनं कोंडमारा झाला की जळती आग विझूच लागते. त्यावेळेला तुमची मयुरा पेटलेली होती...कारण त्यावेळेचा सारा समाजच पेटून उठला होता हो दिनकर...

त्याच्यात काहीतरी धग होती...

जीवन हे धगीवर चालतं...

उबेवर वाढतं...

या... या समाजात ना कसली धग ना कसला जीव... मढं आहे मढं... निर्जीव. कुणीही लाथा माराव्यात... कुणीही कोंडावं... पुरावं... हवं ते करावं...

या... या असल्या मढचासाठी लढताय तुम्ही दिनकर. कशाला या नादान लोकांसाठी तुरुंगात गेलात ? अहो यांना स्वातंत्र्याची किमतच मुळी कळलेली नाही. कारण आपल्यासारखी स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी त्यांना कधी काही किंमत मोजायची वेळच आलेली नाही ! स्वतः स्वातंत्र्यासाठी पाऊल उचलणं तर दूरच... पण जे त्या मार्गावर प्राणपणानं धावत सुटलेत त्यांच्या पाऊलखुणा आपल्या जवळपास उमटल्या गेल्या नाहीत ना... याची यांना फिकिराय !

अन् तशा काही न कळत उमटल्या गेल्या असल्या तर जिवाच्या आकांतानं त्या लगोलग पुसून काढण्यासाठी धडपडणारे हे दुबळे नादान जीव...!

खस्ता काढून. हालअपेष्टा सोषून ज्याला लहानाचं मोठं केलं. तो आपला मुलगा... दीपक देखील त्यातलाच एक.

त्यावेळी दिनकर फक्त हसला होता. मयुरेच्या डोळ्यांत खोलवर पाहात त्यानं फक्त विचारलं होतं..

'मयु— समाजाचं सोड... आपल्या मुलाचं पण सोड... तुला स्वतःला पटतंय का हे सारं ? ज्या स्वातंत्र्याला जन्म देण्यासाठी आपण देहदंड सोसला... तारुण्य घालवलं.... रात्रंदिवस धडपडलो... त्या स्वातंत्र्याची अशी गळचेपी पहावेल तुला ?...'

अन् मयुरेचा तोल सुटला होता...

'बस्स करा हे पोकळ शब्द दिनकर... मरो तो समाज... ती क्रांती... अन ती लोकशाही. तुम्ही काय सगळचाची जिम्मेदारी घेतलीय शिरावर...? आपल्या या ध्येयवादापायी पोटचा मुलगा आपल्याला दुरावतोय... एकटं... एकटं रहावं लागतंय मला या म्हातारपणी... दुखणाईत असूनसुद्धा.. मित्रमंडळी ओळख दाखवेनाशी झालीत... नातेवाईक चार हात दूर राहू लागलेत... अन् बायको जन्मठेपेची सजा झाल्यागत अंधाऱ्या खोलीत एकटी कुढतीय... रडतीय्... नाही दिनकर बस्स झालं आता. मला राख म्हणा... कोळसा म्हणा.. काहीही म्हणा... पण सहन करण्याची माझी ताकद संपलीय्...! या ध्येयवादाच्या गप्पा मला आता पेलेनाशा झाल्या आहेत हो. खरंच सांगते... क्षमायाचनेचा अर्ज करा इंदिरा सरकार कडे... परत राजकारणात पडणार नाही कधी म्हणून कबूल करा... सुटका होईल तुमची... आपला दीपक कलेक्टर आहे... काहीतरी खटपट करील.. मी हातापाया पडीन हवं तर चार जणांच्या..."

अन् त्यावेळेलाच दिनकरनं ते काटेरी धारदार शब्द वापरले होते...

"किती बदललीस मयू तू... किती बदललीस... त्या पेटत्या निखाऱ्याची राख...राख झाली... अरेरे...!!"

त्यावेळेला पाठ फिरवताना त्यांच्या डोळ्यात अश्रू तरळल्यागत वाटलं का ?...

खरंच आपण तुरुंगातल्या नवऱ्याशी असं बोलायला नको होतं...

आजवर इतक्या धीरानं त्यांच्या पाठीशी उभ्या राहिलो आपण अगदी परवा परवा पर्यंत. आणिबाणी जाहीर झाली त्यावेळेला देखील...

दिवस लोटतील तसतशी दिनकरची अस्वस्थता वाढत होती. मग हळू हळू जुन्या काही मित्रमंडळींच्या भेटीगाठी... खाजगी सभा... तापलेलं वातावरण... मग दिनकरनं सुरू केलेली प्रकट भाषणं... पहिल्या भाषणाच्या दिवशीच रात्री दिनकरनं म्हटलं होतं– 'मधु बघ हं... जाणार मी आत लवकरच. तयारी कर मनाची'. त्यावर आपण म्हटलं होतं...

'इश्श. तुरुंगाचं कौतुक मला नका सांगू हं. तुमच्या बरोबरीनं मी देखील भोगलाय कारावास बरं ! अन् म्हणत असाल तर अजूनदेखील तयारी आहे माझी..."

'हं... हं... तेवढं मात्र नको हं.' आपल्याला मध्येच अडवत दिनकरनं म्हटलं होतं... 'तुझी तब्बेत ही अशी अशक्त झालेली. ब्लड प्रेशरचा सारखा होणारा त्रास मधून मधून तुझा जीवदेखील घाबरतो हल्ली. आपल्या दोघांच्या वाटणीचं काम मी एकटाच करतो... अन् मधू... बाहेर राहूनदेखील पुष्कळ काही करता येण्यासारखं असतं. सगळ्यांनी आताच गेलं पाहिजे असं नाहीं... अन् तू तर अनुभवी... ठाऊकाय तुला सारं काय अन् कसं करायचं असतं ते."

अन् खरंच दिनकर आत गेला अन् एखाद्या विशीतल्या तरुणीसारखं आपण कामाला लागलो होतो उत्साहानं...

पण चाळीस वर्षांपूर्वीचा उत्साहानं प्रतिसाद देणारा समाज आपल्याला कुठं भेटलाच नाही...

सरकारचे गुप्तहेर आजूबाजूला पेरले गेले आहेत या कल्पनेनं अन् भयानं प्रत्येकजण मूग गिळून गुपचूप बसलेला.

गुप्तपणे बायकांची संघटना निर्माण करण्यासाठी किती धडपडलो, पण एक बाई सभेला येईल तर शप्पथ.

रात्री जागजागून घडणाऱ्या अन्यायाचा जाब मागणारी पत्रकं आपण लिहून काढली...

एकटीनंच कित्येक प्रती... आपल्या खोलीत दार लावून पहाटे पहाटेपर्यंत आपलं हे काम चाले.

रात्रीच्या अंधारात गुपचूप ती दारोदार टाकायला कुणी उत्साही तरुण हुडकला...

पण कुणी देखील पुढं आलं नाही...

शेवटी आपणच ती पहाटे फिरायला जाण्याचं निमित्त करून कुणाकुणाच्या घरी टाकून आलो...

कधी देवळातल्या गर्दीत वाटून यायचं ठरविलं... कधी शेवटच्या बससाठी थांबलेल्या लोकांमध्ये अंधारात ती आपण देऊन टाकू म्हणून बेत केला.

पण ज्या दिवशी दीपकला हे कळलं.

त्याला कळलं म्हणण्यापेक्षा सूनबाईनंच त्याला सांगितलं असणार.

तिला आपल्या खोलीत काही पत्रकं मिळाली.

किती भडकली ती त्या दिवशी.

भडकणारच.

सरकारपुढं हांजी हांजी करणाऱ्या आमदाराची लेक. असलं काही सरकारविरूद्ध करणं अन् पहाणं रक्तातच नाही.

पण दीपक कुणाच्या रक्ताचा आहे ?

स्वातंत्र्य मिळविण्यासाठी जिवाचं रान केलेल्या आम्हा दोघांच्या रक्तावरच वाढलेला ना तो ?...

नुसतं रक्त नाही...

अरे दूधदेखील माझं प्यायला आहेस रे दीपक तू...

कुठं गेलं ते सारं ?

त्या रक्ताचं त्या दुधाचं नातं अखेर पैसा प्रतिष्ठा अन् मान या तराजूच्या पारड्यांनीच तोललं गेलं !

मधुरेला वाटलं– दीपकचं घर आपण सोडलं ते एका दृष्टीनं फार चांगलं केलं.

त्याच्याशी पहिलं भांडण झालं त्या दिवसापासून तर बोलणं बंद केलंच होतं.

पत्रकांबद्दल कळताच दीपकनं घर नुसतं डोक्यावर घेतलं होतं...

'आई– काय तमाशा चालवलाय तुम्ही दोघांनी हा ?... मला खरोखर जगणं मुष्कील करीत आहात. अग मी सरकारी नोकर. उद्या माझ्या नोकरीचं काय होईल ?... आणीबाणी आली तर येवो. तुम्हाला काय फरक पडतोय ? मुलगा चांगला कलेक्टर आहे. सुखानं घरात बसून

चार घास खावेत तर तुम्हाला बोचायला लागलंय्. नको नको म्हणून हातापाया पडलो. किती विनवणी केली बाबांची. पण नाही गप्प बसले, जरूर होती चार ठिकाणी भाषण देत हिंडायची?... काय उपयोग झाला?... अन् तुझ्यादेखील या दुबळ्या नगण्य कामाचा काय उपयोग होणार आहे? देऊ शकणार आहात टक्कर एवढ्या मोठ्या सत्तेशी? ' मथुरेला त्यावेळी मुलाची अगदी कीव आली होती. वाटलं होतं त्याला सांगावं –

'अरे दीपक. त्रिखंडावर राज्य करण्याची स्वप्नं पहाणाऱ्या बलाढ्य इंग्रज-सत्तेशी आम्ही टक्कर दिलीय् रे. प्राण अक्षरशः तळहातावर घेऊन झुंजलो आम्ही. .अन् म्हणूनच हे स्वातंत्र्य तुम्हाला बघायला मिळालं तरी. "

पण ते सारं सांगून काही उपयोग नव्हता. आपले आईवडिल कितीदा आणि कशासाठी तुरुंगात गेले होते हे काय दीपकला ठाऊक नव्हतं?

आपला स्वतःचा जन्मदेखील तुरुंगात झाला आहे – हे देखील काय त्याला ठाऊक नव्हतं?

दीपक!

केवढ्या आशेनं नाव ठेवलं होतं आपण... खरंय्.

ज्या बाजूला वाऱ्याचा रोख असेल त्या बाजूला ज्योत झुकवण्याचं काम तेवढं त्यानं प्रामाणिकपणे केलंय्...

दीपक, तू नोकरीवर लाथ मारून जर बाहेर पडला असता तर प्राणांचे लाखलाख दिवे करून तुला ओवाळलं असतं रे राजा...

निदान मरताना तेवढा एक तरी दिलासा पुरला असता – की माझं रक्त माझं दूध नासकं नाही निघालं...!

पण सासरा... बायको... दारिद्र्यातून गेलेल्या बालपणानंतर अचानक मिळालेला पैसा – सत्ता – मान –. सगळ्यांचा मोह तुला पडला.

घराबाहेर पडायची देखील मला बंदी केलीस तू धाकरून...!

तरी त्याच्या विरोधाला न जुमानता आपण दिनकरला भेटायला गेलोच. अन् अचानक नियं तशी चक्कर आली..

दीपकचे वाक्बाण त्या दिवशी मात्र फारच जिव्हारी लागले... नाही मरून झालं ते बोलणं ऐकतांना...

'आई – जाऊं नको म्हणून बजावलं होतं तरी कशाला गेलीस बाबांना भेटायला?... तेही उन्हा-तान्हातून धडपडत?

'अन् बाबांची सुद्धा कमालाय् – तुला चक्कर आल्यावर तिथल्या अधिकाऱ्यांना माझा पत्ता दिला...इकडे मला फोन...'

'चुकलंच त्यांचं...! चक्क सांगायचं – बेवारशी बाई आहे म्हणून!'

'तर – तर! तुम्हाला बोलायला काय लागतं? अडचणीत मी सापडतोय्. चार जणांच्या तोंडी झालंय् – कलेक्टरसाहेबांचे वडिल आत आहेत...'

'लाज वाटते ना? लावू नको त्यांचं नांव...'

'उगाच चिडू नकोस आई – तूच विचार कर. या सगळ्या गोष्टींचा काही फायदा होणार आहे का? या तुमच्या वागण्यापायी उद्या माझ्या गळ्याला फास लागायची वेळ येईल. बंद करा हे सारं. घरात बसून आरामात खा-पी झोप काढ. सुखात रहायचं सोडून हे दरिद्री डोहाळे कुठले लागलेत तुम्हाला?–'

मथुरेचं ब्लड प्रेशर वाढतच गेलं होतं... दीपकला खूप तावातावानं बोलून तिनं घर सोडलं होतं...

दरिद्री डोहाळे...

होय रे... अशा दरिद्री डोहाळ्यांमधूनच तू जन्माला आलास...

कित्येकांनी असे दरिद्री डोहाळे सोसले. घरा-दाराचे उन्हाळे केले तेव्हा हे स्वातंत्र्य मिळालं...

अरे तुला कलेक्टर करेपर्यंत किती खस्ता खाल्या आम्ही... किती हौशीमौजी मारल्या... दमडी साठवून
तुला शिकवलं रे –

त्याचं ऋण असं फेडलं गेलं आज.

त्याचं घर सोडलं ते फार बरं केलं...

खरं तर यापूर्वीच सोडायला हवं होतं.

तिथं होणारी सारखी मानसिक कुचंबणा. अवहेलना... गुदमरला होता जीव नुसता...

अशा गुदमरलेल्या. कोंडलेल्या वातावरणात निखारा फुलत कसा जाईल ?

तो विझणारच दिनकर. विझणारच ...!

दीपकचं घर सोडलं.

पण बाहेर सारा समाजच जणू दीपक बनला होता. स्वार्थी — ढोंगी. नादान... दुबळा. भित्रा. कुठूनतरी एकादी खुल्या मनाची खुल्या विचारांची झुळूक येईल म्हणून ही मथू आधाशा-सारखी वाट पहात राहिली...

ओल आलेल्या अंधाऱ्या खोलीत एकटीच तड-फडत राहिली. तिला संगत होती फक्त आपल्या आजारपणाची. दुखण्यांची अन् निराशेची...

जवळची चीजवस्तू मोडत मोडत मी कसेतरी दिवस काढत होते.

मनाची उभारी धरण्याचा खूप खूप प्रयत्न केला... तुम्हाला देखील माझी ही प्रतिकूल परि-स्थिती — दीपकचं वागणं बोलणं... एकटं राहणं... कशाचा कशाचा पत्ता लागू दिला नव्हता आजवर... दिला होता का सांगा ?

मथुरेला ते सुरूवातीचे दिवस आठवले — सारी निराशा अन् दुःख मनाच्या तळाशी धैर्याचा दगड बांधून बुडवून टाकूनच ती दिनकरच्या भेटीला जायची — हसतमुखानं. त्याला तुरूंगात आणि दुःख कशाला द्या म्हणून ती सारं एकटीच भोगत रहायची...

पहिल्या भेटीत दिनकरनं विचारलं होतं — 'दीपक नाही आला ? एकटीच तू ?—'

'कामं असतात त्याला— कलेक्टर झालाय ना आता —'

बळंच हसून मथुरेनं म्हटलं होतं.

'कसली कामं ? सरकारला घाबरतोय म्हणून सांग सरळ.. दिनकर चिडून म्हणाला होता—

तरी मथुरेनं आपलं जळतं दुःख एकटीसाठीच राखून ठेवलं होतं — समजावणीच्या सुरात ती म्हणाली होती—

'अहो थोडंफार घाबरावं लागतंच... आपली गोष्ट वेगळी... आपलं सारं संपलं... त्याचं अजन सगळं आयुष्य जायचंय्... तरुणय तो... शिवाय संसार. '

'संसार आपल्यालाही होता मथू— तरुण आपणही होतो एकेकाळी. त्यावेळी आपण कशाचा विचार करत होतो सांग. ?'

'मनात खूप असतं हो— पण अखेर एक सरकारी नोकर म्हणून त्याच्याही काही जबाबदाऱ्या— कर्तव्ये—'

मथुरेची दुबळी सारवासारव...

'पण तो सरकारी नोकर असण्याआधी माझा मुलगा आहे मथू. हे तो विसरतोय्. '

'तो आपलं रक्त विसरलाय्... माझं दूध विसरलाय्... तो आपला कुणीच नाहीय हो... कुणीही नाही—' म्हणून दिनकरच्या गळ्यात पडून एकवार मनात पुरलेलं सारं दुःख उकरून मन मोकळं करावं असं लाखलाखदा मथुरेला वाटलं होतं...

पण तिनं मोठ्या प्रयासानं तो मोह टाळला. कधीदेखील तिनं दीपकबद्दल एक अवाक्षरही काढलं नाही.

तिच्या हातातल्या बांगड्यांबद्दल अंगठीबद्दल एकदा दिनकरनं असंच विचारलं होतं. पण त्याही वेळेला बळंच हसून मथुरेनं म्हटलं होतं...

'हवेत कशाला दागिने ? तुम्ही या सुटून मग नटीन परत अन् मिरवीन. '

दीपकचं घर सोडलं. खोली घेतली... दागिने मोडले.. एकटी राहतेय्. काही काही सांगितलं नाही.

अन् परवाच्या शेवटच्या भेटीच्या वेळी देखील जवळ दमडी नाही म्हणून मी कालपासून काही खाल्लंच नाही हे देखील मथुरा दिनकरजवळ सांगणार नव्हतीच. नेहमी प्रमाणंच हसतमुखानं ती त्याला भेटायला गेली होती.

पण दिनकरनं म्हटलं— 'तुझा चेहरा इतका ओढलेला दिसतोय आज— की कुणाला वाटावं— मी तुरूंगात नसून तूच तुरूंगात आहेस—'

अन् मग एकाकी मथुरेच्या सहनशीलतेचा बांध फुटला... एकाकीपण इतके दिवस भोगलेली सारी दुःख– सारी अवहेलना उफाळून धावली...

'होय हो. खरं बोललात. तुरूंगात तर मीच आहे. तुमच्या आजूबाजूला निदान जेलर– पोलीस– इतर चार कैदी आहेत.

मी अगदी एकटी एकटी आहे हो. जवळ ना सून ना मुलगा ना नातवंडं...नातेवाईक चारं हात दूर दूर राहू पहाणारे. . मित्र मंडळी ओळख देखील न दाखवणारी...

एकाकीपणाची कैद तर मीच भोगतीय्... तुम्हाला निदान वेळेवर जेवण खाणं...

औषधपाणीदेखील.....

माझ्या नशिबी तर तेवढंही नाही... काल-पासून पोटात अन्नाचा कण नाहीय्...

सजा तर मीच भोगतीय्...

तुमच्या ध्येयवादाची... तत्त्वांची ही सजा. बस्स करा. पुरे झालं हे सारं... आता मला सहन होत नाही... दयेचा अर्ज करा... क्षमेची याचना करा. काहीही करा बाहेर या... मला फार एकटं एकटं वाटतंय हो..."

भाडभाड ती एकटीच बोलत राहिली होती... तिला वाटलं ऐकून दिनकर कळवळेल. पण त्यानं फक्त एकटक मथुरेच्या डोळ्यांत पाहिलं–

'मथु– तुला काय वाटलं तू मला फसवूं शकत होतीस?– दीपक कसा वागतोय, तुझे दागिने कुठे गेलेत आणि तू कशी अन् कुठे रहात असशील याची कल्पना मी त्याचवेळी केली होती. त्याचवेळी कशाला?– तुरुंगात जाण्यापूर्वीच या गोष्टींचा विचार मी केला होता– अन् तरी असं हे सारं घडणार ठाऊक असूनही मी पाऊल उचललं. खात्री होती की येतील त्या साऱ्या अडचणींना माझी मथू खंबीरपणे तोंड देईल. मथू–अग आज तक्रार तू कुणाबद्दल करती आहेस आज?– पूर्वी आपण स्वातंत्र्यासाठी लढलो तेव्हा दीपकसारखी नालायक माणसं काय कमी होती? पण आपण तरी लढलो. कुणासाठी म्हणून नाही– तत्त्वासाठी लढलो. एकटं राहावं लागतंय अन् उपाशी राहावं लागतंय म्हणून तू कुरकुरलीस– मथू पूर्वीचे दिवस आठव... घरात पुरेसं अन्न नाही हे बघून मला भूकच नाही असं म्हणत स्वतः उपाशी राहून मला एकट्याला वाढणारी ती मथू तूच का? नाही मथू... तू शरीरानंच नाही तर मनानं अन् विचारानंदेखील म्हातारी झालीयेस ग... मला खरंच वाटत नाही. ती स्वतः जळणारी अन् दुसऱ्याला पेटवणारी तुझ्यातली आग कुठं गेली मथू–? राख... राख झाली त्या निखाऱ्याची. अरेरे...!'

अन् मग दिनकरनं फिरवलेली पाठ... पाठ त्यांनी फिरवली की आपण?

आपल्या ध्येयाकडे.. आपल्या तत्त्वाकडे?...

का?

खरंच का आपल्यातल्या त्या निखाऱ्याची राख राख झालीय्?

दारावर थाप पडली तशी मथुरा भानावर आली. 'कोणय ते?– दार उघडंच आहे...' पडल्या पडल्या तिनं म्हटलं.

दार ढकलून दीपक आत आला तशी ती खाडकन् उठून बसली...

"आई... आई आनंदाची बातमी... सरकारनं आणिबाणी शिथिल केलीय्... निवडणुका जाहीर झाल्यात... कैदी सोडले जाऊ लागलेत... मी चौकशी केलीय्. बाबा उद्या सुटताहेत... त्यांना घेऊन येऊ आपण... तूही चल. आता हट्ट पुरे. आता तिकडेच रहा... म्हातारपणी आराम करा..."

दिनकर सुटणार... निवडणूका... जाऊ पाहाणारं स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठी मिळणारी एक संधी...

मथुरेचे लटपटणारे पाय एकदम ताठ झाले. ती दीपकला म्हणाली... 'अरे आता आराम कसला? आता तर खरं काम सुरू होणार... आता क्षण क्षण मोलाचा... मी त्यांना आणायला जाईन. तू अजिबात येऊ नको... तू फक्त तुझी नोकरी सांभाळत बस बाबा...!'

अन् मथुरेच्या अंगात नवा उत्साहच संचारला... विनवणी करणाऱ्या दीपककडे तिचं लक्षच नव्हतं.. दिनकरला या खोलीत आणायचं... सभा... मीटिंग... निवडणुक... दिनकरच्या पाठीशी उभं रहायला हवं... सारं बळ एकवटून... ह्या अखेरचा लढा... स्वातंत्र्यासाठी लढा...

मथुरा उत्साहानं उभी पेटून निघाली. दिनकरला आणायला टॅक्सी हवी. फुलांची माळ. पेढे. पैसा. .?

गळ्यातल्या गाठवलेल्या एकुलत्या एक मंगळसूत्राकडे तिचं लक्ष गेलं अन् ती समाधानानं हसली.

ऽ ऽ ऽ

साऱ्या हितचिंतक–मित्रमंडळींचं कौतुक झेलीत झेलीत दिनकर मथुरेसह टॅक्सीत बसला. टॅक्सी सुरू झाली. मथुरेनं अधीरपणे लगेच विचारलं–

'सुटलात. आता पुढं काय?'

दिनकरनं एकवार मथुरेकडे रोखून पाहिलं. मग चेष्टेनं म्हटलं– 'बाईसाहेबांची आज्ञा प्रमाण. म्हणाल तर राजसंन्यास घेऊन तीर्थयात्रा करीत हिंडू?'

'आता? यावेळी? भलतंच. ही मोठी संधी गवसलीय्. सारं तारुण्य आपण ज्याच्या ध्यासानं घालवलं त्या स्वातंत्र्याचा काय म्हातारपणी असा बळी पडताना पाहायचं?– ते काही नाही– आता सारं बळ एकटवून प्राणपणानं लढायचं... मी तात्पुरती पैशाची व्यवस्था केलीय. उद्यापासून तर झोळी हातात घेऊन हिंडणारय्. आता श्वास घ्यायला फुरसत नाही. क्षण क्षण मोलाचा... लगेच कामाला लागायचं उद्यापासूनच.'

'मथू– तू. तूच बोलतीयेस हे?–' दिनकरच्या आश्चर्यातून कौतुक अन् कृतज्ञता दाटली होती.

मथुरा नुसती हसली. आत्मविश्वासानं म्हणाली 'अहो– सगळ्याबाजूनं कोंडमारा झाला ना की विस्तवावर राख साचू लागते बघा. तसं माझं झालं होतं. पण या निखाऱ्याची पुरती राख झालेली नव्हती हं... नुसता राखाळला होता तो...'

नारायण कुळकर्णी कवठेकर / **सावळी**

पाखरांनी सांगू नये तुझी कहाणी
अन् वाऱ्याने गाऊ नयेत तुझी गाणी

ओस पडलेल्या खेड्यातून खडखडा धावाव्यात बैलगाड्या
अन् घुंगुरांचा आवाज विरून जाईपर्यंत रस्त्यावर उठलेली धूळ
खाली बसावी—असे तुझे येणे आणि जाणे

तू आणि तुझी सावळी रूपे
लाख कोनांनी चमचमणारी माझ्या पापण्यांच्या ओलेत्या कडांशी
आणि हात माझे चितारणारे तुला तुटपुंज्या शब्दांनी
जे काढावे लागतात ओढून गळ टाकून
त्या एका विहीरीतून जिच्या तळाशी माझ्या खिन्न श्वासांचे बुडबुडे
हुलकावणी देत असतात मृत्यूला

तू येतेस अशी लाटेसारखी
घेऊन अनावर आवेगी लहरी तुझ्या डोळ्यांच्या ओठांच्या
हातांच्या स्तनांच्या मांड्यांच्या
अन् नेतेस लपेटून माझा देह त्या सावळ्या काळोखात
जेथे वाचता येत नाही मला एकाच ओळीत बसलेल्या
शंभर कावळ्यासारख्या अक्षरांची वर्तमानाची लिपी
जेथे नाहीत शोधू शकत माझे हात
भुतकालीन शिल्पांचे खंडित अवशेष
जे असतात उधळले गेलेले काळाच्या आणि माझ्या विजोड टक्करीने
आणि डोळे हरवून गेलेले सावळ्या गंधाच्या लोटात
नाहीत पाहू शकत भविष्यातले काही
आपल्या परस्परात गुंफलेल्या शरीरांमध्ये
उरलेल्या जराशा अंतरातून
हात माझे थकलेले धरून एका प्रदीर्घ कालखंडाचा नांगर
आणि पाय चिरून गेलेले
चालून चालून त्या प्रदेशात जेथे टाचण्यांनी
टाचून ठेवलेली असतात फुले रस्त्यारस्त्यावर आणि
वाहनांच्या गर्दीत जेथे नसते फुर्सत
न्याहाळुन बघण्याची रस्ता
जेथे घडलेत कडाक्याच्या थंडीत ठेच लागून बोट रक्ताळावे
असे प्रसंग कित्येक
लागावा धक्का टचकन् फोडावर बऱ्या होत आलेल्या अशा कैक घटना
जेथल्या आठवणी जणू भेसूर किंकाळ्या विपण्ण मध्यरात्रीतल्या

हा तुझ्या काखेचा उद्दीपित करणारा उग्रमधुर दर्प
आणि सारा काळोख
गदगदा हलवून सोडणारी तुझी संयमित हालचाल
धावतेय माझ्या पोटऱ्यांकडून कमरेकडे एक सळसळ
जी परिचित तुला तेव्हापासून
जेव्हा खिडकीच्या काचा पुसण्याचे टाकून तू आलीस
तरंगत पिसासारखी माझ्या बाहूंमध्ये
आणि रूतलीस माझ्या कपाळावर गोंदल्यासारखी
हसलीस माझ्या ओठांवर सिग्रेटसारखी त्या
जी पीत असतो मी
डोक्यावरचे ओझे खांद्यावर आल्यावर
त्या हाताच्या बोटांत धरून जो असतो
चिंब ओला पिळल्याने रूमाल
जो असतो भिजलेला घामाने
कपाळावरच्या पाठीवरच्या छातीवरील केसांमधल्या

तू नाहीस तन्वंगी तू नाहीस प्रमदा
आहेस एक प्रचंड झोत एक धो धो खळाळ
जो नेतो उडवून पिवळी पाने अडकलेली केसांत माझ्या
जो नेतो स्वच्छ धुवून बरबटलेली पावलं माझी
जो जाणवतोय मला तुझ्या एकाच धक्क्यात हलक्याशा
तुला असतात मंजूर सारे दैवदत्त बोझे
आणि असतात बोललेले तू नवसही कुठल्याशा संताला
त्या दिवसांसाठी जेव्हा असतील माझे श्वास
स्वच्छ वाहते मोकळे वाऱ्यासारखे
आणि नसतील माझ्या बाह्या शर्टाच्या ओल्या
आणि तू असशील उत्सुक माझ्या निमित्तमात्र हाकेसाठी
जिचं उत्तर म्हणून डोळे झुकवून तू देशील
माझ्या हातांत कलशासारखं श्रद्धापूर्वक तुझं सावळेपण
ज्यांचं नातं तुला वाटतंय की आहे कोण्या नायिकेच्या रंगाशी
गाजलेल्या प्रेमकहाणीतल्या

मला लावायचे आहे कुंपण नुकत्याच हिरवलेल्या शेताला
कारण रोपं आहेत उभी धास्तीत अवघडल्यासारखी
मला आहेत बाजूला करायची ढेकळे माझ्या अंगणातली
पडलेल्या माझ्याच भिंतींची
मला पुन्हा एकदा पाहून घ्यायचाय या गावाचा देह
जो प्रत्येक पावसाळ्यात जातोय जराजरा खचून
टाकतोय एकेक अवयव वाहत्या पाण्यात निमूट

आणि मला घेऊन यायचेत काही क्षण सन्मानाने
जे ठेवलेयत इमारतींच्या बंदिस्त खोल्यांमध्ये गहाण
आणि मी घरेलू कर्जदार आहे त्या लोकांचा
ज्यांच्या फुलपात्रांतले पाणी मी प्यालोय भर उन्हाळ्यात
आणि देऊ शकलो नाही एक शब्दही आभाराचा
त्यांचे शब्द जे पिकल्या फळासारखे असायचे माझ्यासाठी

त्यांच्या गुणगुणण्याची दिशा असायची माझे कान
त्यांची मऊसूत बोटे गलबलायची माझ्या भरल्या डोळ्यांसाठी
आणि आरसा दडवून ते ठेवायचे त्यांच्या घरांच्या
भिंतींचा रंग लख्खलख्ख प्रसन्न
यावी तकाकी माझ्या जर्द चेहऱ्यावर म्हणून

आणि मी असायचो मुकाट उभा
झेलीत त्यांचे आग्रह दुराग्रह आश्चर्यभरले खेदमिसळले डोळे
आणि लपवीत असायचो माझी झोळी
जिच्या बुडाला भोक—माझ्या हृदयाएवढं मोठं
मी जातोय फेकल्या उंच कमरेच्या सुळक्यावरून त्या अंतराळात
जेथे आधाराला म्हणून हाती येतात पुन्हा स्तनांचेच कडे
आणि पोरक्या ज्योती वाचवता वाचवता सोसाट्याच्या वाऱ्यापासून
भाजून गेलेले माझे तळहात
द्रवू लागतात जाणे कोणत्या उत्कट आर्जवाने
हे तुझे ओठ अस्पष्ट शब्द कुजबुजणारे
जसे डोळे शेतकऱ्यांचे प्रार्थनारत
की जाऊ नयेत ढग शेतावरून बरसल्याशिवाय
ही भाषा स्पर्शाची जिच्या शब्दांचे उच्चार
उमटून घुमून जातात विरून पुन्हा दरीतच सावळ्या
आणि तुझे हात ओढणारे मला
माझ्या मालकीच्या पडक्या वाड्यांमधून
जिथे उगवलीय हिरवळ जणू माझ्या स्वप्नांच्या कबरीवरची

चंद्र आक्रमत असता आकाशाचा मार्ग
वेढला गेला अचानक गर्द झाडीने मध्यरात्रीच
आणि तेथूनच झाला सुरू दिवस माझ्या जागरणाचा
ज्याला सोबत कुत्र्यांच्या कर्कश भुंकण्याची अविरत
ज्याला साथ घरामागे वाहणाऱ्या नदीच्या पुराच्या दनदनाटाची
जो प्रतीक्षात्रस्त एका सूर्याच्या उदयासाठी कधीचाच

भिजून गेलेली पुस्तके आणि उसवलेली बांधणी ग्रंथांची
उचकटलेले खिळे चपलांमधून आणि ढिले झालेले कडीकोयंडे
खोल रक्तात साचलेली खालसा संस्थानाची प्रेतकळा
गढूळ थर धुळीचे आणि
हरवून गेलेल्या पानांचा हिरवटपणा
गजबजून गेलेले माझे हृदय निस्तब्धतेत
अन् पाय वाऱ्यावर नसल्यागत भरकटलेले

आणि तुझ्या ओंजळभर निष्ठांना
पाहायचेय आकाश आपल्यावर वाकलेले आशीर्वादासारखे
निर्वात प्रदेशात श्वास घेण्याइतकं दुर्घट आयुष्य
तू करू बघतेयस खुलं
बागेच्या मर्यादेत बागडणाऱ्या तुझ्या पंखांची ही हौस
न रूळलेल्या वाटेवर चालण्याची
तसे मीही नाकारले नाहीच तुला कधी

स्वीकारत आलोय सततं
फाटक्या पांघरूणातून दिसणाऱ्या चंद्रासारखं

सासूच्या धाकात वाकलेल्या
गर्भार बाईच्या केविलवाण्या चालीसारखं हे आयुष्य
मी दाबतोय एखादी जीवघेणी काळिजकळ ऊर दडपून सराईतपणे
आणि तू चिंताक्रान्त की
मी मोकळा का होत नाहीय ओझे फेकून दाटलेले

मी बोलतोय कसाबसा ओठांच्या फटीतून तुझ्यामाझ्या
आणि तू घेतेयस शोषून ओल माझ्या जीभेवरची
आणि माझ्या बेचिराख छातीवरील विस्कटून जाताहेत रांगोळचा
हात फिरताहेत तुझ्या केसांतून अधीरे
तुझ्या कवेत अस्तित्व झालंय गुंत्यासारखं
आणि शब्द भेदरल्यासारखे सरपटत फिरणारे त्यातून
माझ्या खरखरीत चेहऱ्यावर आता धावताहेत वाफा
जलद हलताहेत तुझ्या नाकपुड्या
आणि झालेत तुझे हात आता
धरती झाकणाऱ्या आभाळाएवढे मोठे
मी जातोय जणू दूरदूर
खूप लांबवरच्या हाका जणू आता होताहेत पुसट
आणि माझ्या दुखऱ्या फुफ्फुसांचा भाता होतोय आततायी
आणि पाय तुझे लवचिक चिवट लव्हाळीसारखे

आणि आता या उतू जाणाऱ्या रितं होऊ पाहणाऱ्या क्षणी
एक विचार लखकन् चमकतोय मनात की मला
पाठबळ का वाटत नाहीत पाठीवर माझ्या आवळलेले तुझे हात

भाऊ मांडवकर / 'यतरपस्यें' म्हणजे काय ?

'श्री गोविंदप्रभुचरित्रा'च्या दुसऱ्या लीळेत पुढीलप्रमाणे वर्णन आहे :—

"वोपो उपाध्ये तयांचे रांमो उपाध्ये तयांचे तीकोपाध्ये गोसावियांतें बोपद उपाध्यांपासि पढों घातले वेदघन (वेदाध्ययन करूं लागले : गोसावी अचाट सामग्री स्वीकरीली गोसावियांसि दीसें ये तें आणीका मासें नेये गोसावियांसि मासें ये तें आणीका वरीखा नेये चुकि भुलि ते चाटचांही सांघति आणि उपाधीयांही सांघति ते म्हणेति "गुंडो सामान्य नव्हे हा इस्वर अवतारु होइल हा पढ़ता नायकों नीगदीतां नायकों यकसरी कांडीचि म्हणतां आइकतो :" एकी वासना "म्हणतां नायकों वाचीतां नायकों : एकसरें नीगदीतांचि आइकतों हा गुंडो सामान्य नव्हे हा इस्वर अवतारु होइल कां देवता अवतारु होइल :" ऐसें वोप उपाध्ये म्हणनि : आणि गोसावी हास्य करीति आणि हळूचि म्हणति "मेला जाय होए म्हणे :" चाटयांतें म्हणति **य त र पस्यें** :।।"

शेवटच्या 'यतरपस्यें' या शब्दाची पार्श्वभूमी लक्षात येण्यास मदत व्हावी म्हणून 'श्रीगोविंदप्रभुचरित्रा'तील दुसऱ्या क्रमांकाची वरील लीळा पूर्णपणे दिली आहे. डॉ. वि. भि कोलते यांनी संपादित केलेले हे पुस्तक (प्रकाशन १९५१) त्यांनी एम्. ए.च्या वर्गात १९५५ साली आम्हांला शिकविले होते. पोथीत नकल-कारानें नीट लेखन केले नसावे, हा त्यांचा प्रमुख अंदाज होता. त्यांच्या दुसऱ्या अंदाजाप्रमाणे, श्रीगोविंदप्रभूंची अर्थहीन बडबड चाले, त्यातील ही अक्षरमाला असावी. श्रीगोविंदप्रभू हे बोलनचालून विदेही पुरुष. त्यांचे बडबडणे, बोलणे, असेच अर्थहीन व विसंगत असणार असे सकृद्दर्शनी वाटत असले तरी तसे समजणे उचित ठरत नाही. श्रीगोविंदप्रभू असे अर्थहीन बोलल्याचे संपूर्ण पोथीत कोठेच आढळत नाही. जी काही मोजकी वाक्ये ते बोलत त्यांतील शब्द, अक्षरमाला अथवा ती वाक्ये अर्थाला सोडून नाहीत. तेव्हा या 'यतरपस्यें'चाच फक्त अपवाद होईल असे समजण्याचे कारण नाही. उलट संस्कृत वाणी अस्खलितपणे श्रीप्रभूंनी उच्चारल्याचे याच चरित्रात आढळते. तेव्हा 'यतरपस्यें' ही श्रीप्रभूंची बडबड होय, असे समजणे निखालस चुकीचे आहे.

शिकवीत असताना डॉ. वि. भि. कोलते यांनी 'इतरांपेक्षा' असाही अर्थ येथे संभवतो, असे संदेहसूचक पद्धतीने सांगितले होते.

'श्रीप्रभूंची अर्थहीन बडबड' असा अर्थ सुचवितांना डॉ. कोलते यांनी 'यतरपस्यें' ही अक्षरे श्रीप्रभूंच्या तोंडची गृहीत धरलेली होती हे स्पष्ट आहे. लीळेच्या शेवटी 'मेला जाय होए म्हणे' हे श्रीप्रभूंचे शब्द

अनुक्रमणिका

निश्चितच असून त्यापुढे श्रीप्रभूंनी 'चाटयांते' म्हणजे शिष्यांना 'यतरपस्यें' म्हटले असे समजून 'बडबड' अर्थ सूचित केला आहे.

परंतु या लीळेच्या शेवटी आलेले 'मेला जाय होए म्हणे' हे वाक्य श्रीप्रभूंनी म्हटल्यानंतर पुढे 'चाटयांते म्हणति' असे जे लिहिले आहे ते म्हणणारे कोण ? — याचा विचार केला पाहिजे. उपाध्यांनी 'गुंडों'चे म्हणणे श्रीप्रभूंचे 'असामान्य' असे वर्णन केल्यावर श्रीप्रभूंनी हास्य करून हळूच आपल्या आवडीचे लकबदार नेहमीचे वाक्य 'मेला जाय होए म्हणे' असे म्हटले व ते चूप राहिले. पुन्हा ते उपाध्यांच्या इतर शिष्यांशी बोलले असे समजण्याचे प्रयोजन नाही. तसे श्रीप्रभू बोलत असावे असे वाटण्याजोगी समांतर उदाहरणे प्रस्तुत चरित्र ग्रंथात नाहीत. "चाटयांते 'यतपरस्यें' कोण म्हणति ?" असे या प्रश्नाचे उत्तर 'उपाध्ये' देता येईल. म्हणजे श्रीप्रभूंनी 'मेला जाय' म्हटल्यावर उपाध्यांनी आपल्या शिष्यांना पुन्हा म्हटले–'यतरपस्यें'.

उपाध्यांचा हे वाक्य उच्चारण्याचा हेतूसुद्धा श्रीप्रभूंचे असामान्यत्व स्वशिष्यांना पुन्हा प्रतिपादन करण्याचा होता.

पण या 'यतरपस्यें' चा अर्थ काय ? या अक्षरमालेचा अर्थ डॉ. कोलते यांनी आम्हांला शिकवीत असताना 'इतरांपेक्षा' असा अधू शकतो असे सांगितले होते, तोच अर्थ बरोबर होता असे आता निश्चितपणे म्हटले पाहिजे. डॉ. कोलते यांना त्यावेळी शंका होती. नंतर त्यांच्या त्या शंकेला मागे टाकून ते निश्चित अर्थावर आले असतील असे वाटत नाही. कारण १९७२ मध्ये श्रीगोविंदप्रभूचरित्राची पाचवी आवृत्ती मलकापूरच्या अरुण प्रकाशनातर्फ निघाली तिच्यातही याबद्दलची निश्चिती आढळली नाही. याचा अर्थ असा की डॉ. कोलते यांना 'यतरपस्यें'चा अजून नीटसा उलगडा झाला नसावा असे वाटते. तसे त्यांच्या लेखनातील एखाद्या पुराव्यावरून आढळले नाही.

'यतरपस्यें' चा अर्थ 'इतरांपेक्षा' असा निश्चितच आहे. 'यतर'मधील 'य'चा उच्चार व 'इ'चा उच्चार यांतील अंतर कमी केल्यास 'यतर' हा शब्द 'इतर' अधू शकतो, असे वाटते.

'पस्यें'चा मात्र 'पेक्षा' हा निश्चित अर्थ संभवतो. ग्रामीण भाषेत उच्चारले जाणारे 'पक्षी', 'पक्ष्या' या शब्दांचे अर्थ 'पेक्षा' या शिवाय वेगळे नाहीत. वा. गो. आपटेकृत 'शब्दरत्नाकरा'च्या जुलै १९५६ मध्ये निघालेल्या चवथ्या आवृत्तीत पृ. ३६२ वर 'पक्षी' या शब्दाचा अर्थ 'पेक्षा' असा दिला आहे. 'माह्यापक्षी यो शायना हाये का ?' या वऱ्हाडी वाक्याचा 'माझ्यापेक्षा तो शाहणा आहे काय ?' असा अर्थ आहे. 'माह्या-पक्षी' असे बोलणारा 'माह्यापक्ष्या' असेही बोलू शकतो व त्याचा अर्थ माझ्यापेक्षा असाच आहे. 'पसि' हा शब्द लीळा-चरित्रात 'पेक्षा', 'हून' या अर्थाने आला आहे. 'बाइसाचेयां पसि'[1] असा उल्लेख असून त्याचा अर्थ 'बाईसेपेक्षा' असा आहे. वऱ्हाडी व ग्रामीण 'पक्षी' हे रूप यादवकालीन गद्यात 'पसि' होते असे म्हणावयास हरकत नाही.

'क्ष'चे काठिण्य जाऊन तो 'स' झाला हे लक्षात घेतल्यास 'पक्ष्या', 'पेक्षा'चे 'पस्यें' झाले असे म्हणणे रास्त ठरते.

'पस्यें'चा अर्थ 'पेक्षा'च असावा यासाठी डॉ. यू. म. पठाण यांच्या एका लेखाचा पुरावा मदतीस मिळतो. डॉ. यू. म. पठाण यांनी 'मुनिव्यास कोठी आणि ओटे बांधणी' या नावाचा एक लेख लिहिला असून त्यात आलेल्या 'पैठणच्या वृद्धाचारा'त बेदरच्या बादशहावर पद्मिनीबाई नामक महानुभाव स्त्रीचा प्रभाव पडला व त्याने तिचा सत्कार केल्याचे वर्णन आहे[2]. आरंभीच्या अवस्थेचे व भेटीचे वर्णन करीत असताना या

---

१. डॉ. शं. गो. तुळपुळे **लीळाचरित्र, उत्तरार्ध**, भाग १ ली. १९.

२. डॉ. यू. म. पठाण **महानुभव साहित्य संशोधन : खंड १** मराठवाडा विद्यापीठ प्रकाशन, डिसेंबर, १९७३, पृष्ठ ४७ ते ५७.

'वृद्धाचारा'त लिहिले आहे :—

"हो वर्तमान वेदरच्या वाछायास श्रुत जाल्यानंतरे त्याहीनी वीरवलासुद्धा मरंजामासुद्धा फऊज पाठविले[३]."

पद्मिमीनीवाईकडे वेदरचा वादशहा आणखीच आकर्षित झाला. पुन्हा त्याने लवाजमा पाठविला. ते लिहितांना 'पैठणच्या वृद्धाचारा'त वर आले त्याच्यापुढे आणखी पुढीलप्रमाणे वर्णन आलेले आहे :—

"मग वाछाये पैंटणास विरवीलासुद्धा सकळ सरमजाम : मागीला पस्ये आधीक : पाल्हीवीवो, रथ वो, गज, तुरूंग, चातुरंग सैन्य ऐसे वहुत :"[३]

म्हणजे काय की वादशहाने आधी जेवढा लवाजमा पाठविला त्यापेक्षा जास्त लवाजमा पुढच्या वेळी किंवा नंतरच्या वेळी पैठणास पाठविला हे वरील वर्णनावरून स्पष्ट होते. 'मागीलापस्ये आधीक' म्हणजे मागे पाठविला त्यापेक्षा, मागीलापेक्षा अधिक लवाजमा पाठवला हे उघड आहे. मुद्दा हा की 'पस्ये'चा अर्थ पेक्षा' हाच आहे, हे यावरून सिद्ध झाले आहे. तेव्हा श्रीगोविंदप्रभुचरित्रातील 'यतरपस्ये' हा शब्द उपाध्यांनी आपल्या अन्य शिष्यांना उद्देशून म्हटला असून श्रीप्रभू हे इतरांपेक्षा श्रेष्ठ प्रतीचे, असामान्य दर्जाचे आहेत असे पुन्हा पुन्हा सांगण्याचा तो प्रयत्न आहे.

---

३. डॉ. यू. म. पठाण **महानुभाव साहित्य संशोधन, खंड १** म. वि. प्र., डिसेंबर, १९७३, पृ. ५१.

(पृष्ठ १६५ वरुन)

The Perspective of socialistic realism is of course the struggle for socialism. The perspective will vary in form and contain of according to the level of social development and the subject matter.

— G. LUCAS

यामुळे वदलत्या समाजिक जाणिवांच्या संदर्भात आज जर या नाटकातील विजोड दंपतीचे दर्शन झाले तर हीच मूकनायिका भारती जास्तीत जास्त उंचावणारी नाट्यगर्भ आशयाची पातळी गाठताना आढळते. कारण आज रंगभूमीचे आयाम जसे वदललेले आढळतात तसेच नाट्यगर्भ आशय म्हणजे काय, याचीही नव्या प्रेक्षकाला जाण आलेली दिसते; म्हणूनच जो नाट्यगर्भ आशय या आधीच्या काही वर्षात 'भारती'च्या जन्मानंतर जाणवला नाही तो आज जाणवतो. यामध्ये नाटककार आणि समाज यांच्यातल्या परस्पर प्रेरणांमधील सुसंवाद प्रगट झाला आहे. म्हणूनच आजच्या नवनाट्याचे 'भारती' हे नाना जोगांनी अगोदरच करून ठेवलेले भाकित ठरते.

'भारती' या नाटकात मनोविश्रांतीला वावच नाही. तिथे प्राधान्य आहे ते फक्त समाजवादी तत्वज्ञानाला. हे तत्वज्ञान नाना जोगांनी संपाच्या तत्वज्ञानाद्वारे मांडले आहे. त्यांनी मांडलेले हे संपाचे तत्वज्ञान फार निराळे आहे. या तत्वज्ञानाच्या पाठीमागची वेगळी जीवनदृष्टी हेच त्याचे प्रमुख वैशिष्ट्य ठरते. नाना जोगांच्या या तत्वज्ञानाचा अर्थ असा की, समाजावर सततच जुलूम घडत आहेत. मात्र आता नव्या समाजात त्या जुलुमांचा वंडखोर वृत्तीने प्रतिकार करण्याची प्रेरणा निर्माण झाली आहे. अगोदर पूर्वीपासून चालत आलेल्या परंपरांचे जुलूम जे सतत सहन करीत आले त्यांच्यातच आज ही प्रेरणा व प्रतिकाराची शक्ती निर्माण झाली आहे. या वंडखोर शक्तीची वाट क्रांतीकडे नेणारी असल्यामुळे या जुलुमांना एकदम प्रचंड स्फोटालाच आता तोंड द्यावे लागेल. या स्फोटातूनच नवे क्रांतीचे तुफान उत्पन्न होईल, असा त्यांना विश्वास वाटतो. 'भारती' या मूकनायिकेच्या साऱ्या हालचालींतून नाना जोगांनी जे तत्वज्ञान मांडले ते हेच आहे. या तत्वज्ञानाला विशिष्ट जीवनदृष्टी व नवेपणा ही दोन्ही प्राप्त झालेली असून त्याचमुळे नाना जोगांचे स्थान 'तत्वगर्भ' नाटककार म्हणून बरेच वरचे ठरते.

अशाप्रकारे, एका गरजेतून निर्मिली गेलेली ही मूकनायिका 'भारती' अचानक एक मोठी व फार गंभीर नसलेली अशी तत्वप्रवर्तक बनते. या पाठीमागे असलेले नाना जोगांचे नवनाट्याचे आद्यप्रवर्तकत्व आणि त्यासोबतच 'तत्वगर्भ' नाटकाचा मराठी नवनाट्यातील पाया घालण्याचे श्रेय ही दोन्ही अविस्मरणीय ठरली आहेत.

अनुक्रमणिका

॥ प्रसिद्ध झाली ॥

जहाज
कथासंग्रह :
बाळकृष्ण वि. प्रभुदेसाई रु. १५.००

कांटची सौंदर्यमीमांसा
समीक्षा रा. भा. पाटणकर रु. ३०.००

यातनाघर
एकांकिकासंग्रह :
महेश एलकुंचवार रु. ११.५०

मानसी
कवितासंग्रह : वसंत बापट रु. ५.००

॥ छापत आहेत ॥

ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र
समीक्षा : नवी आवृत्ती : गो. वि. करंदीकर

रापण
आत्मवृत्त प्रल्हाद अनंत धोंड

डॉ. पटवर्धन
ऊर्फ माधव जूलियन
चरित्र : द. न. गोखले

मातृका
कादंबरी : पुरुषोत्तम शिवराम रेगे

सलाम
कवितासंग्रह मंगेश पाडगावकर

॥ आगामी पुस्तके ॥

मौ ज प्र का श ने

सौंदर्यानुभव
समीक्षा प्रभाकर पाध्ये
(एस्थेटिक्स सोसायटी/मौज प्रकाशन)

बिअरची सहा कॅन्स
कथासंग्रह नरेश

उच्छाद
कादंबरी त्र्यं. वि. सरदेशमुख

माती
कादंबरी वि. ज. बोरकर

पु न र्मु द्र णे

कोंडुरा
कादंबरी : चिं. त्र्यं. खानोलकर

पाचोळा
कादंबरी रा. रं. बोराडे

मौ ज वि त र ण

वामन मल्हार आणि विचारसौंदर्य
समीक्षा : प्रभाकर पाध्ये

आतून बंद बेट
कवितासंग्रह श्रीधर शनवारे

॥ मौज प्रकाशन गृह ॥ मौज प्रकाशन खटाववाडी, मुंबई ४०० ००४

अनुक्रमणिका

"वैशाखी पौर्णिमेच्या दिवशी गुरु गोविंदसिंगांनी आपल्या सर्व शिखांचा एक दरबार आनंदपूर येथील राजधानीत भरविला. सर्वजण जमल्यावर गुरु गोविंदाने आपली तलवार म्यानातून उपसली आणि गुरूसाठी कोण निष्ठावान् शिष्य आपल्या प्राणांची आहुती देण्यास तयार आहे? असे खडसून विचारले! सर्वजण घाबरून गेले. एकदा, दोनदा व तीनदा गुरुने हा भयंकर सवाल केल्यावर दयाराम नावाचा लाहोरचा एक शीख पुढे येऊन त्याने आपली मान पुढे केली. गुरुने त्यास पडद्याआड नेले. रक्ताचा ओघ पडद्याबाहेर दिसू लागला. रक्ताने भरलेली तलवार घेऊन गुरूने आणखी कोण शिष्य मजसाठी आपले शीर अर्पण करण्यास तयार आहे, असे दरडावून विचारले. दिल्लीचा दुसरा धर्मदास नावाचा पुढे आला. एकामागून एक असे द्वारकेचा मुहकमचंद, बेदरचा साहेबचंद, जगन्नाथचा हिंमत पुढे आले असता अशा पाचही शिखांना पडद्याआड करीतोपर्यंत दरबारातून बरेचसे ऐतखाऊ शीख नाहीसे झाले होते. पण उरले ते करारी व निधड्या छातीचेच राहिले होते. मग गुरु गोविंदाने मोठ्या आवेशाने पडदा एकीकडे सारुन ते पाचही कट्टे शिष्य एका रांगेने बसलेले जमलेल्या मंडळीला दाखविले. त्यांच्याऐवजी पडद्याआड प्रत्येकवेळी त्याने एक एक बकरा कापून त्याचे रक्त दाखविले होते. तो सर्वांना उद्देशून मोठ्याने ओरडून म्हणाला, "शिष्यांनो! आद्य गुरु नानकाच्या वेळी अंगद हा एकच शिष्य मिळाला! आता मला पाच शिष्य मिळाले आहेत!! ह्या पाचांनी आज नव्या शीख राष्ट्राचा पाया आपले रक्त अर्पण करून घातला आहे". सर्वांनी विस्मित होऊन त्या पंचांना धन्यवाद देऊन साष्टांग प्रणिपात केला... ह्यावेळी सुमारे वीस हजार माणसांनी उभे राहून ह्या नवीन जहाल धर्माची दीक्षा घेतली. त्यात कित्येक वैश्य, क्षत्रिय व इतर शून्य मतांचे हिंदूही होते. बाकी केवळ तमासगीरच होते".

महर्षी अण्णासाहेब शिंदे यांनी केलेले हे प्रसंगवर्णन आहे.

महर्षी विठ्ठल रामजी उपाख्य अण्णासाहेब शिंदे हे एक थोर समाजसेवक होते, अस्पृश्योद्धारक होते, विचारवंत होते, संशोधक होते आणि उत्कृष्ट शैलीकारही होते. राष्ट्रासाठी आपले स्वतःचे, आईवडिलांचे, बायकोमुलांचे आणि वहिणीचेही सर्वस्व अर्पण करणाऱ्या या कर्मवीर महर्षींची आयुष्यभर उपेक्षा झाली त्यांच्या कर्तृत्वाची, विचारांची आणि लेखनाचीही. त्यांच्या लेखनशैलीचे सामर्थ्य विजेप्रमाणे दिपविणारे नसले तरी सूर्याप्रमाणे तेजस्वी, तर काही वेळा चंद्राप्रमाणे शीतल व शांत आहे. तीत उग्र दर्प नाही, मंद मधुर दरवळ मात्र सर्वत्र भरून आहे. त्यांच्या लेखनशैलीचा परिचय करून घेणेही मनाला आल्हाददायक ठरते.

अत्यंत स्पष्ट व तेवढीच प्रांजळ भाषा हे महर्षींच्या सर्वच लेखनातून आढळणारे पहिले विलोभनीय वैशिष्ट्य आहे; मग त्यांचे ते लेख धर्मपर विषयावर असोत की शिक्षणविषयक असोत किंवा भाषाविषय, राजकारण, अस्पृश्यतानिवारण, पुस्तकपरीक्षण, व्यक्तिचित्रणविषयक, शेतकरी विषयक, समाजशास्त्र, तत्त्वज्ञान, इत्यादी कोणत्याही विषयावर असोत; अथवा ते त्यांचे आत्मचरित्र असो, संशोधन असो, प्रवासवर्णन असो, बालवाङ्मय असो की त्यांची मुलाखत असो. त्यांच्या या सर्व साहित्यप्रकारांतून भव्य विचारविलास आढळून येतो. प्राचीन इतिहास, जर्मनांच्या लढाया, महाराष्ट्रातील वर्तमानपत्रे, बुद्ध-येशूचा काळ, कोलंबसाचे जीवन इत्यादींच्या व्यासंगातून महर्षींनी वाङ्मयाच्या परिणामाचे सामान्य तत्त्वज्ञान मांडताना त्यांच्या शब्दांचा अचूकपणा, समाजदर्शन व दिग्दर्शन, एकाच वाक्यखंडातून विरोध अलंकाराची मार्मिक पखरण आणि शेवटी कटुसत्य-निवेदन या सर्वांचा सहजसुन्दर मिलाफ जसा दृष्टीस पडतो तसाच त्यांच्या सर्वच वैचारिक वाङ्मयातून भव्य विचारविलास परिणामकारी शैलीने नटून आविष्कृत झालेला आढळतो. अशी कितीतरी उदाहरणे आहेत, त्यातले हे एक—"कोलंबसाने अमेरिका शोधून काढली, पण तो दरिद्री मेला. ख्रिस्ताने जगदुद्धारासाठी एका धर्माची स्थापना केली, पण स्वतः त्याला दोन चोरांच्यामध्ये सुळावर डांबून प्राण सोडावा लागला. शेवट गोड झाला नाही. तरी इतिहासाने अशा कित्येक महात्म्यांना गोड करून घेतले आहे. पण मतलब आणि मानवी कपट इतके गहन आणि चिरपरिणामी आहे की इतर असंख्य महात्म्यांना देहान्तशिक्षा मिळूनही वर इतिहासात त्यांच्याच नव्हे पण त्यांच्या वंशाच्या व जातीच्या कीर्तीला अक्षय्य कलंक फासण्यात आला आहे". ह्यानंतर अण्णांनी अशा महात्म्यांची उदाहरणे देऊन याच परिच्छेदात पुढे म्हटले आहे, "चालू वर्तमानपत्राचा आणि मध्ययुगीन पुराणांचा विषारी महिमा अगाध आहे! जनतेला या विषाचे बाळकडू अशा कुशल आणि दीर्घ पद्धतीने देण्यात आले आहे की तिचा दृष्टिकोण बदलणे केव्हा केव्हा मानवी शक्तीच्या पलीकडची गोष्ट होऊन जाते".

महर्षींच्या लेखणीला मराठी रक्ताची वेदरकार भाषा पूर्णपणे गवसली आहे. वि. का. राजवाडे यांनी मराठ्यांची निर्वीर्य म्हणून निर्भत्सना केली तेव्हा आपल्या धारदार तेजस्वी शब्दांत महर्षी म्हणाले, "थंड देशात ज्याप्रमाणे वरती बर्फाचे दाट आवरण पडले असूनही त्याचेखाली पिके सुरक्षित वाढत असतात, त्याप्रमाणे डोक्यावरील बादशाही छत्राची कितीही क्रांती होवो, महाराष्ट्रातील मराठ्यांच्या स्थानिक स्वातंत्र्याला कायमची मूठमाती कधीच कोणाला देता आली नाही. ह्याचे कारण मराठा म्हणजे केवळ आपल्या तलवारी-वरच अवलंबून राहणारा अन्योपजीवी प्राणी नसून, त्याच्या आड जर कोणी येईल तर तो काही काळ नांगराचा फाळ फोडूनही त्याची तलवार करून आपले स्वत्व व इतिहास राखील असा आहे". जदुनाथ सरकारने मराठ्यांची कुरापत काढली तेव्हा तर अगदी ठणकावून आणि खडसावून त्यांनी म्हटले आहे, "जदुनाथ बाबू! महाराष्ट्रभूमी खडकाळ आहे. तिच्यावर चारचार हजार फूट उंचसखल दऱ्याखोरी आहेत. बंगालबिहार-प्रमाणे सपाट, मऊ मेणाने पसरलेली व आयते पीक देणारी नव्हे. ज्यांनी परवा साम्राज्य उभारले ते मावळे नाचणीच्या शिळ्या भाकऱ्या खाणारे व रानडुकरांची हाडे चोखणारे होते, आयता रसगुल्ला खाणारे बंगाली-बाबू नव्हते... मराठ्या आजोबाला बंगाली नातू शिकवायला लागला..."

असे असले तरी अनेक ठिकाणी अंतरीचा उमाळा आणि ओला जिव्हाळा यातून निर्माण झालेले महर्षींचे अनुभव आणि विचारविश्व कोमल करुण रसात भिजून गेलेले आढळते. खरे तर हाच त्यांच्या लेखनाचा स्थायीभाव आहे. 'शेतकऱ्यांचा कुणी न्हाई वाली' हा पोवाडा ऐकून त्यांचे काळीज जणू छातीचे कपाट फोडून बाहेर उडून जाते की काय अशी त्यांची अवस्था झाली आणि त्यांना वाटले की हा पोवाडा नव्हे, हा शेतकऱ्यांचा हंबरडा आहे. अन्यायाने चीड उत्पन्न होते पण ती अगतिक असेल तर निराशेत परिणत होते. महर्षी

लिहितात, "हिंदुस्थानातील अस्पृश्य वर्गाची हलाखी पाहून मोठी चीड येते पण संस्थानातील शेतकऱ्यांची स्थिती तर त्याहून पलीकडची निराशाजनक होत चालली आहे. चीड येण्यापुरती तरी थोडी आशा दिसायला पाहिजे ना ?"

अंतःकरणाने सात्विक आणि वृत्तीने चिंतनशील असलेल्या अण्णासाहेबांच्या लेखनात सूक्ष्म व मार्मिक विनोदबुद्धीचाही प्रत्ययकारी आढळ होतो. त्यांनी आपल्या प्रवासवर्णनात लिहिले आहे, "कलकत्त्याची कढी, फ्रान्सचे वाटाणे, थारमाऊथचे मासे, इटलीची आमटी, सार्डिनियाचे अमूक व रंगूनचे तमूक, अशी यादीतली चटकदार नावे वाचून नवख्यास (आगबोटीतल्या नव्या प्रवाशास) मोठी मौज वाटते. तरी प्रत्यक्ष पदार्थ पाहीपर्यंत नुसत्या नावावरून काही कल्पना होत नाही. हा सर्व थाट आणि हे सर्व प्रकार पाहून नवीन मनुष्य सहजच वाजवीपेक्षा अधिक खातो आणि दोन दिवसांनी ओक लागल्यावर म्हणतो आपल्यास बोट लागली."

"आगबोटीच्या घड्याळाशी ताडून पाहता माझे घड्याळ दुसरे दिवशी दहा मिनिटे पुढे गेले आणि तिसरे दिवशी पंचेवीस मिनिटे पुढे गेले. मग मी त्याचा मागचा काटा फिरवून हळू चालेल असे केले. तरी ते आपले चाळीस मिनिटे पुढे ! मला वाटले, घड्याळाला आगबोट लागली". काही वेळेला त्यांचा विनोद हजरजबाबीपणातूनही निर्माण झालेला आहे. इंग्लंडला जातानाही महर्षींनी डोक्यावरचा भारतीय फेटा तसाच ठेवला होता. तो पाहून आगबोटीतील एक प्रवासी त्यांना मोठ्या आस्थेने विचारतो, "काय हो, ते तुमच्या डोक्यावरचे तुम्ही लंडनपर्यंत कायम ठेवणार की काय ? लंडनची मुले वात्रट आहेत, ती तुम्हाला त्रास देतील !" देतील !" महर्षी उत्तरतात, "विलायतेत पोलीसची व्यवस्था चांगली आहे ना ?" हल्लीच्या विद्वानांची मते कशी अर्धवट व दुष्ट असतात याचा विनोदी पुरावा देताना ते म्हणतात, "सर्वच माणसांच्या अंगांत देव कमी-अधिक प्रमाणाने प्रसंगविशेषी येतो असा अलीकडे शोध लागला आहे. पशूंच्या अंगात देव कधी येत नाही. अंगात देव येणे हेच मुळी माणूसपणाचे लक्षण". एखादा लहानसा अनुभवही किती खुमासदार विनोदी पद्धतीने कथन करतात पाहा – अण्णा क्लाइड नदीच्या काठी असलेल्या विश्रांतीच्या स्थळी गेले होते; तो अनुभव मांडताना ते लिहितात, "इतका वेळ कामात गुंतलेल्यांच्या गर्दीत होतो, तर आता विश्रांती घेणाऱ्यांच्या गर्दीत पडलो." आता त्यांच्या नर्म विनोदाचा नमुना—"कॉलेजच्या परिसरात विद्यार्थिनींची वसतिगृहे एका कोपऱ्यात लाजून बसल्यासारखी त्याच आवारात असतात. पण त्यांच्या रस्त्यावर इकडून 'विद्यार्थ्यांना येण्याजाण्याला सक्त मनाई आहे' अशा ठळक पाट्या लटकत असतात. जणू इतरांना मोकळीच". केवळ शेतकीवर निर्वाह होतो एवढ्यावरून अस्पृश्यांना शेतकरी ही फुकटची पदवी बहाल करायची असली तर गाय, म्हशी, रेडे, बैल, बकरे इत्यादींना शेतकरी का म्हणू नये ?" "काही ठिकाणी जमिनीचे टेबलाएवढे तुकडे पडले आहेत असे नामदार सी. व्ही मेथा म्हणतात. नामदारांचे टेबल मोठे राक्षसी असले पाहिजे". "मराठ्यांच्या लग्नात कर्नाटकात वीर निघत असतो. .पण खानदानी मराठ्यांत अलीकडे ही लग्नातील चाल फारशी आढळत नाही हा चमत्कार आहे. मराठे तेवढे सारेच वीर म्हणून त्यांच्यात ही चाल नसावी".

सत्यान्वेषी तर्कपद्धती हादेखील त्यांच्या शैलीतला एक विशेष गुण आहे. वेदपूर्व वाङ्मय उपलब्ध नाही एवढ्यावरून त्या काळात संस्कृतीचा अभाव होता असे मानता येत नाही. पण राजवाडे प्रभृती लोक तसा निष्कर्ष काढतात, म्हणून अण्णासाहेब म्हणतात, "ह्या प्राचीन राजकारणाचा खडान्‌खडा इतिहास उपलब्ध नाही, हे खरे आहे. त्या काळचा प्रत्यक्ष जेत्यांचाच इतिहास उपलब्ध नाही, तिथे जितांचा कोठून असेल ? ज्यांचे सर्वस्व गेले, त्या जितांचा इतिहास तरी कसा उरणार ? असा कोण जेता आहे की जो आपल्या कृतकर्माची कथा जशीच्या तशी लिहून ठेवील ? आणि स्वतःचा इतिहास लिहिण्याची अक्कल आणि करामत असती तर हे बिचारे आजचे अस्पृश्य जित तरी का झाले असते ? ह्या प्रकरणी इतिहास मागणे म्हणजे बाप दाखव नाही तर श्राद्ध कर म्हणण्याप्रमाणेच आहे. बिचारे बाप कोठून दाखवतील ? मुकाट्याने श्राद्ध करीत आहेत, झाले !"

युक्तिवाद आणि उपरोध हेही महर्षींच्या लेखणीचे लक्षणीय वैशिष्ट्य आहे. 'विराट', व 'वेरड' हे एकच केवळ नामसादृश्यामुळे व्युत्पत्तिसिद्ध म्हणून इतिहासाचार्य राजवाडे यांनी प्रमेय मांडले आहे. महर्षी म्हणतात, "ह्यावरून पांडवांचा व्याही विराट हाही एक वेरड ठरला म्हणायचा ! ! फार काय, पुरुषसूक्तातील विराटपुरुष हाही एका प्राचीन वेरडांच्या टोळीचा नायकच होता म्हणायचा" न. चिं. केळकरांनी इतिहास-मीमांसेवर लिहिलेल्या पुस्तकात इतिहासमीमांसेऐवजी अवांतरच गोष्टींचा भरणा अधिक आहे. त्यावर महर्षी लिहितात, "तात्या केळकरांनी आपल्या भावी पुस्तकाची जाहिरात केसरीत फुकट प्रसिद्ध करून वरती नगयात ब्राह्मणांकडून बहादुरीचे शिफारस पत्र मिळविले ! हे सर्व ठीक जुळले पण या खटाटोपात इतिहास मीमांसेचा कितीसा संबंध पोचतो हा किंचित् गैरसोयीचा प्रश्न शिलकीतच पडला, एवढेच काय ते व्यंग उरले !" महाराष्ट्रातील विद्वान अनुभवजन्य ज्ञानापेक्षा ग्रांथिक ज्ञानालाच अधिक महत्त्व देतात ह्या वस्तुस्थितीवर प्रकाश टाकताना अण्णा लिहितात, "कोळी जसा आपल्या जाळ्यातच गुंतून मेलेला आढळतो तशी महाराष्ट्राच्या इतिहासाची गत या ग्रंथप्रिय लोकांनी केलेली दिसते". भागलपूरच्या प्रार्थना समाजात पूर्वीचे चैतन्य आता दिसत नाही हे त्यांनी पुढील शब्दात सांगितले आहे—"संगतसभा, बायकांची सभा, तरुण ब्राह्मणसंघ, मुलां-साठी शाळा, सामाजिक मेळे वगैरे बरेच सुखसोहळे उपभोगून हा समाज आता शांत झाला आहे". विरोध अलंकाराचीही उदाहरणे महर्षी-वाङमयात विपुल आढळतात. उदाहरणार्थ "बाजीरावाने नुसत्या लढवय्ये-पणातच यश मिळविले, पण कर्जाखाली चिरडून मेला. नानासाहेब दीर्घसूत्री व हद्दीबाहेर कपटी होता. कपटाची धूतशेखर मात्रा तो रोज पसापसा खाऊ लागला. स्वतःच्या भावाच्या कर्तबगारीवरही विश्वास नाही असा हा ब्राह्मणी औरंगजेब आपल्या कपटाच्या थडग्यात गुदमरून मेला." "जगातील एका (इंग्रज) अत्यंत बुद्धिमान, संपत्तिवान व पराक्रमी जातीच्या लोकांचे ह्या देशावर आज शंभर वर्षे राज्य असूनदेखील देशातील दोन दशांश जनतेची (शेतकऱ्यांची) ही केविलवाणी स्थिती असावी आणि इकडे या राज्यकर्त्यांच्या टेकडीवरील हवाशीर राजवाड्यात नाचरंग, तमाशे यांची झोड उठावी !" अण्णांनी पुष्कळदा अगदी साध्या वाक्यातूनही अर्थपूर्ण विरोध साधला आहे. "शेतकऱ्यांचे डोळे उघडणे म्हणजे इंग्रजांचे डोळे मिटण्याची पाळी येणे". "दिवस सहकार्याचे आहेत, दडपशाहीचे नाहीत". "प्रथम ज्यांनी भुंकून हैराण केले तीच कुत्री तपासणी चालू असता पायाशी स्वस्थ निजून राहत. जणू काय भुंकणारे वेगळेच होते". उपरोध वैचारिक वाङमयात तर आहेच पण प्रवासवर्णनात त्याहून वैशिष्ट्यपूर्ण आहे. सह्याद्रिवर्णनात ते म्हणतात, "दुभत्याची गुरे लवकर आटून व ओढीची गुरे छाती फुटून अकाली मरतात. इतकेच नव्हे तर लहान लहान वासरेदेखील दात येण्या-पूर्वीच प्राण सोडतात. ही जुनी परंपरा या परशुराम क्षेत्रात अबाधित चालली आहे. तरी गोरक्षणाची दिखावू चळवळ काही पांढरपेशा देशभक्तांनी चालविलेली पाहून मात्र ती सहन करणे हा घाट चढण्याहूनही कठीण आहे". "ब्रिटिश आणि म्हैसूर या दोन संस्थानात ही घाटाची वाट विभागली आहे. जबाबदारीही विभागून नाहीशी झाली आहे. यावरून ज्ञानेश्वर–आळंदी घाटाचे महत्त्व रहदारीच्या दृष्टीने इतके महत्वाचे असूनही परकीय मुत्सद्दी आणि राष्ट्रीय चळवळे मंत्री आजवर एकमताने ही हयगय कशी करीत आहे हे पाहून दोघांचे कौतुक केल्याशिवाय राहवत नाही". "अध्यक्षांच्या खादीच्या टोपीशिवाय येथे काहीही प्रेक्षणीय व श्रवणीय नाही". काही ठिकाणी श्रीपाद कृष्णांची आठवण यावी अशी वाक्यांची रचना त्यांनी साधली आहे. "बाकीच्यांसाठी रेल्वे कंपन्या नसून उलट रेल्वे कंपन्यांसाठीच हिंदुस्थानातील तिसऱ्या वर्गाचा उतारू वर्ग आहे हे ज्यांना अनुभवावयाचे असेल त्यांनी विरूरची तीर्थयात्रा करावी. विशेषतः अमावास्येची रात्र असल्यास साक्षात्कार पूर्ण घडेल".

लालित्य हे अण्णासाहेबांच्या आत्मचरित्र, प्रवासवर्णन आणि इतर ललित वाङमयप्रकारांचे एक कमनीय वैशिष्ट्य आहे. खालील काही उपमा व दृष्टांत याची साक्ष देतील. "जिवंत मासे प्रवाहातून उलटसुलट पोहून खेळतात, मेलेले मासे लाटांबरोबर वरवरच तरंगत जातात". यातून जिवंत आणि मेलेल्या मनांचाच

आविष्कार होतो असे वाटते. "युनिटेरियन धर्माचा प्रसार दलदलीत पडलेल्या पावसाप्रमाणे, वर दिसावा तितका वर दिसत नाही" "आम्ही बसलो ही नाव जर पुढे न्यायची असेल तर आधी वल्हांनी पाणी मागे ढकलले पाहिजे. आणि हाच प्रकार सर्वदा नाही तरी पुष्कळदा समाजात चाललेला दिसतो. माझे धन ते दुसऱ्याचे ऋण, माझा आराम तो दुसऱ्याचा कष्ट, गर्दीत माझे पाऊल पुढे पडावे म्हणून मी इतरांस मागे रेटीत असतो". "दिवा किती मोठा केला किंवा लहान केला तरी त्याने प्रकाशित केलेल्या प्रदेशापलीकडे जसे नैसर्गिक अंधकाराचे अपार वलय राहणारच, तसे या प्रार्थनासमाजाभोवती ह्या प्राकृत अप्रियतेचे वलय राहणारच" "कडक इस्त्रीचा व सुशिक्षितपणाचा गेल्या पिढीत जितका संबंध होता, तितकाच किंवहुना काकणभर जास्तच संबंध, लेखी पुरावा आणि ऐतिहासिक सत्य ह्यांमध्ये असावा, अशी काही संशोधकांची अद्यापि समजूत असलेली आढळते" "मनुष्य बैलाला पाठळ करतो पण सिंहाला भितो. त्याच न्यायाने शास्ताही शहाण्या प्रजेचा नोकर आणि मूर्खांचा मात्र राजा होतो". "अंतःकरण कोमल करायचे असेल तर कातडी मृदू राहण्याकडे पाहू नका. नारळाची करवटी किती जाड, फुटता फुटत नाही; पण आत मगज किती मऊ, व त्यातले पाणी तर किती गोड". "एखाद्या कमळाचे फूल पाण्यामध्ये जन्म पावते. जलाचे अनेक तरंग इतक्या जोराने येतात की त्या कमळाचा देठ तुटून जाईल असे वाटते पण ते कमळ आपले स्थान सोडीत नाही. किंवा पाण्यात राहणारा मासा ते पाणी कितीही वाढले तरी भीत नाही; उलट त्याला आनंदच होतो किंवा चातक पक्षी दुसरे पुष्कळ पक्षी पाणी पीत असतानाही ते न पिता पावसाच्या पाण्याची अपेक्षा करीत आतुर झालेला असतो, किंवा दूध विस्तवावर ठेवले असता पाणी ज्याप्रमाणे म्हणते की प्रथम मी मरेन, किंवा टिटवी रात्रभर ओरडत असते व सूर्योदय झाला म्हणजे तिला आनंद होतो त्याचप्रमाणे भक्त ईश्वराला सोडत नाही, सुखदुःखात वाढतच असतो, ईश्वरभक्तीसाठी व्याकूळ होतो, ईश्वरासाठी त्याग करतो, ईश्वरावर खरे प्रेम करतो". खालील दृष्टांत तर कोणत्याही समाजकार्यकर्त्याने चिरंतन लक्षात ठेवावा असा आहे. "एकदा एका मोठ्या आगबोटीवरील एक उतारू फार आजारी पडला. तो जगण्याची बहुतेक आशाच नाहीशी झाली. शेवटी आगबोटीवरील डॉक्टरांनी रोग्याला नीट तपासून आपली खात्री करून घेतली आणि स्टुअर्डस लोकांस एकीकडे बोलावून सांगितले की, रोग्यास आता जीव फारच थोडा उरला आहे. तो दहा वाजण्याच्या आत खात्रीने मरणार. त्यानंतर त्यास समुद्रात टाकून द्यावे. दहा वाजता सांगितल्याप्रमाणे स्टुअर्डस येऊन रोग्यास उचलून नेऊ लागले, रोगी त्यांस तसे करू देईना. स्टुअर्डसनी डॉक्टरचे मत कळविले तरी रोगी आपण मेलो हे कबूल करीना. स्टुअर्डसनी त्याला दरडावून विचारले, काय डॉक्टरपेक्षाही तुला अधिक कळते काय ? एखाद्या विद्वान टीकाकाराने टीका केली व आमच्यामध्ये जीव नाही असे ठरविले तरी आपल्यामध्ये जीव आहे की नाही हे विद्वानापेक्षा आपणास जास्त समजते".

पाश्चिमात्य संस्कृती वरपांगी मोहक वाटली तरी तिची आत्मोन्नती झालेली नाही हा विचार चेतना-गुणोक्तीच्या आधारे मांडताना ते लिहितात, "अहा गे सुधारणे ! तू दिवाणखान्यात येताना कशी नटून येतेस ! तुझ्या पदरावर माशी देखील बसलेली खपत नाही. तुझा नाजूक बांधा, कोमल गात्रे, उंची पोशाख, व जडजवाहीर पाहून आम्हा पौरस्त्यांस कितीही कौतुक केले तरी पुरेसे होत नाही ! जगात राहण्याची कला आपल्यास चांगली साधली आहे असे तू कितीतरी वेळा म्हणतेस. पण नाही सुधारणे, तुला देखील अद्यापि पुष्कळ सुधारले पाहिजे आहे". अशा रूपकात्म प्रतिपादनाचा पारिजात गंध महर्षी-वाङ्मयात ठिकठिकाणी दरवळतो. त्यात कुठे नदीवर, कुठे दुर्बिणीवर, कुठे वृक्षावर, कुठे लक्ष्मीवर, कुठे रानातील काटेरी रानफळावर कुठे पर्जन्यविरहित वावटळीवर, कुठे जंतूंवर, कुठे संगमरवरी स्वप्ने व अन्यायाची स्मारके यांवर, अशा अनंत गोष्टींवर रूपके साधून त्यांनी प्रतिपाद्य विषय आशयगर्भ व बहारीचा केला आहे. कित्येक वर्षांचा इतिहास रूपकांच्या साह्याने ते काही क्षणातच आपल्या डोळ्यांपुढे उभा करतात. "राममोहनने ब्राह्मसमाजाचा नुसता पाया रेखाटला. ठाकूर महर्षीने त्यात रंग भरून ओटाही भरून काढला. मेकॉलेने शिक्षणाचे

आराखडे बांधले. त्यानंतर विकास नावाचा पडदा थोडा पाडून थोडावेळ १८५७ च्या बंडाची नाटयछटा दाखविण्यात आली. पुन्हा पडदा उघडला तो अकस्मात आमचे चरित्रनायक ब्रह्मानंद केशवचंद्र सेन सज्ज होऊन पुढे उभे राहतात" रूपकांप्रमाणेच उत्प्रेक्षाही आहेत. "ह्या ठिकाणी मिसर, असिरिया, बाबिलोनिया ग्रीक रोमन इत्यादी गत राष्ट्रांच्या सुधारणेचे अवशेष राखून ठेवले आहेत. ही ह्या सुधारणांची जणू प्रेतेच आहेत"

घटनांच्या अवलोकनातून सामान्य तत्त्व प्रस्थापित करण्याची किमयाही त्यांच्या लेखणीने साधली आहे. "जो आपले रूप अधिक वेळा व अधिक लवकर पालटील, जनमनाचे अधिक रंजन करील, वेळोवेळी बदलणाऱ्या राजसत्तेचा रंग ओळखून उगवत्या सूर्याची उपासना नेहमी करीत राहील, त्याला जय हा ठेवल्यासारखाच असतो".

महर्षींची निसर्गवर्णने केवळ मनोहारीच नव्हे तर चिंतनशीलही आहेत. "तेथील समाधी पाहून झाल्यावर मागे वळलो तोच साक्षात् ब्रह्मपुत्रेने मला आपले विराट दर्शन दिले. 'मृत्योर्मा अमृतंगमय' असे मनात येते न येते तोच अमृताची पताकाच माझ्यापुढे फडकू लागली. हिमालयाच्या पलीकडे कैलासपर्वताच्या पूर्वपायथ्याशी असलेल्या मानस सरोवरातून निघून पित्यास प्रदक्षिणा घालून आलेली महाभाग ब्रह्मपुत्रा ! हिने केवळ दर्शनहेळामात्रेकरून किती दिवसांची वार्ता सांगितली ! किती काळाची साक्ष दिली ! डुब्री गावाच्या तिन्ही बाजूंनी हिचा प्रवाह असल्याने हा गाव तिने काखेत कवटाळून धरल्यासारखा दिसतो. महासागरास पाहून ईश्वराच्या अनंत स्वरूपाची व गंभीरतेची थोडी कल्पना येते खरी पण अशा महानदीच्या विभूती पाहिल्याशिवाय ईश्वराचे कार्य व संसाराची प्रगती याविषयीची प्रत्यक्षता ध्यानात येण्यासारखी नाही. अस्तमान झपाटयाने होऊ लागला. सर्व दृष्य जगावर रात्रीचा अभेद्य पडदा पडू लागला. मातीच्या डोळयाला जसजसे कमी दिसू लागले, तसतसे स्मृतीच्या डोळयास अधिकाधिक दूरदूरचा प्रदेश दिसू लागला. किती देश, किती भाषा ! किती जाती, किती रीती पण सद्धर्माची किंचित् आस लागल्याबरोबर हे सर्व भेद विरघळून जाऊन एकत्र प्रेमरस कसा पाझरतो !" सृष्टीचे निखळ सौंदर्यवर्णनही मोठे मनोहर आहे. "सूर्योदयाचे वेळी लाल किरणे काचनगंगेच्या शुभ्र बर्फावर पडल्याने त्या प्रकाशाचे परिवर्तन होऊन काचेच्या झुंबरातून पाहिल्याप्रमाणे लाल, निळा, हिरवा वगैरे रंगांची बहार मोठी नयन मनोहर दिसते— गुलाबी थंडी होती. टेकडीच्या शिखरावर दोन इंच जाडीचा मऊ गवताचा रंगीबेरंगी गालिचा पसरला होता. दवाने तो चिंब भिजला होता" 'हिरवे हिरवे गार गालिचे । हरित तृणाच्या मखमालीचे' या काव्य पंक्तीपेक्षाही 'दवाने चिंब भिजण्याची' कल्पना अधिक प्रतिमा-तरल आहे. सृष्टीवर चेतनाचा आरोप करून ते म्हणतात, "सृष्टीचे प्रसन्न मुख आम्हास सतत दिसत असे. जेवणाच्या पंगतीत बसलो असता दूर शिखरावर सूर्यकिरणांची अपूर्व शोभा दिसे; दिवाणखान्यात क्रीडेत गुंगलो असता मध्येच सरोवरावर मेघधारा नाचू लागत तिकडे लक्ष जाई; खोलीत वाचीत बसलो असता भिंतीखालच्या नदीशी वायू अकस्मात धिंगाणा घाली, आणि पाहता पाहता गुलाम दरीत शीळ घालीत पार निसटून जाई ! ह्या प्रकारे सृष्टिबाला आमच्याशी अहोरात्र सलगी करी पण ती मोठयाची कन्या म्हणून तिच्या प्रत्येक चेष्टेचे आम्हा सर्वांना उलट मोठे कौतुकच वाटे".

ओघवती भाषा, संस्कृत व मराठी सुभाषितांची पखरण, कानडी म्हणींचा वापर या बरोबरच कधी कधी, "कुठे फारा शतकांचे मराठयांचे साम्राज्य ? कुठे त्यांच्या प्रतिभाशाली कल्पना ? कुठे त्यांची चिरस्मरणीय व वंदनीय कृत्ये ? कुठे त्यांचा दरारा ? एकूण कुठे त्यांचा हा महाराष्ट्रमहोदधी आणि कुठे या महोदधीवर पडलेली भट घराण्याची एक भाग्यशाली पण अपयशी लाट ? आणि लाट सागराला कारण, असे प्रतिपादणारा या बंगाल्याचा द्राविडी प्राणायाम ?" अशी प्रश्नवाक्ये यामुळे त्यांच्या रचनेला रेखीव घाट आला आहे. काही ठिकाणी "निसर्गातील सर्व सुखे निर्मळ असतात; निश्चित असतात; निरालंब असतात — शांततेने, शिस्तीने व सहनशीलतेने वागणे अत्यंत आवश्यक असते — जमीन सर्वकालीन सर्वांच्या

समाईक हक्काची – धुराने व धुळीने दिशा धुंद" असे नादमधूर अनुप्रास साधले आहेत तर कुठे व्यंजनेने विविध अर्थवलये निर्माण केली आहेत. "लंडनच्या जमिनीत खाली कोठे काय आहे हे सांगवत नाही" या वाक्यातून 'इंग्रजांचे अंतरंग आणि बाह्यांग, त्यांचे मन, त्यांची सुधारणा व संस्कृती भारतातील स्वातंत्र्यवीरांवर त्यांनी केलेला अत्याचार आणि त्याचवेळी आपण स्वतः स्वातंत्र्यप्रिय म्हणून त्यांनी जगभर मिळविलेली कीर्ती अशी अनेक अर्थवलये डोळ्यांपुढून तरळून जातात. "जेरुसलेमच्या देवळात नित्य जमून गिल्का करणाऱ्या सराफांना येशूने एकदा पार धुडकावून दिले होते. असे कित्येकांनी कित्येकदा केले आहे तरी हे सराफ पुन्हा जमतात" धर्माला आलेले बाजारू स्वरूप, त्यातील सराफ, नाडवणूक आणि नागवणूक, भक्तिभावाचा व्यापार आणि धर्माचे हे शतकांपासून चालत आलेले चित्र इत्यादी कितीतरी कल्पना या वाक्यांतून स्पर्शून जातात. अपवित्र शंका, अदूरदर्शी औदार्य, पापी पण अनुतापी आई, पारदर्शक संभाषण, खडकाळ इतिहास, दुडक्या चालीची लेखणी, मिळमिळीत सौभाग्य, झळझळीत विधवा, चातुर्मासाचे गुळचट लक्षण, अदृष्य सासुरवास, विपारी संतोष, अपवित्र सख्य इत्यादी अर्थपूर्ण विशेषणे व वाकवून तयार केलेली मार्मिक क्रियापदे यांमुळे त्यांची शैली काटेकोर बनली आहे.

कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त सघन, प्रभावी व परिणामकारी अर्थ पेरण्याची, सुभापितवजा वाक्य रचनेची किमया महर्षींना सहज साधल्यामुळे त्यांचे लेखन श्रुतिमधुर व अर्थमधुर झाले आहे. जखडलेल्या धर्मापेक्षा मोकळा नास्तिकपणा कितीतरी बरा – स्वभाव हा ईश्वरदत्त वारसा आणि शील ही स्वकष्टार्जित मिळकत होय--कोणत्याही चळवळीस औदासिन्यासारखे दुसरे काहीच घातक नाही–मोठी माणसे मरणानंतर पुष्कळ दिवसांनी मरतात व कीर्ती अजरामर करतात पण लहान माणसे मरणाआधीच मरतात व कीर्ती तर जन्मलेलीच नसते – आकडे निर्जीव व मानीव आहेत तसेच ते मानवी आहेत – अत्याचार हा नेहमी नैतिक असतो, शारीरिक नसतो – खऱ्या धर्ममार्गात लक्ष्मीप्रमाणेच सरस्वतीचीही किंमत फुटक्या कवडीची नसते – सर्वात निढळाच्या घामाचे खत अत्यंत श्रेष्ठ खत होय – सहकार्य करील तोच टिकेल – यथा राजा तथा प्रजा हे खरे नसून यथा प्रजा तथा राजा हेच खरे होय – सैन्य जितके मोठे तितकी पराभवकाळी पळताना अडचण – कुंभकर्ण बलाढ्य खरा पण झोपेतून उठेल तेव्हा... इत्यादी.

अशा या संपन्न शैलीकाराचे शैलीसामर्थ्य वादातीत असले तरी महाराष्ट्रात त्यांच्या शैलीची दखल आजवर कोणत्याही अभ्यासकाने घेतली नाही, हे कटुसत्य आहे.

जमखिंडीला १८७३ साली जन्म, १८९८ साली मुंबई विश्वविद्यालयातून पदवीधर, इंग्लंडला तौलनिक धर्मशास्त्राचा अभ्यास, भारतात एकेश्वरीपंथ प्रचारार्थ सेवाव्रत, अस्पृश्यता निवारणासाठी भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीची स्थापना – तिच्या देशभर शाखा – हा प्रश्न भारतीय स्तरावर आणण्याचे यशस्वी प्रयत्न – त्याकरिता सर्व कुटुंबाचा आत्मयज्ञ, पुढे महात्मा गांधींच्या असहकार चळवळीत भाग व तुरुंगवास आणि १९४४ साली अनंतात विलीन; असा या महर्षींचा जीवनपट आहे. त्यांनी 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हा संशोधन प्रबंध, भागवत धर्म, मराठा, मराठी भाषा, मुरळी इत्यादींवर संशोधनपर लेख, सामाजिक, धार्मिक राजकीय, शैक्षणिक इत्यादीवर वैचारिक लेख, व्यक्तिचित्रे, प्रवास वर्णन, बालवाङ्मय, कविता इत्यादी ललित वाङ्मय व कारागृहात लिहिलेले 'माझ्या आठवणी व अनुभव' हे आत्मचरित्र इत्यादी विपुल लेखन केले आहे.

ह्या शब्दप्रभू लेखकाच्या शैलीचा धावता परिचय एवढेच या लेखाचे प्रयोजन.

* * *

वा. पु. दामले / "ते सुख जाणे लक्ष्मी!"

संकाळी स्नानानंतर, घरची कामे करीत करीत माझी मावशी श्रीव्यंकटेश-स्तोत्र म्हणत असलेली मी दुसरीत असल्यापासून ऐकले आहे. बुद्ध्या लक्ष दिलेही नसेल; पण मला ते पाठ झालेले होते. शाळेच्या अखेरच्या वर्षात पोहोचेपर्यन्त, व्यंकटेशस्तोत्र भाषेची अलंकारिक श्रृजुता, काव्यातील प्रसाद हेजसजसे लक्षात येऊ लागून पटू लागले तसतशी त्या भावार्थखाणीच्या रसाळतेने माझ्या मनाची पकडच घेतलीन्. ध्यानी मनी नसताना असा घडलेला बोध, झालेली उकल मनाला मोठेच सुखावह करते. तुम्ही पावसाळयाच्या सुरुवातीला, जुलै–ऑगस्टमध्ये, आगगाडीच्या प्रवासात खिडकीतून कापूस-मूग, हरवरा, इत्यादी धान्यांची दाटी-वाटीने पसरलेली शेते पाहिली असतील. आगगाडीने तेवढ्यात आपल्याला शेतांच्या काही विशिष्ट (दृष्टी) कोनात आणल्याने, आधीच्या त्या एकजिनसी हिरव्याचार परिसरगत रांगांची निक्षून रेखीव कराभत दृष्टिक्षेपात येते अन् एकदम कशी नवीन अटकळ ध्यानी येऊन दिलखुलास वाटते! नाही? आगगाडीतून कधी कधी घडणाऱ्या या साक्षात्कारावरून आठवले –– गाडी उजवीकडे वेगात चालली असताना खिडकीतून (दरवाजात उभे राहून जास्त बरे) पाहिले तर, जवळील वृक्ष डावीकडून उजवीकडे गिरकी घेणाऱ्या नृत्यांगनेसारखे नाही वाटत? दूरवर असलेल्या वृक्षराजीही नृत्यांच्या लयी छेडतात; मात्र त्या सिनेमात दाख-विल्या जाणाऱ्या 'स्लो मोशन'सारख्या वाटतात. त्यातून नजिकचा वृक्ष आय-लॅन्थस एक्सल्साचा असावा; त्याच्या फांद्या आधी खाली कलत्या पण टोकांना वर झुकलेल्या वाकदार असल्याने, नृत्यांगनेच्या गिरकीत तिच्या अलवार झग्याचे उंचावर विस्फारणेही दर्शवितात! म्हणून म्हटले ऐकलेल्यातील, वाचलेल्यातील, पाहिलेल्यातील कराभत ही ज्याच्या त्याच्या मानसिक, वैचारिक, दृष्टीकलावर अवलंबून असते. श्रीव्यंकटेशस्तोत्राच्या माझ्या वेळोवेळीच्या आकलनाने मला असा अधिकाधिक जाणकार केला होताः शिक्षक, स्वभावोक्तीची उदाहरणे, पुस्तकात असलेली तीच तीच देत असत—"अंग वक्र अधरि धरी पावा. तो ठसा स्वहृदयात वसावा!" किंवा "मातीत ते पसरले अति रम्य पंख.. श्रमही निमाले!" मला मात्र वाटे, ज्या ईशाने हृदयी प्रकटून 'सुखाची पार नाही' असे केले त्या श्रीव्यंकटेशाच्या आपादमस्तक स्वरूपाचे नितांत रम्य शव्दचित्र हेच खरे स्वभावोक्तीचे अप्रतिम उदाहरण आहे.

मावशीने म्हटलेल्या ओळी ––

"कुबेर तुझा भांडारी, आम्हा फिरविशी दारोदारी।
यात पुरुषार्थ मुरारी, काय तुजला पैं आला? ।।

ऐकू आल्या की मला वाटे, 'खरच, देवाने आम्हां मर्त्यांना का दु:खे द्यावीत ?" आणि जिथे असे तिथे मी हात जोडून देवाला नमस्कार करीत विनवीत असे की त्याने साऱ्या मानव योनीचे जीवन सुखसंवर्धित करावे. कमलापतीला माझीही प्रार्थना असे, "तुझे नामी राहो माझी माती"; आणि "मजलागि देई ऐसा वर, जेणे घडेल परोपकार".

केव्हा केव्हा त्या स्तोत्रातील भाव अव्यावहारिक वाटत. पण एकदा, दुसऱ्याच उक्तींबाबत, मावशीशी घातलेल्या वादात मी हरकलो असल्याने उपरती पावून भावलो होतो — गंजातील सायीचे दही रवीने घुसळून निघालेले सफरचंदायेवढे लोणी तळहातात घेऊन त्यातून ताक निथळत असताना, डोळे मिटून भाविकपणे, ती देवाला नैवेद्य देत असे —

"समुद्रा येवढे ताक, डोंगरा येवढे लोणी।
हे सारे कृष्णार्पणी ।।"

एकदा मी म्हणालो, "येवढंस ताक अन् लोणी. त्याच्या नावाने असं काय देवाला उगाच खोटं नाटं ऐकवायचं ग ?" त्यावर ती निश्चयाने उत्तरली होती, "तसं नव्हे रे. यात प्रत्याप्रत्यक्षतेचा, खरे-खोटेपणाचा संबंध नाही. ही केवळ श्रद्धा-भावदर्शन-कल्पनारम्यता आहे". आणि ते मला पटले होते. त्यानंतरचे माझे शिक्षण विज्ञानविषयक झाल्याने भाषांचा परिमल आटोपला होता; तरीपण मनोधर्माच्या राज्यात, भावनेच्या परिसरांत, मी व्यावहारिक, बौद्धिक, वैज्ञानिकतेचा शिरकाव होऊ दिलेला नाही ! नामदेवांच्या एका अभंगात त्यांनी देवावर फसवी, खोटी बिरुदे बाळगल्याचा आरोपच केला आहे — पतितपावन तू म्हणून तुझा लौकिक ऐकून मी, पतित, मोठ्या आशेने तुझ्या दाराशी केव्हाचा ताटकळत उभा राहिलो. पण तू पतितपावन वगैरे काही एक दिसत नाहीस. गावात डंका पिटत तुझं सारं ढोंग अन् थोतांड उघडं करतो ! 'पतितपावन नव्हेसि म्हणूनि जातो माघारा!' मात्र परतता परतता, आपली गैरसमजूत ध्यानी आल्याने, देवालाच फक्त ऐकू जाईल येवढ्या आवाजात ते विनिविताल, "पण देवा, तुझाचि म्हणुनी कृपादृष्टी असू दे बरं मजवरी !' हे कवन ऐकून माझी देवावरची श्रद्धा येवढीही कमी होत नाही. केवळ नामदेवांचा अधिकार जाणवतो. मनातले सांगून टाकणारे ते निस्पृह, सचोटीचे, असामान्य दानतीचे देवभक्त वारकरी म्हणूनच भक्तीचा भुकेला, भक्तांचा कैवारी देव त्याला सडेतोडपणे बोलण्याचा अधिकार त्यांचा. तुम्हां-आम्हांचा नोहे !

श्रीव्यंकटेश स्तोत्रातील किती एक ओळी प्रसंगा-प्रसंगाने आजही माझ्या जिभेवर रुळतात. त्यातील एक भावदर्शन लक्षवेधी आहे. असे पाहा, माणसांचे रूप वर्णून ओळख पटवून द्यायची तर सहसा त्याच्या चेहेरेपट्टीचेच वर्णन करतात — गोल चेहेऱ्याचा (ची), निळ्या डोळ्यांचा, बसक्या नाकाचा — या चेहेऱ्या-वरील खुणांवरून संदर्भीय व्यक्ती कोणती ते पटवायचे. श्रीव्यंकटेश स्वरूप रेखाटताना मात्र कसे त्याच्या पावलापासून सुरूवात करून मग मस्तका-पर्यंतचे वर्णन केलेले आहे —

'ते स्वरूप अत्यंत सुंदर,
श्रोती श्रवण कीजे सादर।
सावळी तनू सुकुमार,
कुंकमाकार पादपद्मे ।'

आणि अखेर —

'मस्तकी मुगुट आणि किरीटी,
सभोवती झिरमळ्यांची दाटी।
त्यावरी मयुरपिच्छांची वेटी,
ऐसा जगजेठी देखिला ।।'

यात मला भावविश्व आढळते. देवरायाकडे पाहायचे तर त्याच्या मुखावर कशी एकदम नजर जावी ! त्याच्यापुढे नतमस्तक होऊन हात जोडले की पहिल्याने दृष्टिपथात यावीत त्याची पादयुग्मेच; नाही का ? मग हलके हलके धीर येत, नजर वर वर जात त्याचे मुखकमल आपल्या डोळ्यांपुढे यावे. हे विचार-आचार, मर्त्य-मृत्युंजयाशी वागण्याच्या रीती-भातीतील हे फरक मला जाणवतात व देवाला त्याची महत्ता अर्पिणाऱ्यात मी सश्रद्ध सामील होतो. या प्रसंगी लक्ष्मणाबद्दल सांगितलेली एक कथा आठवते. सीताविरहाने दु:खी-कष्टी, हवालदील झालेले श्री रामचंद्र विध्यमन:स्थितीत व असहाय्यतेच्या व्यथेने केविलवाणा झालेला लक्ष्मण, रानावनांतून सीता-

शोधात असताना कुणी एक गाठोडे आणून लक्ष्मणाला दाखविले. ते सोडून त्यात असलेले दागिने पहाताच पायातील नूपुरे त्याने झटकन उचलली आणि अनपेक्षितपणे एक ओळखीचा ऐवज गवसल्याच्या हर्षाने लक्ष्मण उद्गारला, "ही आमच्या सीतामाईंची नूपुरे आहेत खास". उरलेल्या कानां-गळयांतील अलंकारांबद्दल विचारता तो म्हणाला, "त्याबद्दल मी काय सांगू? सीतामाईंच्या पदकमलांकडे जसे मी वारंवार पाहिले आहे तसे त्यांच्या मुखाकडे, गळयाकडे पाहिलेले नाही". हा सारा प्रसंगच, ही कल्पनाच अतिशय हृदयस्पर्शी वाटते आणि अंतःकरण सद्गदित करते. तसेच श्रीव्यंकटेशाचे आपादमस्तक वर्णन मला भावचिंब करते.

स्वतःला पामर, निंद्य म्हणत, देवापुढे लोटांगण घालत त्याची करुणा भाकण्याची संत-योगिराजांची रीत श्रीव्यंकटेशस्तोत्र पठण करणारा भक्तही पाळत आहे. स्वतःच्या अपराधांच्या गगनभेदी राशींची नोंद करता करता, अधमाहूनी अधम असून, व्यर्थ बडिवार जगी माजविणारा भक्त, अखेर असहाय्यपणे कबुली देत आहे, किती सांगणार, छेः! 'अठराभार वनस्पतिंची लेखणी, समुद्र भरला मषी करोनी। माझे अवगुण लिहिता धरणी, तरि ते लिहिले न जाती ।।'

श्रीव्यंकटेशाच्या स्तोत्रौघांत, 'खालते विश्वोत्पत्ती स्थळ, वरी झळाळी सोनसळा।' हेही येऊन जाते. खरंच ही ओवी असंख्य स्त्री-पुरुष मनोभावे व निर्विकारपणे म्हणत आलेले आहेत; म्हणत राहातीलही. त्यात वैषयिक विकारांचा छळही कधी गुंतलेला नाही. देवादिकांच्या दिगंबर मूर्तींची दृष्ये सर्रास पहाताना त्यातून वैषयिक भाव निर्माण होऊच नयेत अशी आम हिंदी मानससरोवरांची शुचिता आहे. म्हणून तितक्याच श्रद्धेने व अपरिमित निष्ठेने जेव्हा ओळी म्हटल्या जातात – 'अधरामृत प्राप्तिची गती, ते सुख जाणे लक्ष्मी।' तेव्हाही, ऐहिक हेवा न वाटता फक्त स्तोत्रकारांचे पारमार्थिक कथन पूर्णांशाने पटते. खरंच, त्या अपरंपार सुखाची जाणकार एकमेव लक्ष्मीच. किती सहजासहजी अन् केवढे अमरकाव्य स्तोत्रकार ऐकवीत आहेत.

श्रीव्यंकटेशाच्या नेत्रांचे वर्णन काय बहारदार आहे! बरं का, एकदा असाच वनस्पति-संकलनासाठी कॉलेजच्या विद्यार्थ्यांना घेऊन, उन्हाळी खानदेशात सरकारने नव्याने बडिवारलेल्या थंड हवेच्या ठिकाणी –तोरणमाळला, गेलो होतो. सुप्रभाती उठून बंगलीबाहेर येतो तो, समोरच उजव्या-डाव्या बाजूंना, निमुळते होत पसरलेले निळेशार सरोवर दृष्टिपथात आले. त्याच्या अल्याड-पल्याड कडांवर वृक्षवेलींनी साज चढविला होता. तांबूस प्रकाशाने तेजाळलेले नेत्रानंद देणारे ते पाणीदार दृष्य पाहून मला जणू साक्षात्कार झाला आणि व्यंकटेशाच्या नेत्रकमलांच्या वर्णनाच्या काव्यपंक्ती आठवल्या —

'त्रिभुवनींचे तेज एकवटले,
बरवेपण सिगेसि आले।
दोन्ही पातयांनी धरिले,
तेच नेत्र श्रीहरिचे ।।'

या ओळी माझ्या अंतःकरणात भव्य, दिव्य, उदात्त भाव उसळवितात, डोळे मिटतात, एकाग्रचित्त होते अन् समोर प्रत्यक्ष श्रीव्यंकटेशाची मूर्ती प्रगटते.

श्रीकांत तिडके / महदंबेचा शोक

'महानुभाव' म्हणजे सात्विक तेजाने तळपणारा दैदिप्यमान, बलसंपन्न असलेल्था संतमहंतांचा पंथ. जयकृष्णी पंथे, अच्युत पंथ, भटमार्ग, महात्मा पंथ इत्यादी अनेक नावांनी तो ओळखला जातो. स्पर्शास्पर्श, सोवळे-ओवळे जाती-पाती इत्यादी दृढमूल प्रथांना न जुमानता बंडखोरी करणारा हा पंथ. 'चातुर्वर्ण्यं चरेदभक्ष्यम्' या 'शास्त्रासि अनुसारिजे' म्हणत आपल्या अनुयायांना 'विकल्पशून्य' होऊन चारही वर्णांची भिक्षा घ्यायला लावणारा आणि स्त्रियांनाही "ब्रह्मवादिनी' मानणारा हा पंथ. सर्वज्ञ चक्रधरांच्या व्यक्तित्वाच्या विविध छटा 'कॅलिडिओ-स्कोप' मधील शोभाकृतीसारख्या लीळाचरित्रात दिसतात. असे सर्वज्ञ चक्रधर ह्या पंथाचे प्रवर्तक.

श्रीचक्रधरांनी समाजातील विविधांगांतून आपला शिष्यपरिवार संग्रहीत केला. श्रीसर्वज्ञानाच्या प्रेमास पात्र ठरलेली अशी महादायिसा ही शिष्या होती. लीळाचरित्रात श्रीचक्रधरांच्या तोंडी तिच्याविषयी 'म्हातारी चर्चक म्हातारी जिज्ञासक ' असे गौरवोद्गार आलेले आहेत. भटोबासांनी 'म्हातारी धर्मरक्षक म्हातारी प्रतिरक्षक :' असे प्रशस्तिपत्र तिला दिले आहे

डॉ. अ. ना. देशपांडे यांनी आपल्या वाङमयेतिहासात महदंबेच्या चरित्राचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. महदंबेची पणजी विदुषी असून तिचे नाव महदाइसा असे होते. ती कोण्या महादेवरायाची पुरोहित होती. महदंबेचे नाव रुपाई होते. लग्नानंतर लवकरच तिला वैधव्य आले. नागदेवाचार्य व महदाइसा ही चुलत भावंडे. दादोसामार्फत तिची सर्वज्ञ चक्रधराशी गाठ पडली. शेवटी ती चक्रधरांना अनुसरली. चक्रधरांनी महदाइसा हे 'नामाभिधान' दिले.

श्रीगोविंदप्रभूच्या सान्निध्यात कृष्णविवाहप्रसंगी धवळे गाण्याची स्फूर्ती तिला झाली. जीवा-शीवाच्या मीलनाची अपूर्व कहाणी महदंबेच्या भावोत्कट कथाकाव्यातून प्रगटली. कृष्ण-रूक्मिणी कथेतील मूळ शृंगाररस इथे गौण होऊन भक्तिरसाने त्याच्या माथ्यावर पाय ठेवलेला दिसतो.

'चीत चैतन्यी विगुतले
जेव्हेळी देखियले यदुरायाचा पाय'...

इथे जीवात्मा परमात्म्यात विलीन झालेला दिसतो. तिच्या ह्या भावोत्कट, अकृत्रिम अशा साध्या रचनेनेच तिला 'आद्य कवयित्री' ह्या पदी निःसंशयपणे आरूढ केले. 'मातृकी-रुक्मिणी स्वयंवर' गर्भकांड ओव्या' वगैरे स्फुट रचनाही तिच्या नावे आहे.

महदंबेचे व्यक्तित्व :

सर्वज्ञ चक्रधरांच्या 'उत्तरापंथे' गमनानंतर त्यांच्या शोकाकुल शिष्य परिवाराने लीळांचे संकलन केले. म्हाइंभटाने त्याचे सजीव शब्दांकन केले.

चक्रधरांचा वियोग शिष्यांना असह्य होता. त्या वियोगाने वेडेपिसे होऊन नागदेवाचार्य निघून गेले. नागदेवाचार्यांचा शोध घेण्यासाठी महदंबा निघाली. जंगलात निश्चेष्ट अवस्थेत पडलेल्या नागदेवाचार्यांना तिने पाठीवर बसवून आणले व बोळच्याने दूध पाजून त्यांना भानखेडाहून ऋद्धिपुरास आणले. (प्रा. व. दा. कुळकर्णी, 'महानुभाव', जुलै ७७, पृ. ७). वियोगाच्या प्रसंगीही ही स्त्री आपल्या दुःखाला आवर घालून मातेच्या ममतेने सांप्रदायिकांना धीर देते. ही गोष्ट तिच्या कर्तृत्वावर नवा प्रकाश टाकते. पण प्रश्न असा निर्माण होतो की, चक्रधर वियोगप्रसंगी धीराने वावरणारी महदंबा व्यथित झाली नव्हती का ? 'विद्यामार्गाला अनुसरणारे दादोस व ब्रह्मविद्येला अनुसरणारे चक्रधर यांच्यात सूक्ष्म स्पर्धा होती. तिच्यात महदंबेची ओढाताण झाली व शेवटी ती चक्रधराला अनुसरली' असे डॉ. अ. ना. देशपांडे यांनी आपल्या वाङमयेतिहासात लिहिले आहे. म्हणजे चक्रधरावर डोळस प्रेम करणारी ही स्त्री त्यांच्या वियोगाने मुळीच व्यथित झाली नसेल का ? गोविंदप्रभूंच्या आज्ञेने स्वयंस्फूर्त असे ढवळे रचणारी महदंबा अशा दुःखद प्रसंगी मूक कशी राहिली ? 'Our sweetest Songs are those that tell us of sadest thought' असे शेलेने लिहिले आहे. अशा दुःखद प्रसंगी स्त्रीसुलभ गीत महदंबेच्या तोंडून का निघाले नाही ? की असह्य दुःखातिरेकाने तिची प्रतिभा मूक झाली ? तिच्या संवेदनाशील, सृजनशील स्त्रीमनाचा दुःख-वांधा फुटला कसा नाही ? दुःखाने क्रंदन करीत बसण्यापेक्षा त्या दुःखाचे उदात्तीकरण करून जीवन उजळून टाकण्यासाठी सर्वज्ञ चक्रधरांना स्मृतीच्या लक्ष-लक्ष दीपांनी भक्तांनी आळविले, व त्यातून 'लीळाचरित्र' हा मार्गदर्शक दीपस्तंभ उभारला गेला. त्यातील लीळांच्या संग्रहकृती त महदंबेचाही वाटा होता. कारण महदंबेच्या जिज्ञासक प्रश्नांना उत्तर देताना अनेक 'तत्त्वसूत्रे' मांडली गेलीत. अशी चिकित्सक, भावनाप्रधान महदंबा चक्रधर वियोग प्रसंगी काहीच का लिहीत नाही ? लीळाचरित्रात व स्मृतिस्थळात तिच्या दुःखाविषयी काहीही सांगितले नाही.

काळाच्या ओघात कदाचित महदंबेचे 'शोकगीत' विरले असेल ? किंवा अज्ञातस्थळी ते असेलही. पण महदंबेला चक्रधर वियोगप्रसंगी तिच्या प्रतिभाशक्तीने गप्प बसू दिले असेल असे वाटत नाही. ह्याचे कारण ऋद्धिपूर येथील गोपीराज महानुभाव ग्रंथसंग्रहालयात महदंबेच्या शोकाचे वर्णन करणाऱ्या ३९ ओव्यांचे एक काव्य आहे. प्रा. व. दा. कुळकर्णी ह्यांनी 'महानुभाव' मासिकाच्या जुलै १९७७ च्या अंकात त्या ओव्यांचे संपादन केले आहे.

महदंबेची शोकावस्था :

एका अनामिक कवीने (किंवा कवयित्रीने) आपल्या प्रतिभेने महदंबेच्या दुःखाचा वेध घेण्याचा प्रयत्न ह्या ओव्यांतून केला आहे. महदंबेच्या स्वरचित विलापिकेच्या अनुरोधाने तर हे शोकवर्णन ह्या अनामिक कवीने केले नाही ना; असे वाटते. (अर्थात ह्याला आधार नाही.) कारण त्यातील वर्णन केलेला महदंबाशोक उत्कट आहे. त्यातील 'Spontaneous Overflow' मुळे ह्या शोकवर्णनाला सजीवत्व प्राप्त झाले आहे.

'वेळापूर नगरी अवसर वनदेवी
उदास गोसावी स्वीकरीले ।।३।।

भक्तिजन वीनवीती राया चक्रधरा
उदास ईश्वरा : प्रेहरावे ।।४।।'

असे चक्रधरांच्या उत्तरापंथे गमन प्रसंगाचे वर्णन करुन महदंबेच्या अतीव दुःखाचे वर्णन पुढ आले आहे :—

डोळया द्रवडनि   न पुरेचि साजणी
गेला चक्रपाणी   सांडूनिया ।।१२।।

मावळल्या सृष्टि   पडला अंधकारू
गेला तो सुंदरू   सांडूनिया ।।१३।।

आजिचा दिवषू : गेला जीवलगा
मग पूजा अस्वरू   करील कोण? ।।१४।।

चक्रधरांच्या विरहाने व्यथित झालेल्या महदंबेचा हा भाव ज्ञानेश्वरांच्या विराण्यांची आठवण देतो —

जीवाचिया जीवा प्रेमभावाचिया भावा ।
तुज वाचुनी केशवा अनुनावडे ।।१।।

जीवे अनुत्यरलिये असुनी का नये ।
वेगी आणावा तो सये प्राणु माझा ।।२।।

पण ज्ञानेश्वरांना 'सौभाग्य सुंदरु गुण लावण्य सागरु' असा 'श्रीविठ्ठलु' भेटेल अशी आशाही वाटत होती. पण महदंबेचा शोक निराशेने काळवंडलेला दिसतो. पण दुःखाचा कढ आवरून महदंबा श्रीगोविंदप्रभूंच्या चरणी ठाव घेते. असा शेवट ह्या शोकगीताचा केलेला आहे. श्रीनागदेवाचार्यांनाही ती गोविंदप्रभूंजवळ ऋद्धिपूरला आणले असे वर्णन ह्या अनामिक कवीच्या गीतात आहे. ह्या गीतातून महदंबेच्या भावनाप्रधान, समजुतदार मनाचे दर्शन घडते.

लेखकांना विनंती

साहित्य कागदाच्या एका बाजूला, सुवाच्य अक्षरांत, पुरेसा समास सोडून लिहावे. ते मराठी साहित्य महामंडळाच्या शुद्धलेखनाच्या नियमांनुसार असावे. सोबत पुरेसे टपालहशील व स्वतःचा पत्ता लिहिलेला लिफाफा असेल तरच नापसंत साहित्य परत पाठविले जाईल. त्या विषयी कोणताही निराळा पत्रव्यवहार केला जाणार नाही. कवींनी टपालहशील पाठवू नये. नापसंत कविता निकालात काढल्या जातील.

म. ल. वराडपांडे / **काही न छापलेली पाने**

'कोल्हटकर आणि हिराबाई' हे माझे पुस्तक साहित्य सहकार संघाने १९६९ साली प्रकाशित केले आणि त्यानंतर सतत तीन वर्षे त्याविषयी उलटसुलट प्रतिक्रिया विविध मासिक-पुस्तकांतून, वृत्तपत्रांतून व्यक्त होत होत्या. गंमत म्हणजे या प्रतिक्रिया विलक्षण परस्परविरोधी आणि आत्यंतिक टोकाच्या होत्या. 'प्रस्तुत ग्रंथ हा मराठी चरित्रेतिहासात तरी निदान केवळ अपूर्व आहे'. येथपासून तो 'प्रा. वराडपांडे ह्यांनी कोल्हटकरांच्या वाङमयाचे कोणते मर्म यात उलगडले आहे, कोण जाणे' (सत्यकथा मार्च, ७२). येथपर्यंत टीकाकारांनी त्याचे मूल्यमापन किंवा अवमूल्यन केले. 'लेखक एखादी व्यक्ती निर्मितो तेव्हा त्यामागे ज्या प्रेरणा असतात, त्या काही छायाचित्रकारासारख्या सरळ व सोप्या नसतात', असे एक आचार्य मला सांगून गेला. छायाचित्रण सरळ आणि सोपे असते हे त्यांना कोणी सांगितले देव जाणे ! कोणी नैतिक निकषांवर पुस्तक तपासून निर्णय दिला. लेखकाचे वैयक्तिक जीवन आणि त्याची कलानिर्मिती याचा नेमका काय संबंध असतो याविषयी विचारमंथन झाले. वि. द. घाटयांसारख्या जेष्ठ साहित्यिकाने 'महाराष्ट्र-टाईम्स'मध्ये (५ सप्टेंबर, १९७१) एक प्रदीर्घ लेख लिहून हिराबाईंचे जीवन 'एक दीर्घकालीन ग्रीक शोकांतिका होती' असे म्हटले तर एका सुप्रसिद्ध नाटककाराने यावर नाटक (कस्तुरीमृग) लिहून या शोकांतिकेला मूर्त रूप दिले. कै. भाऊसाहेब माडखोलकरांच्या प्रेरणेने लिहिलेल्या या पुस्तकाने एक वाङमयीन इतिहास निर्माण केला असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे निश्चितच होणार नाही.

१९६६ मध्ये प्रकाशित झालेल्या 'व्यक्तिरेखा' या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीत भाऊसाहेब माडखोलकरांनी लिहिलेला 'साहित्यातील उपेक्षिता' हा लेख वाचून मी विलक्षण प्रभावित झालो होतो. कोल्हटकरकालीन समाजजीवनाचे विविध पैलू मला त्यात दिसून आले इतकेच नाही तर साहित्यिक व त्याचे जीवन यांच्यातील अपरिहार्य संबंधही तीव्रतेने मला जाणवला. हा संबंध विलक्षण गुंतागुंतीचा असतो आणि निर्मितीप्रक्रियेच्या विविध अवस्थांतून गेल्यानंतर साहित्यकृतीत त्याचे जे रूप दिसते ते अगदीच वेगळे असू शकते याचे भान मला निश्चितपणे होते. परंतु पुष्कळदा आदिम अनुभवाचे वस्तुनिष्ठ रूप अविकृत स्वरूपात कलाकृतीत अवतरू शकते याची जाणीवही मला होती. 'उडता घोडा' अशी फँटसीच्या पातळीवर गेलेली संकल्पना मुळात 'उडणे' आणि 'घोडा' या दोन वास्तव बाबींचे निर्णायक संश्लेषण (creative synthesis) करणारी असते. ती जशी निर्मितीप्रक्रियेच्या मुशीतून जाऊन वेगळया स्वरूपात अवतीर्ण होऊ शकते त्याप्रमाणे 'उडणे' आणि 'घोडा' या वास्तव बाबी विलक्षण वस्तुनिष्ठ स्वरूपात स्वतंत्रपणे ललित

कृतीत येऊ शकतात. ही शक्यता आचार्यांनी का लक्षात घेऊ नये? पण प्रत्येकाचा आपला आवाका असतो हेही तितकेच खरे. मग तो कलावंत असो की सर्वज्ञ टीकाकार.

'कोल्हटकर आणि हिराबाई' हे पुस्तक एकदम प्रकाशित झाले नाही. त्यापूर्वी 'दीपावली'च्या दिवाळी अंकात या विषयावर एक प्रदीर्घ लेख मी लिहिला होता. या लेखाच्या संदर्भात भाऊसाहेब माडखोलकरांनी संपादक दलालांना जे पत्र पाठविले होते ते विलक्षण बोलके आहे. ते लिहितात, "माझ्या 'व्यतिरेखा' ह्या पुस्तकात हिराबाईवर जो लेख आलेला आहे त्याचा आधार व त्यातील काही अवतरणे प्रो. वराडपांडे ह्यांनी घेतलेली आहेत, ही गोष्ट खरी तरीसुद्धा त्यांचा लेख हा तसा स्वतंत्रच आहे. मजजवळ हिराबाईसंबंधीचे जे अस्सल कागदपत्र आहेत त्यांतील सर्व माहितीचा उपयोग अनेक कारणांमुळे मला करणे शक्य झाले नाही. त्यांपैकी काही माहितीचा उपयोग प्रो. वराडपांडे यांनी केलेला आहे. कोणताही माहितीचा लेख अनेक ठिकाणाहून गोळा केलेल्या माहितीचा उपयोग करूनच लिहावा लागतो पण त्यामुळे त्याचे नाविन्य किंवा उपयुक्तता कमी होत नाही" (९ ऑगस्ट १९६७).

भाऊसाहेबांनी हिराबाईसंबंधीची कागदपत्रे सुखासुखी मला दिली नाहीत. भांडं कच्चं आहे की पक्कं हे ठोकून पाहून, परीक्षा करून नंतर त्यांनी ती हातावेगळी केली. ही सर्व कागदपत्रे विलक्षण स्फोटक व तितक्याच नाजूक तपशीलाने भरलेली होती. ती वापरणे जबाबदारीचे काम होते. तोल सांभाळून बंदिस्त लेखन मी करू शकेन असा विश्वास त्यांना वाटल्यानंतरच त्यांनी ती मला दिली. ज्या पुडक्यात घालून ही आधारसामुग्री त्यांनी मला दिली होती ते अजूनही माझ्याजवळ आहे. त्यावर त्यांनी लाल पेन्सीलने लिहिले होते "न छापायची पत्रे".

काही नव्या माहितीची भर टाकून 'दीपावली'च्या दिवाळी अंकात एक लेख मी प्रकाशित केला. थोड्यांच दिवसांत सुप्रसिद्ध समीक्षक डॉ. द. भि. कुळकर्णी यांचे पत्र अनपेक्षितपणे मला आले. त्यांनी लिहिले होते ते असे : 'दीपावली वार्षिकातील आपला लेख एवढ्यात वाचला; अतिशय आवडला. त्यामागील व्यासंग आणि समतोल दृष्टी स्पृहणीय आहे'. (३ ऑक्टोबर १९६७). फेब्रुवारी ६८ मध्ये 'पंजण'मध्ये मी पुन्हा दरम्यान गोळा केलेल्या माहितीच्या आधारावर दुसरा लेख लिहिला. श्री. अ. सी. केळुसकर यांनी त्यावर अभिप्राय देतांना मला लिहिले होते, 'विषयाच्या औत्सुक्यामुळे लेख वाचून काढला. मला तो अतिशय आवडला. आपण फारच परिश्रम घेऊन हा परिचय लिहिला आहे' (५–४–१९६८).

भाऊसाहेबांनी कागदपत्रे मला दिल्यापासून पुस्तक येईपर्यंत म्हणजे सुमारे दोन वर्षेपर्यंत त्यांनी मला स्वस्थ बसू दिले नाही. अनेकांशी मला पत्रव्यवहार करायला लावला. अनेकांशी प्रत्यक्ष जाऊन भेटायला सांगितले. हिराबाईशी संबंधित मुंबईचा परिसर पायाखाली घातला. अंजनीबाई मालपेकर, आचार्य अत्रे, प्रा. भ. श्री. पंडित, श्री. ह. वि. मोटे, सर भवानीशंकर नियोगी, रावबहादुर गोखले अशा अनेक जाणकारांना भेटलो, त्यांच्याशी प्रदीर्घ चर्चा केली. विविध संदर्भ ग्रंथ डोळ्यांखालून घातले. हिराबाईसारख्या एका नगण्य स्त्रीविषयीची माहिती गोळा करण्यासाठी मी येवढी खटपट प्रदीर्घ काळपर्यंत करावी याचे अनेकांना सखेदाश्चर्य वाटले. सुप्रसिद्ध नाट्यविद् के. नारायण काळे यांनी आपल्या परखड पत्रात याविषयीची नाराजी अत्यंत स्पष्ट शब्दात व्यक्त केली. ते लिहितात,

"आपण श्रीमती हिराबाई व त्यांचे वाङमय यावर पुस्तक लिहायला घेण्याचा विचार करीत आहा, हे वाचून मला आश्चर्य वाटले. 'पहिली स्त्री नाटककार' ह्या वैशिष्ट्याला बालिश कौतुकाहून साहित्यदृष्टीने अधिक महत्त्व देण्यात कांही स्वारस्य आहे, असे मी तरी मानीत नाही. व्यक्ती आणि नाटककार या दोन्ही दृष्टींनी प्रस्तुत लेखिका उपेक्षणीय आहे व तिचे नाटक तर उल्लेख करण्याच्याही योग्यतेचे नाही. अशा परिस्थितीत तिच्या चरित्र-लेखनाचा खटाटोप म्हणजे काळ आणि शक्ती यांचा अपव्यय होय, असे मी तरी म्हणेन. 'ललितकलादर्शा'ने हे नाटक बसविले तेव्हा ती संस्था उपेक्षणीय होती. तिला पुढे प्राप्त झालेल्या

मान्यतेवरून एका प्रतिष्ठित संस्थेने ते नाटक रंगभमीवर आणले होते असे अनुमान आपण करीत असाल तर ते वस्तुस्थितीला सोडून आहे. आपल्या संकल्पित चरित्र नायिकेला साहित्येतिहासात उल्लेखाचे भाग्य मिळाले ते तिच्याशी आलेल्या कोल्हटकर, केळकर, गडकरी, देवल यांसारखे साहित्यिक व जोगळेकरादी नट यांच्याशी आलेल्या संपर्कामुळे होय. एक literary scandle यापेक्षा या घटनेला स्थायी महत्व नाही असा माझा याबावतीतला स्पष्ट अभिप्राय आहे" (पुणे, ५–१–१९६८).

परंतु एक 'वाङमयीन भानगड' या दृष्टिकोनातून मी या प्रकरणाकडे कधीच पाहिले नाही. ही केवळ एक चविष्ट कथा नव्हती. तिला अनेक पदर होते, अनेक पैलू होते; अनेक सामाजिक–वाङमयीन संदर्भ होते, त्यांचे स्वरूप फार गंभीर होते. ते गांभीर्य मला जाणवले म्हणून मी लेखनास प्रवृत्त झालो. ह्यामुळेच सखोल दृष्टी असणाऱ्या अनेक विचारवंत, साहित्यिकांनी या लिखाणाची गंभीरपणे दखल घेतली. मला या प्रकरणाची कादंवरी सहज बनविता आली असती. परंतु त्याला जे वेगळे स्वरूप आले ते मला प्रकर्षाने जाणवलेल्या त्याच्या गांभीर्यामुळे. परंतु एक चविष्ट गंमत म्हणून मी या प्रकरणाकडे पाहतो आहे की काय याची भीती अनेकांना वाटत होती. प्रा. भा. ल. पाटणकर यांनी तर मला 'हे सदभिरुचीला धरून नाही. आपल्या पवित्र पेशाला कमीपणा आणणारे आहे' असे तळमळीने लिहिले होते. भाऊसाहेब माडखोलकरांकडे, माझ्या 'दीपावली'च्या लेखात काही अनुचित शब्द आहेत अशी तक्रार कोणीतरी केली. तेव्हा ते माझ्यावर फार अस्वस्थ झाले होते. परंतु प्रत्यक्ष लेख वाचल्यानंतर तसा काही प्रकार नाही याची त्यांना खात्री पटली व त्यांचा गैरसमज दूर झाला. भाऊसाहेवांनी आपल्या गुरूची बदनामी केली, कुचाळी केली असा वेजवाबदार आरोप करणारांना ते याववतीत किती दक्ष होते याची यावरून कल्पना यावी. लिखाणाचा 'समतोल' जरा देखील ढळला असता तर त्यांनी खपवून घेतले नसते. गुरूंविषयी त्यांना किती विलक्षण आदर होता, याचा अनुभव मला अनेकदा, अनेक प्रकारे आला होता. टीकालेखनाविषयी माडखोलकरांचा विशिष्ट दृष्टिकोन होता. कोल्हटकरांच्या आत्मवृत्ताची दुसरी आवृत्ती श्री. वि. स. खांडेकरांच्या प्रस्तावनेसह प्रकाशित झाली. खांडेकरांच्या या प्रस्तावनेत परस्परांना छेद देणारी विधाने होती ती मला मुळीच आवडली नव्हती. यासंवंधी माडखोलकरांना मी विस्तृत टिपण पाठविले. आपल्या उत्तरामध्ये भाऊसाहेब माडखोलकर लिहितात, " 'आत्मवृत्ता'ला खांडेकरांनी लिहिलेल्या प्रस्तावनेवद्दल आपण जे लिहिले आहे ते मला पूर्णपणे मान्य आहे. मात्र आपण जी टीका कराल ती उडत उडत किंवा कुचाळीची नसावी. ती मुद्देसूद, सडेतोड, साधार आणि भारदस्त असावी". (३–८–१९७१) आपल्या दुसऱ्या पत्रात ते लिहितात, 'श्री. खांडेकर यांच्या प्रस्तावनेच्या बाबतीत आपण माझी सूचना मान्य केलीत याबद्दल मी आपला आभारी आहे. वयोमान आणि प्रकृती या दोहोंमुळे ते आता इतके थकले आहेत की त्यांच्यावर आघात करणे माणुसकीला सोडून होईल. योग्य टीकेला हरकत नाही'. (१२–८–७१) यावरून भाऊसाहेब माडखोलकरांच्या मनाची ऋजुता व सहृदयत्व लक्षात यावे. यावरून गुरुवंधूविषयी त्यांची ही भावना होती तर गुरुविषयी कशी असेल याची कल्पना यांच्या अप्रगल्भ टीकाकारांना येऊ शकेल. 'टीका कुचाळीची नसावी' या विषयी त्यांचा आग्रह होता. त्यांच्या सडेतोड वृत्तीमुळे त्यांच्यावर निष्कारण कुचाळीचा आरोप काहींनी केला. पण तो त्यांना निश्चितच अन्यायकारक आहे. मी विलक्षण दक्षतेने आणि जवावदारीच्या भावनेने या पुस्तकाचे लेखन केले. कोल्हटकरांची पुतणी व स्वतः साहित्याच्या ज्ञात्या असलेल्या सौ. विमलाबाई देशपांडे याना या पुस्तकाची एक प्रत त्या दिल्लीला आल्या असताना मी अभिप्रायार्थ दिली व श्रीपाद कृष्णांचे चरित्र वा चारित्र्य यांना गालबोट लावणारा मजकूर या पुस्तकात असल्यास तसे आपण मला स्पष्टपणे सांगावे अशी मी त्यांना विनंती केली होती. त्यांनी आपल्या अभिप्रायात याविषयी जे मत व्यक्त केले ते मला फार फार मोलाचे वाटते. त्या म्हणतात, "श्री. म. ल. वराडपांडे यांचे 'कोल्हटकर व हिराबाई' हें पुस्तक वाचले. कोल्हटकर व हिराबाई यांच्या मैत्रीबद्दल बरेचसे दूषित वातावरण उत्पन्न केल्याचे ऐकिवात होते म्हणून हे पुस्तक काहीशा उत्सुकतेने वाचले. पण या पुस्तकात या मैत्रीबद्दल

कुत्सितपणे काहीही लिहिले गेले नाही" (२१–६–१९७०). माझ्या पुस्तकावर जे अनेक अभिप्राय दिले गेले त्यात हा अभिप्राय मला सर्वात मोलाचा वाटतो. 'लेखनामागे ममत्वाची दृष्टी आहे' हे याविषयावरच्या अगदी पहिल्या लेखाविषयी डॉ. कुळकर्णी यांनी जे लिहिले होते तोच दृष्टिकोन पुस्तकातसुद्धा मी ठेवू शकलो याची पावती सौ. देशपांडे यांनीही दिली. भाऊसाहेब माडखोलकरांनी जेव्हा हे अभिप्राय पाहिले तेव्हा आपला विश्वास अनाठायी नव्हता याचे समाधान त्यांना नक्की वाटले असले पाहिजे.

१९७० च्या सप्टेंबर महिन्यात महाराष्ट्राचे थोर विचारवंत श्री. नरहर कुरुंदकर यांचे एक पत्र मला आले. त्यातील काही भाग अत्यंत महत्वाचा असून कलावंत व त्याची निर्मिती यांच्यासंबंधीच्या काही मूलभूत प्रश्नांना त्यांनी यात स्पर्श केला आहे. ते लिहितात

"आपल्या ग्रंथाने मराठीत एक नवीन पायंडा पडत आहे म्हणून या ग्रंथाचे स्वागत करताना अनुकूल व प्रतिकूल अशा दोन्ही बाबी मी मोकळेपणे नोंदवितो. मराठी साहित्यकारांची चरित्र लिहिताना त्यांच्या वाङमयाचे रहस्य उलगडण्यास उपयोगी ठरणारी माहिती प्रतिष्ठेच्या मिथ्या कारणाखातर डावलली जात आहे. आपल्या पुस्तकामुळे वाङमय आणि जीवन यांचे सांधे अधिक धीटपणे चर्चिण्यास नव्या चरित्रकारांना संधी मिळेल . . . देवलांच्या 'संशय-कल्लोळ'वर जाता जाता आपण जो प्रकाश टाकला आहे त्याचे वाङमयीन महत्व कोल्हटकरांच्या नायिकांवर जो प्रकाश पडतो त्यापेक्षा जास्त वाटतो. कारण कलावंत देवलांचे अजून वाङमयीन आकर्षण आहे . . एक उत्तम ग्रंथ लिहिल्याबद्दल अभिनंदन !"

प्रा. वनहट्टींच्या देवलविषयक चरित्र ग्रंथात नेमका या गोष्टींचा अभाव आहे. कवी गिरिशांनी देवलांच्या जीवनाविषयी जी महत्वाची माहिती आपल्या पत्राद्वारे मला दिली किंवा कोल्हटकरांनी आपल्या निर्भिड आत्मवृत्तात हिराबाईविषयीच्या देवलांच्या वात्सल्याची जी हकीगत नोंदली आहे त्याचा साक्षात संबंध त्यांच्या वाङमयाशी येतो. लेखकाच्या कलानिर्मितीची प्रक्रिया गुंतागुंतीची असते असे म्हणून त्याविषयी विचार करायचा नाही की काय ? कलावंत समाजात जे सामाजिक बदल त्यावेळी हळूहळू पण निश्चितपणे होत होते त्याचे प्रतिबिंब 'संशयकल्लोळा'च्या पहिल्या व दुसऱ्या आवृत्तीत जे फरक केले गेले त्यात स्पष्टपणे पडलेले आहे. कलावंतीणींना प्रतिष्ठित वैवाहिक जीवन जगता यावे म्हणून हिराबाई पेडणेकर, अंजनीबाई मालपेकर, सुदाम मांद्रेकर वगैरे अनेक तळमळीच्या कार्यकर्त्यांनी जी चळवळ उभारली होती तिचा प्रभाव देवलांवर स्वच्छपणे पडल्याचे वाङमयीन पुरावे आहेत. हरिपूरला देवलांचे स्मारक त्यांनी ठेवलेल्या बाईच्या मालकीच्या जमिनीवर बांधले गेले आहे. या सर्व गोष्टींची दखल प्रा. वनहट्टींसारख्या त्यांच्या देवल-चरित्रांत का घेतली नाही याचे आश्चर्य वाटते. या पुस्तकाला मिळालेले साहित्य अकादमीचे पारितोषिक घेण्यासाठी प्रा. वनहट्टी येथे आले असताना मी त्यांना याविषयी विचारले होते. पण त्यांनी फार गुळमुळीत उत्तरे देऊन विषय टाळला. माझ्या पुस्तकाच्या पृ. ७७–७८ वर देवलांचा या नायकिणींशी जो संबंध आला त्याच्या वाङमयीन परिणामांची चिकित्सा केलेली आहे.

हिराबाई पेडणेकरांवर एक प्रदीर्घ लेख श्री. वि. द. घाटे यांनी 'महाराष्ट्र-टाईम्स'मध्ये प्रकाशित केला. एका नव्या दृष्टिकोनातून त्यांनी या प्रकरणाकडे पाहून त्यातील शोकांतिका स्पष्ट केली. भाऊसाहेब माडखोलकरांनी एका पत्रात या लेखाचे वर्णन 'नाटचकाव्य' या शब्दांत केले होते. त्यांचे या लेखाबद्दल मी अभिनंदन करण्यासाठी पत्र पाठविले. त्याला दिलेल्या उत्तरात ते म्हणतात, 'तुम्हाला माझा लेख आवडला हे वाचून फार बरे वाटले. माझ्या लेखाचा मुख्य आधार तुमचे पुस्तकच आहे. तुम्हीही प्रांजळपणे लिहिले आहे याबद्दल तुमचे अभिनंदन. माझ्या लेखाबद्दल ४०–५० अभिनंदनाची पत्रे आली त्यामुळे मी भांबावून गेलो आहे'. (१४–९–१९७१). श्री. घाटे यांचे विश्लेषण खरोखर फार सूक्ष्म आणि मर्मग्राही होते. त्यांना आलेल्या पत्रांत एका कॅप्टनचेही पत्र होते. त्यांच्याकडून पत्ता घेऊन मी कॅप्टनसाहेबाशी पत्रव्यवहार केला. विविध देशांचा प्रवास केलेल्या या तरुण गृहस्थाने विवाहाचा विचार करताना मी विवाह करीन तो 'एका

गोवेकरणीशी, म्हणजे ज्या समाजात पतित समजल्या जातात अशा कोणत्याही लायक स्त्रीशी विवाह करेन' अशी उदात्त प्रतिज्ञा केली होती व त्याप्रमाणे ती पारही पाडली. ते लिहितात, "माझ्या वरच्या एक दोन पिढ्यांत बाई ठेवणे हा प्रकार फार रूढ होता. पण ही बाया ठेवणारी माणसे फार म्याड होती. त्यामुळे अनेक स्त्रिया त्यांनी पतित केल्या व अशा पतित स्त्रियांची संतती पण पतित व बिनबुडाची राहिली. या लोकांनी सामाजिक पाप फार मोठे केलेले आहे" एका उच्च वर्णीय तरुणाने अशा प्रकारचा विवाह करणे ही त्याकाळी सामान्य गोष्ट नव्हती. हा तरुण हिराबाईंच्या संपर्कात आला 'अशा मुलीशी मी लग्न करणार व येवढे धारिष्टच दाखविणार याचा आनंद हिराबाईना फार फार झाला', असे पुढे ते लिहितात. हिराबाईंनी जे समाजकार्य करण्याचा निश्चय केला होता तो प्रत्यक्षात उतरवणारा तरुण त्यांना भेटला होता. हिराबाईनी त्याला मातृतुल्य प्रेम दिले. आपल्या पत्नीविषयी लिहिताना कॅप्टनसाहेब पुढे म्हणतात, 'माझे वैवाहिक जीवन सुखी आहे. यात माझ्या पत्नीचे सहकार्य फार मोठे आहे व या यशाची तीच मोठी वाटेकरी आहे'. महाराष्ट्रात 'बोलके सुधारक' आणि 'करते सुधारक' अशा सुधारकांच्या श्रेण्या मानल्या जात होत्या. कॅप्टनसाहेबांचे नाव आगरकरांसारखे महाराष्ट्रात घेतले जाणार नाही म्हणून त्यांचे कार्य उपेक्षणीय ठरत नाही. उलट ते जास्त उदात्त, सुधारणेला पुढे नेणारे कार्य होते. समाजाने अशांचे ऋणी राहिले पाहिजे. हिराबाईंच्या रूपाने तत्कालिक समाज-जीवनाचा जो पट उलगडत जातो तो निश्चितच अनेक दृष्टींनी महत्वाचा आहे. साहित्य आणि समाजजीवन या दोन्ही दृष्टींनी हिराबाईंच्या जीवनाचे विविध पैलू निश्चितच अभ्यास करण्यायोग्य आहेत. चरित्रलेखन एक सामान्य गोष्ट नाही येवढे जरी साहित्यिकांना जाणवले तरी पुष्कळ झाले. हिराबाईंशी परिचित असणाऱ्या कॅप्टनसाहेबांनी तथ्य आणि विश्लेषण या दोन्ही अंगांनी या पुस्तकातील लिखाण अचूक असल्याचा निर्वाळा दिला आहे.

भाऊसाहेब खांडेकरांनी श्रीपाद कृष्णांच्या आत्मचरित्राच्या दुसऱ्या आवृत्तीला जी प्रस्तावना लिहिली आहे तीत माझ्या लिखाणांत सूचकता कमी आहे असे म्हटले आहे तर 'टाइम्स ऑफ इंडियात' या पुस्तकाचे परीक्षण करताना एका टीकाकाराने ते केवळ सूचक स्वरूपाचे आहे अशी तक्रार केली. तो म्हणतो,
'Owing to false sense of decorum, neither Varhadpande nor Madkholkar deal with the liaison between Kolhatkar and Hirabai beyond humming and hawing discreetly and hinting that theirs was much more than a platonic relationship.'
'औचित्याविषय भ्रामक किंवा खोटया कल्पनेने हवे तितके उघडपणे मी किंवा भाऊसाहेब माडखोलकरांनी लिहिले नाही' हा अभिप्राय मी एक मोठे कॉम्प्लिमेन्ट समजतो. कारण या दोघांच्या मैत्रीतील शारीरिक पैलूंविषयी हे लेखन नाही.

विविध टीकाकारांनी या पुस्तकावर विविध प्रकारे लिहिले. कोणी समजून लिहिले, कोणी न समजून. परंतु या सर्व अभिप्रायांत भाऊसाहेब माडखोलकरांचा अभिप्राय मला फार मोठा मोलाचा वाटतो. तो अनुकूल आहे म्हणून नव्हे तर पुस्तकाच्या स्वरूपाविषयी वाटलेले समाधान त्यातून व्यक्त झाले आहे म्हणून; त्यांनी माझ्यावर जो विश्वास टाकला होता तो यथार्थ होता असे सिद्ध झाले म्हणून. भाऊसाहेबांनी लिहिले होते 'कोल्हटकरांसारख्या महाराष्ट्रातील संप्रदायप्रवर्तक श्रेष्ठ ग्रंथकाराच्या मनोजीवनावर लिहिलेले अशा प्रकारचे हे पहिलेच टीकात्मक पुस्तक आहे. पाश्चात्य वाङमयात आंद्रे मॉर्वापासून सॉमरसेट मॉम पर्यंत अनेक जगद्विख्यात टीकाकारांनी अशा प्रकारचे चरित्रात्मक प्रबंध लिहिले आहेत. तसा उपक्रम अल्प प्रमाणात मराठीत करण्याचे धाडस प्रो. वराडपांडे यांनी केलेले आहे.

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त (दि. १ सप्टेंबर, १९७७ ते ३१ ऑक्टोबर, १९७७)

गो. स. देहाडराय, सरचिटणीस

१ कार्यालय व्यवस्थापन

१.१ कार्यकारी मंडळाची तिसरी सभा दि. ११ सप्टेंबर, १९७७ ला यवतमाळ येथे महाजनवाडीत त्या शाखासभेच्या विनंतीनुसार झाली.

१.२ या सभेत भंडारा येथे वि. सा. संघाचे साहित्य संमेलन घेण्याचे ठरले.

१.३ मराठी साहित्य महामंडळाचे कार्यालय ३१ मार्च, १९७८ नंतर नागपूरला आणावे असे ठरले.

१.४ कार्यकारी मंडळाच्या सभासदांची लेखी संमती मागवून वर्धा शाखा सभेला मान्यता देण्यांत आली.

१.५ वि. सा. संघ घटना कलम १३ अन्वये अध्यक्षांनी श्रीमंत सुमतीबाई मारोतराव धनवटे यांची मान्यता आल्यावर त्यांची कार्यकारी मंडळावर सभासद म्हणून नियुक्ती केली.

२ आजीव सदस्य

या कालात खालील आजीव सदस्य झाले :—

(१) श्री. जोशी, मधुसूदन गोपाळ, नागपूर.
(२) श्री. वसु, अरूण गुलाबराव, नागपूर.
(३) प्रा. चौधरी, कृष्णा सूर्यभान, गोंदिया.
(४) श्री. घाणेकर, श्रीपाद सदाशिव, नागपूर.
(५) श्री. मुजुमदार, उल्हास शांताराम, नागपूर.
(६) श्री. कणीरे, शांताराम रघुनाथ, नागपूर.
(७) श्री. खांडरे, मधुकरराव, चंद्रपूर.
(८) श्री. पोटदुखे, शामरावजी, चंद्रपूर.
(९) श्री. भास्करवार, बाबूरावजी, चंद्रपूर.

३ सांस्कृतिक कार्यक्रम (साहित्य, संगीत, चित्रकला)

३.१ **"सात कथाकार"**:—वि. सा. संघाच्या व्यासपीठावरून कथाकथन, कथावाचन व कथा सादरीकरण उपक्रमाच्या मालिकेतील विदर्भातील सात प्रसिद्ध कथाकारांचा समावेश असलेला कथाकथनाचा दुसरा कार्यक्रम २४–९–७७ रोजी गडकरी सभागृहात सादर करण्यांत आला. सर्वश्री वसंत

चिचोळकर, वसंत निगवेकर, कमलाकर धारप, बुलढाणा, येथील कथाकार श्री. शंकर कऱ्हाडे व सौ. शंकुतला जोग आणि सौ. मालती निमखेडकर यांनी आपआपल्या कथा कथन करून आपला सहभाग दिला.

३.२ **साहित्य अकादमी व्याख्यानमाला :—** विविध भाषांतील साहित्य अकादमीची पारितोषिके प्राप्त ग्रंथाचा समीक्षात्मक परिचय करून देण्याच्या दृष्टीने सांस्कृतिक समितीतर्फे आयोजित व्याख्यान मालेतील दुसरे पुष्प १९७६ चे अकादमी पुरस्कार प्राप्त "मेरी तेरी उसकी बात" ले. यशपाल ह्या हिन्दी ग्रंथाची समीक्षा करून प्रसिद्ध हिन्दी साहित्यिक श्री. रञ्जन त्रिवेदी यांनी गुंफले.

३.३ **एक समीक्षक**

"तीन कवी" सांस्कृतिक समितीच्या वतीने नवीन कवींना वि. सा. संघाचे व्यासपीठ उपलब्ध होवन त्यांना समाजाभिमुख करून देण्याच्या हेतूने दर महिन्याच्या एक तारखेस तीन नवीन कवींच्या कवितांची एका समीक्षकांकडून समीक्षा अशा स्वरूपाचा कार्यक्रम करण्यांचे ठरविण्यांत आले असून या मालिकेतील प्रथम कार्यक्रम ३ ऑक्टोबर रोजी गडकरी सभागृहात आयोजिण्यांत आला होता.

श्री. उल्हास मनोहर व कु. अरूणा पवार ह्या कविसोबत श्रीमती सुशीला शंकर ह्या मराठीत नव्याने लिहू लागलेल्या कवयित्रीचाही समावेश होता.

३.४ **सात कवयित्री :—** कवयित्री, लेखिका, कलावंत यांच्या स्वतंत्र कार्यक्रमाचे आयोजन करण्यांचा सांस्कृतिक समितीच्या योजनांतर्गत "सात नवोदित कवयित्र्यांच्या कवि-सम्मेलनाचा" प्रथम कार्यक्रम डॉ. प्रा. सौ. शंकुतला खोत यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यांत आला.

३.५ काव्यवाचनाच्या ह्या कार्यक्रमात कु. चित्रा पांढरकर, रत्ना महाजन, चारू फत्तेखानी, नंदिनी उपासनी, विजया देशपांडे, निलिमा मोहरीर व कु. अरूणा पवार या कवयत्र्यांनी भाग घेतला. ह्या कार्यक्रमाचे आयोजन कु. अरूणा पवार यांनी केले होते. विदर्भातील कवयित्री, लेखिका व अन्य कला प्रांतातील स्त्री कलावंत यांची संदर्भ सूचि तयार करण्याची योजना याप्रसंगी आमंत्रक श्री. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी जाहीर केली.

३.६ **श्री. पु. भा. भावे यांच्या तीन कथा—** अ. भा. मराठी साहित्य संमेलन, १९७७ चे अध्यक्ष व प्रसिद्ध वैदर्भीय कथाकार श्री. पु. भा. भावे यांची अध्यक्ष म्हणून निवड झाल्याच्या सन्मानार्थ कथाकथन, मालिकेतील तिसऱ्या कार्यक्रमात दि. २२-१०-७७ शनिवार रोजी पु. भा. भावे यांच्या 'व्यक्तिमत्व व कथा' ह्यावर प्रसिद्ध लेखक श्री. वसंत वरखेडकर यांचे भाष्य व भावे यांच्या तीन कथांचे वाचन अशा स्वरुपाचा कार्यक्रम आयोजिण्यात आला होता.

"श्री. पु. भा. भावे हे जगातली सारी अश्लीलता कचऱ्याच्या ढिगाऱ्यासारखी एकत्र गोळा करून मग त्या ढिगाऱ्याला निषेधाच्या आगीची काडी लावतात व त्यातून निघणाऱ्या स्वच्छ जाळेकडे ते आपले व इतरांचे लक्ष केन्द्रित करु इच्छितात व एका शेवटच्या क्षणी भावे स्वतःचाही स्वतःच निषेध करवून घेतात." असे उद्गार प्रसिद्ध विचारवंत व साहित्यिक श्री. वसंत वरखेडकर ह्यांनी श्री. पु. भा. भावे यांच्या तीन कथा या कार्यक्रम प्रसंगी भाष्य करतांना काढले. श्री. भावे ह्यांच्या कथांचे वाचन सर्वश्री शामकांत कुळकर्णी व बळवंत वाघमारे ह्यांनी केले.

३.७ **"साहित्याकडून अपेक्षा"** —श्री. बाबा आढाव, प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते व प्रसिद्ध लेखक आणि पत्रकार डॉ. अनिल अवचट यांच्या साहित्याकडून "आमच्या अपेक्षा" या विषयावरील

भाषणाचा कार्यक्रम दि. ९ ऑक्टोबर रोजी सांस्कृतिक समितीच्या वतीने आयोजिण्यांत आला होता.

अध्यक्षस्थानी डॉ. मधुकर आष्टीकर हे होते. प्रचंड संख्येने उपस्थित असलेल्या साहित्यप्रेमी यांच्या गर्दीसमोर डॉ. अनिल अवचट व श्री. बाबा आढाव यांनी साहित्यावरील नवीन मूल्यांच्या संदर्भात विवेचन केले.

३.८ **"बातचीत"** :— रंगभूमीवरील प्रसिद्ध नट, अभिनेते व नाट्य अभ्यासक डॉ. श्रीराम लागू व हौशी रंगभूमीवरील नट श्री. मोहन गोखले यांचे बरोबर साहित्य व नाट्य प्रेमी यांची "बातचीत" घडवून आणण्याचा कार्यक्रम दि. १५ ऑक्टोबर रोजी करण्यांत आला.

३.९ **बालचित्रकला वर्ग** :— कला केंद्राच्या वतीने प्रसिद्ध चित्रकार प्रा. प्रकाश कावळे यांच्या मार्गदर्शनाखाली निःशुल्क चालणाऱ्या बालचित्रकला वर्गातील बालकांना महाराजबाग व अन्य ठिकाणी नेऊन, तेथील अनुभूतीचे चित्रण करावयास लावण्यांत आले होते.

३.१० **प्रदर्शन** :— महाराष्ट्र शासनाच्या या संबंधीच्या विभागातर्फे चित्रकला विद्यार्थ्यांनी दारूबंदी संबंधी काढलेल्या कलात्मक पोस्टर्सचे एक प्रदर्शन वि. सा. संघाच्या कला केन्द्राच्या सहाय्याने ३ ते ८ ऑक्टोबर पर्यंत आयोजिण्यांत आले होते.

३.१० **संगीत केन्द्र**

विद्यार्थी कलावंताचा कार्यक्रम :—संगीत केन्द्राच्या वतीने झालेल्या संगीत संस्था व संगीत तज्ञांच्या मेळाव्यात ठरल्या प्रमाणे शहरातील सर्व संगीत संस्थातील संगीताचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी कलावंताचे कार्यक्रम सादर करण्यांच्या योजनांतर्गत गुरू गायन वादनालयाच्या विद्यार्थ्यांचा कार्यक्रम दि. २५ रोजी सादर करण्यांत आला.

या संगीत सभेत श्री. शामराव विलायची यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या विद्यार्थ्यांनी वाद्यवृंदाचा कार्यक्रम सादर केला तर नवोदित गायिका कु. तारा विलायची यांनी बहारदार गाण्याने प्रेक्षकांना रिझविले.

३.११ **संगीत सभा** :— विद्यार्थी कलावंताच्या कार्यक्रम मालीकेतील दुसरी संगीत सभा दि. ९ ऑक्टोबर रोजी सकाळी झाली.

या संगीत सभेत प्रसिद्ध सतारवादक श्री. अरूणकुमार भट्टाचार्य यांच्या विद्यार्थ्यांचे सामुहिक सतारवादन व कु. रिंकु रूद्रा यांचे सतार वादनाचा कार्यक्रम सादर करण्यांत आला होता. या कार्यक्रमाला श्रोत्यांची बरीच गर्दी होती.

३.१२ शारदोत्सवाचे निमित्ताने विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक समितीच्या वतीने एका कार्यक्रमाचे आयोजन दि. २९ ऑक्टोबर रोजी रात्री करण्यात आले होते. प्रसिद्ध तबलावादक श्री. गोपाळ वाडेगांवकर यांच्या 'सोलो' तबला वादनाने सायंकाळी सात वाजता सुरु झालेल्या या कार्यक्रमात श्री. वसंत चिंचाळकरांच्या कथेचे वाचन, श्री. प्रभाकर पुराणिक ह्यांच्या चांदण्याच्याच अनुभूति विषयक ललित लेखाचे कथन व जुन्या व नव्या पिढीतील प्रतिथयश व काही नवीन कवींचाही समावेश असलेले एक भव्य कविसंमेलन झाले.

३.१३ **न्या. मू. रानडे आंतर-महाविद्यालयीन वादस्पर्धा** :—न्या. मू. रानडे आंतर-महाविद्यालयीन वादस्पर्धा वि. सा. संघ व वक्तृत्वोत्तेजक सभा, पुणे, या संस्थेच्या विद्यमाने यावर्षी गडकरी सभागृहात दि. ३० सप्टेंबर, १९७७ व १ व २ आक्टोबर, १९७७ असे तीन दिवस आयोजित

करण्यांत आल्या. स्पर्धेचा विषय **'भारतात आर्थिक नियोजनाचा कार्यक्रम फसला आहे'** हा होता. या स्पर्धेत अकरा महाविद्यालयांच्या बावीस विद्यार्थी स्पर्धकांनी भाग घेतला. या स्पर्धेचे उद्घाटन संघाध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर यांच्या हस्ते झाले. स्पर्धेची फिरती रौप्य ढाल धरमपेठ कला-वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने मिळविली. कु. दुर्गा कातोरे (श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालय, नागपूर) यांना प्रथम क्रमांकाचे रोख रु. १००/- आणि कु. माधुरी पारसनीस (हिस्लाप कॉलेज, नागपूर) यांना द्वितीय क्रमांकाचे रोख रु. ७५/- अशी वैयक्तिक गुणवत्तेची पारितोषिके मिळाली. याशिवाय पंधरा स्पर्धक विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रके घोषित करण्यांत आली. परीक्षक म्हणून प्रा. भा. ल. भोळे, डॉ. सौ. सुनंदा सोनारीकर व सौ. कमल आंबेकर यांनी काम केले व स्पर्धेचे संचालन श्री. मधुकर राजे यांनी केले.

४ सन्माननीयांच्या भेटी

४.१ महाराष्ट्र राज्य ग्रंथालय विभागाचे संचालक श्री. कृ. द. पुराणिक यांनी दि. ५–९–७७ ला वि. सा. संघाला भेट दिली. श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाची कार्यपद्धती त्यांना सरचिटणीसांनी विशद करुन सांगितली.

४.२ प्राचार्य श्री. शिवाजीराव भोसले यांनी दि. ३० आक्टोबर, १९७७ ला संघाला भेट दिली. उपस्थित सभासदांनी त्यांच्याशी वाङमयीन स्वरुपावर संवाद साधला.

५ सत्कार :

५.१ दि. ५ सप्टेंबरला संघाचे कार्यकारी चिटणीस प्रा. ज. रा. फणसळकर यांनी एकावन्नाव्या वर्षात पदार्पण केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यांत आला.

५.२ वि. सा. संघाचे पूर्वाध्यक्ष व विद्यमान उपाध्यक्ष श्री. आ. रा. उपाख्य आप्पासाहेब देशपांडे 'अनिल' यांना त्यांच्या साक्षरता प्रचार व सांस्कृतिक कार्याबद्दल भारत सरकारचे नेहरु पारितोषिक प्रदान करण्यांत आले. त्यांच्या या गौरवाबद्दल संघातर्फे दि. १८ सप्टेंबरला त्यांचा सत्कार करण्यांत आला.

६ नैमित्तिक कार्यक्रम :

६.१	२२–९–७७	श्री चक्रधर स्वामी जयंती निमित्त श्री. बा. श्री. गडकरी यांनी स्वामीच्या जीवन व तत्त्वज्ञान यावर व्याख्यान दिले.
६.२	१–१०–७७	कवीवर्य अण्णाजी बोबडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करण्यांत आली.
६.३	२–१०–७७	राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार समर्पण.
६.४	३१–१०–७७	सुप्रसिद्ध राष्ट्रीय कवी दुर्गा प्रसाद तिवारी यांच्या पुण्यस्मरणार्थ नामदार बाळासाहेब चौधरी, राजस्व मंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला. याप्रसंगी सौ. उषा धारप यांनी त्यांची स्फूर्ति गीते गाईली. डॉ. भाऊसाहेब कोलते, श्री. श्रीकृष्ण विठ्ठल गंधे व कवि गायधनी यांची

भाषणे झाली. त्यांचे चीरंजिव मनोहर तिवारी उपस्थित होते. संघाध्यक्ष डॉ. आप्टीकर यांनी तिवारींच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करुन आदरांजली वाहिली. श्री. गंधे यांनी कै. दुर्गा प्रसाद तिवारी यांचे तैलचित्र वि. सा. संघाला देण्याचे जाहीर केले.

७ नाटयसमिती

७.१ दि. २७ सप्टेंबर, १९७७ ला समिती तर्फे श्री. वसंत कानेटकर लिखित व श्री. महेश पातुरकर दिग्दर्शित 'स्मगलर सम्राटाच्या न्यायालयात' आणि डॉ. मधुकर आप्टीकर लिखित व श्री. मदन गडकरी दिग्दर्शित 'डॉक्टर सलामत तो रोग पचास' या दोन एकांकिका धनवटे रंगमंदिरात सादर करण्यांत आल्या.

७.२ दर्जेदार प्रायोगिक नाटयप्रयोग अल्प दरात स्थानिक नाटय कलावंत, नवोदित दिग्दर्शक व रसिक यांना पाहावयास मिळावा हा समितीच्या योजनेचा या वर्षीचा एक भाग. या योजनेनुसार समितीने मुंबई येथील सुप्रसिद्ध 'बहुरुपी' या नाटयसंस्थेकडून 'जुलूस' या नाटकाचे दोन प्रयोग दि. १ व २ ऑक्टोबर, १९७७ या दिवशी सादर केले.

७.३ दि. २१, २२ व २३ आक्टोबरला बालनाटय स्पर्धा आयोजित करण्यांत आली. या स्पर्धेत एकूण आठ बालनाटय संस्थांनी भाग घेतला. स्पर्धेचा निकाल असा. — देवबाप्पा नाटयसंस्था 'लेकुरे ईश्वराची' – रु. १०० चे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक व रंजन कलामंदिर फिरता रौप्य-चषक नवयुग विद्यालयाने सादर केलेल्या 'शेपटीचा शाप'– रु. ७५ चे द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक आणि आनंद निकेतन या संस्थेने सादर केलेल्या 'चोर सोडून सन्याशाला'— रु. ५० चे तृतीय क्रमाकांचे पारितोषिक. याशिवाय वैयक्तिक अभिनयाची पारितोषिके खालील बाल कलावंतांना मिळाली. पुरुष कलाकार अतुल कुळकर्णी (लेकुरे ईश्वराची) प्रथम क्रमांक रु. २५, पराग माटेगावकर (लेकुरे ईश्वराची) द्वितीय क्रमांक रु १५ व प्रकाश खेंगरे (चोर सोडून सन्याशाला) तृतीय क्रमांक रु. १०, स्त्री कलाकार उमा रमण (चोर सोडून सन्याशाला) प्रथम क्रमांक रु २५, प्रतिभा सातवळेकर (लेकुरे ईश्वराची) द्वितीय क्रमांक रु. १५ व रुपा दत्ता (चोर सोडून सन्याशाला) तृतीय क्रमांक रु. १०. सौ. आशाताई कुळकर्णी, सौ. प्रभा गावली व सौ. शाभला पोहणकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

८ अभिनव उपक्रम

यंदा संघाच्या महिला सभासदांनी एक 'सहा कवियत्री व एक समीक्षक' हा अभिनव उपक्रम दि. १५ आक्टोबर, १९७७ ला आयोजित केला. सौ. शोभना चांदूरकर, सौ. मृणाल चिचाळकर, अरुंधती जोशी, सौ. अपर्णा देव, माधुरी पारसनीस व सुनीती सप्रे या सहा कवियत्रींनी आपल्या कविता म्हटल्या तर समीक्षक या नात्याने सौ. सुलभा हेर्लेकर यांनी प्रत्येक कवियित्रीच्या काव्याचा परामर्ष घेतला. अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध कवी अनिल, श्री. आ. रा. देशपांडे होते. शेवटी श्री. शिरीष गोपाळ देशपांडे यांनी आभार मानले.

९ श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय—व्याख्यानमाला :

९.१ विदर्भातील साहित्यिक व संशोधक यांच्या कार्याचा नवीन पिढीला परिचय करून देण्याच्या उद्देशाने यंदा एका नवीन व्याख्यानमालेला अभ्यास मंडळातर्फे प्रारंभ करण्यांत आलेला आहे. या व्याख्यान मालेतील पहिले पुष्प डॉ. सौ. आशा सावदेकर यांनी **कै. नीळकंठ बळवंत भवाळकर– व्यक्ती आणि कार्य'** या विषयावर दि. २० ऑक्टोबर, १९७७ ला गुंफले.

९.२ **शासकीय वाचनालयाची बहुमोल देणगी** :—महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संचालनालय, मुंबई, यांचे कडून श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाला महाभारताचे अठरा खंड (संस्कृत) देणगीदाखल मिळाले. या बहुमोल संदर्भ ग्रंथाच्या देणगीबद्दल ग्रंथालय संचनालयाची संस्था ऋणी आहे.

९.३ **डॉ. सौ. शकुंतलाबाई खोत यांची ग्रंथ भेट** :— डॉ. सौ. खोत यांनी संदर्भ ग्रंथालयाला **'नाट्यस्वागत स्वरूप व समीक्षा'** तसेच **'मनोरा'** (कादंबरी) हे दोन ग्रंथ देणगी दाखल दिले. त्याबद्दल डॉ. सौ. खोत यांची ही संस्था आभारी आहे.

९.४ संदर्भ ग्रंथालयाचा एम. ए. चे विद्यार्थी तसेच संशोधक, पत्रकार व संस्थेचे सभासद वाचक फार मोठ्या प्रमाणात उपयोग करीत आहेत.

१०. परीक्षा समिति

प्रथम सत्रात विद्यालयीन ४८८, महाविद्यालयीन ११७, शासकीय ३८ याप्रमाणे एकूण ६०३ परीक्षार्थी सम्मिलित झालेत. त्यापैकी शासकीय परीक्षांचा निकाल पुढील प्रमाणे घोषित करण्यांत येत आहे :—

पारितोषिक प्राप्तकर्ते

परीक्षा विद्यालयीन	परीक्षार्थ्यांचे नांव	केन्द्र	पुरस्कार रक्कम
विद्यालयीन			रु.
१. मराठी प्रवेश	कु. राधा केशव मुन्शी	भा. मा. अध्ययन मंदिर, नागपूर	५-००
२. मराठी परिचय	स. अतिरव आहेमदसहान देशमुख	आंध्र समिती, तेलगू हायस्कूल, नांदेड	५-००
३. मराठी बोध	कु. कामिनी गुणवंत भगत	जनता प्रशिक्षण हायस्कूल, चंद्रपूर	५-००
४. मराठी प्रबोध	बी. कालीदास मलया	आंध्र समिती, तेलगू हायस्कूल, नांदेड	५-००
५. मराठी प्रारंभ	दिवाकर सुकनजी मोहूर्ले	जिल्हा परिषद हायस्कूल, गुंजेवाही	५-००
	प्रकाश मारोतराव साक्रतवार	—,,—	५-००
६. साहित्य विनीत	वसंत मोतीरामजी काळे	भारत विद्यालय, अकोला	१५-००
महाविद्यालयीन			
७. साहित्य परिचित	१ कु. पंचफुला उर्फ कुमुदिनी पवार	शासकीय उच्च माध्यमिक, मुलताई	५-००
८. साहित्य परिचित	२ कु. प्रमिला शंकरराव खलोकर	जगदंब महाविद्यालय, अचलपूर	५-००

परीक्षा विद्यालयीन	परीक्षार्थ्यांचे नांव	केन्द्र	पुरस्कार रक्कम
			रु.
९. साहित्य प्रवोध	कु. अलिमुन्निसा बेगम, तोहीदखां	म्युनिसिपल प्रायमरी, अमरावती	५-००
१०. भाषा स्नातक	चक्रधर नामदेव अडगोकर	म्यु. उर्दू शाळा, अमरावती	१०-००
११. साहित्य स्नातक	कु. चित्रा विनायक पांढरकर	भा. मा. मंदीर, नागपूर	१०-००
शासकीय			
१२. मराठी प्रवीण	कु. विमला एन. गुप्ता	भा. भा. मंदिर, नागपूर	१५-००
१३. मराठी प्राज्ञ	१) श्री. डॉ. प्रकाशचन्द्र वन्सल	भा. भा. मंदिर, नागपूर	२५-००
	२) श्री. ह. म. देशपांडे	भा. भा. मंदिर, नागपूर	१०-००
	३) श्री. नरेन्द्रकुमार वर्मा	भा. भा. मंदिर, नागपूर	१०-००
	४) श्री. वे. सू. गुंटीवार	भा. भा. मंदिर, नागपूर	१०-००
	५) श्री. डी. के. शंकरन	भा. भा. मंदिर, नागपूर	१०-००
१४. केन्द्र पारितोषिक	जगदंव महाविद्यालय, अचलपूर	सर्वाधिक परीक्षा शुल्क सर्वाधिक परीक्षार्थी	५०-००

१. **साहित्य स्नातक** पदवी परीक्षा : बी. ए. मराठी साहित्य समकक्ष कु. चित्रा विनायक पांढरकर : द्वितीय श्रेणीत सर्वप्रथम १० रु. पुरस्कार.

द्वितीय श्रेणी विजयकुमार दुर्गाप्रसाद पाठक, रहेमतुल्लाखां अ. जब्बारखां पठाण, प्रभाकर पांडूरंग कोसनकर, चंद्रभान बाळकृष्ण भोयर.

तृतीय श्रेणी वासुदेव गणपती ठाकूर.

भाषा स्नातक पदवी परीक्षा — बी. ए. आवश्यक मराठी, समकक्ष.

चक्रधर नामदेवराव अडगोकर — द्वितीय श्रेणींत सर्वप्रथम १० रु. पुरस्कार.

तृतीय श्रेणी — मोहमंद एहसानुरहीम शेख मेहताब, मोहमंद एजाजुररहीम, शेख मेहताब, शेख रऊफ अहमद व शेख हुसेन.

९.२ **शासकीय वाचनालयाची बहुमोल देणगी** :—महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संचालनालय, मुंबई, यांचे कडून श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाला महाभारताचे अठरा खंड (संस्कृत) देणगीदाखल मिळाले. या बहुमोल संदर्भ ग्रंथाच्या देणगीबद्दल ग्रंथालय संचनालयाची संस्था ऋणी आहे.

९.३ **डॉ. सौ. शकुंतलाबाई खोत यांची ग्रंथ भेट** :— डॉ. सौ. खोत यांनी संदर्भ ग्रंथालयाला **'नाट्यस्वागत स्वरूप व समीक्षा'** तसेच **'मनोरा'** (कादंबरी) हे दोन ग्रंथ देणगी दाखल दिले. त्याबद्दल डॉ. सौ. खोत यांची ही संस्था आभारी आहे.

९.४ संदर्भ ग्रंथालयाचा एम. ए. चे विद्यार्थी तसेच संशोधक, पत्रकार व संस्थेचे सभासद वाचक फार मोठ्या प्रमाणात उपयोग करीत आहेत.

१०. परीक्षा समिती

प्रथम सत्रात विद्यालयीन ४८८, महाविद्यालयीन ११७, शासकीय ३८ याप्रमाणे एकूण ६०३ परीक्षार्थी सम्मिलित झालेत. त्यापैकी शासकीय परीक्षांचा निकाल पुढील प्रमाणे घोषित करण्यांत येत आहे :—

पारितोषिक प्राप्तकर्ते

परीक्षा विद्यालयीन	परीक्षार्थ्यांचे नांव	केन्द्र	पुरस्कार रक्कम
विद्यालयीन			रु.
१. मराठी प्रवेश	कु. राधा केशव मुन्शी	भा. मा. अध्ययन मंदिर, नागपूर	५-००
२. मराठी परिचय	स. अतिरव आहेमदसहान देशमुख	आंध्र समिती, तेलगू हायस्कूल, नांदेड	५-००
३. मराठी बोध	कु. कामिनी गुणवंत भगत	जनता प्रशिक्षण हायस्कूल, चंद्रपूर	५-००
४. मराठी प्रबोध	बी. कालीदास मलया	आंध्र समिती, तेलगू हायस्कूल, नांदेड	५-००
५. मराठी प्रारंभ	दिवाकर सुकनजी मोहूर्ले	जिल्हा परिषद हायस्कूल, गुंजेवाही	५-००
	प्रकाश मारोतराव साक्रतवार	–,,–	५-००
६. साहित्य विनीत	वसंत मोतीरामजी काळे	भारत विद्यालय, अकोला	१५-००
महाविद्यालयीन			
७. साहित्य परिचित	१ कु. पंचफुला उर्फ कुमुदिनी पवार	शासकीय उच्च माध्यमिक, मुलताई	५-००
८. साहित्य परिचित	२ कु. प्रमिला शंकरराव खलोकर	जगदंब महाविद्यालय, अचलपूर	५-००

अनुक्रमणिका

परीक्षा विद्यालयीन	परीक्षार्थ्यांचे नांव	केन्द्र	पुरस्कार रक्कम
			रु.
९. साहित्य प्रवोध	कु. अलिमुन्निसा वेगम, तोहीदखां	म्युनिसिपल प्रायमरी, अमरावती	५-००
१०. भाषा स्नातक	चक्रधर नामदेव अडगोकर	म्यु. उर्दू शाळा, अमरावती	१०-००
११. साहित्य स्नातक	कु. चित्रा विनायक पांढरकर	भा. मा. मंदीर, नागपूर	१०-००
शासकीय			
१२. मराठी प्रवीण	कु. विमला एन. गुप्ता	भा. भा. मंदिर, नागपूर	१५-००
१३. मराठी प्राज्ञ	१) श्री. डॉ. प्रकाशचन्द्र बन्सल	भा. भा. मंदिर, नागपूर	२५-००
	२) श्री. ह. म. देशपांडे	भा. भा. मंदिर, नागपूर	१०-००
	३) श्री. नरेन्द्रकुमार वर्मा	भा. भा. मंदिर, नागपूर	१०-००
	४) श्री. वे. सू. गुंटीवार	भा. भा. मंदिर, नागपूर	१०-००
	५) श्री. डी. के. शंकरन	भा. भा. मंदिर, नागपूर	१०-००
१४. केन्द्र पारितोषिक	जगदंव महाविद्यालय, अचलपूर	सर्वाधिक परीक्षा शुल्क सर्वाधिक परीक्षार्थी	५०-००

१. **साहित्य स्नातक** पदवी परीक्षा : बी. ए. मराठी साहित्य समकक्ष कु. चित्रा विनायक पांढरकर : द्वितीय श्रेणीत सर्वप्रथम १० रु. पुरस्कार.

द्वितीय श्रेणी विजयकुमार दुर्गाप्रसाद पाठक, रहेमतुल्लाखां अ. जव्वारखां पठाण, प्रभाकर पांडूरंग कोसनकर, चंद्रभान बाळकृष्ण भोयर.

तृतीय श्रेणी वासुदेव गणपती ठाकूर.

भाषा स्नातक पदवी परीक्षा — वी. ए. आवश्यक मराठी, समकक्ष.

चक्रधर नामदेवराव अडगोकर — द्वितीय श्रेणीत सर्वप्रथम १० रु. पुरस्कार.

तृतीय श्रेणी — मोहमंद एहसानुरहीम शेख मेहताब, मोहमंद एजाजुररहीम, शेख मेहताब, शेख रऊफ अहमद व शेख हुसेन.

सूचना

(१) आगामी परीक्षा दि. ४ व ५ फेब्रुवारी, १९७८ रोजी होतील.

(२) आवेदनपत्रे भरण्याची अंतिम तारीख १५ नोव्हेंबर व केंद्र व्यवस्थापकांनी केन्द्र कार्यालयात पाठविण्याची अंतिम तारीख २५ नोव्हेंबर, १९७७ ही आहे.

(३) शासकीय अभ्यासक्रमात परिवर्तन झाले असून ते फेब्रुवारी, १९७८ च्या परीक्षेपासून अमलात येईल. (जुना अभ्यासक्रम केवळ वैकल्पिक म्हणून फेब्रुवारी, १९७८ साठीच राहील).

प्रा. माणिक बैतुले,
परीक्षा संचालक, वि. सा. संघ.

११. शाखा सभांचे वृत्त

११.१ यवतमाळ :—दि. ७–७–७७ ला कविभूषण ब. ग. उपाख्य अण्णासाहेब खापर्डे यांना प्रा. न. मा. जोशी, प्रा. गोविंदराव देशपांडे, अॅड. म. अ. साकळे यांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. अध्यक्षस्थानी श्री. ब. ना. एकबोटे होते.

दि. २९–७–७७ ला झालेल्या सभा शाखेची सर्वसाधारण सभेत खालील पदाधिकारी निवडून आले. अध्यक्ष– प्रा. गोविंदराव देशपांडे, उपाध्यक्ष– सौ. संजीवनी देशमुख, कार्यवाह– श्री उमेश पत्की, सहकार्यवाह– श्री. रमेश तादगावकर, याच प्रसंगी ज्येष्ठ पत्रकार पंडित विश्वनाथजी सारस्वत यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. गो. वा. पंडित यांचा अमृत महोत्सवी सत्कार करण्यांत आला.

दि. १४–८–७७ ला श्री. म. य. दळवी याचे "साने गुरुजींच्या साहित्यातील सामाजिक जाणीव" या विषयावर भाषण झाले.

दि. ११–९–७७ ला वि. सा. संघाच्या केन्द्रीय कार्यकारिणीच्या सर्व सदस्यांचा सत्कार व साहित्य सोहळा संपन्न झाला. अध्यक्षपदी डॉ. मधुकर आष्टीकर होते. याच प्रसंगी सत्त्याहत्तराव्या वर्धापन दिनानिमित्य व नेहरु साक्षरता पुरस्कार मिळाल्याबद्दल श्री. आ. रा. देशपांडे 'अनिल' यांचा आणि नागपूर विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख झाल्याबद्दल डॉ. वि. बा. प्रभुदेसाई यांचा सत्कार करण्यांत आला.

दि. १८–१०–७७ ला श्री. ब. ना. एकबोटे यांच्या निवास स्थानी शाखासभेची सर्वसाधारण सभा झाली.

११.२ उमरखेड :—दि. १८–८–७७ ला संघशाखा सभेची साधारण सभा होऊन त्यात अध्यक्ष—प्राचार्य रा. स. चितलांगे, उपाध्यक्ष– प्रा. बा. दा. जोशी व डॉ. सोनी, सचिव– प्रा. रा. कृ. कुळकर्णी, सहसचिव– प्रा. द. अं. जोशी, श्री. अ. द. दलाल, कोषाध्यक्ष—श्री. अ. ह. पोटे, सदस्य सर्वश्री (१) म. या. गांधे, (२) यशवंतराव भीष्म, (३) तु. रा. दादेगावकर, (४) शरद वान्नेरे, (५) मधुकरराव वेदरकर, (६) जयपुरकर, (७) केशवराव भागवत, (८) अंबादास साकळे, या पदाधिकाऱ्यांची निवड झाली.

अनुक्रमणिका

११.३ लाखनी:—दि. ६-१०-७७ ला शाखा सभेचे उद्घाटन श्री. वसंतराव वरखेडकर यांच्या हस्ते झाले.

११.४ भंडारा :—दि. १३ जुलै, १९७७ ला शाखा सभेचे उद्घाटन नाट्य कलावंत श्री. किशोर कुमार काकडे यांचे हस्ते झाले. अध्यक्षस्थानी श्री. द. त्र्यं. साठे होते. याप्रसंगी कवीसंमेलन आयोजित करण्यांत आले. यात श्री. राम आस्वले, श्री. व सौ. केकरे, सर्वश्री श्यामराव नंदूरकर, श्याम चेपे, सौ. सुधा कापरे, खादीवाला लांजेवार या कवींनी भाग घेतला.

दि. २४ आगस्ट, १९७७ ला कथा कथनाचा कार्यक्रम झाला. त्यात श्री. फेडंग, कु. माधुरी देव, श्री. रहाटे, श्री. भास्करराव पांढरीपांडे, श्री. गो. रा. लांजेवार, श्री. पांढारकर यांनी भाग घेतला. श्री. भास्करराव पांढरीपांडे यांनी समारोपाचे भाषण केले.

दि. १० सप्टेंबर, १९७७ ला सर्वसाधारण सभा झाली. त्यात खालील पदाधिकारी निवडून आले. अध्यक्ष—श्री. प्रल्हाद पांढारकर, उपाध्यक्ष – श्री. निळकंठ रणदिवे, चिटणीस—श्री. राम आस्वले, सहचिटणीस— कु. माधुरी सुतोने, कोषाध्यक्ष – श्री. अरुण निर्वाण व सोळा सदस्य.

११.५ पांढरकवडा :

पांढरकवडा येथे नवीन शाखासभा स्थापन करण्यांत येवून त्यात खालील पदाधिकारी निवडून आले. अध्यक्ष— श्री. श्रीकांत होटे, कार्यकारी अध्यक्ष – प्रा. सौ. लिला हरिश्चंद्र भोळे, उपाध्यक्ष— प्रा. दादाराव तानवाजी मनगटे, सचिव— श्री. हरिश्चंद्र माधवजी भेले, सहसचिव— श्री. रमेश गणपतराव मंथनवार व इतर सहा सदस्य.

११.६ दिग्रस :—

दिग्रस येथे नवीन शाखा सभा उघडण्यांत आली. या सभेचे उद्घाटन प्रा. शेवडे (खालसा कॉलिज, मुंबई) यांचे हस्ते झाले.

या वर्षासाठी खालील पदाधिकाऱ्यांची निवड करण्यांत आली. अध्यक्ष –प्रा. ज. रा. कस्तुरे, उपाध्यक्ष— सौ. मालती पाटील, कार्यवाह— प्रा. ज. सा. गवळीकर, कोषाध्यक्ष— प्रा. सौ कविता पाटील व इतर सहा सदस्य.

इतर शाखासभांचे वृत्तांत अद्यापपर्यंत हाती आलेले नाहीत.

अनुक्रमणिका

साभार पोच

('युगवाणी'कडे दि. १ सप्टेंबर, १९७७ ते ३१ ऑक्टोबर, १९७७ पर्यंत खालील पुस्तके भेटीदाखल आलीत)

१. **शतरुपा** (काव्य) कवी राजीव (चंद्रकांत महामुनी), प्रकाशक : देवदत्त प्रकाशन, १९५, शुक्रवारपेठ, सोलापूर, पृ. १०३, मूल्य रु. ८.

२. **अरुण कोल्हटकरांच्या कविता** : प्रकाशक अशोक शहाणे, ३९, नाथमाधव, कांदिवली (पूर्व), मुंबई-४०००६७, पृ. १३१, मूल्य रु. २०.

३ **स्वरोवर** (काव्य) : कवी लक्ष्मीकांत प्रामाणिक, प्रकाशक: कार्यवाह, मराठवाडा साहित्य परिषद, सन्मित्र कॉलनीजवळ, औरंगाबाद, पृ. ५६, मूल्य रु. ७.

४ **सार्थ श्रीज्ञानेश्वरी** संपादक व अनुवादक म. शं. गोडबोले, प्रकाशक श्री विद्या प्रकाशन, २५०, अष्टभुजा मार्ग, शनिवारपेठ, पुणे-३०, पृ. ९१२+३९, मूल्य रु. ६०.

५ **शोधशिल्प** (शोधनिबंध) लेखक रामचंद्र चिंतामण ढेरे, प्रकाशक विश्वकर्मा साहित्यालय, २०३५/२, सदाशिवपेठ, टिळक पथ, पुणे-४११०३०, पृ. २१६, मूल्य रु. २०.

प्रकाशक नागपूर प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर १२.

६. **फॉरिन रिटर्ण्ड** (सामाजिक नाटक) लेखक हेमन्त कानिटकर, पृ. ८८, मूल्य रु. ७.


७. **मानवोपनिषद** लेखक पुरुषोत्तम यशवंत देशपांडे, पृ. १९८, मूल्य रु. २२.

८. **जन-अरण्य** (कादंबरी) लेखक शंकर, अनुवाद– अशोक शहाणे, प्रकाशक अमेय प्रकाशन, रूईकर मार्ग, नागपूर-२, पृ. २२६, मूल्य रु. २५.



विदर्भ साहित्य संघाच्या यवतमाळ शाखेने दि. ११-९-७७ ला आयोजित केलेल्या साहित्य सोहळ्यात अध्यक्षीय समारोप करीत असताना डॉ. मधुकरराव आष्टीकर. छायाचित्रात (डावीकडून) श्री. उमेश पत्की, श्री. म्हैसाळकर, डॉ. प्रभुदेसाई, डॉ. गेडाम, श्री. आ. रा. देशपांडे, श्री. पां. श्रा. गोरे, श्री. देहाडराय, श्री. सरपटवार व प्रा. देशपांडे हे दिसत आहेत.

वि. सा. संघ, नागपूर, तर्फे
श्री. पु. भा. भावे ह्यांचे स्वागत
दि. २७-१०-७७





विदर्भ साहित्य संघातर्फे
(अकोला शाखा)
श्री.पु.भा.भावे ह्यांचे
अकोला स्थानकावर
स्वागत - दि. २३-१०-७७.



दि.१८-९-७७ ला कवि
अनिल यांचा वि.सा.संघा-
तर्फे झालेल्या सत्कार समारंभ
प्रसंगी. डॉ. आष्टीकर, अनिल,
ना. तिरपुडे.

प्रकाशक - गो. स. देहाडराय, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, नागपूर-१२.
मुद्रक - क. मा. सावंत, अधिक्षक, नागपूर. विद्यापीठ मुद्रणालय, नागपूर. मुखपृष्ठ डिझाईन - भाऊ समर्थ
मुखपृष्ठाचे मुद्रण - मधुकर आर्टस्, धंतोली, नागपूर-१२.

अनुक्रमणिका